पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक –६३

सभावृत्तांत

दिनांक – २०/१०/२०२१ वेळ –दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **ऑक्टोबर -२०२१** ची मासिक मा.महापालिका सभा **बुधवार** दिनांक **२०/१०/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२०व दिनांक २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) तसेच मा. कक्ष अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक-आव्यप्र-२०२०/प्र.क्र.२२५/आव्यप्र-१ दिनांक १७/९/२०२१ अन्वये सभागृहातील आसन क्षमतेच्या ५०% प्रमाणे सदस्यांचे उपस्थितीत आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.अश्विनी संतोष जाधव

६) मा.सारीका शिवाजी सस्ते

७) मा.राहुल गुलाब जाधव

८) मा.वसंत प्रभाकर बोराटे

९) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास

११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.गायकवाड निर्मला मनोज

१५) मा.सागर बाळासाहेब गवळी

१६) मा.गोफणे अनुराधा  देविदास

१७) मा.बारसे प्रियांका प्रविण

१८) मा.अजित दामोदर गव्हाणे

१९) मा.लांडगे सारिका संतोष

२०) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२१) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२२) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२३) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२४) मा.फुगे भिमाबाई पोपट

२५) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२६) मा.सावळे सिमा रविंद्र

२७) मा.लोंढे नम्रता योगेश

२८) मा.लांडे विक्रांत विलास

२९) मा.गिता सुशिल मंचरकर

३०) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३१) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३३) मा.अनुराधा गणपत गोरखे

३४) मा.केशव हनुमंत घोळवे

३५) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३६) मा.अश्विनी भीमा बोबडे

३७) मा.योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे

३८) मा.संजय बबन नेवाळे

३९) मा.भालेकर प्रविण महादेव

४०) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४१) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४२) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४३) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४४) मा.पवळे सुमनताई मधुकर

४५) मा.चिखले सचिन तुकाराम

४६) मा.यादव मीनल विशाल

४७) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४८) मा.राजू मिसाळ

४९) मा.शैलजा अविनाश मोरे

५०) मा.बाबर शर्मिला राजू

५१) मा.अमित राजेंद्र गावडे

५२) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५३) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५४) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५५) मा.ढाके नामदेव जनार्दन

५६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५७) मा.करुणा शेखर चिंचवडे

५८) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५९) मा.भोईर सुरेश शिवाजी

६०) मा.अपर्णा निलेश डोके

६१) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६२) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६३) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६४) मा.जयश्री वसंत गावडे

६५) मा.कोमल दिपक मेवानी

६६) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६७) मा.सुलक्षणा राजु धर

६८) मा.शाम गणपतराव लांडे

६९) मा.सुजाता सुनिल पालांडे

७०) मा.योगेश मंगलसेन बहल

७१) मा.कदम निकीता अर्जुन

७२) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७३) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७४) मा.नढे विनोद जयवंत

७५) मा.पाडाळे निता विलास

७६) मा.काळे उषा दिलीप

७७) मा.कोकणे संतोष अंकुश

७८) मा.पवार मनिषा प्रमोद

७९) मा.अभिषेक गोविंद बारणे

८०) मा. अ‍ॅड.भोसले सचिन सुरेश

८१) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८२) मा.बारणे माया संतोष

८३) मा. निलेश हिरामण बारणे

८४) मा.दर्शले रेखा राजेश

८५) मा.कलाटे राहुल तानाजी

८६) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८७) मा.ममता विनायक गायकवाड

८८) मा.कामठे तुषार गजानन

८९) मा.चोंधे आरती सुरेश

९०) मा.कस्पटे संदिप अरुण

९१) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९२) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९३) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९४) मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९५) मा.कुटे निर्मला संजय

९६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९७) मा.आंगोळकर सागर सुनिल

९८) मा.मुंढे उषा अंकुश

९९) मा.कदम शशिकांत गणपत

१००) मा.लोखंडे चंदा राजू

१०१) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०२) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०३) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०४) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०७) मा.नवनाथ दत्तू जगताप

१०८) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०९) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११०) मा. संजय मल्हारराव वाबळे

१११) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

११२) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११३) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११४) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.प्रमोद भोसले-मुख्य लेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.लोणकर, मा.खोत, मा.मा.चारठाणकर, मा.इंदलकर, मा.दुरगुडे-उपआयुक्त, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.कुलकर्णी - सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.देशमुख, शिंदे -सहाय्यक आयुक्त, मा.ओंभासे, मा.भोसले-कार्यकारी अभियंता, मा.गावडे- मुख्य अग्निशामक अधिकारी व मा.पाटील-प्राचार्य (आयटीआय) व मा.पानसरे सुचिता-प्र.क्षेत्रीय अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर** – उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा. ज्ञानेश्वर थोरात – मा.महापौर साहेब, शरद रणपिसे – काँग्रेस आमदार व विधान परिषदेचे गटनेते यांचे निधन, ह.भ.प. ताजुद्दीन महाराज शेख - जेष्ठ किर्तनकार यांचे निधन, क्रांतिविरांगना हौसाताई पाटील– क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कन्या यांचे निधन, द. मा. मिरासदार - जेष्ठ साहित्यिक व विनोदी लेखक यांचे निधन, अरविंद त्रिवेदी – जेष्ठ अभिनेते व खासदार यांचे निधन, पुछ सेक्टरमध्ये दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीमध्ये ५ शहीद जवान, क्षितीजा आनंद व्यवहारे – बिबवेवाडी येथील कबड्डीपटू यांचे निधन, हरिदास नायर यांचे निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

( विशेष उल्लेखनीय कामगीरीबद्दल कुमारी माधुरी गरुड, श्री. दशरथ गायकवाड, सौ. सविता गायकवाड, मा. ऋतुराज गायकवाड, मा. ह.भ.प. सतिश महाराज काळजे, श्री. प्रसाद पाटील

यांचा मा.महापौर, मा. उपमहापौर, मा.अध्यक्ष-स्थायी समिती, मा. सत्तारुढ पक्षनेते, मा. विरोधी पक्षनेते व सर्व पक्षांचे गटनेते यांचे हास्ते सन्मान करणेत आला.)

महापौर – सभेच्या पुढील कामकाजाला सुरवात करण्यात येत आहे.

मा. सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. माई आता श्रध्दांजली वाहताना माऊली थोरातांनी एक उल्लेख केला आहे. १४ वर्षीय कबड्डीपटू क्षितीजा व्यवहारेचा. मला वाटतं की आपण कमीत कमी या पंचवार्षिक मध्ये १० वेळा तरी आपण हया पध्दतीची श्रध्दांजली वाहिलेली आहे. कालच मी शेल पेट्रोलपंप येथुन शंकरवाडीचे जे मंदिर आहे तेथून येत होते. तीन मुले होती आणि ६ मुली होत्या. त्यातील एक मुलगा त्या मुलीला इतक अतोनात मारत होता की ते त्याला कुठल्या पध्दतीने थांबवायचे हेही आम्हांला कळत नव्हतं. माई आजजर आपण बघितलं तर आपली पोलीस यंत्रणा ज्या पध्दतीने काम करते पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड महापालिका परिसरात आहे. पण पोलीस यंत्रणा ज्या पध्दतीने काम करते ज्या वेळेला क्षितीजाचा अंत झाला त्यावेळेला माई आपल्याला भिती वाटायला लागली. आज आपल्याला ५०% महिलांचे आरक्षण आहे तरी आपण सुरक्षित किती आहोत याचा विषय पदोपदी रोज सारखा लक्षात येतो. आज जर आपण कामासाठी पीसीएमसी मध्ये काही कामासाठी रात्री बाहेर गेलो माई तर आपण पाहिलं तर प्रत्येक रस्त्यामध्ये वेगळे व्यवसाय करणा-या महिला तीथे उभ्या राहताना दिसतात ज्या पहिल्यांदा एवढया दिसत नव्हत्या. माई माझ्याच वॉर्डाचा अभ्यास केला तर २- ३ ठिकाणे अशी आहेत की जिथे संध्याकाळी महिलांना जाता सुध्दा येत नाही. हा जो विषय आहे दोन वर्ष कोविड मुळे शाळा बंद आहेत, आता आपल्या शाळा सुरु होणार आहेत. आज आपण ८ वी ते १० वी चे वर्ग सुरु केले आहेत. थोडया दिवसांनी सरकार संपूर्ण शाळा सुरु करेल. हा जो सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे आयुक्त साहेब तुम्हांला प्रश्न आहे की आपण आणि आपले पोलीस आयुक्तालय हया दोघांनी मिळुन पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील महिलांच्या सुरक्षिततेचा विषय कुठल्या पध्दतीने हाताळण्याचा ठरवलेल आहे. कारण प्रत्येक ठिकाणी बघितलं तर प्रत्येक गल्लीमध्ये प्रत्येक रस्त्यावर मुलींची चेष्टा, प्रत्येक गल्लीमध्ये घाईघाईत एखादा बॅनर लावला तर काढायचा फक्त प्रयत्न करतात मात्र बाकीचे जे चाललय त्याच्यासाठी तुम्ही कुठल्या पध्दतीने प्रयत्न करता याचं उत्तर आयुक्त साहेब तुम्ही आम्हांला द्यायचय. आज ५०% आरक्षण घेऊन सभागृहात आम्ही महिला बसतोय. पण आमचा आवाज तुमच्यापर्यंत पोहोचतो का. माई तुम्ही सुध्दा आमच्या आई आहात. आज आमच्या भगिनी म्हणुन तुम्ही ज्या पध्दतीने सहकारी म्हणुन महापौर पदावर बसलात मागे सुध्दा आपला विषय झाला होता की जर आयुक्तालय इथे असेल तर पिसीएमसी साठी आपण कुठल्या पध्दतीने काम करतोय याचे उत्तर आयुक्त तुम्ही आम्हांला द्या. ज्या पध्दतीने रेग्युलरली आम्ही महिलांची अवहेलना होताना आम्ही पाहतोय त्या अवहेलनेचं

उत्तर आयुक्तसाहेब तुम्ही आम्हांला द्या. पोलीस आयुक्तांलयामध्ये तुम्ही कुठल्या पध्दतीची यंत्रणा आमच्या साठी राबविता येईल याचे उत्तर तुम्ही द्यावे लागेल. या प्रश्नाचे उत्तरानंतर महापौर मला परत बोलायचय.

मा. महापौर - आयुक्त सो. सुजाताताईंनी जो प्रश्न मांडलेला आहे त्याला आपण उत्तर द्यावे.

मा.आयुक्त – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. मा. सुजाता मॅडम यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो निश्चितपणे या विषयी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मला वाटतय या विषयी काही स्टेप जे महापालिका म्हणुन आपण घेत आहोत यामध्ये पूर्ण शहरामध्ये सीसी टीव्ही नेटवर्क आपण खुप लवकरच शहरामध्ये पेरणार आहोत. त्यामध्ये सर्व प्रकारचे जे काही पब्लीक प्लेसेस आहेत त्या कव्हर करण्याच नियोजन झालेल आहे त्याचे टेंडर डॉक्युमेंट सर्व रेडी आहे पुढच्या एक आठवडयाच्या आत ही प्रोसेस सुरु होणार आहे. मला वाटतं यामुळे आपल्याला त्या प्रकारच्या ज्या घटना आहेत त्यांचे वेळेवर डिटेक्शन आणि त्यानंतर इमिजिएट ऍक्शन कारण पोलीस जे मुख्यालय आहे याची जी कमांड आणि कंट्रोल सिस्टीम असणार आहे तीही आपल्याबरोबरच एका ठिकाणी असणार आहे. तरी ही एक स्टेप ब-याय अंशी या समस्येला एक तोडगा म्हणुन आपल्याला बघता येईल. मला वाटतं या विषयी ज्या काही घटना होत आहेत तर त्यांचा योग्य पध्दतीने पाठपुरावा करणे खूप गरजेचं आहे. तुम्ही आता ज्या घटना मेन्शन केल्या मी स्वत: पोलीस कमिशनरांशी चर्चा करतो आणि या विषयी जे काही करणे गरजेचे आहे किंवा या सभागृहामध्ये या विषयी ज्या काही सूचना असतील त्यानुसार काम करण्यासाठी प्रयत्न केले जातील. आपले शहर वाढत असताना जेवढया प्रमाणामध्ये पोलीस स्टेशन व पोलीस चौक्या असण्याची गरज आहे त्याचंही ऍसेसमेंट करणे खूप महत्वाचे आहे. हया घटना वारंवार ज्या एरियात घडत आहेत किंवा तिथे आपले पेट्रोलिंग असो किंवा जे काय पोलीसांचे नियोजन आहे त्या विषयी लक्ष देणे गरजेचे आहे या विषयी पोलीस कमिशनर बरोबर इव्हन सन्मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली पुढील काही दिवसांमध्ये आम्ही एक मिटींग निश्चित बोलावू व या सर्व बाबींवर विस्तृत चर्चा करु. कारण मला वाटत महिलांची सुरक्षा ही सर्वात महत्वाची प्रायॉरिटी आहे. एक शहर म्हणुन आणि एक शहर प्रशासन म्हणुन ती आपली जबाबदारी आहे. निश्चितपणे फ्युचर मध्ये या विषयी योग्य ती कार्यवाही करण्याचे या महासभेला आश्वासन देतो, धन्यवाद.

मा. सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. मा. आयुक्त मागे जेव्हा श्रावणजी हर्डीकर होते त्यावेळेला आमच्या सगळया नगरसेवकांची व नगरसेविकांची एक मिटींग आयुक्तांबरोबर लावली होती. मा. आयुक्त आमचे सगळयांचे जे वॉर्ड आहेत ना ते वेगवेगळया पध्दतीचे आहेत. माझ्या वॉर्डात वायसीएम हॉस्पिटल आहे, डी.वाय. पाटील इंजिनिअरींग कॉलेज आहे, डी. वाय. पाटील हॉस्पिटल, नर्सिंग कॉलेज आहे. माझ्या वॉर्डात येणारा जाणारा जो लोंढा आहे तो

वेगळया पध्दतीचा आहे. आज माझ्याकडे वल्लभनगर एस.टी. स्टँड आहे. नाही म्हटले तरी परप्रांतिय १००० ते १५०० बसेस माझ्याकडे तीथे रात्रीच्या मुक्कामाला येतात. त्यावेळेला या बसेसचा जो ड्रायव्हर असेल, जो कंडक्टर असेल, जो कोणी माणूस असेल त्यांवी कुठलीही नोंद आमच्याकडे नसते. आज तीथे छेडछाडीचे प्रकार एवढे वाढलेत कमिशनर साहेब की त्या अनुषंगाने तुम्हांला लवकर काम करावेच लागेल. मागे सुध्दा माई आपली एक मागणी होती की स्वतंत्र महिला पोलीस चौकी असावी. कारण आम्हांला जर एखादा विषय झाला तर डिरेक्टली आम्ही एखाद्या चौकीत जातो तर महिला थोडया घाबरतो की कोणत्या पध्दतीने कंम्प्लेंट नोंदवायची. आमची ही एक विनंती असेल की स्वतंत्र महीला पोलीस चौकी किंवा पोलीस स्टेशन हे पिसीएमसीसाठी असाव. त्याचबरोबर आपले जे ८ प्रभाग आहेत त्या ८ प्रभागासाठी स्वतंत्र महिला पोलीस चौकी असावी एवढी तुम्हांला मी विनंती करते आणि मला वाटतं ही सूचना आपण ग्राहय धरावी.

मा. उषा मुंढे – मा. महापौर साहेब, सूचनेस माझे अनुमोदन आहे.

मा.अजित गव्हाणे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. आवर्जुन उपस्थित असलेले शिरुर विधानसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोलजी कोल्हे व पत्रकार, महापौर, आयुक्त मा. सुजाताताई पालांडे यांनी महत्वाचा विषय घेतला आहे व हा विषय आपल्याला संपुर्ण पिंपरी चिंचवड मध्ये अनुभवायला मिळतो. याच्यामध्ये आपली महापालिका नेमक काय करीत आहे व काय करणार आहोत या संदर्भातील नियोजन आयुक्त सो. सांगण्याचा प्रयत्न केला. आगामी काळामध्ये आपण सीसी टीव्ही कॅमेरे बसवायचा प्लॅनिंग आहे. या अनुषंगाने महापौर साहेब आणि आयुक्त साहेब मला एका महत्वाच्या विषयाला या ठिकाणी वाचा फोडायची आहे. गेल्या काही दिवसापासुन महापौर साहेब आपण पाहतोय की स्मार्ट सिटीचा जो प्रकल्प आपल्या शहरासाठी ख-या अर्थाने एक मानाचा तुरा अशा प्रकारचा प्रकल्प राबविण्यास घेतला. सुरुवातीच्या काळामध्ये आपल्या शहराला स्मार्ट सिटीमध्ये घेतलं गेलं नाही आणि मग आपण त्या वेळेस आपल्या सगळयांना वाईट वाटले की आपलं शहर एवढं चांगलं असताना आपल्या शहराचा स्मार्ट सिटीमध्ये अंतर्भाव झाला नाही आणि त्या वेळेस खरं म्हणजे आपण त्याच्या पूर्वीच ख-या अर्थाने आपलं शहर एक स्मार्ट शहर म्हणुन ओळखलं जात होतं. बेस्ट सिटीचा पुरस्कार मिळाला. आपल्याला स्वच्छतेचाही पुरस्कार त्या काळात मिळाला. आपला स्मार्ट सिटीमध्ये होण्यासाठी आपण सर्व या साठी प्रयत्न करु लागलो. आम्ही सगळयांनी आदरणीय अजितदादा पवार साहेबांची भेट घेतली त्यांच्या माध्यमातुन शरश्चंद्र पवार साहेबांना आम्ही त्या ठिकाणी भेटायला गेलो दिल्लीला आणि त्यांना विनंती केली की आपल्या पिंपरी चिंचवड शहराचा अंतर्भाव स्मार्ट सिटीमध्ये व्हायला पाहीजे कारण ख-या अर्थाने देशातील शहरे निवडली आहेत त्यात आपले शहरही एक उत्कृष्ट शहर आहे आणि त्याचा हयाच्यामध्ये अंतर्भाव झालेला नाही. मग पवार

साहेबांनी ताबडतोब त्यावेळी मा.वेंकय्या नायडूजीकडे ते खातं होतं त्या ठिकाणी वेंकय्या नायडूंजी कडे आम्हां सगळयांना जाण्याची साहेबांमुळे संधी मिळाली आणि साहेबांनी त्या ठिकाणी त्यांना  सांगितलं की आमच्या शहराला हयाच्यात तुम्ही घेतलं पाहीजे. त्यावेळेस वेंकय्यांजीनी सांगितले की तुमचे शहर हयातुन राहुन गेलय. आमचंही बँगलोर  शहर त्यातुन राहून गेलयं. परंतु नंतरच्या काळात जेव्हा कधी संधी मिळेल तेव्हा १०० टक्के तुमच्या शहराचा अंतर्भाव करु आणि काही दिवसानंतर  नवी मुंबईनी जेव्हा बॅकआऊट केल त्या वेळेस आपल्या पिंपरी चिंचवड शहराला त्यात घेण्यात आले. १००० कोटीचा निधी  केंद्र सरकार, राज्य सरकारच्या, महापालिकेच्या  माध्यमातुन आपल्या शहराला स्मार्ट सिटीचं प्रत्यक्षात काही इतर शहरांच्या तुलनेत व पुणे शहराच्या तुलनेत आपल्याला काम करायला संधी मिळाली आणि आपण सर्व जण आनंदात होतो की आपल्या शहराच्या नंतर का  होईना त्याच्यात समावेश करण्यात आलेला आहे.परंतु जेव्हा महापौर साहेब ती प्रक्रिया राबवली गेली  त्या वेळेस सुध्दा आमची मागणी होती की तुम्ही ऑनलाईन प्रक्रिया राबविली गेली आणि ऑनलाईन केल्यामुळे काय झालं की ज्या ठिकाणी ऑनलाईनमध्ये आय.टी. मध्ये काम करणारा क्राऊड मोठया प्रमाणात आहे त्या ठिकाणच्या लोकांनी त्याच्यामध्ये मागणी नोंदवली आणि त्या मध्ये मला वाटतं पिंपळे सौदागर असेल पिंपळे गुरव असेल किंवा राजू मिसाळांचा  निगडी प्राधिकरणाचा भाग असेल हया लोकांनी जास्तीची मागणी नोंदविली. त्यामध्ये तुम्ही पिंपळे सौदागर आणि पिंपळे गुरव हा भाग सुरुवातीच्या काळात निवडला. वास्तविक महापौर साहेब जो भाग दुर्लक्षित होता उदा. आमच्या भोसरीतील समाविष्ट गावाचा भाग जर त्यात घेतला गेला असता तर त्याचा अधिक  फायदा झाला असता. आपण जे ऑलरेडी डेव्हलप्ड भाग होते त्या डेव्हलप्ड भागावरती आपण काम  करायला घेतले आणि त्या दृष्टीकोनातुन त्या ठिकाणी कामही सुरु झाले. माझ्या माहितीप्रमाणे ४ प्रकारचे वेगवेगळे टेंडर्स त्याच्यात काढण्यात आले. एल अँड टी असेल टेक महिंद्रा असेल आणि अजुन वेगळे २ अशी ४ कामांची विभागणी महापौर साहेब त्यामध्ये झाली. आणि एल अँड टी चे काम आहे आपण सर्वजण जे पेपरला वाचतोय ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातुन अनेक वेळा आयुक्त साहेब आपल्याकडे तशी मागणी करण्यात आली. त्यासाठी ज्येष्ठ नगरसेविका सीमाताई सावळे सुध्दा तशाच प्रकारची मागणी गेले दीड दोन वर्ष  करत आहेत. या कामामध्ये मोठया प्रमाणात चुकीच्या पध्दतीने काम केली गेलेली आहेत आणि त्यामध्ये जी काही अनियमितता दिसते ती आपल्यासमोर आणण्याचा प्रयत्न अनेक वेळा अनेक लोकांनी केला आहे आणि त्याच्यामध्ये आता जो एल अँड टी चा जो प्रकार आहे एल अँड टी ला जी २५० कोटीची निविदा देण्यात आली त्याच्यातला जो आपल्या समोर आलेला विषय आहे त्यामध्ये आयुक्त साहेब त्याच्यात मुख्यत: टेक्निकल सँक्शनच  घेण्यात आलेली नाही. म्हणजे महापालिकेच्या इतिहासातील हे पहिलं काम असेल की त्यात आपण टेक्निकल सँक्शन महापौर साहेब घेतलेलं नाही. आपण २ लाखाचे काम असेल, ३ लाखाचे काम असेल त्याला टेक्निकल सँक्शन घेतो असं असताना आपण २५० कोटीच्या कामाला महापौर साहेब टेक्निकल सँक्शन घेतले गेले नाही ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे आणि ते टेक्निकल सँक्शन....

मा.महापौर – इथे जो विषय महिलांबाबत मांडला आहे त्या बद्दल बोला. मी तुम्हांला बोलायला नाही म्हणत नाही.

मा. अजित गव्हाणे - १०० टक्के त्या विषयाबद्दल बोललो आहे. हा विषय महत्वाचा नाही का. ज्या करदात्या नागरीकांच्या पैशाचा प्रश्न आहे. विषय चुकीचा आहे का . नागरीकांच्या हिताचा नाही का.

मा. महापौर – १०० टक्के महत्वाचा आहे. महिलांच्या बाबतीत विषय मांडला आहे त्या विषयावर बोलणे आवश्यक आहे. जो विषय आता चालू आहे त्या विषयावर बोलावे. मा. सुजाता पालांडे यांनी महिलांचा जो विषय मांडला आहे त्या विषयावर बोलावे.

मा. अजित गव्हाणे – पिंपरी चिंचवड शहराच्या हिताच्या विषयावर बोलत असल्याने तुम्ही मला अडवू शकत नाही. तो माझा अधिकार आहे.

मा. महापौर – आयुक्तांना पण आम्ही सूचना केलेल्या आहेत. जेव्हा तो विषय येईल तेव्हा बोला.

मा. अजित गव्हाणे –. महापालिकेनी जी कामे १००० कोटीची कामे काढली आहेत त्यातल्या २५० कोटीच्या कामाला टेक्निकल सँक्शन घेतलेले नाही महापौर साहेब. तुम्हांला असं म्हणायचय का ते बरोबर आहे.

मा. महापौर – हे पहा. विषय आल्यानंतर तुम्ही बोला.

मा. अजित गव्हाणे - तो विषय नाही अजेंडयावर. मला हया विषयावर बोलायचय सभागृहामध्ये. सभागृहाला कळलं पाहिजे काय चाललय ते.

मा. महापौर –आयुक्तांचा तो विषय आहे. आयुक्तांनी त्यांचे पध्दतीने त्यांचा खुलासा मांडलेला आहे.

मा. अजित गव्हाणे – मा. महापौर मला १००० कोटीच्या विषयाबाबत मला सभागृहामध्ये बोलायचे आहे. माझा तो अधिकार आहे मा. महापौर आणि तुम्ही मला अडवू शकत नाही

मा. महापौर – १०० टक्के. मी नाही म्हणत नाही.

मा. अजित गव्हाणे – मा.महापौर साहेब, हा सुध्दा महत्वाचा विषय आहे. महापौर साहेब आपल्या प्रत्येकाच्या प्रभागामध्ये खोदाई झाली. प्रत्येक प्रभागात कुठल्या नगरसेवकाला माहिती खोदाई झाली. कुणी पण सांगावं. तुमच्या प्रभागात जेव्हा खोदाई झाली तेव्हा कोणी स्थापत्य विभागाला माहित होतं का खोदाई झाली. खोदाई केल्यानंतर त्याच्यामध्ये जेव्हा आम्ही अधिका-यांना फोन केले की ही खोदाई कशा प्रकारची आहे तेव्हा त्यांनी सांगितले की ही खोदाई स्मार्ट सिटीची आहे आणि ती खोदाई केल्यानंतर जेव्हा आमच्या लक्षात आलं की ही खोदाई स्मार्ट सिटीची आहे. स्थापत्य विभागाला माहिती होतं का बिल्कुल माहित नव्हतं. मग

आम्ही अधिका-यांना सांगितले की तुम्हाला स्मार्ट सिटीच्या कामाची माहिती आहे का. मला काय कुठल्याही नगरसेवकाला की त्यांच्या त्यांच्या प्रभागात खोदाई झाली त्यांना त्यानंतर कळालयं की स्मार्ट सिटीची खोदाई आहे महापौर. किती चुकीचं आहे. आपण जे चांगले रस्ते होते ते डांबरीकरण केलेले रस्ते अनेक ठिकाणची खोदाई केली आणि खोदाई करताना कुठल्याही प्रकारचं नियोजन नाही. स्थापत्य विभागाला कल्पना नाही. त्या विभागाच्या नगरसेवकांना माहित नाही आणि तशा प्रकारे तुम्ही कामं सुरु केली आणि काम सुरु झाल्यानंतर माझ्या प्रभागात सांगतो माई आपण त्या ठिकाणी जेथे खोदाई झाली मी अधिका-यांना सांगितले की काम थांबवा कारण माझ्या येथे दोन ऍक्सिडेंट झाले. त्या खोदाईच्या कामात दोन लोक पडली. आमच्या भागामध्ये जास्तीच्या शाळा आहेत. शाळांच्या मुलांना आणि नागरीक तेथे जात होते. आणि मागच्या वेळेस हा विषय जेव्हा सभागृहात आला त्या वेळेस हा विषय मी काढला होता. आणि त्या वेळेस जेव्हा खोदाईमध्ये लोकं पडली तेव्हा मी स्थापत्य विभागाला विनंती केली की ताबडतोब ते बुजवा. ते बुजवले कोणी स्थापत्य विभागाने. प्रत्यक्षात या टेंडरमध्ये महापौर साहेब ते कॉंट्रॅक्टरचे काम होतं. मागच्यावेळेस तो विषय काढला होता रिस्टोरेशनचा. ही जबाबदारी कोणाची होती त्या कॉंट्रॅकटरची जबाबदारी होती. आयुक्त साहेब कुठल्याही प्रकारचे रिस्टोरेशनचे काम त्या संबंधित ठेकेदारांकडून झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. हे सगळं काम पिंपरी चिंचवड मनपाच्या स्थापत्य विभागाने केलेले आहे. किती मोठं नुकसान आहे हे महापौर साहेब त्याच्यामध्ये महापालिकेचं. पर्यायाने नागरीकांच्या पैशाचं नुकसान करतोय आपण.हे करताना दुसरा मुद्दा असा की ज्या ठिकाणी खोदाई झाल्यात, मी नंतर त्याच्या खोलात गेलो. तर त्याच्यामध्ये खोदाई किती करायची आणि किती खोदाईला नेमकं काय काय करायचे हे सुध्दा ठरलेले असते. प्रत्यक्षात तसं झालय काय तुम्ही चला आयुक्त साहेब. प्रत्येक ठिकाणी तुम्हांला घेऊन जातो. तुम्ही जर तशा पध्दतीने प्लॅनिंगनी काम केलं असेल तर आम्ही विरोध करणार नाही पण वस्तुस्थिती काय महापौर साहेब तुम्ही कुठल्याही भागात जा शहराच्या त्या ठिकाणी तशा पध्दतीचे काम झालेले नाही. मोठया प्रमाणामध्ये हया कामामध्ये चुकीच्या पध्दतीचा कारभार झालाय त्या कामामध्ये भ्रष्टाचार झालाय. हा जो भ्रष्टाचार होतोय टन्की प्रोजेक्ट ७५० कि.मी.चे काम त्याच्यामध्ये काढले गेले आहे हे जे मी एल अँड टीचे जे मी सांगतोय ७५० कि.मी.चे आपल्याकडे तेवढे रस्ते आहेत का महापौर सो, बिल्कुल नाहीत. प्रत्यक्षात ५०० किमी चे काम झालेले आहे आतापर्यंत. आता परवा आम्ही आयुक्त साहेबांना आमचे अध्यक्ष आणि आम्ही भेटायला गेलो की तेव्हा आयुक्त साहेबांनी आम्हांला सांगितले की आम्ही ५०० किमी चे काम केलय आणि आता उर्वरीत काम बघु आम्ही केव्हा कसं करतोय. जेव्हा ५०० किमी चे काम होते तेव्हा तुम्ही ७५० किमी चे कॉन्ट्रॅक्ट काढताय महापौर साहेब त्यावेळेस त्याच पध्दतीचे ठेकेदार येणार आहेत आणि मग त्याच्यामध्ये रिंग होतात. रिंग झाल्यामुळे एलअँड टी चा जो कॉन्ट्रॅक्टर आहे एल अँड टी काम करतय का, बिल्कुल करत नाही.

एल अँड टी नी कुणाला काम दिलय दुस-याला सब कॉन्ट्रॅक्टरला दिलयं. सब कॉन्ट्रॅक्टरनी कोणाला काम दिलय तिस-या सब कॉन्ट्रॅक्टररला. म्हणजेच मुळात टेंडर मध्ये सबकॉन्ट्रॅक्टर नेमण्याचा अधिकार नव्हता आणि जर होता तर १५ दिवसात जे तुम्ही सब कॉन्ट्रॅक्टर नेमलय त्यांनी त्या बोर्डासमोर किंवा प्रशासनासमोर आलं पाहिजे. तुम्ही त्या ठिकाणी सब कॉन्ट्रॅक्टरनेमला होता ते सांगितलं पाहिजे होतं. प्रत्यक्षात तसं झालयं का बिल्कुल झालेलं नाही. आणि जर तुम्ही सब कॉन्ट्रॅक्टर्स नेमायचे तर त्यांच्याकडे काय क्षमता आहे त्या लोकांनी जे काम केलय ती क्षमता आहे का त्यांच्याकडे काम करायची बिल्कुल नाही. इतक्या मोठया प्रमाणात सबकॉन्ट्रॅक्टर आपण करुन या शहरातील काम केलं गेलं आणि चुकीचं केलं गेलं. आता तुम्ही कुठेही चला आयुक्त साहेब तुम्ही या कामाची चौकशी करा अशी आमची मागणी आहे. परवा तुम्हांला आमच्या पक्षाचे अध्यक्षांनी आणि नगरसेवकांनी आपल्याला मागणी केली आहे की तुम्ही या संबंधित कामाची चौकशी लावली पाहिजे आणि तुम्ही चला ठिकठिकाणी आम्ही तुम्हांला घेऊन जातो नाही तर तुम्ही चला आम्हांला घेऊन त्या साईटवर आपण जाऊ आणि तिथे त्या पध्दतीचे काम झालय का तुम्ही दाखवून द्या आम्हांला. इतका प्रचंड भ्रष्टाचार हया कामामध्ये झालेला आहे त्यामुळे महापौर हा आपल्या शहरातील नागरीकांच्या करदात्यांच्या पैशाची लुट आहे त्याच्यामुळे आमची ही आग्रही मागणी आहे की जे काही चुकीच्या पध्दतीने कारभार हया स्मार्ट सिटीच्या अंतर्गत झालेला आहे हयाच्यावरती सखोल हयाची चौकशी झाली पाहिजे आणि हे सगळं जनतेपुढे आले पाहिजे. नेमका कशा पध्दतीने हा चुकीचा कारभार झालेला आहे. हे तर २५० कोटीचे काम झाले. परंतु याच्या व्यतिरिक्त उरलेली जी तीन पॅकेजेस आहेत महापौर त्याच्याही मध्ये खुप मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे हया सर्व कामांची सखोल चौकशी व्हावी अशी माझी आग्रही मागणी आहे.

मा. सीमा सावळे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. आज या सभेला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे खासदार मा. डॉ. अमोल कोल्हे साहेब आवर्जुन उपस्थित आहेत. म्हणजे राष्ट्रवादीच्या सर्व सदस्यांनी लक्षात घ्यायचे आहे की तुमच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी इथे आलेले आहेत. तुम्ही सभागृहात बसतात विरोध करत नाहीत हे तुम्ही लक्षात घ्या, तुम्ही चुकीच्या कामाला विरोध करत नाहीत म्हणुन पक्षाकडून तुम्हांला निरीक्षक आलेले आहेत आणि त्यांचे अभिनंदन. त्यांना या ठिकाणी येऊन या सभागृहाचे कामकाज बघायला यावं लागते यातच सर्व आलेल आहे. आम्ही बोलायला संधी देत नाही असं होतच नाही. कारण की ख-या अर्थाने जर विरोधी पक्ष स्ट्राँग असता तर आता जे स्मार्ट सिटी वर तुम्ही बोललात हे तुम्ही स्मार्ट सिटी बद्दल पुर्वी बोलला असतात तर याचे केव्हाच तुम्ही तीन तेरा आणि नऊ बारा करु शकला असता याच्यासाठी सुध्दा सीमा सावळेंला पत्र द्याव लागतं. विरोधी पक्ष म्हणुन तुम्ही तुमची भूमिका योग्य रितीने पार पाडली नाही. मा. माई आज गेल्या अनेक महिन्यानंतर आपण या सभागृहामध्ये सभेसाठी उपस्थित झालेलो आहेत. मा. महापौर मागच्या वेळेसच आपल्याला खरं तर ऑफलाईन सभा

घेण्याचा आदेश आलेला असताना सुध्दा आपण १७ तारखेला आदेश आल्यानंतर सुध्दा २० तारखेची ही सभा ऑनलाईन घेतली. आम्ही सुध्दा सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक आहोत परंतु नगरसेवक असताना सुध्दा अनेक विषयांवर बोलायची इच्छा असते. आता सुजाता ताईंनी जो विषय मांडला तो महिलांच्या सुरक्षिततेच्या संदर्भातील होता. त्याच्यावर कमिशनरांनी जे उत्तर दिलं, खरं तर तुमची डयुटी आहे का आणि नाही का तर डयुटी आहे पण, आणि पोलीस प्रशासनात तुम्ही नसल्यामुळे तुम्ही ठोसपणे उत्तरपण दिल नाही त्यामुळे आम्ही जो प्रश्न सांगितला त्याच्यावर तुम्ही जे उत्तर दिलं मी कॅमेरे लावतो, कॅमेरे लावतो म्हणजे सार्वजनिक ठिकाणी कॅमेरे लावणार. त्यांचा जो प्रश्न होता त्याचा अर्थ गंभीर होता आणि खोलवर होता. महापालिकेच्या आत अशा प्रकारची अनेक महिलांची पत्रं येतात त्याचेवर सुध्दा आपण कार्यवाही करीत नाही, तो सुध्दा अत्याचारच आहे माझ्या पर्समध्ये ते पत्र आहे ते पटलावरती तुम्हांला मी देते. आमच्या स्वीमिंग पुलवर अशा प्रकारची छेडछाडीची अनेक प्रकरणं मा. योगेशभाई ज्या वेळेस महापौर होते त्या वेळेस सुध्दा सभागृहात आलेले आहेत. बॅडमिंटन कोर्टवरती अशा प्रकारच्या महिलांच्या छेडछाडीचे, मुलींच्या छेडछाडीचे प्रकार घडतात ते सुध्दा विषय हया सभागृहात आले आहेत. आपली जी सिक्युरिटी आहे आपण मोठा गाजावाजा करुन त्या काँट्रॅक्टरवर कारवाई केलेली आहे. ते काँट्रॅक्टर जे त्या ठिकाणी सिक्युरिटी नेमतात त्यांची शारीरीक क्षमता काय असते, त्यांचं बॅकग्राऊंड काय असतं, खरच ते गुन्हेगार असतात की नसतात अशी कुठलीही पडताळणी न करता त्या ठिकाणी सिक्युरिटी नेमले जातात अनेक गोष्टी त्या ठिकाणी घडलेल्या आहेत. आम्हांला ते विचारायचे होते तुम्हांला ज्याला तुम्ही सपशेलपणे बगल दिलेली आहे. म्हणुन तुमचा विषय असताना सुध्दा या सभागृहात तो मुद्दा उपस्थित करताना एवढं निश्चितपणे म्हणायचे होते सुजाता पालांडेना की त्यांनी या ठिकाणी काय मुद्दा मांडला पाहिजे. परंतु तुम्हांला विषयाचं गांभीर्य नाहीयं. तुम्हांला घाई असते खूप बोलायची. मी बघतो मी करतो मला सगळं माहिती आहे. पण काही विषय आमच्याकडून पण समजुन घ्या. आम्ही अशिक्षित माणसं आहोत. तुम्ही सुशिक्षित आहात. त्यामुळे तुम्ही जे बोलता तेच बरोबर असतं आम्ही जे बोलतो ते मुर्ख ठरतो हे वारंवार तुम्ही तुमच्या कृतीतुन दाखवुन दिलेलं आहे आणि म्हणून मा. महापौर साहेब आपण आता स्विमींग पुल चालू केले आहेत त्या स्विमींग पुलवरती कुठल्या प्रकारची सिक्युरिटी नेमायची. महिला सिक्युरिटी आहे का आपल्याकडे, नाही. आपल्याकडे जी कमिटी होती महिलांवर अत्याचार केले एखाद्याने काही पत्रं लिहिली व फोटोग्राफ काढलेत, व्हॉटसएॅप चॅट केलेले आहेत अशावर ती कमिटी होती. तुम्ही माहिती घ्या मा. महापौर साहेब गेल्या अनेक वर्षात त्यांच्या बैठका झालेल्या नाहीत. म्हणुन काय तक्रारी कमी झाल्या आहेत का? तर अजिबात नाही. त्या तक्रारी आहे तशा आहेत आणि त्याच्यावर कुठलीही सुनावणी झालेली नाही. मा. कमिशनरांना विनंती आहे की अशा प्रकारच्या विषयांवरती आपण जाणिवपूर्वक लक्ष देणे फार गरजेचे आहे. मा.अजितदादा गव्हाणेंनी आता जो स्मार्ट सिटीचा विषय काढला आहे मी टोचुन बोलले असेल पण मी खरं

बोलले. स्मार्ट सिटीवरती मा. महापौर साहेब हा भ्रष्टाचार आहे का, भ्रष्टाचार झालायं का तर १०० टक्के भ्रष्टाचार झालेला आहे आणि त्यामध्ये जितके पॉलीटीशियन्स इन्व्हॉल्व्ह आहेत त्यापेक्षा जास्त पटीने ब्युरोक्रॅटस आहेत हयामध्ये अधिकारी आहेत. त्या अधिका-यांवर मा. कमिशनरांना पत्र दिल्यानंतर त्यांनी काय कारवाई केली त्यांनी सांगावे सभागृहाच्या पुढे. गेले एक वर्ष झालं मी त्या विषयावर वारंवार पत्र देत आहे. पॉलिटिशियन्स खुप नंतर आले. ब्युरोक्रॅटस पहिले आहेत त्यांचेवर कारवाई करायचे धाडस आहे का, अजिबात नाही आणि म्हणून मा. महापौर साहेब स्मार्ट सिटीचं ते लोढणं आपण आपल्या गळयात बांधुन घ्यायचं नाही. कोणाला काय काय बोलायचं असेल, काय काय आरोप करायचे असतील १०० टक्के कराव, राज्यात सत्ता तुमची आहे. आमची आहे ना आम्ही करतोय परंतु हयांना सुध्दा कळले पाहिजे सत्तेची माणसे आहेत. त्यांना सांगा कारवाई करायला आणि आग्रह धरायला. मा. महापौर साहेब २५० कोटीचे एल अँड टी चे काम असताना आपण त्या ठिकाणी टेक्निकल सँक्शन घेतलेले नाही. कमिशनर साहेब टेक्निकल सँक्शन म्हणजे काय असतं हे माझ्या सारख्या लोकांनी तुम्हांला शिकवायची गरज नाही. परंतु निश्चितपणे सभागृहात सांगते, टेक्निकल सँक्शन का घ्यायचं असतं. तर एखाद्या गोष्टीचे एस्टिमेशन काय. काम जर असेल तर खोदाईला किती खर्च येणार आहे, जेएसबी लागणार आहे का, ब्रेकर लागणार आहे का, मॅन्यूअल करणार असेल तर मॅन पॉवर किती लागणार आहे. त्यासाठी सिमेंट, वीट, वाळू, डस्ट, खडी किती लागणार आहे त्यांचे एस्टिमेट करतात आणि एस्टिमेट हे योग्य आहे की नाही ते तपासण्याचं काम त्या कमिटीकडून होत असते म्हणुन त्याला टेक्निकल सँक्शन घेतात आणि तुमच टेक्निकल सँक्शन न घेतल्यामुळे शहराचा रेडीअस हा ५०० किमी चा असताना ७५० किमी ची निविदा ज्या दिवशी प्रसिध्द झाली त्याच दिवशी २५० कोटीच्या कामामध्ये भ्रष्टाचार झाला हे सांगायला कुठल्याही ज्योतिषाची गरज नाही. इतके क्रिस्टल क्लिअर असताना सुध्दा मा. कमिशनर साहेब आपण कोविडचे कारण काढून मला आपण सुनावणी नाकारली. तुम्ही जर इमानदार आहात, तुम्ही जर स्वच्छ आहात तर तुम्ही जर माझं पत्र वाचले असते तर तुम्हांला लगेच कळालं असतं की आपण हयाची सुनावणी घेणे किती आवश्यक आहे परंतु तुम्ही सुध्दा सुनावणी दिली नाही साहेब. आणि म्हणुन तुम्ही सुध्दा तेवढे दोषी आहात. तुम्ही परवा दिवशी माझी सुनावणी झाल्यानंतरचं मला सांगा तुम्ही अजुनही भालकर साहेबांकडचा हया ठिकाणी कार्यभार काढून घेतलेला नाही. मा. महापौर साहेब विषय निघालाच आहे म्हणुन सांगते वाचून पण दाखवते काय काय मुद्दे होते तर. जसा ५०० किमी रेडीएस असतानी ७५० किमीचे आपण टेंडर काढले ना तसंच त्याच बरोबर आता ते लेईंग करताना, डक्ट करताना मिनिमम मॅक्झिमम ५ फुट खोल खोदायचे आणि मिनिमम २ फुट आहे. २ फुट जर खोदले असेल तर त्या ठिकाणी एक चौकोन करावयाचा असतो आणि तो जो चौकोन आहे तो किती लांबीचा व किती मीटरचा असेल तेवढया मीटरचा करावा लागतो. तो एक काँक्रीटचा बॉक्स करावयाचा असतो. तो कुठेही आपल्याला शहराभरामध्ये केलेला आढळून येत नाही. मी परवा

सुनावणी देताना  कमिशनरांना सांगितलं की  की कमिशनर साहेब आपण सांगाल त्या ठिकाणी जे नकाशे आपले आहेत ज्या ठिकाणी डक्ट क्लीन केलं तिथे बोट ठेवावं. मी २० लाख रुपयाची मशिन हया ठिकाणी विकत घेतलेली आहे आणि त्या ठिकाणी केबल हातभर आहे जमिनीच्या आतमध्ये फक्त स्मार्ट सिटीची केबल आहे का ते पण आपण बघु. त्या ठिकाणी अनेक कंपन्या आहेत ज्यांनी स्वत:चे सुध्दा डक्ट त्या ठिकाणी लेईंग केले आहे. आणि म्हणुन महापालिकेच्या कोटयावधी रुपयांचा महसुल या चोरांनी बुडवलेला आहे आणि म्हणुन ही चोरी उघडकीस आली पाहिजे मा. महापौर साहेब. ही महानगरपालिका चालणार कशी. ही करदात्या नागरीकांच्या पैशावर चालणारी महानगरपालिका आहे. इथे पै पै चा  हिशोब आपण देणं लागतो. हयांच्या चो-या आपण का पचवायच्या आणि म्हणुन कमिशनर साहेब ज्या ठिकाणी आपलं ठरलं होतं त्या दिवशी तुम्ही चांगलं बोलला होता की ताई आपण चला आता जाऊन बघु. मध्येच भालकर साहेब बोलले आणि विषय त्यांनी वळवला. कमिशनर साहेब आपण जर इमानदार आहात, आपण जर स्ट्रेट फॉरवर्ड आहात तर आपण का नाही त्या मुद्दयावर ठाम राहिलात. मी तर तीथ तयारी करुन आली नव्हती ना. तुम्ही कुठल्याही कोप-यात घेऊन चला. त्या ठिकाणी जे डक्ट केलेले आहेत त्या ठिकाणी आपण तपासणी करु. जे नियम पाळले नाहीत नॉर्म्स पाळले नाही  तुमचा सल्लागार तुमचे अधिकारी हे सर्वच्या सर्व तुमच्यासहीत अख्खी कमिटी त्या ठिकाणी दोषी आहे.  मा. सदस्यांनी मागच्या वेळेस सांगितलं असताना स्मार्ट सिटीत भ्रष्टाचार नाही म्हणे. अरे डोळे बंद करु आणि पाहिजे तसे दगड टाकू नाही भ्रष्टाचार दाखवला तर राजकारण सोडून देईन मी. इथे आमचे पैसे जातात. तुम्ही रस्त्यात ठिकठिकाणी खोदुन ठेवलय साहेब. त्या खोदलेल्या रस्त्यांची आज काय परिस्थिती आहे ती बघा.  ज्या करदात्या नागरीकांच्या  पैशावर आम्ही हया शहराचा विकास करतो ना ते नागरीक सुध्दा तुम्ही जेलमध्ये पाठवायला कमी केलेले नाहीत आणि म्हणुन चीड येते हया विषयाची मला तुमची. एखादा नगरसेवक जेलमध्ये गेला ना काही फरक पडत नाही. त्याच नंतर बोट धरायच असतं.  जेव्हा करदाता नागरीक जेलमध्ये पाठवून साहेब आपण विचार केला पाहिजे की आपण आपला पगार सुध्दा त्याच्या टॅक्समधुन निघतो. प्रत्येक गोष्ट मलाच समजते, मीच भारी, माझ्याशिवाय कुणीच भारी नाही असं होत नाही साहेब. हया राज्याला यशवंतराव चव्हाणांचा वारसा आहे. यशवंतराव चव्हाण साहेबांनी मुख्यमंत्री म्हणुन त्यांनी या ठिकाणी  कारभार केलेला आहे. अनेक नेते होऊन गेले आहेत ते काय शिक्षितच होते अशातला काही  भाग नाही आणि म्हणुन त्यांनी काही राज्य बुडविले नाही. त्यामुळे आपण त्या गोष्टीचा किती घमंड करावा तोही एकदा लक्षात घ्या. मा. कमिशनर साहेब दुसरा मुद्दा मी तुमच्यापुढे मांडला होता एल अँड टी नी ज्या ठिकाणावरुन केबल खरेदी केली होती ती प्रोक्युअरमेंटची बीले आहेत. त्या बिलांना व्हाईटनर लावलेला आहे. मा. पोमण साहेब म्हटले की  तो तर कॉंट्रॅक्टरचा विषय आहे. १०० टक्के कॉंट्रॅक्टरचा विषय आहे त्यांनी त्याला ५ रुपयात केबल विकत दिली आहे

आमचं काही म्हणणं नाही. त्याच्यावर १८ टक्के जीएसटी देतो आपण. मग जीएसटी कशावरती देतो आपण संपूर्ण टेंडरच्या कॉस्टवरती जीएसटी हेही बरोबर आहे. पण केबल कुठल्या कंपनीची घेतली हे बघणे तर आपले काम आहे. त्याचा दर्जा काय आहे हे बघणे तर आपले काम आहे. तुम्ही जीएसटी कशावरती दिली. इतकं काय आहे त्यात लपवण्यासारखं. असं तर काही नाही टर्न की प्रोजेक्ट आहे आणि केबलची किंमत कमी असताना तुम्ही त्या ठिकाणी टेंडरमध्ये फुगवुन दाखवली आहे आणि म्हणुन टेंडरची कॉस्ट २५० कोटी वरती गेली. भ्रष्टाचाराला वाव नाही या ठिकाणी साहेब. सरळ सरळ भ्रष्टाचार आहे. बघितलं का विचारा पोमण साहेबांना आज पर्यंत केबल कुठल्या कंपनीची आहे ती. त्यांनी ती केबल सुध्दा पाहिलेली नाही. खोदाईचे काम बॅक टू बॅक १४८ कोटीचे आहे. बॅक टू बॅक शंभर कोटीला बाहेर देऊन टाकलं. सब काँट्रॅक्टर करण्याचा टेंडरमध्ये नियम आहे आणि त्या नियमाचा अंतर्गत तुम्ही केल आहे एकदम बरोबर. परंतु त्या ठिकाणी जर सब काँटक्टर आपण नेमला असेल तर आपण कमिटीला स्मार्ट सिटीच्या कमिटीला कळवणं पूर्व मान्यतेशिवाय आपल्याला करता येणार नाही असे सुध्दा त्यामध्ये आर.एफ.टी. मध्ये नमूद आहे साहेब. जे मास्टर ॲग्रीमेंट आपण एल अँड टी बरोबर केलेलं आहे त्यामध्ये अनेक अटींचा उल्लंघन केलेलं आहे. अट क्र. ४१.३ System Inagurators shall not sub contract any work related to supply installation testing commissioning and O.M. of Smart City feed instructor inferture compressing of passive fibre net work poles gantry etv ETC Model without PCSCL prior return consent. दिलं का सांगा मला आज पर्यंत. आज पर्यंत घेतलं का? कमिटीच्या पुढं आलं का? कोण काम करतय माहिती नाही. जो आहे तो दादागिरी करतोय. मला आताच खोदायचय, आता खोदणार, काय करणार, काय करणार. नगरसेवक तर आमच्या कपाळावर लिहिलेलं आहे, पाठीवर लिहिलेल आम्ही भ्रष्टाचारी आहोत. अधिकारी फक्त चांगले आहेत. पॉलिटिशियन्स सगळे भ्रष्टाचारी आहेत. अरे तुमचा भ्रष्टाचार लपवता लपवता आमच्या नाकीनउ आलय. जो त्या ठिकाणी सल्लागार आहे ना त्या सल्लागारांनी बिले कशी पास केलीत तेही सांगा. त्यांनी ती बीलं चेक केलीत का पण हया अटींचं तुम्हांला काही देणं घेणं नाही तर मग त्या हया टेंडरमध्ये आल्यात कशा. टेंडरमध्ये याचा समावेश काय आहे. तुम्ही टेंडरसाठी अटी शर्ती पाळायच्या नाहीत. तुम्ही परस्पर बिले अदा करायची दादागिरी करायची तुम्ही घरं भरायची आणि आम्ही बदनामी घ्यायची. का आम्ही बदनाम व्हायच. त्याचबरोबर स्मार्ट सिटीमध्ये सर्व पक्षाचे लोक आहेत. सगळयात पहिल्यांदा राष्ट्रवादीचे या ठिकाणी बसलेले विरोधी पक्ष नेते राजू भाई मिसाळ तुम्ही राजीनामा देऊन बाहेर पडायला पाहिजे होतं तिथुन. ज्या दिवशी तुम्हांला कळलं इथे भ्रष्टाचार आहे त्याच दिवशी, तुम्ही पण राजीनामा नाही दिला. देऊन टाकायला पाहिजे होता तुम्ही. तुम्ही पण बाहेर पडला नाहीत अजुनपर्यंत. ज्या

वेळेस एक बोट ज्यावेळी समोरच्याकडे दाखवलं तर चार बोटं आपल्याला सुध्दा सांगतात आपण काय आहे ते. मुद्दा हा आहे महत्वाचा सांगण्याचा. तुम्ही भ्रष्टाचारावरती बोलतात, आम्ही केलेल्या भ्रष्टाचारावरती बोलतात, अभिनंदन आहे तुमच. परंतु या ठिकाणी खरं तर तुम्ही त्या दिवशीच राजीनामा देवून बाहेर पडायला पाहिजे होतं. पदसिध्द आहात ना. ३ च महिने राहिले आहेत. आणि तुम्ही सांगू शकला असता की भाजपच्यात आणि यांच्या संगनमताने चाललेल्या भ्रष्टाचारात मी सहभागी नाही. आम्ही मान्य केले असतं तुमचं. तुम्ही नाही केलं आणि त्यामुळे सुध्दा एक नैतिकता असते ती आपली कुठे तरी कमी पडते की काय त्याच सुध्दा आपण आत्मपरीक्षण करणं तितकच गरजेचं आहे. मा. कमिशनर साहेब हा जो विषय निघाला ना त्याच्यामध्ये आपण १५ दिवसाचा सब कॉंट्रॅक्टरचा नियम फॉलो केला गेला नाही म्हणुन कॉंट्रॅक्टरला फक्त २५० कोटीचे टेंडरला ५० हजाराचा दंड केला आणि ते ही मी तुमच्याकडे १७ वेळा पत्रव्यवहार केला. येऊन आकांड तांडव केला. अनेकांनी लिहील सीमा सावळेला तीथ अमके अमके पैसे खायचेत म्हणुन अधिका-यांवर प्रेशर वापरते. अरे बाबा तुझी अक्कल किती, तु लिहीतोस काय बघ तरी. मी काय म्हणते ते तरी वाच. त्यातही माझं काही म्हणणं नाही बाबा. मला शिव्या देऊन तुझी लेकरं बाळं पोट भरतात, भरु दे. कारण कोणीतरी सांगतय रोज उठुन लिहा. स्मार्ट सिटीचा जसा विषय काढला त्या दिवसापासुन मी काल का परवा माझ्या पत्रकारबंधुना सांगितले की माझी मार्केटला व्हॅल्यु कमी करताय का, लिहा ना. रोज शिव्या देऊन शिवराळ भाषेत खालच्या भाषेत सुजाताताई मगाशी तुम्ही म्हटलात ना काय महिलांवरती अन्याय होतात, अत्याचार होतात, त्याच बरोबर महिला नगरसेवकांवरती ज्या वेळेस म्हशी, टोणगे अगदी खालच्या दर्जाची भाषा वापरतात ना मा. महापौर साहेब तो सुध्दा एक प्रकारचा विनयभंग आहे विनयभंग, अशा लोकांविरुध्द गुन्हे दाखल व्हायला पाहिजेत, होत नाही दुर्दैवाने. हया स्मार्ट सिटीसाठी साहेब आम्ही तुमच्याकडे वारंवार तुमचे उंबरे झिजविले आहेत. हयांच्यावरती काय कारवाई केली सांगा. कॉंट्रॅक्टरनी टर्न की प्रोजेक्ट आणला आणि रुल्स फॉलो केले नाहीत त्यांच्यावर आपण काय कारवाई केली ते सांगा. मा. भालकरांनी डक्ट लेईंग केलं असताना जे काम खरं तर स्मार्ट सिटीने पुर्ववत करण्याची अट असताना सुध्दा जी कामं खोदल्यानंतर पुर्ववत केलेली नाही त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ते सांगा. तुम्ही केलेला भ्रष्टाचार आम्ही अंगावरती नक्कीच घेणार नाही. तीन महिन्यावरती इलेक्शन्स आहेत. आम्ही सफर होणार नाही. तुम्हांला उत्तर द्यावे लागेल आणि तुम्हांलाच कारवाई करावी लागेल. मा. महापौर साहेब एल अँड टी ला एक नाही मा. महापौर साहेब एक नाही तर सतरा सतरा पानांची पत्र येतात, वाचायची पण तसदी घेत नाही. सुनावणी घेताना चार वेळा साहेब म्हणायचे, अच्छा ठिक आहे, ओके. झाले आमचे पुढे चला, हा ठीक आहे, कळलं मला पुढे चला. साहेब खुप इन्सलटींग होतं हो. खुप इन्सलटींग होतं. ऐकुन घ्या. तुम्ही चांगलेच आहात आणि चांगुलपणा माणसाचा तेंव्हा असतोना की ज्यावेळेस

ऐकण्याची सुध्दा  क्षमता ठेवतो. इथे बसलेले १२८ आहेत ना साहेब ते  इथे  येवून कितीही बोलतील आणि वॉर्डात गेलात ना लोकांचं ऐकुन घेतो आणि म्हणून लोक निवडून देतात. तुम्ही ऐकतच नाही. तुम्ही ऐकत नाही आणि म्हणुन प्रॉब्लेम आहे.  या विषयावर साहेब सुनावणी झाल्यावर आपण खरं तर परत ऑन फिल्ड जाणार आहोत आणि माझी तुम्हांला विनंती आहे जाहीरपणे या ठिकाणी विनंती करते मी तुम्हांला त्या दिवशी पत्रकारबंधुंची सुध्दा एक टीम आपल्याबरोबर घ्या. खरंच काय घडलं ते एकदा बघु दया. आज आपण ज्या  ठिकाणी गँट्रीज उभ्या केल्यात त्या पोलची साहेब एकदा  क्षमता बघा काय लेव्हलची त्यांनी त्या ठिकाणी पोल्स उभे केलेले आहेत ते. त्या गँट्रीज काय लेव्हलच्या आहेत. आपण सगळी कार्यालय वायफायला आपण जोडणार होतो. आज झालय  का ते सांगा. कामाची मुदत काय आहे ते सांगा. पावसाळयात हाय कोर्टाचे निर्देश असताना खोदाईला मनाई असताना तुम्ही भर पावसाळयात खोदाईचे या ठिकाणी ऑर्डर दिली. तुम्हांला  ते काम सप्टेंबरच्या आत कम्प्लिट करायचे होते असं तुमचं म्हणणं होतं  आणि म्हणुन  तुम्ही करदात्या नागरीकांना अगदी ३५३ मध्ये जेलला पाठवायला सुध्दा कमी केलेलं नाही. इतकं काम तुमच्यासाठी महत्वाचं होत, आमचे आहेत कमिशनर, कळलं. तुमचे नाहीत. तुम्ही फक्त नावाचे सत्ताधारी राज्यात. ते आमच्यासाठी काम करतात. त्यांना कळली पाहिजे परिस्थिती, स्मार्ट सिटी काय आहे त्यात किती भ्रष्टाचार झाला तर तो लपवुन  त्यांना काम पूर्ण करण्याची घाई झाली. म्हणुन कमिशनर साहेब तुमच्या वरती खरोखर बोलण्यासारखं खुप आहे अनेक विषय आहेत बोलण्यासारखे. परंतु या स्मार्ट सिटीच्या कामामध्ये त्या दिवशी जी  सुनावणी झाली साहेब त्या सुनावणीमध्ये एकीकडे माझं म्हणणं आणि दुसरीकडे प्रशासनाचे मला तुमचे निर्देश काय, तुमचं निरीक्षण काय हे सुध्दा त्या ठिकाणी मला बघायचयं. ते तुम्ही दिलं की सेकंड डेला मी कोर्टात दावा लावणार. आणि हया वेळेस मात्र मी नावासहीत पिटीशन दाखल करणार आहे तुमच्या सगळयांचे . जे जे लोकं त्यामध्ये इन्व्हॉव्ड आहेत त्यांचे. मा. महापौर साहेब स्मार्ट सिटीचा घोटाळा  हा आपण अंगावर घेण्याचं काही कारण नाही. ज्यांनी पैसे कमवलेत आणि ज्यांनी कमवू द्यायला संधी दिली त्यांनी त्यांच बघायचं, त्यांनी त्यांचं बघायचं. रस्ते खोदलेत का. सगळीकडचे रस्ते खोदुन ठेवलेले आहेत. आज त्या ठिकाणी वेगवेगळया कंपन्यांच्या केबल पडल्यात का तर केबल आहेतच आतमध्ये. कमिशनरांनी सांगावं जीओचं असेल, एअरटेलचे असेल, आयडीया असेल हयांच्या सगळयाच्या फोरजी, फाईव्हजी येतातना आता त्यांनी परवानग्या घेतल्या आहेत का बघा. त्या जर घेतल्या नाहीत आणि लोकल केबल  ऑपरेटरनी आपल्याकडून परवानगी घेतली नाही तर त्यांचं आमच्याकडे वायफाय फोरजीचं इतकं फास्ट कसं चालतय. त्याजा  परवानग्या घेतल्या नाही तर, केबलला लेईंग झालेलं त्याच्याबद्दलचंतर आणि दोन प्रकारचा भ्रष्टाचार झालाय. एक १५० कोटीचे काम खोदाईचं आणि पुर्ववत करायचं केबल लेइंगचं  तुम्ही दिलच होत  आणि त्याच बरोबर प्रभाग स्तरावर  आणि शहर स्तरावर जे काय टेंडर निघालेत

डांबरीकरणाचे असतील चर भरण्याचे असतील लेव्हलिंग करण्याचे असतील त्यामध्ये त्यांनी त्यांचे हात धुवुन घेतलेले आहेत त्यामुळे त्यांचेवर फौजदारी झाली पाहिजे. अँटी करप्शनला गेलं पाहिजे. आर्थिक गुन्हे शाखेकडे गेले पाहिजे. अधिकारी असूदे, नगरसेवक असुदे, जे कोणी असुदे त्यांना त्या मध्ये सजा होऊदे. आम्ही याचे भागीदार होणार नाही. आम्हांला गरज पण नाही भागीदार होण्याची बोलण्यासाठी एकूण मुद्दे ३७ आहेत. सगळेच जर मुद्दे आमचे बोलायला लागलो तर त्याचे रेक्टीफाय करत बसतील म्हणुन ते किती चुकतात ते मी पण वाट बघते. ते चुकु नये म्हणुन ८ महिने मी मागणी केलेली मला सुनावणी द्या. तुम्ही दिली नाहीत साहेब. परंतु लवकरच आपण माझं म्हणणं ऐकलेल आहे कारण की अनेक लोकांना उत्सुकता आहे की नेमकं त्या दिवशी मी काय बोलले आणि तुम्ही त्याच्यावरती मला काय उत्तरं दिली. त्याच्या संदर्भात मा. महापौर साहेब कमिशनर साहेबांनी सांगावं. दुसरं असं की महिलांच्या अत्याचाराच्या संदर्भात जो मुद्दा आम्ही जे मुद्दे मांडले आहेत ते मुद्दे अत्यंत गांभीर्याने घेणेचे आहेत. हया ज्या वायफाय सिटी आपण करतो जे कॅमेरे लावतोय या सगळया गोष्टीसाठी या सुरक्षीततेच्या दृष्टीकोनातुन काम चालू आहे त्या कॅमेराचा दर्जा पण तपासा, कुठल्या कंपनीचे सांगितले होते आणि कुठल्या कंपनीचे आपण खरेदी केले. तुम्ही सुध्दा काम करताना अनेक चुका करताय. त्या चुकांचेही एक विषय घेऊन आलेली आहे तो हया विषयात मिक्स् करत नाही. निश्चितपणे महापौरांनी जर दुस-यांदा संधी दिली तर तो एक विषय मा. महापौर साहेब अत्यंत गंभीर विषय आहे. मा. कमिशनर साहेबांकडून चुक घडती, मे बी पॉलीटिकल प्रेशरमध्ये ते चुका करत असतील, मला माहिती नाही किंवा महापालिकेमध्ये यापुर्वी त्यांनी कधी काम केलेलं नाही. त्यांनी कलेक्टर म्हणुन काम केलेलं असल्यामुळे त्यांना माहिती नाही की कुठल्या कुठल्या सक्षम कमिटयांची मान्यता लागते. आणि ती मान्यता नाही झाली तर कमिशनर म्हणुन ते अशा कुठल्याही कामांना मंजूरी देऊ शकत नाही हे त्यांना माहिती नाही. एखाद्याने माहितीच्या अधिकारात माहिती मागितली असता "देऊ ना", "इतकी काय घाई आहे", मी जो पर्यंत सांगत नाही तो पर्यंत द्यायचं नाही कमिशनर साहेब अशी भाषा योग्य नाही आपली. आम्ही सिनिअर मोस्ट नगरसेवक आहोत. आम्ही चो-या तुमच्या उघडकीस आणायच्या म्हणुन याच्यामध्ये आम्ही काम करतोय. आम्हांला चोरी करायची नाही. आम्हांला तुमच्याकडे काही काम मागायला यायचं नाही. सेटलमेंट करायला यायचं नाही. दुरुस्ती व्हावी हा प्रामाणिक उद्देश त्यामध्ये आहे हे जे काही बोलता हे कर्मचारी आहेत ना ते हया महापालिकेचे कर्मचारी आहेत. अनेकांचे नातेवाईक आहेत. तुम्हांला आणि ढाकणे साहेबांना असं वाटत असेल की आपण जे बोलतोय बाहेर जातच नाही. तुम्ही जायच्या आत बातमी बाहेर आलेली असते. दुसरं सर मी परवा सुनावणीसाठी आले तेव्हा आपण म्हणाला की ताई आपण रेकॉर्डींग करणार आहात का व्हेरी सॉरी टु से साहेब मला खुप ते हर्ट झालं. रेकॉर्डींग करणं, चोरुन करणं मी डेअरींग साठी ओळखले जाते या शहरामध्ये. मी जे काय करेल समोरुन वार करेल, पाठीत वार करणा-यातील

मी नक्कीच नाही. आज स्मार्ट सिटी वरती एवढया ताकदीने सभागृहात बोलायची हिम्मत ठेवते म्हणजे इथुन पुढे किती विषय बोलायची हिम्मत ठेवते ते पण मी सांगते. तुम्ही त्या दिवशी बोललात ते चुकीचं आहे. रयतच्या विद्यार्थ्यांनी जे तुमच्या इथे येऊन केलं त्याला कारणीभुत एखादया वेळेस काय होत की तुमची जी बोली भाषा आहे परत एकदा सांगते मी की तुमची बोली भाषा आहे. आणि त्या बोली भाषेत तुम्ही बोलुन जाता. आणि त्यातनं तो समोरचा जो हर्ट होतो त्यातनं जे काही घडतं त्याला सुध्दा जबाबदार तुम्हीच आहात. आणि मला असं वाटतं की आपण त्या दिवशी तुम्ही मला बोललात मला खुप वाईट वाटलं मी खरं तर त्याच दिवशी तुम्हांला सुनावणार होते पण मी म्हटलं जाऊ दे. कधीतरी वेळ मिळेल त्या दिवशी बोलून दाखवू साहेबांना. आमचा तुम्हांला या ठिकाणी बोलण्याचा हेतु एकच आहे आपण जर इमानी आहात, आपण चांगले आहात, आपण सज्जन आहात, आपण स्ट्रेट फॉरवर्ड आहात, आपण जर गरीबीतुन वर आलेले आहात, आपण कलेक्टर झालात, “ताई मी कलेक्टर व्हायनू” हे गरीबीतुन वर आलेलं जे आपण पुस्तक लिहिलेल आहे त्या पुस्तकाशी आपण जर प्रामाणिक राहणार असाल आणि त्याची गरीमा करणार असाल, त्या आईच्या भावनेची जर आपण गरीमा ठेवणार असाल तर हया स्मार्ट सिटीत झालेल्या भ्रष्टाचारावरती तुमच्या अधिका-यांवरती पहिली कारवाई करुन दाखवा, तुमच्या अधिका-यांवरती. आणि मग त्या राजकारण्यांची पण गय करु नकात भले तो कोणी का असेना. एवढे बोलुन मी थांबते जयहिंद जय महाराष्ट्र .

मा. माऊली थोरात – मा. महापौर साहेब, मा. सभागृह, मा. आयुक्त साहेब, मागे बसलेले खासदार मा. डॉ. अमोलजी कोल्हे व सर्व पत्रकार बंधु खरं तर मा. आयुक्त साहेब सुजाताताई पालांडे यांनी चांगला विषय मांडला होता की महिलांच्या सुरक्षिततेचा विषय आपण खरंच किती गांभीर्याने घेतला ते मला कळलच नाही आणि तुम्ही त्या बद्दल किती विचार करता हे सुध्दा मला कळलंच नाही. कारण मी शेतकरी कुटुंबातील मुलगा आहे. माझे वडील सुशिक्षित नव्हते. मला त्यांनी शाळा शिकविली नंतर नोकरीसाठी पिंपरी चिंचवडला आलो. तुम्ही तर सुशिक्षित आहात साहेब. या महिलांचा एवढा मोठा प्रश्न असताना सुध्दा तुम्ही जे उत्तर दिलं ना माझ्या सारख्याला सुध्दा थोडं दु:खद वाटलं, काय उत्तर दिले ताईंनी काय विचारलं तुम्ही उत्तर काय दिलं. तुम्हांला महिलांबद्दल अजिबात आदर नाही हे सिध्द झालेलं आहे. कारण ज्या पध्दतीने कासारवाडीच्या ८ – १० महिला होत्या. नगरसेविका होत्या. इथे आल्या त्या बोलत असताना तुम्ही त्यांचेवर एवढी मोठी कारवाई केली साहेब. त्या काही बांगलादेशातुन आल्या नव्हत्या. भारताचे नागरीक होत्या. पिंपरी चिंचवड मध्ये राहणा-या होत्या आणि कासारवाडीचे माझे नागरीक होते ते. ७-८ महिला होत्या. त्या महिलांची परिस्थिती तुम्हांला माहित होती. तरी तुम्ही त्यांच्यावर तीन तासात कारवाई केली साहेब, तुमच अभिनंदन. खरंच अभिनंदन त्याबद्दल तुम्ही महिलांवर एवढी जोरात कारवाई केल्याबद्दल. साहेब मी काही

विषय घेऊन आलोय. मला काही निनावी पत्रही आलयं तुमच्या वरिष्ठ अधिका-याच. ते वाचून दाखवणार. आणि ते पत्र वाचुन दाखवल्यानंतर त्यांना एक पत्रही दिलं होतं माहितीच्या अधिकारात ३० -९-२१ ला. त्याचं सुध्दा अजुन त्यांनी उत्तर दिलेलं नाही. किती तफावत आहे तुमच्या अधिका-यावर तरी मी दोन तीन विषय मोजके मांडणार आहे. नाशिक फाटयाचा पूल आहे ना साहेब तो मागच्या वेळेस पण तुमच्या समोर विषय मांडला होता. १२ वर्षापूर्वी तो रॅंप झालेला आहे त्याच्यावरुन अजून एकही टुव्हीलर आणि फोर व्हीलर वाहन खाली उतरलं नाही साहेब. त्या रॅंपला जो खर्च झाला नां त्या नागरीकांचा झाला आहे. आणि अधिका-याला आता तुम्ही पोस्टींग दिलेलं आहे. किती तफावत आहे साहेब ज्या न्याय मागायला महिला आल्या त्यांना १४ दिवस जेलमध्ये पाठवताय आणि ज्या अधिका-याने तो रॅंप चुकवला १२ वर्षात एकही वाहन खाली आले नाही त्याला १२ कोटी खर्च आला तुम्ही काय केलं त्याच्याबद्दल. तुम्हांला १२ वर्ष लागली त्याच्यावर कारवाई करायला. काही कारवाई करु शकले नाही तुम्ही. मी साडेचार वर्ष या सभागृहात येत आहे. साडेचार वर्ष झालं. पाणी प्रश्न महत्वाचा आहे जिव्हाळयाचा प्रश्न आहे. मी जसं ऐकतोय तसं १ च टक्का ४०, ३९ ,३८ टक्के गळती सांगतात. का त्याच्यावर परिणाम झाला नाही. आतापर्यंत त्याच्यावर कोणी म्हणलेलं नाही की आम्ही ३९ वरुन ४७ वर गळती आणलेली आहे. एवढं थांबवलेलं त्या अधिका-यांवर काय कारवाई केली तुम्ही. हया सगळया गोष्टीचा तुम्हांला हिशोब द्यावा लागणार आहे. विचार करावा लागणार आहे. म्हणजे तुम्ही जे करदाते आहेत ज्या सर्वसामान्य महिला नागरीक आहेत त्या तुम्हांला प्रश्न विचारायला आल्या, चुकुन काय झालं सगळं बघितलं मी ते ऐकलं. त्या दिवशी सभागृहात नव्हतो, या पालिकेत नव्हतो फक्त तुमच्या बोर्डला शाई लावली होती. म्हणुन १४ दिवस जेल त्यांना आणि हया अधिका-यांनी करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केलाय त्या रॅंपवरुन एकही वाहन खाली उतरले नाही आणि १२ वर्षात तुमचा पेन चालला नाही, कुणी केलं हे. कोणाचे आदेश आहेत हे कोणाच्या सांगण्यावरुन करताय हे आम्हांला या सभागृहाला कळलं पाहिजे. चुका तुम्ही करणार आणि आम्ही नागरीक भोगतोय. कासारवाडीत कसं वागायचं आम्ही. त्या महिलांची काय चुकी होती. मला त्याचं सगळं उत्तर द्यावं लागंल. हया लोकांनी जर चुकीची कामं केलीत ६ महिन्यापूर्वी इथं त्या आशाताई होत्या दापोडीतील नगरसदस्या. एका सर्वसामान्य माणसाचा जीव गेला आणि एक आपला फायरचा अधिकारी शहीद झाला. काय केली त्या अधिका-यावर कारवाई. ज्यांचा मुलगा गेला त्या आई वडीलांना काय वाटलं असेल. इथ तुमचे हात पाय नाही चालत साहेब कारवाई करायला. तिथं तुमचा पेन नाही चालत. इथ तुम्ही सुजाता ताईंना सांगितलं मी बघतो करतो काम चालू आहे. त्या दिवशी कसं तुमचं तीन तासात काम झालं. चौथा प्रश्न माझा आहे की ज्या ठेकेदाराला आपण बोगस बील घोटाळयाला जबाबदार धरलं साहेब आपण जे अधिकारी असतो तो त्या त्या पदाच्या

शिक्षणानुसार त्यांची भरती करत असतो. ठेकेदार सोडून द्या. ते कमवायलाच आले आहेत इथं. तुमचे अधिकारी कुठे गेले होते. बोगस घेतलं होतं ना त्यांनी एफडीआर. काय केलं त्याचं. त्या अधिका-यांना समजलं नाही. का मग त्यांना त्या पदावर घेतलं तुम्ही. अनेकदा शेतक-यांची मुलं येतात ना आम्ही पण आहेत ना. पण त्या पदाला लागणारे त्या शिक्षणाची तुम्ही जबाबदारी घेऊन तुम्ही ती पदं भरलेली असतात. मग त्या अधिका-यांना का कळलं नाही ते बोगस आहे. चुकीचे आहे, काय आहे. हयाला जबाबदार कोण आहे साहेब. मावळमधला विषय आहे. मावळमधला विषय आहे माई त्या वेळेस जे पाईप घेतले आपण कोण इंजिनिअर होता. जागा ताब्यात नव्हत्या सगळं नसताना तुम्ही पाईप लाईन खरेदी केली. आज त्या पाईपलाईनच्या भाडयापोटी लाखो रुपये जातात. कुणाचे जातात साहेब या करदात्यांचे जातात ना. का विचार केला नाही की जागा ताब्यात नाही. तुम्ही पाईपलाईन खरेदी करुन ठेवताय आणि त्या सगळया पाईपलाईन ठेवल्यात त्याचं भाडं किती झालं, तो कुणाचा पैसा आहे. हया सगळया चुका तुमच्या आहेत. इथ बसलेल्या नगरसेवकांवर तुम्ही आरोप करतां. हया नगरसेवकांना तुम्ही अटक करता आणि त्यांच्या बरोबर आलेल्या जनतेला अटक करता तुम्ही. हे मी पहिल्यांदा माझ्या इतिहासात ऐकलं साहेब. आंदोलनं मी पण केली. सगळयांनी इथं सभागृहातल्यांनी केली आंदोलनं. पण त्या कार्यकर्त्यांना १४ दिवस जेलला नाही जावं लागलं. आणि काय आंदोलनं करुन होतं साहेब. २० वर्षात हॉस्पिटलवर येणारे एकही पेशंटला ऍडमिट होताना त्याच बील निघालं रात्री ११.१५ वाजता तुम्ही त्या साहेबाला काय केलं. अजित पवार साहेबांना काय केलं. अतिरिक्त आयुक्त. फक्त त्यांची बदली झाली आणि तो विषय कुठे गेला तो विषय. अहवाल देणार होते परंतु तुमच्याच एका जबाबदार अधिका-याने त्याच्यावर टिपण पण केलं होतं साहेब. ते टिपण करुन सुध्दा तुम्ही त्यांचे ३.५ कोटी अदा केले. हा काय विषय आहे. अजुन एक विषय आहे माझा. परवा मी तुम्हांला फोन केला होता. टाईमिंगही सांगतो. दि. ४/९/२१ ला फोन सायंकाळी तुम्हाला फोन केला होता. तुम्हांला फोन करायला पण आम्हांला भिती वाटायला लागली की फोन करुन टॉर्चिंग केल आणि मला जेलमध्ये टाकलं तुम्हीतर ही सुध्दा आमच्या मनात भिती वाटायला लागली आता. कार्यकर्ते महापालिकेत भेटायला येतात आयुक्त साहेबांना मी म्हणतो थांबा मी महापौर साहेबांना विचारतो. आमच्या सत्ताधारी पक्षाला विचारु द्या. आज सुध्दा मी एवढी डेअरींग केली ना हे सगळे सदस्य माझ्या संग आहेत. सगळयांसमक्ष बोलतोय म्हणुन केली आहे. नाहीतर तुम्ही सुध्दा याच्यावरुन सुध्दा माझ्यावर आरोप करणार आणि मी तुमच्या पीएकडे जाऊन फोन सुध्दा चेक केला साहेब. आता मी वर गेलो होतो. हाच खरा साहेबांचा फोन आहे का. फक्त दोन वेळा फोन केला साहेब. तिस-या वेळेस माझी डेअरींग नाही झाली तुम्हांला फोन करावयाची. सत्य परिस्थिती आहे. कारण

तुम्ही असं काही करता ना मला तुम्ही फोन करुन टॉर्चींग केलं म्हणुन. तुम्हांला आत टाकू शकतो आम्ही. शेवटी अधिकारी आहात तुम्ही. क्लास वन अधिकारी आहात. मी काय सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा. साहेब मला हया सगळया गोष्टीच उत्तर पाहीजे. दुसरा विषय आहे जे प्रभागात बॅनर लावतात ना अतिक्रमण साहेब तुम्ही प्रभागाच्या मिटींगला आला होता ना तेव्हा मी ह प्रभागाच्या मिटींगला सांगितलं होतं अतिक्रमण पिंपरी चिंचवड शहरात मी त्या प्रभागात आहे त्या प्रभागाचे द्वार आहे ते पिंपरी चिंचवड शहर. त्या प्रभागाचं मी तुम्हांला सविस्तर सांगितलं होतं की पिंपरी चिंचवड प्रभाग क्र. २० ला जवळ जवळ ४.५ ते ५ किमी. पुण्यातुन येणारे सगळ त्या प्रभागातुन येतो अतिक्रमण आहे . नाशिक फाटयाचा विषय आहे. सगळा सविस्तर बोललो त्यावेळेस तुम्ही सांगितल्याप्रमाणे की थोरात साहेब मी एक महिन्याच्या आत उत्तर देईन. काहीच नाही उत्तर दिलं तुम्ही. खरं पाहिलं तर या सगळया गोष्टी बघितल्या ना तर फार विचित्र वाटतं. तुम्ही उत्तरच देत नाही. अजुन एक मला निनावी पत्र आलं आहे. ते पण मी वाचून दाखवणार आहे मी तुम्हांला साहेब. त्याची माहिती पण मागवलेली आहे मी पण त्याची माहिती एक महिना झाला तरी मिळालेली नाही. माई पत्र वाचू. मा. नगरसेवक, ज्ञानेश्वर थोरात, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिका आय.टी.आय. च्या प्राचार्याची तक्रार. महोदय, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोरवाडी आयटीआयचे प्राचार्य श्री. शशिकांत पाटील यांची तक्रार आपल्याकडे करत आहोत. आपण त्या तक्रारीचे निवारण करावे ही आपल्याकडे विनंती आहे. आय.टी.आयमध्ये मागील ६ वर्षात झालेल्या नुतनीकरणामध्ये या प्राचार्याने त्यांचा आय.टी.आय.मधील मित्र प्रकाश घोडके या दोघांनी मिळून प्रमाणाबाहेर अफरातफर केली आहे. प्रत्यक्ष खर्च कमी असताना या दोघांनी कंत्राटधाराला हाताशी धरुन किती तरी पटीने जास्त खर्च केला आहे. कोरोना लॉकडाऊनच्या काळात आदेश क्र. ९/२६२६/२०२१ दि. १९/६/२०२१ मा. आयुक्त यांचे आदेशानुसार फक्त ५० टक्के कर्मचारी उपस्थित असताना असे निर्देश असतानाही आपत्ती व्यवस्थापन अधिका-यांची परवानगी न घेता त्या आदेशाला केराची टोपली दाखवुन आयटीआयमध्ये १०० टक्के कर्मचारी उपस्थित केले. गंभीर विषय आहे हा नुकत्याच झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची परंपरेने चालत असलेली जयंती आय.टी.आय.मध्ये हया प्राचार्यानी साजरी केलेली नाही. हा गंभीर विषय आहे साहेब हयाची नोंद घ्या. सबंध महाराष्ट्राला लाज वाटेल अशी घटना महानगरपालिकेत घडली आहे. आयटीआय प्राचार्य सर्व कर्मचारी विशेषत: महिला आणि दिव्यांग कर्मचारी यांचे वार्षिक गोपनीय अहवाल जाणुन बुजुन खराब देत आहेत. महीला आणि दिव्यांग कर्मचा-यांचे शोषण करुन मनमानी बदल्या करीत आहेत. सातवा वेतन आयोग लागू होताना या प्राचार्याने प्रशासनाची फसवणुक करुन स्वत:ला पगार वाढवुन घेतला आहे. महाराष्ट्र शासनाच्या

आय.टी.आय. मध्ये दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारात शिकाऊ उमेदवार हा विभाग फक्त महाराष्ट्र शासनाच्या आय.टी.आय.मध्येच असतो. दुस-या प्रकारात शिकाऊ उमेदवारास विभागीय खाजगी आय.टी.आय.मध्ये नसतो. आपले आयटीआय हे दुस-या प्रकारात येते. पहिल्या प्रकारात मुलींची संख्या १००० पेक्षा अधिक आहे अशी महाराष्ट्र शासनाच्या आय.टी.आय. साठी प्राचार्य पदासाठी वेतनश्रेणी एस- २३, ६७७००– २०८७०० आहे. दुस-या प्रकारात मुलींची संख्या १००० पेक्षा कमी आहे अशा इतर आय.टी.आय प्राचार्य पदाची वेतनश्रेणी एस – २०, ५६१००–१७७५०० आहे. महानगरपालिकेच्या मोरवाडी आयटीआय मध्ये ६०० पेक्षा कमी मुले शिकतात आणि शिकाऊ उमेदवारही नाही वेतनश्रेणी एस–२०, ५६१००–१७७५०० पाहिजे पण या प्राचार्यानी स्वत:च्या अधिकारात स्वत:ला मोठया पगाराची वेतनश्रेणी एस- २३, ६७७००–२०८७०० करुन प्रशासनाची फसवणुक केलेली आहे. आता प्रशासनाची मोठी फसवणुक करुन प्राचार्य पालिका विकुन खात आहे. या प्राचार्यानी प्रशासनाची फसवणुक करुन जास्त मिळवलेला पगार नियमानुसार कमी करुन त्याच्यावर कारवाई करावी. आणि त्यांचेकडून हे पद काढुन घ्यावे ही कर्मचा-यांची आपल्याकडे विनम्र विनंती. महापौर साहेब, यानंतर माहितीच्या अधिकारातील पत्र, त्यांना दि . २३/९/२०२१ ला दिलं. आतापर्यंत कुठलही उत्तर नाही. माझ्या माहितीप्रमाणे नियमाने १५ दिवसात उत्तर दिलं पाहिजे. त्यांनी कुठल्याही पत्राला उत्तर दिलं नाही. आणि जे आमचे आराध्यदैवत आहे छत्रपती शिवाजी महाराज त्यांची सुध्दा जयंती केली का माहित नाही. म्हणुन मी माहिती अधिकारात पत्र दिलं होतं की ते मला मिळेल. पण कुठल्याही पत्राचं उत्तर मला मिळालं नाही. काही केलेलं नाही. साहेब तुम्ही ठरवावं आणि मी आता तिथं मांडी घालुन बसणार आहे जोपर्यंत तुम्ही माझ्या नागरीकावर १४ दिवसाचा कारावास केला तसा माझ्यावर १४ महिन्याचा केला तरी चालेल. मला काही हरकत नाही पण मी तिथे मांडी घालुन बसणार आहे. साहेब या अधिका-यावर किती दिवसात व कशी कारवाई करणार आहे तीन तासात तुम्ही कारवाई केली विद्यमान नगरसेविका आणि माझे कासारवाडीचे नागरीक तर मग हया अधिका-यावर काय कारवाई करणार ते मला सांगा. मला जो पर्यंत उत्तर मिळत नाही मला मुदत देत नाही तोपर्यंत मांडी घालुन बसणार आहे, धन्यवाद.

मा. योगेश बहल - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा.नगरसेवक, मा. नगरसेविका व सर्व पत्रकार बंधु, आणि आज आदरणीय मा. खासदार डॉ. अमोलजी कोल्हे उपस्थित आहेत. मा. महापौर साहेब खरं म्हटलं तर आपण हिंदी सिनेमा पाहिला असेल अजितचा तो खुप चांगल्या पध्दतीने म्हणायचा स्मार्ट, स्मार्ट पोरगा. अनेक गोरगरीबांचा कष्टक-यांच्या पैशावरचा हा डल्ला आहे, लुट आहे ही लुट आणि महापौर साहेब आता भारतीय जनता पार्टीची सन्मा. सदस्य नगरसेवक जे आहेत त्यांनी आता सांगितलं तर मला सुरुवातीलाच मा. आयुक्तांना विनंती करायची आहे की तुम्ही आमच्या सहकारी नगरसेविका आणि त्यांच्या काही

सहका-यांना तुम्हांला राग आला असेल तुम्हांला काही चुकीचं वाटलं म्हणुन त्यांना तुम्ही पोलीसांच्या हवाली केलं किंवा जेलमध्ये पाठवलं. मा. आयुक्त साहेब सीमाताईंनी आता आपल्याला सर्व व्यवस्थित खरं काय झालं काय घडलं ते सांगितलं. माझी सुरुवातीलाच आपल्याला विनंती आहे की हया सर्व सल्लागारापासुन त्या भालकरपासुन त्यांचे सर्व सहकारी डेप्युटी व ज्युनिअर इंजिनिअर जेजे लोक हयामध्ये आहेत त्या सर्वांना ख-या अर्थानं तुम्ही जेलमध्ये पाठवा. आणि हयाच्यामध्ये सब कॉंट्रॅक्टींगमध्ये भारतीय जनता पार्टीचे नातेवाईकांना काम दिलेल आहे. त्यांची पण चौकशी व्हायला पाहिजे. कोण कॉंट्रॅक्टर आहे कोण कोणाचा नातेवाईक आहे.

(गोंधळ)

मा. महापौर – बहल साहेब कोणत्याही पक्षाचे नाव घेऊ नका. आमचा पक्ष भारतीय जनता पक्ष हा राष्ट्रीयीकृत पक्ष आहे आणि मोठा पक्ष आहे. एवढा मोठा कामाचा व्याप आहे आणि त्यामध्ये तुम्ही विषयाला धरुन बोला. अधिका-यां विषयी बोला. पक्षाच नाव घ्यायचं नाही.

मा. योगेश बहल – मा. महापौर साहेब पक्ष मोठा आहे. भ्रष्टाचारही मोठा आहे. मा. महापौर साहेब पक्ष मोठा आहे. मान्य आहे. पक्षाला आम्ही लहान म्हटलं नाही. अरे तुरे बोललो नाही. आम्ही ज्या वेळी बोलतो त्यावेळेला आदरणीय मोदीजीच म्हणतो. आम्ही एकेरी भाषेत बोलत नाही. माझं म्हणणं आपल्याला एवढंच आहे की पक्ष जितका मोठा आहे त्याच्यापेक्षाही मोठा हा भ्रष्टाचार आहे. हा भ्रष्टाचार होत असताना माई तुम्ही एकवेळचे आमचे बरोबरचे सहकारी आहात. तुम्ही सहकारी असताना तुम्ही त्या खुर्चीवर बसलेले असताना तुम्ही असं बोलू नका. सत्ताधारी म्हटलं तर चालेल का. भाजप नाही म्हटलं तर सत्ताधारी म्हणलतर चालेल का. अहो तुम्ही सत्ताधारीच आहात ना. सत्ताधारीने केलेला भ्रष्टाचार आहे. आणि तुमच्या राज्यामध्ये चाललेला आहे. आणि मग मला सांगा मा. महापौर साहेब जर उद्या काही चुकीचं घडत असेल तर मी स्वत: तुम्हांला सांगतो की मी स्वत: नवरात्राच्या आधी या कामाला माझ्या वॉर्डात केबल लेईंग चाललं होतं तेव्हा मी स्वत: बंद केलं होतं. त्यावेळेंला त्या ठिकाणी आमच्या भागातील शशिकांत कोल्हे डेप्युटी इंजिनिअर हे माझ्या ऑफीसमध्ये आले. मी ऑफीसमध्ये नव्हतो. माझ्या ऑफीसच्या लोकांना भेटले म्हटले साहेब कुठे आहेत. ते म्हणाले बाहेर कामाला गेले आहेत. मग फोनवर बोलले. म्हटले साहेब तुम्ही काम बंद करायला सांगितलंय का, का बंद करायला सांगितलयं. मी म्हटलं तुम्ही बघा तुमच्या नियमामध्ये बघा किती फुट खोलीमध्ये ते केबल लेईंगचे काम करायचय. ते एक फुटावर करत आहेत. तुम्ही पाहिलं का. ते मी बघुन घेतो. तात्काळ त्यांनी काम बंद केलं. चुकीचं वाटलं बंद केलं. अर्ध्या तासामध्ये जस सीमाताईंनी सांगितलं अर्ध्या तासात दोन पहिलवान आमच्या ऑफीसमध्ये आले. म्हटले साहेब कुठं आहेत. ते

म्हटले नाहीत. ते म्हणाले आम्हांला साहेबांना भेटायचय काम कोणी बंद केलं. तुम्हांला माहित आहे का काम कोणाचं आहे. ते म्हणाले कोणाचं काम आहे, तुम्हांला माहीती का काम कोणाच आहे. आमचे लोक म्हणाले तुम्हांला काय बोलायचय ते आमच्या साहेबांशी बोला. त्यांनी मला काही फोन केला नाही. मी पुन्हा साहेबांना फोन केला, संबंधितांना. साहेबांना म्हटलं हा काय प्रकार आहे. नाही म्हणले तो ठेकेदार तुम्हांला भेटायला येणार आहे. म्हटल मला ठेकेदार मला भेटण्याची आवश्यकता नाही. काम करायचं असेल तर नियमानं करा नाही तर बंद करा. मी दोन दिवस काम बंद केलं दोन दिवस. दोन दिवस काम बंद ठेवल्यानंतर मला भालकर साहेबांचा फोन आला. ते म्हणाले साहेब काम करु द्या. माझी लोक काम करतील बघतील. वाटलं तर भालकर साहेबांना आता बोलवा. बोलवा. भालकरांना विचारा. किंवा त्या अधिका-यांना बोलवा. त्यांना विचारा. चुकीच्या पध्दतीनें काम चालू होतं म्हणुन काम बंद करायला लावलं. चुकीच्या पध्दतीच्या कामाला कसंकाय संमत्ती देणार आम्ही. अशी परिस्थिती असताना आज एवढया कोटयावधी रुपयांचा टेंडर या पध्दतीने एल ऍण्ड टी इन्फ्राला २५० कोटी, टेक महिंद्राला ४५० कोटी, बी.जी. शिर्केला ३२५ कोटीचे काम, सायबर मॅटीकला ५० कोटीचे काम, मा. महापौर साहेब अशा पध्दतीने जर हे काम होणार असेल तर अशा पध्दतीने जर आपण भ्रष्टाचाराला साथ देणार असाल तर मा. आयुक्त साहेब आपणांकडून आम्हांला अपेक्षा आहे की आपण याची चौकशी केल्याशिवाय हे काम पुढ आपण बंद करावं. सब कॉट्रॅक्टींग झालं आहे तर सब कॉट्रॅक्टींग कोणी केलंय त्याच्यामागे कोण आहे आणि ते नियमामध्ये बसतयं का, त्यांनी वेळेत काम केलेलं नाही, त्या वेळी दंड केला असेल या सर्व गोष्टी आपण तपासुन पाहायला पाहिजेत. मा. महापौर साहेब तुमच्या माहितीसाठी सांगतो जसं सीमाताईंनी आता सांगितलं ७५० कि.मी.च काम ते केलं गेलं वास्तविक पाहता ते काम ५०० ते साडेपाचशे किलोमीटरचे आहे असे असताना ते सल्लागार लोक सल्ला देतात चुकीच्या पध्दतीने सल्ला देतात ना महापौर साहेब मग सल्लागार आले कुठुन, हे चुकीचा सल्ला देतात कसे काय. मग टेक्निकल कमिटी करते काय. आपले इंजिनिअर करतात काय. हे सगळं पाहिलं गेलं पाहिजे ना महापौर साहेब. आज इतकी वर्ष तुम्ही महापौर म्हणुन, नगरसेवक म्हणुन, स्थायी समिती अध्यक्ष म्हणुन काम केले आहे. मग अशा चुकीच्या पध्दतीने काम होत असेल तर कसं काय चालणार हे. काय सांगायचं लोकांना. म्हणुन आम्ही म्हटलं आपल्या राज्यामध्ये आपण आज महापौर आहात. आपल्या पक्षाची सत्ता आहे. असं असताना हे जे काही घडलय ते तुमच्या डोळयासमोर दिसतयं, आता थोरातांनी सांगितलं. मी स्वत: मा. आयुक्त साहेबांना सांगितलं आयुक्त साहेबांनी उचलुन ते विभागीय आयुक्तांकडे देऊन टाकलं. मी म्हणलो की डॉ. आडसकरांची बायको आपल्या महापालिकेमध्ये काम करते. असं असताना कॉंट्रॅक्ट कसं दिलं गेलं. त्यावर पण आयुक्तांनी काही केलं नाही. त्यावरही आपण काही करत नाही. शेवटी

नाईलाजास्तव इथनं काही झालं नाही. इथं काही होत नाही. आपल्याच नगरसेवकांनी सांगीतल की एकही पेशंट नसताना बील अदा झालं. पवारांची बदली झाली. ते निघुन गेले. आपलं प्रशासन काय करतयं. आपल्या आयुक्तांनी प्रशासनामध्ये काही चौकशी करण्याचा प्रयत्न केला का नुसती जबाबदारी ढकलुन दिली. जबाबदारी ढकलुन मोकळे झाले. मा. महापौर साहेब आज सुध्दा अशाच पध्दतीने आता जे पॅरामेडीकल स्टाफ बद्दल जे टेंडर काढलयं पॅरामेडीकल स्टाफबद्दल टेंडर काढताना मात्र टेंडरला तुम्ही बघा ३४० लोकांचे टेंडर काढलयं आणि वर्क ऑर्डर देताना १०५० लोकांची काढली आहे सीमाताई. टेंडर काढताना ३४० लोकांचं टेंडर काढलयं आणि वर्क ऑर्डर देताना १०५० लोकांची काढलीय. काय चाललयं हे. हा भ्रष्टाचार नाही तर काय. जो प्रिंसिपल सिक्युरिटी म्हणुन जो टेंडरमध्ये सहभागी होता चौथा मा. महापौर साहेब अजुनही तुम्हांला आश्चर्याचा धक्का बसेल मी सांगतो टेंडर काढताना वास्तविक पाहता इतक्या घाणेरडया आणि चुकीच्या पध्दतीने टेंडर काढलं की ३४० लोकांची पॅरामेडीकल स्टाफची गरज असताना तिथं लिहिलं गेलय की ५ परसेंट सर्व्हिस चार्जेस सगळयांनी ५ परसेंटच टाकले. आपल्या स्थानिक लोकांना आपल्या स्थानिक नेत्यांना, आपल्या सत्ताधारी नेत्यांच्या सहका-यांना एक काम मिळावं म्हणुन त्याच्याकडं पाठवलं नाही. ज्यांनी बोगस कागदपत्र दिली, त्यांनी बोगस सर्टीफिकेट दिले त्यालाच पात्र केलं. जो योग्य होता मा. महापौर साहेब तो पात्र होता जो पात्र असणारी व्यक्ती आहे तो प्रिंसिपल सिक्युरिटी होता. त्या प्रिंसिपल सिक्युरीटीचे कागदपत्र असताना सुध्दा त्याला बाद केलेलं आहे. आणि दुस-या बाजूला जो बसत नव्हता त्याला बसवलंय तिस-या बाजुला ज्या माणसाकडे लेबर लायसन्स नाही ज्या माणसाने लेबरचे काम कधी केलेले नाही टेंडरची अशी अट असताना वास्तविक पाहता ज्या वेळेला प्रीबीड होते मा. महापौर साहेब त्या वेळेस प्रीबीडमध्ये छोटया मोठया दुरुस्त्या असतात ना किंवा सूचना असतात ना त्या फक्त होतात. पण कॉमन कंडीशन डिलीट होत नाही. मा. महापौर साहेब कंडीशन डिलीट झाली. तिथे टेंडर व्हायोलेशन झालं. इथं भ्रष्टाचार झाला. तिथं संगनमत झालं. तिथंच ऑर्डर दिली गेली. टेंडर काढताना ३४० लोकांचं ऑर्डर देताना १०४० आणि दुस-या बाजुला जो चुकीचे काम करतोय त्याच्याकडे एकही सर्टीफिकेट नाही त्याच्याकडे कुठलेच चेंकींग केले गेलेलं नाही. मा. महापौर साहेब अशा पध्दतीने अंदाधुंद कारभार चालू आहे. आता आपली जनरल बॉडी संपल्यानंतर मी आपला अधिक वेळ घेत नाही. आपली जनरल बॉडी संपल्यावर पत्रकार परिषद घेणारच आहे त्याच्यावर की कशा पध्दतीने काम चालतं कशा पध्दतीने भ्रष्टाचार होतो. किती दिवस गप्प बसायचं आणि का गप्प बसायचं. मा. महापौर साहेब या सर्व गोष्टींची दखल वास्तविक पाहता तुम्ही पण घ्यायला पाहिजे. तुम्ही आयुक्तांना आदेश द्याना. तुम्ही आयुक्तांना आदेश द्या की जे तुमचे संबंधित भ्रष्टाचारी अधिकारी आहेत त्यांना निलंबन करा. त्यांना घरी पाठवा. त्यांना जेलला पाठवा. त्यांची चौकशी का होत नाही. त्यांची चौकशी का होत नाही. बी.जी. शिर्के

सारख्या माणसाला काम दिले त्या कामाबद्दल त्यांनी १ कोटी दंड पण भरला. काम करत नाही तिथं. त्याला कोण त्रास देतयं हे आपण पाहील आहे का. तीकडचे नगरसेवक त्रास देतात. त्याच्या तक्रारी आहेत तशा. तो काम करत नाही पुढचं. महापौर म्हणुन आपण दखल घेतली का. का तो काम करत नाही. कारण तुमच्याकडे तक्रार आलीच नसेल. तुमच्या भागाचं पण नाव आहे त्याच्यामध्ये. पिंपळे सौदागर, पिंपळे गुरवला आपण सव्वा तीनशे कोटीचे काम दिलं आहे. कितीचं काम झालं. मा. महापौर साहेब अशा अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. परंतु आपण हयाची गांभीर्याने दखल घ्यावी. हा जनतेचा पैसा आहे. जनतेच्या पैशाची लुट होतेय, धन्यवाद.

मा.सागर आंगोळकर - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा.नगरसेवक, मा. नगरसेविका व सर्व पत्रकार बंधु, आणि आज या ठिकाणी स्मार्ट सिटी नाही बरेच जे अनुभवी नगरसेवक आहेत ते आपलं मत मांडत आहेत. हयात भ्रष्टाचार झालाय. गेले साडेचार वर्ष माझे सिनिअर सर्व सदस्य हे या विषयावर काहीच बोलले नाहीत. खरं पाहता मी मा. खासदार साहेबांचे अभिनंदन करतो साहेब माझ्या सारख्या नवीन नगरसदस्याला पालिकेत भ्रष्टाचार कसा होतो, काय होतो हे आता कळायला लागलं. कारण विरोधी पक्षनेता किंवा विरोधी पक्ष हा आता कामाला लागलाय असं दिसतयं इलेक्शनचं पाहुन. इलेक्शन जवळ आलंय हे समोर दिसतय. मला एवढंच म्हणायचय मा. महापौर योगेश बहल साहेबांनी जे मत मांडलय खरं पाहता आमचा प्रभाग पिंपळे गुरव पिंपळे सौदागर हा स्मार्ट सिटी अंतर्गत काम चालू असताना जवळपास ९० टक्के कामे तिथं पूर्ण झालेली आहेत. कमिशनर साहेबांना आम्ही या ठिकाणी रिक्वेष्ट केली आहे त्यांनी सुध्दा तीथे व्हिजीट केलेली आहे आणि तुम्हांलाही माहिती आहे. इथं विनाकारण एखाद्या प्रभागाचे व्यवस्थित काम चालू असेल तर विनाकारण त्याचं काम बदनाम करण्याचं काम मला वाटतय या सभागृहात होतय. माझ्या प्रभागात जवळपास ९० टक्के काम पूर्ण झालेली आहेत. १० टक्के जी कामे पूर्ण झालेली नाहीत ती पण दोन तीन महिन्यात पूर्ण होतील आणि दिवाळीपर्यंत स्मार्ट सिटीची सर्व कामे पूर्ण झालेली असतील. मला एवढंच बोलायचय की वैयक्तिक दोष किंवा द्वेष पाहुन आपण राजकीय टीका न करता आमच्या सारख्या नगरसेवकांना तुम्ही जितकं मार्गदर्शन करताल त्यातुनच पुढील भविष्य घडणार आहे. मी एवढंच बोलतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

मा. संदीप वाघेरे –मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा.नगरसेवक, मा. नगरसेविका व सर्व पत्रकार बंधु, धन्यवाद महापौर, आणि संपूर्ण सभागृहाला असं म्हणावसं वाटतंय "दया कुछ तो गडबड है." कारण मा. खासदार डॉ. अमोलजी कोल्हे आज येथे आले आहेत आणि सगळयांचाच आवाज ब-यापैकी वाढलायं आणि खासदार साहेब मी विनंती करतो बरं का दर महिन्याच्या जीबीला तीनच राहिल्या आहेत पण या तुम्ही. कारण दुध का दुध पानी का पानी

पण होईल इथं. विषय चांगलाय महिलांचा विषय आहे. स्मार्ट सिटीचा विषय आहे. माझ्या माहितीप्रमाणे नितीन काळजे महापौर होते त्यावेळेस पहिल्याच जीबीला स्मार्ट सिटीचा वियय होता आणि पर्यावरणचा विषय होता. दोन्ही विषयांवर मी बोललो होतो. बाकी मला वाटतं माझं पहिलंच भाषण असेल कारण की मला कधी भाषण करायची किंवा बोलायची सवय नाही. पण मी जे काही विषय मांडले ते पूर्ण अभ्यासपूर्ण मांडले होते. पोमण साहेबांनी त्यावेळेला २,१८,००० मतदान झाल होत पूर्ण पिंपरी चिंचवड शहरात तुम्हांला माहित नाही कसं मतदान झालं किंवा कसं नोंदवलं गेलं. प्राधिकरणामध्ये ३६००० मतदान झालं, पिंपरीमध्ये ३२००० झालं तर वाकडमध्ये २८००० झालं तर पिंपळे सौदागर मध्ये २२००० झालं तर भोसरी मतदारसंघात १८००० मतदान झालं. पोमण साहेबांनी पिंपळे सौदागर आणि वाकड क्लब करुन ५०००० ते स्मार्ट सिटीचं प्रोजेक्ट तिथं केलं. मी त्यावेळेस वास्तविक पाहता असं म्हटलं होतं की जो स्मार्ट भाग नाही ते काळेवाडी रहाटणी हा बकाल एरिया आहे तिथं स्मार्ट सिटी जरी केली असती तरी चाललं असतं. मी त्या वेळेला म्हटलं होतं की आमचं पिंपरी सुध्दा जिथं महापालिकेची सुरुवात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेपासुन झाली पहिलं पिंपरीला प्राधान्य द्या कारण पिंपरी आमची बकाल राहिलेली आहे. ३५–४० वर्ष झाली पिंपरीला कधी न्याय भेटला नाही, कुठलं काम, कुठला प्रोजेक्ट बाकीच्या गोष्टी कधीच झालेलं नाही. पण दैवसहयोगाने पिंपरीच्या लोकांनी मला निवडुन दिलं. मी माझ्या प्रभागातील भांडुन मला कशाही पध्दतीनं तुम्हांला सर्व सभागृहाला माहिती आहे महापौर तुम्हांला सगळया गोष्टी माहिती आहेत की माझी कामं कशी अडवण्यात आली कुठं अडवण्यात आली मला ती मंजुर करायला किती किती प्रयत्न करायला लागले. पण मी सांगतो आज सभागृहाला ९९ टक्के मी कामं मंजुर करुन घेतलीत आता राहिलय ते मिलिटरी डेअरी फार्म उड्डाणपुलाचं. मी उद्या मंत्रालयात चाललोय ते पण मार्गी लागेल. पण मला म्हणायचं काय महापौर साहेब माहिती का स्मार्ट सिटीमध्ये जो भ्रष्टाचार झालायं असं इथं म्हणतात ते गेले चार जी.बी.पासुन चालू आहे गेले साडेचार वर्ष झाले हा सगळा भ्रष्टाचार चालू आहे. आणि हा राजरोसपणे दिवसाढवळया महापालिकेच्या तिजोरीवरती किंवा केंद्राने जे पैसे पाठविले आहेत त्याच्यावर दरोडा टाकुन इथं ब-याचशा लोकांचा उदरनिर्वाह चालू आहे. माझं घर त्याच्यावरती चालत नाही. मी सधन आहे. माझे माझे उद्योगधंदे व्यवस्थित आहेत. आणि परवा दिवशी अमोलजी कोल्हे साहेब देशाचे नेते आलेले शरद पवार साहेब मी असं म्हणत नाही की मी काही तरी काढणार आहे म्हणुन पण त्यांचच म्हणणं असं होतं की मॉल्स उघडले गेलेत. पण चार-पाच दुकानदार राष्ट्रवादीचे पण आहेत त्याच्यात. मॉल ठीक आहेत. मॉल उघडलेत मॉलमध्ये २०० दुकाने आहेत किंवा १०० दुकानं आहेत पण पाच दहा टक्के पाच दहा दुकानं ही राष्ट्रवादीच्या नेतेमंडळींची पण आहेत ही सत्य परिस्थिती आहे. दिवसा ढवळया हया महापालिकेच्या तिजोरीवर दरोडा टाकायचा आणि चिरीमिरीवरती उदरनिर्वाह करायची कामं इथली लोकं करतात आणि ती प्रत्यक्ष प्रत्येक गोष्टीला त्यासाठी विरोध केला वेळप्रसंगी मी कोर्टातही गेलोय.

१४८ कोटीचं नदी सुधार ड्रेनेज पाईपलाईनचं टेंडर काढलंय. मी वास्तविक पाहता हर्डीकर साहेबांना म्हटलं होतं की अमृत योजनेमध्ये असे असे पैसे शिल्लक आहेत साहेब. आपण ते नदीला म्हणजे ड्रेनेज पाईप लाईन रोडनी करु ते पैसे वाचतील. नवीन टेंडर काढायची गरज नाही. रात्री ३ वाजेपर्यंत महापौर साहेब आपल्या सभागृहात जीबीच्या हॉल्मध्ये बसुन टेंडर काढलं. सहा सात वाजता नारळ फोडला. एचआयटीची परमिशन नसताना सुध्दा हया गोष्टी करण्यात आल्यात. ते काम नंतर थांबवलं गेलं. हयात नुकसान कोणाचं आहे. ज्याला टक्केवारी भेटायची त्याला भेटून गेली. ज्या ठेकेदारानी अबोव्ह रेट मध्ये घेतलं त्याने घेतलं. मी माझ्या प्रभागामध्ये मिलिटरी डेअरी फार्म म्हणजे कासारवाडी एसटीपी ते भाटनगर पर्यंत लाईन करतोय ६.५ ते ७ किमी. त्याचा रेट आहे १३००० पर कि. मीटर म्हणजे १ कोटी ३० लाख पर किलो मीटर आणि आपल्या इथे देण्यात आला त्यात मी जे काम करतोय त्याच कामाला कारण की माझ्या कामामुळे नंतर उपरती नदी सुधारवाल्यांना झाली पर्यावरणवाल्यांना की असे असे काम होऊ शकते. ८ ते ४००००पर किमी म्हणजे पर मीटर म्हणजे ४ कोटी ८० लाख मग ठीक आहे तुम्ही त्याच्यात रिसायकलिंग बाकी जे मेकॅनिकल जे बसवणार आहेत ते किती. वरचे ८० लाख रुपये कमी केले मी जे काम आता करतोय साधारणपणे १ कोटी २० लाखात ते ३० लाखात. दोन तीन कोटीचा सरळसरळ घोटाळा दिसतोय पर किमी. हे काम काढण्यात आलं. नद्यांची लांबी आपोआप वाढली. जी नदी आपण आतापर्यंत म्हणत होतो इंद्रायणी नदी आपल्याला १८ किमी आहे, पहिली ११ होती आता १८ झाली, ठीक आहे तो सर्व्हे मीच करायला लावला. नदी सुधारसाठी एकच टेंडर आलं. हर्डीकर साहेबांना म्हटलं हे ओपन करा. तो विषय चांगला आहे आणि तो आपण मार्गाला लावू. पैसे नाही तर बाँड करु. डीपी नाही तर बेटरमेंटचे चार्जेस लावू. महापालिकेचा इन्कम पण चांगला येईल. १५ -२० हजार कोटी रुपये येतील कारण मी या महापालिकेत विश्वस्त म्हणुन आलोय तर मला विश्वस्त सारखच काम करायच आहे. पण तशा पध्दतीच इथं काम झालेलं नाही. फक्त टेंडर काढायचं त्यात आपल्या आजुबाजूच्या लोकांना बसवायचं, द्यायच, आणि त्यातनं जे काय आहे म्हणजे कोल्हे साहेब तुम्ही पण वाईट नका मानुन घेऊ की राजकारण हा तुमचा पिंड नव्हता. तुम्ही स्वत: वैयक्तिक डॉक्टर आहात आणि चांगले ऍक्टर पण आहात. म्हणजे तुमची राजा शिवछत्रपती, संभाजी हया मालिकाही चांगल्या गाजल्या आहेत. राजकारणाकडे तुम्ही धंदा म्हणुन बघत नाही. तसंच राजकारण आम्ही धंदा म्हणुन बघत नाही. तुमचा प्रवास उलटा झालाय तसाच माझाही झालायं. म्हणजे मी बिझिनेसमधुन राजकारणात आलोय. तुम्ही जसं तुमच्या पेशातुन राजकारणात आलात. पण इथं बरीच लोकं अशी आहेत की त्यांनी राजकारण हा आपला धंदा केलेला आहे. जे आज इथं आहेत किंवा इथुन पूर्वी झालेत साधारणपणे १००० एक नगरसेवक आतापर्यंत महापालिकेत होऊन गेलेत गिनीचुने १० लोकांचीच त्यांची प्रगती उदरनिर्वाह करुन घेतला बाकीच्या लोक मग देशोधडीला पण लागलेले आहेत. पण आयुक्त साहेब तुम्हांला एक

सांगतो राजकारणी लोक जेवढा भ्रष्टाचार करतात त्याच्या व्यतिरिक्त अधिका-यांचा सर्वात जास्त भ्रष्टाचार आहे. अधिका-यांचा भ्रष्टाचार दिसुन येत नाही. राजकारण्यांचा लगेच दिसुन येतो. राजकारणी माणसाने समजा आता मारुतीची गाडी वापरत असेल आणि बोलेरो घेतली किंवा फॉर्च्युनर घेतली किंवा लँड क्रुझर घेतली तर हयांनी पैसे खालले बरं का अशा पध्दतीने हे काम चाललं आहे आणि आयुक्त साहेब खरं तुम्हांला म्हणजे मी बघतोय एक सहा महिने झालेत तुम्ही स्ट्रेट फॉरवर्ड वागता, पण आयुक्त साहेब तुमच्याकडे मे महिन्यात एक विषय दिला होता मागच्या जीबीला तुम्ही विषय मंजुर केलात माझ्या पिंपरीतील स्मशानभूमीचा विषय होता. हे सलग गार्डन करायचं होतं. मध्ये स्मशानभूमीचं रिझर्व्हेशन इकडे २ एकर इकडं ५ एकर असे दोन रिझर्व्हेशन. तुम्हांला तो विषय पटला. तुमच्याच महापालिकेच्या दोन जुन्या मिळकती होत्या. हर्डीकरांकडे तो विषय होता पण राष्ट्रवादीच्या काही लोकांनी तो विषय थांबवला. आयुक्त साहेबांना सर्व परिस्थिती माहिती आहे. आणि कोल्हे साहेब तुमच्याच राष्ट्रवादीच्या दोन लोकांनी मला पत्र दिलं की संदीप वाघेरे तुम्ही तो विषय घेऊन गेले ते बरोबर आहे आमची त्याला संमती व मान्यता आहे. आणि मी ते सगळं गार्डन करुन एका कोप-यात अत्याधुनिक स्मशानभूमी करतोय मला आयुक्त साहेबांनी गेल्या आठ दिवसापूर्वी त्याच्यावरती सही करुन दिली. म्हणजे माझे सहा महिने तर असेच आयुक्तांनी घालवले. मागच्या आयुक्तांनी माझे तीने वर्ष घालवलेत. म्हणजे कोल्हे साहेब चांगलं काम जरी करायचं तरी करुन दिलं जात नाही. कारण स्वत:चे हितसंबंधी स्वार्थ साधण्याकरीता एक तर पहिले एक गोष्ट म्हणजे चाळीस वर्षात हयानी कुठलीही कामं केली नाहीत. पण मी माझ्या प्रभागातील छातीठोकपणे सांगतो ९९ टक्के कामे मी मंजुर केली आहेत. ठीक आहे. मला प्रत्येक प्रभागात प्रत्येक गोष्टीसाठी अडचणी आल्या. माझ्या पक्षाच्या पण आल्या. महापौर साहेब मला काय म्हणायचय माहिती का आयुक्त साहेब की या महापालिकेमध्ये साडेचार वर्ष झाली मी पण बघतोय की कसं कामकाज चालतयं. इथं बरेचसे विभाग आहेत. जे १२८ नगरसेवक आहेत त्यापैकी १८ च नगरसेवकांना माहिती असतं की प्रत्येक विभाग कुठं कुठं आहे आणि त्यांचा एचओडी कोण आहे. त्या विभागात काय काम चालतयं बाकीचं अजुन काय कोणाला माहिती नाही. मी महापालिकेत माझा बांधकाम विषयाशी माझा संबंध आहे म्हणुन मी इथं येतो. मलाही अजुन पर्यंत इतर विभाग माहित नाहीत किंवा तयांचे एचओडी माहित नाहीत. जे माझे संबंधित विभाग आहेत तिथं मी जातो बघायला. तुम्ही अशी कार्यशाळा ठेवली पाहिजे होती की हया हया विभागाचे एचओडी आणि हे हे हयांचं अस असं काम आहे असं. पण मी आता काय माहिती का बैल गेला आणि झोपा केला असं नको व्हायला. आता तीनच महिने राहिलेत. त्यामुळे आता तसं करु नका. पुढच्या पंचवार्षिकला करा. महापौर साहेब हा स्मार्ट सिटीचा घोटाळा असेल बाकीचा असेल. पण आयुक्तांना क्लीअर कट आदेश द्या. मीच तो विषय फॉलो अप करुन फॉलोअप दिला. स्पर्श हॉस्पिटल महापौर साहेब अतिरिक्त आयुक्त अजित पवार

साहेब हे आपल्या महापालिकेत होते. मी म्हणतो ते तोतया अधिकारी होते. त्यांचा शासनाकडून जो आदेश आला होता त्यानंतर त्यांचा दुसरा आदेश आला की जात पडताळणीला त्यांची बदली केली. आपल्या हर्डीकरांनी असं पत्र शासनाला पाठवलं आम्हांला हयावर खुलासा करावा की हयांची नियुक्ती नक्की कुठं. त्याच्यानंतर इथे जे सगळे विषय झाले त्याच्यानंतर राजेश पाटील साहेबांनी त्यांची बदली जिथं होती जातपडताळणी विभाग तिकडं पाठवलं. म्हणजे १८ महिने त्या अधिका-याने ज्या ज्या फाईलवरती सहया केल्या ते सगळे बोगस आहे. तोतया अधिकारी निघाला महापालिकेत. आयुक्त साहेब तुमच्या चेअरवर जर तोतया अधिकारी बसले आणि त्यांनी सहया करीत बसले. शासनाकडून काय आदेश. तुम्ही आदेशाची माहितीच घेतली नाही. ११ फेब्रुवारीला मी पत्र दिलं. मला संबंधित प्रशासन विभागाचे सहा. आयुक्त म्हणतात एवढया मोठया माणसाची तुम्ही माहिती मागवली असे म्हटलं जे चुकीचं आहे ते चुकीचंच आहे. त्याच्यानंतर हया प्रकरणात खुलासा आला. बाकीच्या गोष्टी झाल्या. त्याच्यानंतर तुम्ही आल्यानंतर त्यांची विधीवत पाठवणी केली. त्याच्यामध्ये त्यांनी स्पर्श हॉस्पिटलला जे बील देण्यात आलं बाकीचा जो काही स्पर्श हॉस्पिटलच्या कामामध्ये जो घोटाळा झाला साडेतीन कोटी ३,१४,२६,००० अमाऊंट देण्यात आली. चौकशी आयोग नेमला साहेब. दोन महिन्यापूर्वी त्या आयोगाचा अहवाल आपल्याकडे आलेला आहे. आलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणं आलेला आहे. मी माहिती घेतलेली आहे. विभागीय आयुक्तांकडं मी पत्रव्व्यहार केलेला आहे. तीच माहिती मी घेतली आहे. तो विषय तुम्ही झाकुन का ठेवला. दोन महिने विभागीय आयुक्तांचा अहवाल आलेला तो प्रशासनाला किंवा नगरसेवकांना सभागृहात तुम्ही महापौरांना वचन दिलं होतं किंवा शब्द दिला होता २० दिवसात. महापौर तुम्ही आदेश दिला होता. दोन महिन्यापूर्वी जर अहवाल आलाय तर सभागृहाला कळला पाहिजे होता. अहवालात काही नाहीए किंवा काय आहे. आपण कोर्टाततर केस केलेली आहे. पण सभागृहाला तर कळलं पाहिजे होतं की आज तिथं जर काही खर्च न करता सुध्दा आपण त्या व्यक्तीला किंवा त्या संस्थेला बील देण्यात आलेलं आहे. आयुक्त साहेब आम्हांला तुमच्याकडून भरपुर आशा आहेत की तुम्ही चांगलं काम कराल. आमची इच्छा आहे की तुम्ही चांगलं काम करुन प्रशासनावर कमांड ठेवून जसं नगरसेवकांना पण ठेवता ना की १४ दिवस आतमध्ये गेले नगरसेवक, ठीक आहे. नगरसेवक पण चुकले असतील आणि साहेब तुमच्यासारखे आमचे आयएएस वगैरे शिक्षण झालेले नाही तेव्हा आम्हांला प्रत्येक गोष्टीचे प्रोटोकॉल समज कमी आहे. त्यावेळेस तुम्ही आम्हाला लोकांना समजुन घेतलं पाहिजे की कसं कसं कुठलं काम केलं पाहिजे. महापौर साहेब सखोल सगळया गोष्टीची चौकशी करण्याचे आदेश मा. आयुक्तांना द्या. आणि सगळया गोष्टी क्लीअर करा. आपल्या चुका असतील तर आपल्या पण दाखवा. कोणावर पांघरुण घालू नका. एवढं बोलून थांबतो. जयहिंद. जय महाराष्ट्र .

मा. वैशाली घोडेकर – सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, आणि या ठिकाणी आलेले मा. खासदार डॉ. अमोलजी कोल्हे या ठिकाणी मी पहिल्यांदा संदीपभाऊंना सांगेन की दर जीबीला आमचे आवाज वाढलेलेच असतात सगळयांचे आज तरी मंगलाताई नाहीत नाही तर हयाच्यापेक्षा जास्त आवाज दिसले असते आणि दुसरं म्हणजे सीमाताईंच महिला म्हणुन खरंच मनापासुन अभिनंदन करेन की सत्ताधा-यांना घरचा आहेर देण्याचं काम त्यांनी केलेल आहे त्यामुळे या ठिकाणी खरं म्हणजे महिला म्हणुन अभिनंदन करेन कारण आम्हांला शिकवलं गेलय की वाईटाला वाईट म्हणा आणि चांगल्याला चांगलं म्हणा आणि जर चांगलं काम होत असेल तर त्याला साथ द्या. भले तो विरोधातला असु किंवा कोणी असु. त्याच्यामुळं चांगल्या कामाला नेहमी आमची साथ असणार आहे पण वाईट कामाला आमचा आवाज नेहमी वाढलेला असणार आहे. या ठिकाणी महापौर मी तुम्हांला म्हणत होते की सगळयांना बोलू द्या कारण दोन महत्वाचे विषय होते. या आदि तुम्ही सगळया मिटींग हया ऑनलाईन घेतल्या. ऑनलाईनमध्ये किती गडबड झाली हेही तुम्हांला चांगल्या पध्दतीने माहित आहे. तुम्हांला माहित आहे की आम्ही तुमच्या केबीनमध्ये येऊन त्यावेळेस महापालिका सभा रोखलेल्या आहेत हेही तुम्ही डोळयाने बघितले आहे. त्यावेळेस आम्हांला आमचे मुद्दे मांडता आले नाहीत. कमिशनरांनी पण काही गोष्टी अशा केल्या की तेही आम्हांला सभागृहात बोलता आले नाही. त्यामुळे महापौरांना मी विनंती करेन की सगळयांना बोलू द्या. सगळयांच्या प्रभागातले प्रश्न अहेत म्हणूनच मी तुम्हांला ही विनंती करीत होते. स्मार्ट सिटीचा मुद्दा हा मी तर म्हणेन स्मार्ट म्हणणारच नाही. पिंपरी चिंचवडला लागलेली एक कीड आहे. या ठिकाणी स्मार्ट सिटीमध्ये स्मार्ट होण्याच्याऐवजी अतिशय भोंगळ कारभार हया ठिकाणी पिंपरी चिंचवड मध्ये झालेला आहे. योगेशभाईंनी आताच एक चांगलं उदाहरण सांगितलं सेम तसंच माझ्या पण वॉर्डात घडलेल आहे, समीरदादा पण इथंच आहेत. महापौर ताई आम्ही चांगले रस्ते बनवतो. मस्त व्हाईट पट्टे मारतो आणि ही लोकं येतात आणि खोदून जातात. खोदुन पण कसे जातात फक्त १ १ फुट. मी भालकर साहेबांना दहा वेळा फोन केले त्यांना म्हटलं तुम्ही या तुमच्याकडं लेबर नसतील तर मी हातात फावडं घेते आणि खोदते आणि तुम्हांला ते केबल हाताने काढुन दाखवते. आयुक्त साहेब ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. एकही केबल दीड मीटरच्या खाली हवी ती नाहीए हे मी तुम्हांला खुप वेळा सांगितलं, पत्रही दिलं. हर्डीकर साहेबांनाही सांगितलं. पण माझ्या वॉर्डात त्याबद्दल एकही ऍक्शन घेण्यात आली नाही. आम्ही काम अडवलं की पोलीस बंदोबस्तामध्ये ते काम केलं जायचं. स्मार्ट सिटीमध्ये मीही आयुक्त साहेब मी असं म्हणेन की सीमाताईंनी जो मुद्दा काढला की टी.एस. नाहीए, टेक्निकल सँक्शन नाहीए. प्रत्येक गोष्ट, प्रत्येक टेंडर एक लाखाचे असुद्या, १ कोटीचं असुद्या, ५० कोटीचं असुद्या, ज्या वेळेस टेंडर प्रोसेसला जातं त्यावेळेस आपणही व्हिजिलन्स अहवाल घेतो. मग त्या वेळेस ही गोष्ट तुमच्या लक्षात आली नाही का की टेक्निकल सँक्शन हया गोष्टीला घेण्यात आलेले नाही. जे सब कॉंट्रॅक्ट तुम्ही

दिले त्यांना देखील हे टेक्निकल सँक्शन घेण्यात आलेले नाही याचा आपल्या अधिका-यांनी कोठेही काही बघितलेले नाही. पण मी हयावर म्हणेन मी की मला हे खरच हास्यास्पद वाटतं की ज्या वेळेस या महापालिकेच्या निवडणुका होतात लोकं विचार करुन एक सत्ताधारी निवडतात लोकं का निवडतात हो सत्ताधारी. तुम्ही ज्या पध्दतीनं ओरडता त्या पध्दतीने ओरडण्यासाठी सत्ताधारी निवडतात. सत्ताधारी हा निवडला जातो की जो प्रशासनाला योग्य पध्दतीने रस्ता दाखवतो. मग तुम्ही रस्ता दाखवण्यामध्ये चुकलात. कारण एवढा भ्रष्टाचार बोकाळलाय हया पिंपरी चिंचवड मध्ये मग यांचे हात हे सीमा ताई सत्ताधा-यांना झटकुन चालणार नाहीत. विरोधी पक्ष हा प्रत्येक वेळी थांबवत होता. प्रत्येक वेळेस योगेश भाईंचे स्टेटमेंट आहे. योगेश भाईंचे प्रत्येक वेळेस स्मार्ट सिटीला स्टेटमेंट आहे. माझं हर्डीकर साहेबांना पत्र आहे. प्रत्येक पत्र आहे हयाचा सत्ताधा-यांनी हात झटकुन चालणार नाही. पूर्णपणे जेवढे नुकसान हया पिंपरी चिंचवडचं झालेलं आहे ते फक्त सत्ताधा-यांच्या चुकीच्या कारभारामुळे झालयं आणि ते फक्त या अधिका-यांवर कमांड न ठेवल्यामुळे झालयं. अधिका-यांना हयांनी भ्रष्टाचार करु दिला, त्याच्यात साथ दिली. आता दुसरा महत्वाचा प्रश्न आहे आरोग्याचा. आताच योगेशभाई बोलले की खूप काही पदे भरली गेली आयुक्तसाहेब एक उदाहरण म्हणुन डेंटीस्टचे काही डॉक्टर मी आपल्याकडे घेऊन आले. त्यांना पेमेंटसाठी जवळ जवळ २५०००/- आम्ही ज्या तीन एजंस्या तुम्ही निवडल्या त्या कोणाच्या आहेत मला त्याच्यावर बोलायचे नाही. मला फक्त डॉक्टरांवर आणि आरोग्य कर्मचा-यांवर जो अन्याय होतोय महापौर कोविड काळात त्या लोकांनी अतिशय आपल्याला साथ दिलेली आहे. आता जो आकडा तुम्हांला १०० च्या खाली दिसत आहे तो फक्त त्या आरोग्य कर्मचा-यांमुळे आणि डॉक्टरांमुळे दिसतोय. आपण जी आपली पाठ थपथपुन घेतोय ना सगळेजणं ते फक्त त्या डॉक्टर आणि आरोग्य कर्मचा-यांमुळे. हा पण महत्वाचा मुद्दा आहे महापौर. आज मी डॉक्टरांचे एक आयुक्तांकडे घेऊन आले. २५०००/- किती टक्के कमी केले पाहिजेत त्यांना जेव्हा बोलवलं इंटरव्हयुला, १८ टक्के कशाचे १८ टक्के. ते काय आपल्याला सर्व्हिस देतात. ते जे डॉक्टर आहेत ते त्या ठेकेदाराकडे एम्प्लॉई म्हणुन काम करणार आहेत. त्यांच का तुम्ही पेमेंट कमी करणार १८ टक्के. साहेब तुम्ही मला काय म्हटले मॅडम त्यांचा एकही रुपया कमी होणार नाही. मी ऑडीटरबरोबर ती मिटींग लावतो. सगळं व्यवस्थित करतो. साहेब मिटींग नाही, काही नाही. त्यांचा तो मॅनेजर येतो त्या लोकांच्या आधीच राजीनाम्यावर सहया घेतो आणि पेमेंट तुम्हांला १८ टक्क्याचा स्लॅब का तुम्हांला दिला जात नाही, का म्हणुन, कोण म्हणतं सर्व्हिस चार्ज मी माझ्या सी.ए.ला विचारलं. मी माझ्या सी.ए.ला विचारलं की आपल्याला १८ टक्के जो कोणी सर्व्हिस देतो त्याचा टीडीएस कमी केला जातो. जो एम्प्लॉई म्हणुन असतो त्याचा सर्व्हिस टॅक्स कमी केला जात नाही. तो पण १८ टक्के नाही. या ठिकाणी आयुक्त साहेब स्वत: सगळे डॉक्टर लोक तुम्हांला बोलले होते हे

अशा पध्दतीने चाललेलं आहे. बिचारे जे खाली बसलेले आहेत जे वर्ग ४ चे आहेत त्यांची तर हालत दयनीय आहे. मग मी म्हणेन कशाला हवीय तुम्हांला ठेकेदारी. का पाहिजे तुम्हांला ठेकेदारी. हयाच्यावरुन सत्ताधा-यांनी का नाही अडवली ठेकेदारी कारण त्याचे प्री टेंडर कोणाचे आहेत. मग सत्ताधा-यांनी आपली पाठ थपथपावी की आम्ही कोविडमध्ये काम केलयं आम्ही असं केलयं आणि आम्ही तसं केलयं, आमची लोक असतील तर आता बाहेर काढा. आमचे असतील तर आता बाहेर काढा. तुमचे हात कोणी धरलेत का. तुमचे हात कोणी धरलेत का ,काढा ना बाहेर. सत्ता तुमची आहे. आयुक्त साहेब आयुक्त साहेब मला काय म्हणायचय डॉक्टरांवर अन्याय आणि कर्मचा-यांवर अन्याय आम्ही होऊ देणार नाही. माझं असं म्हणणं आहे की मी प्रामाणिकपणे सांगते की सत्ताधा-यांमधील सुध्दा प्रत्येक नगरसेवक हा कोविड कर्मचा-यांवर होणारा अन्याय सहन करणार नाही. हे मी छातीठोकपणे सांगते मग अशा पध्दतीने महापौर आणायला नको का गोष्टी १० वेळेला गेले मी हयांच्याकडे आयुक्तांकडे, १० वेळा ढाकणे साहेबांकडे गेले. मेसेज केले की साहेब अडवा. मी साहेबांना सांगितलं की हया टेंडरला व्हिजिलंस रिपोर्टच नाही दक्षता अहवालच नाही. त्यांनी लगेच महापौर ताई, सकाळी १० वाजता फाईल व्हिजिलन्सला गेली. किती वाजता यायला पाहिजे. ४ वाजता लगेच फाईल व्हिजिलन्सवरुन आली. हयाला काय म्हणायचं. १० वाजता व्हिजिलन्सला गेली आणि ४ वाजता व्हिजिलन्सवरुन आली. तिसरं तुम्हांला सांगितलं होतं आयुक्त साहेब तुम्ही टेंडरमध्ये असं टाकलं आहे की तुम्ही ३ वर्ष १५० लोक काम करण्याचा त्यांना हे पाहिजे त्यांनी लेबर सप्लाय केलय असं त्यांना पाहिजे. तिसरी अट तुम्ही लेबर लायसन्सची ठेवलीच नाही. मग त्यांनी काय इललिगल लेबर पुरवले का तीन वर्ष. १५० लोक इललिगल पुरवले का तीन वर्ष मग लेबर लायसन्सची अट का नाही. मी कामगार आयुक्तांशी बोलले कामगार आयुक्त म्हटले की एकाही फर्मने जर एकही माणुस किंवा ५०च्या वर जर माणसं व्हिदाऊट लेबर लायसन्स पुरविली असतील तर तो त्या ठिकाणी गुन्हयास पात्र होतो. मग एवढं मोठं टेंडर, एवढं मोठं टेंडर त्यामध्ये लेबर लायसन्सची अट ही गायब, का . आयुक्त साहेब मग टेंडर त्याच वेळेस तुम्ही थांबवायला हवं होतं. त्याच वेळी थांबवायला पाहिजे होते हे ई टेंडर. मग बिचा-या त्या कोविडवाल्यांना आठरा आठरा टक्के कमी करता. आपण त्यांना देत होतो ३००००/- डॉक्टरांना, ते तुम्ही केले २५००० ते मला मान्य आहे. तुम्ही ५००० कमी करा पण त्या २५००० मध्ये पण तुम्ही १८ टक्के त्या लोकांना प्लस ५ टक्के जो त्यांनी सर्व्हिस चार्ज भरलेला आहे एवढं मोठं ते काय आपले जावई लागले का तीन्ही ठेकेदार. कशा साठी पाहिजे तुम्हाला आधीपासुन आपण हया महापालिकेत सर्व सदस्यांना सांगू इच्छिते की आधी ज्या वेळेस कोविड नव्हता त्या वेळेसपण आपण लोक भरत होतो त्या वेळेस आपण त्यांची रितसर एक्झॅम घ्यायचो सहा महिन्याचा त्यांना पिरीयड द्यायचो. परत स्टार्ट करायचो परत एक्झॅम घेऊन त्या

ठिकाणी त्यांना आपण सेवेत घ्यायचो मग या पध्दतीने का नाही केले सर . थोडासा स्टडी करायचा होता. थोडासा वेळ द्यायचा होता. आणि मग नंतर तुम्ही टेंडर प्रोसेस करायचे होते. आधी तुम्ही सगळे यात शहराचा अभ्यास करायला पाहिजे होता की किती ठेकेदार आणि किती भ्रष्टाचार इथे बोकाळलेला आहे. हया ठिकाणी तुम्ही हे टेंडर काढले आणि आमचे कोरोना योध्दयांना आमच्या डॉक्टरांवर, कर्मचा-यांवर या ठिकाणी अन्याय केला आणि या अन्यायावर जेवढे तुम्ही जबाबदार आहात ना तेवढेच सत्ताधारी पण जबाबदार आहेत. आणि तिसरा विषय मी हा सांगेन महापौर आमच्या अजमेरामध्ये आम्ही आताच जो मेन खुप चांगला रहदारीचा रस्ता आहे जो आताच केला आणि लगेच खोदून ठेवला. आयुक्त साहेबांनी मला याच पण उत्तर दयाव की तो का खोदला. नाही इमरजन्सी काम आहे, केबलचं काम आहे. आम्हांला करावं लागेल. मग मला आयुक्त साहेब आम्ही किती तरी वेळा हया ठिकाणी ओरडलो आहे की या ठिकाणी आपण जे खोदकाम करतात स्मार्ट सिटी असुद्या केबल असुद्या वॉटर पाईप लाईन असुदयात हे स्थापत्य विभागाशी कोऑर्डीनेट का नाही करत. किती वेळा ओरडलेलो आम्ही मंगलाताई असतील योगेशभाई असतील, अजित भाऊ असतील, कोऑर्डीनेशन यामध्ये का होत नाही. जेव्हा आम्हांला माहिती आहे डांबराचे प्लँट उन्हाळयातच उघडतात त्यावेळेस आपण रस्ते करतो. त्याच्या आधीच हया गोष्टी करुन घ्यायला का नाही अधिकारी जबाबदार नाहीत का. मग अशा अधिका-यांना तुम्ही मेमो काढायला नको. जो पर्यंत एक दोन अधिका-यांना अशा पध्दतीने तुम्ही शिक्षा देत नाही तो पर्यंत आपले अधिकारी सुतासारखे सरळ होणार नाहीत. आयुक्त साहेब मी आधी तुम्हांला सांगते त्या पध्दतीने केले पाहिजे आणि स्मार्टसिटी मध्ये आयुक्त साहेब स्मार्ट सिटीमध्ये दोनदा दोनदा बीले केलेली हे मला ते खोदकामावरुन आठवतय. आयुक्त साहेब स्मार्ट सिटीमध्ये आपण दोनदा बीले दिली. आयुक्त साहेब मी माझ्या वॉर्डातील सांगते. सर माझ्या वॉर्डात एक रस्ता खोदला मी अधिका-यांना फोन केला. रस्ता खोदला कस करायचं त्याचं. ते म्हणाले मॅडम मी येतो आणि लगेच बुजवतो. पण ते काम तर स्मार्ट सिटीचं आहे मग स्मार्ट सिटीवाल्यांनी ते बुजवले पाहिजे. नाही मी लगेच डांबरीकरण करुन देतो प्लँट चालू आहे. आपलं पण बील त्यात गेलं आणि स्मार्ट सिटीवाल्याला ते बुजवायचं सुध्दा बील गेलं. म्हणजे एका कामाची दोन दोन बीलं गेली नाहीत का. याचा सुध्दा आपण विचार केला पाहिजेना आयुक्त साहेब. स्मार्ट सिटीवाला जर खोदून गेला तर त्याला एक २४ तासाचीच मुदत पाहिजे की तु तिथे डांबर टाक. महिनोंमहिना दीड दीड महिना ही लोक डांबर टाकत नाही, मग आम्ही काय केलं पाहिजे. हया वेळेस तुम्ही भालकरांना किती मेमो पाठवायला पाहिजे होते. या विषयांना तुम्ही भालकरांना किती मेमो दिले पाहिजे होते. आतापर्यंत एकही अधिकारी तिथे आलेले नाहीत. आयुक्त साहेब आमची विनंती आहे की सत्ताधा-यांकडून आम्हांला बिल्कुल अपेक्षा नाहीत. पण हया पिंपरी चिंचवडकरांची थोडी तरी

दया  करा आणि आयुक्तसाहेब आपण कामाला लागा एवढीच माझी या ठिकाणी विनंती आणि या ठिकाणी थांबते, धन्यवाद.

मा. ॲड.सचिन भोसले – सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, सन्मा. नगरसचिव, सभागृहातील माझे सर्व सहकारी नगरसेवक, नगरसेविका, पत्रकार बंधु आणि आज या ठिकाणी अवर्जुन उपस्थित असलेले सन्मा. खासदार डॉ. अमोलजी कोल्हे साहेब, माई खरं तर सुरुवात झाली होती महिलांवर होत असलेल्या अत्याचाराबद्दल. साहेब इथं बसलेले आहेत कोल्हेसाहेब. ते ही विचार करीत असतील विषय कुठला आणि बोलणं कुठलं चाललय तर सगळयात पहिलं मला असं वाटतय की ज्या कबड्डीपटटूवरती त्या ठिकाणी अत्याचार झाला त्याच्यामध्ये तिचा खुन झाला  अतिशय निंदनीय बाब या शहरामध्ये घडली आणि ती कोणाच्याच मनाला पटेल अशी गोष्ट नाही. सर्वप्रथम मी हया गोष्टीचा इथं जाहीर निषेध करतो. आणि भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. थोडंसं वेळेचं भान ठेवून माई मला असं वाटतं आपण काम केलं पाहिजे कारण की गेले अनेक दिवसापासुन आपण सर्व जण ऑनलाईन ऑनलाइन काम करतोय ऑफलाईन आज पहिल्यांदा आलोय तर या शहरात जे काही प्रश्न आहेत त्याच्यावर माझ्या सर्व सहका-यांनी त्या मुद्दयावर बोललं पाहिजे. आणि स्मार्ट सिटी, महिलांचा जो विषय आहे तो खरंच म्हणजे महिलांवर जो अत्याचार होतोय, अन्याय होतो, सुरक्षितता नाही, हया सगळया गोष्टी आपण सगळेजण अनुभवतोय परंतु त्याला वाचा फोडण्यासाठी किंवा तो प्रस्ताव उपस्थित करण्यासाठी सगळयांनी सन्मा. आयुक्त आहेत आपण आहोत हया सभागृहाच्या माध्यतातुन ठराव करुन तो मा. आयुक्तांना देऊन  सन्मा. आयुक्तांनी तो पोलिस आयुक्त आहेत त्यांची जॉईंट मिटींग लावावी आणि त्या मिटींगला सर्व सन्मा. सदस्यांना बोलवावं आणि त्या ठिकाणी त्यामध्ये आपल्याला काय मार्ग काढता येईल त्याच्यावर खरं तर विचारमंथन झालं पाहिजे. आता स्मार्ट सिटीला कनेक्ट केलं गेलं तर तो पण सुरक्षिततेचा मुद्दा जसा तुम्ही सांगितला की संपूर्ण शहरामध्ये आपण सी सी टीव्ही कॅमेरे बसवणार आहोत. तर स्मार्ट सिटी हा प्रकल्प आपल्या हया शहरामध्ये साडेचार वर्षापूर्वी सुरु झालांय आणि साडेचार वर्षापूर्वी सुरु झालेला प्रकल्प आजतागायत त्या प्रकल्पामधुन आपल्याला किती कामं करता आली आणि सुरक्षिततेची बाब म्हणुन सी सी टीव्ही कॅमेराविषयी विषय केला तर सन्मा. आयुक्तांना माझा पहिला प्रश्न असा राहील की कॅमेरे बसवण्याचा आपण सांगितलं की संपुर्ण शहरामध्ये चौकाचौकामध्ये आपण सी सी कॅमेरे बसवणार आहोत तर हे जे काम आहे कॅमेरे बसवण्याचं हे कुठल्या ठेकेदाराला दिलयं त्याची रक्क्म किती निविदा रक्कम किती ते मंजुर झालं का नाही झालं त्याचा आजचा स्टेटस काय . मला काय म्हणायचय हे तुम्हांला माहित असेल. कदाचित २–३ लोकांनी माहिती घेतली असेल. परंतु साहेब आपल्याकडून अपेक्षित हे होतं की महिलांच्या सुरक्षिततेसाठी या शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत कॅमेराचा जो प्रोजेक्ट आहे तो इतक्या इतक्या प्रभागात झालाय आणि त्याचं काम हया हया स्टेजला आहे. म्हणजे हे आपल्याकडून अपेक्षित होतं. आणि ते जर आपण सांगितलं असतं तर ते थोडंसं फायदेशीर झालं असतं. आणि त्याची माहिती आम्हां सर्वांना मिळाली असती. आता इतक्या वेळच्या चर्चेनंतर असं वाटायला लागलं

की काही तरी आरोप होतात की प्रशासनाने चुकीचा कारभार केला. परंतु हया सगळयातनं एक बाब समोर येते की “सौ चुहे खाके बिल्ली चली हज को.” हे असं झालं की गेले साडेचार वर्ष जे आज या ठिकाणी ओरडताएत ते झोपले होते का. त्यांना चार वर्षात त्यांना कुठल्या कुंभकर्णाची झोप लागली होती का. तुम्ही आज जे बोलताय छातीठोकपणे सांगताय की प्रशासनाने हे केले, प्रशासनाने ते केलं. अहो तुम्ही काय करत होता तुम्ही त्यांच्या सोबत होता आता काय झालं आणि नेमकं आज का हा फार महत्वाचा प्रश्न आहे. म्हणजे काय झालयं की शहरातल्या जनतेला कळुन चुकलय कारभार कळुन चुकलाय कारभार आता आपली हकालपट्टी होणार. जिथं बसायची तिथे लाथ बसणार हे कळाल्यानंतर आज जर तुम्ही आपले ढोल बडवत बसले तर या शहरातली जनता एवढी बावळट नाही ज्यांनी तुमच्यावर विश्वास ठेवला तुम्हांला एक हाती सत्ता दिली. तुमच्याकडून काही तरी होईल चांगलं तुम्ही चांगल काही तरी सांगितलं असेल आणि सत्तेत आला. म्हणजे जनतेच्या तुमच्याकडून अपेक्षा होत्या हो. म्हणजे ती जनतेची चुक झाली का तुम्हांला एक हाती सत्ता देऊन. आणि आता साडेचार वर्षानंतर तुम्ही जर म्हणत असाल की तुमच्या हया चुकीच्या कारभारामध्ये आम्ही सहभागी होणार नाही . का तुमचं आता भरलं का साडेचार वर्ष तुम्ही हया पिंपरी चिंचवडकरांच्या तिजोरीवर डल्ला मारला एवढे खोटे तुम्ही. मगाशी संदीप वाघेरेंनी सांगितलं काही तर सत्ताधारी नेतेसुध्दा बोलायला लागले. सत्ताधारी सुध्दा बोलताएत की भ्रष्टाचार झाला. एवढे दिवस तुम्ही झोपले होते का साडेचार वर्षात तुम्हांला दिसला नाही का. तुम्ही का आवाज उठवला, मग आताच का. आयुक्त आलेत एखादे अधिकारी आले असतील आणि काम चांगलं करत असतील मग त्यांना तुम्ही टारगेट कधी करावं आणि का करावं याचं पण आपण आपलं आत्मपरीक्षण केलं पाहिजे. की आपण काय करतोय ते आपल्या हाती असतं. साहेबांचे म्हणजे आयुक्त साहेबांचं काम अनधिकृत होर्डींगचं काम चांगलं केलयं. कदाचित त्याची कुठं सल लागली का ते पण बघायला पाहिजे. महिलांचा जो विषय आहे तर हया राज्यातील महाविकास आघाडी सरकार सक्षम आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी हे सरकार काम करतय त्यामुळे महिलांवरती अत्याचार अन्याय हे कदापि सहन केलं जाणार नाही. आणि जो अन्याय करेल अत्याचार करेल त्याला निश्चिचपणे शासन केलं जाईल. परंतु त्या दृष्टीकोनातुन जर तुम्ही बोलत असाल तर मग स्मार्ट सिटीमध्ये हया सत्ताधा-यांनी त्या वेळेस सन्मा.आयुक्तांना का नाही सांगितले की आपल्याला प्रत्येक प्रभागामध्ये पोलीस स्टेशनची उभारणी करणे गरजेचे आहे. त्यासाठी तुम्ही तेथे तरतुद करा. आहे का एखादे पत्र असं दाखवा. हे कशाला करताय तुम्ही की मी मारल्यासारखं करतो आणि तु रडल्यासारखं कर. म्हणजे नेमकं काय तुम्हांला सिध्द करायचय म्हणजे शहरातल्या जनतेला तुम्हांला असा मेसेज पाठवायचाय का की आता आम्ही एकदम चांगले आहोत. आता आम्हांला हे झालयं, अरे काही नाही तुम्ही जे केलयं ते या शहराच्या जनतेने बघितलय. तुम्ही काय करणार अँटी करप्शन आणि तुम्ही काय सांगणार त्यांना अहो हे महाविकास आघाडी सरकार

वरती इथं हे करतात आणि एखादा कोणी काय बोलायला गेला की हयांच्या दावणीला ती ईडी आणि इन्कम टॅक्स अंगावर सोडतात म्हणजे काय, म्हणजे आत्मपरीक्षणाची गरज आहे. सत्ताधारी पक्षाला सुध्दा आणि आज खरं तर त्या विषयाला धरुन बोलायचं म्हटलं तर महिलांचं सक्षमीकरण झालं पाहिजे. महिलांना संरक्षण मिळालं पाहिजे. याच मताचे आम्ही आहोत. आणि तशा सूचना करा ना. त्या संदर्भात तुम्हांला स्मार्ट सिटी अंतर्गत काय कामं करता येतील ती बघा. स्मार्ट सिटीमध्ये घोटाळे झाले आहेत हयाची तक्रार सन्मा. मुख्यमंत्र्यांकडे आमच्या शिवसेनेच्या पदाधिका-यांनी केलेली आहे. महाविकास आघाडी सरकारकडे अनेक लोकांनी केली आहे. प्रत्येकाचा कार्यक्रम होईल. वेळ आल्यावरती कोणाचा कुठं कसा कार्यक्रम करायचा हे महाविकास आघाडी सरकारला कळतय. ते बोलायची गरज नाही. परंतु आपल्याला हया सभागृहातुन काय मेसेज द्यायचाय की जो महिलांवर अन्याय, अत्याचार झालाय त्याच्यासाठी हया सभागृहातुन कोणता विषय जातोय सन्मा. आयुक्त साहेब मी आपणांला विनंती करेन की कृष्णप्रकाश साहेबांची वेळ घ्या आणि त्या ठिकाणी या सगळया हा जो प्रश्न निर्माण झालेला आहे महिलांच्या सुरक्षेचा तर मी आपल्याला विनंती करेन की एक दिवशी तुम्ही आम्हांला सर्वांना बोलवा आणि आमचं सगळयांचे ऐकुन घ्या. आणि सन्मा. माई महापौर आपण स्मार्ट सिटी वरती एक दिवस फुल धिंगाणा करु म्हणजे काय कोणाला बोलायचय तेवढं बोलूदया. पण बोलूद्या. कारण की काय होणार आहे लोकांना कळून चुकलयं शहरातल्या नागरीकांना कळुन चुकलयं इथं बोलतो तेव्हा काय होतं विषयाला सोडून आपण बोलणं योग्य नाही. त्यासाठी एक खास दिवस नेमा. त्या दिवशी आपण मस्त सगळे बॅटींग करु. या ठिकाणी माई मला आपण ब-याच वेळानंतर आपण बोलण्याची संधी दिली त्या बद्दल मनापासुन धन्यवाद.

मा.विकास डोळस - सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, आणि आजच्या महासभेसाठी उपस्थित मा. खासदार डॉ. अमोलजी कोल्हे. माई मी आज बोलणार नव्हतो. आणि पाठीमागुन शामभाऊ, रामदास भाऊ बोलले कशाला बोलतो. पण बोललं पाहिजे. आजचा परफार्मन्स सगळयांचा चांगला होता. Nice Performance. कोल्हे साहेब सगळयांचा परफॉर्मन्स चांगला होता एकदम, एकदम छान. मी पहिल्यांदा सभागृह साडेचार वर्षात नवीन नगरसदस्य साडे चार वर्षात एवढं ॲग्रेसीव्ह सभागृह पहिल्यांदाच बघितलं. सभागृहात ॲग्रेसिव्ह कोण व्हायचं तर सीमाताई आमच्या. सभागृहात ॲग्रेसिव्ह कोण व्हायचं तर आपले भोईर साहेब व्हायचे. असे दोन चार असायचे पण आज सगळं सभागृह एवढं ॲगेसिव्ह. वा, वा. ब-याच जणांनी आपली मतं प्रगट केली. सचिन भाऊनी पण आपलं मत प्रगट केलं. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला प्रत्येकाचं मत मांडण्याचा अधिकार आहे. जरी मला पटत नसेल तरी लोकशाहीमध्ये मी त्यांच्या मताचा सन्मान करतो. साडेचार वर्ष काय करीत होतात. साडेचार वर्ष विरोधकांची जबाबदारी असते की स्मार्ट सिटीमधला घोटाळा बाहेर आणायचा. पण दुर्दैव

असं की तो घोटाळा पण माझ्याच पक्षाच्या भगिनीने तो सभागृहासमोर मांडलेला आहे. त्यालाही ताकद लागते हिम्मत लागते अवगत व्हायला. बोट दाबुन चालत नाही तर ते उघडं करायला लागत. स्मार्ट सिटी स्मार्ट सिटी आम्ही सगळे बाकीचे नगरसेवक समजायचो मी तर म्हणतो सभागृहातील १२८ पैकी ११० नगरसेवकांना स्मार्ट सिटी माहितीच नाही. फक्त आम्हांला माहिती केबल टाकल्यानंतर कॅमेरे बसवणार आहेत. १०० टक्के. आतापर्यंतचा आमचा कालावधी कशासाठी गेलाय. पाणी द्या, रस्ते द्या, डांबरीकरणासाठी तरतुद द्या, आरक्षणाच्या जागा ताब्यात घ्या, माझे गावतर अस आहे की पालिकेत जाऊन आता जवळजवळ २२-२३ वर्ष होतील जी स्मशानभूमी असती ती पालिकेच्या ताब्यात आता आली ती केवळ आमच्या प्रयत्नांमुळे आली. आणि आपण स्मार्ट सिटीचं आज इथ विचार करतोय. ब-याच जणांनी चर्चा केल्या आणि सीमाताई मी तुमचं मनापासुन अभिनंदन करतो. जी हिम्मत, हुशारी लागते, अभ्यास करावा लागतो त्याला. फक्त दोन चार वाक्य बोलली आणि त्यांनी आतापर्यंत ज्या ज्या गोष्टींबद्दल बोलल्यात, ज्या ज्या घोटाळयांबद्दल बोलल्यात ते कागदपत्र पुराव्यानिशी समोर ठेवून बोलल्यात. आयुक्त साहेब मी येतानाच म्हटलो मे आय कम ईन कारण सीमाताईंनी अगोदर पण सांगितलं होतं की मा. आयुक्तांच्या केबिनमध्ये जाताना तिथं अडवतात. सीमाताई मी परवा एक निवेदन द्यायला गेलो होतो आणि अडवलं. मी नगरसेवक आहे मी शर्ट पँटमध्ये आलो आहे म्हणुन ओळखलं नसेल. तो कर्मचारी म्हणाला नाही साहेब, सरांनी सांगितलंय. मग थोडा आवाज वाढवला. जर त्यांचे गेस्ट असतील तर त्यांना अँटी चेंबरमध्ये घेऊन बसा. हया पालिकेचा ट्रस्टी आहे मी हया पालिकेचा विश्वस्त आहे. आत मध्ये जायला मला परवानगीची कोणाची गरज नाही. मग जाऊ दिलं आम्हांला आत मध्ये. आयुक्त साहेब सीमाताईंनी तीन वेळा सभागृहात ही गोष्ट सांगितली आणि मी चवथ्यांदा सांगतोय. हयाच्यामध्ये बदल व्हायलाच पाहिजे. आज स्मार्ट सिटीबद्दल बोलतोय. गेले आठ महिने त्या फॉलोअप घेतात. ऐन पावसाळयात तुम्ही खोदाईची परमिशन दिली आणि आमच्या भगिनी आशाताई आणि त्यांच्या प्रभागातील महिला आहेत त्यांना जेलमध्ये पाठवले. आज स्मार्ट सिटीबद्दल बोलत असताना आपण हया गोष्टीचा का विचार करत नाही, स्मार्ट सिटीमध्ये कोण कोण सदस्य आहेत. सगळया पक्षांचे गटनेते आहेत. विरोधी पक्षनेते आहेत मग कोणताच गटनेता बोलला नाही. सगळयाच पक्षाचे गटनेते, महापौर, विरोधी पक्ष नेते हे त्या स्मार्ट सिटीमध्ये आहेत. मग मला सांगा हयांना कुणाला सुचल नाही का की इथ भ्रष्टाचार झाला. का बरं आवाज उठवला नाही कोणी त्या वेळेस. का राजीनामा दिला नाही. आज सुध्दा सीमाताईंनी मुद्दा मांडल्यानंतर प्रत्येक जण तावातावाने स्मार्ट सिटीबददल बोलतोय. १०० टक्के स्मार्ट सिटीमध्ये ज्यांनी कोणी भ्रष्टाचार केला असेल माझ्या पक्षाचा का असेना त्यांच्यावर आयुक्त साहेब तुम्ही कारवाई करा. पण त्या अगोदर टेक्निकल सँक्शन शिवाय काम करणा-या तुमच्या अधिका-यांवर पण कारवाई करा. ती

हिम्मत तुम्ही दाखवा साहेब. आज काय झालं माहिती का आम्ही तुमच्याकडं पत्र देतो पण त्या पत्रांवर कार्यवाहीच होत नाही. किती तरी पत्र दिली. तिथं गेलं की तुम्ही फक्त फोन करता पण त्याच्यावर काही होत नाही. गेली वर्षभर प्रशासनाबद्दल माझ्या मनात काही तरी संशय निर्माण व्हायला लागला. उदाहरणासह सांगतो साहेब. आता आठ महिन्यापासुन त्या स्मार्ट सिटीचा फॉलोअप घेतात. आज तीन महिने झालेत तो विषय पटलावर आलाय. आणि ते पण बोलल्या म्हणुन आलाय. स्पर्शचा अहवाल मा. महापौर आपण आदेश दिला होता की १० दिवसात त्याचा अहवाल पटलावर ठेवा. आज कितवा दिवस आहे त्याचा अहवाल आजपर्यंत पटलावर का आला नाही याचं उत्तर आज प्रशासनाने दिलं पाहिजे. सभागृहामध्ये मागे विषय आला होता तुळापुर येथे आपले महाराजांचे आराध्य छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त त्याच तुळापुर ग्रामपंचायतीला आपण एक ठराविक निधी द्यायचा होता. त्या विषयासाठी हया विभागाचा, त्या विभागाचा, हया विभागाचा शेवटी तो विषय झाला नाही. सभागृहात तो विषय घेतल्यानंतर तुम्ही आदेश दिले तो विषय आपल्या अजेंडयावर आला. त्याचं आपण लेखाशिर्ष निर्माण केलं. पण अजुनपर्यंत त्या ग्रामपंचायतीला अजुनही निधी दिला नाही. म्हणजे एखादा विषय हा महाराष्ट्राची अस्मिता असतो पण त्या विषयाबद्दल आपलं प्रशासन किती काळजीपूर्वक काम करतं हे आपल्या समोर येतं. दिघी मध्ये माई माजी सैनिकांचे दिघी मध्ये १८०० कुटुंब ही माजी सैनिकांची आहेत. माझ्या दिघीचं मी नशीब म्हणतो माझ्या सारख्याचं नशीब म्हणतो की माजी सैनिक राहायला दिघीमध्ये येतात. १८०० कुटुंबांचा माजी सैनिक विकास संघ आज दिघीमध्ये कार्यरत आहे. तत्कालीन जे सत्ताधारी होते ते म्हटले की सैनिकांसाठी एक इमारत बांधु माजी सैनिक विकास संघ आणि ती सैनिकांसाठी ठेवू. ठीक आहे. त्यांनी जे सांगितले ते काम आपण केलं. तिथं बिल्डींग बांधली. पण अजुनपर्यंत ते दोन मजले अधिकृत रित्या आपल्या पालिका प्रशासनाने त्यांना दिलेले नाहीत मग ते हर्डीकर साहेब असतील किंवा राजेश पाटील असतील यांच्याकडे तो विषय अजुनपर्यंत पेंडींग आहे. २४ बाय ७ सभागृहात आतापर्यंत १०० वेळा बोललो असेल ना त्यातल्या ९९ वेळा पाण्यावरती बोललो असेन. एक तर माझं गाव टेलएण्डच, पाण्यासाठी १ वाजता, २ वाजता, ३ वाजता आमच्या भगिनी आमच्या घरी यायच्या. आता खुप बरी परिस्थिती सुधारली होती. पाठीमागच्या महिन्यापूर्वी आयुक्त साहेबांनी एक बैठक ठेवली होती. आपण २४ बाय ७ करु आणि त्याच्यामध्ये ठराविक गावं निवडली आपण. त्याच्यामध्ये दिघीचा काही भाग त्यात समावेश केला तेव्हा मला जरा बरं वाटलं. २४ बाय ७ केल्यानंतर त्या भागाला जास्त पाणी देणे गरजेचे असते. कारण की पहिल्यांदा लोकांचा युज वाढतो. २४ बाय ७ ज्या भागात केलं ना त्या भागातील लोक परत पहिल्यासारखी परिस्थिती रात्री १ ला, २ला, ३ला आमच्या घरी यायला लागली. मी.मा. लडकत साहेबांना फोन केला तुमच्या पाया पडतो नवरात्र चालू आहे.

२४ बाय ७ बंद करा आणि परत पूर्ववत करा.जर आपण प्लॅनिंग करतो मग तुम्ही हया ज्या गोष्टी प्रशासन करतय जाणीवपूर्वक काही कामांकडे दुर्लक्ष करतय . मग माझ्या मनात साशंकता निर्माण होती की हे काम आज राजाभाऊंच्या पाण्याच्या टाकीचा विषय आहे तो कोणी थांबवलाय सभागृहात कोणाला मी घाबरत नाही. सभागृहात पत्र आणुन दाखवलेले आहे. प्रशासनाबद्दल साशंकता आहे. मी सभागृहात आवर्जुन सांगतो की इथं लोकांची कामं करायला आलो आहे. विरोधक असेल सत्ताधारी असेल पण प्रशासनावरुन कोणीतरी एजंट असतील आणि एजंटच्या पध्दतीने कामं करीत असतील तर एक लक्षात ठेवा गाठ आमच्याशी आहे. लोकांची कामं होणार नसतील तर त्यांना पण त्याच पध्दतीने उत्तर देऊ. माई प्रशासनावर आपण त्याच पध्दतीने पकड ठेवली पाहिजे. आणि प्रशासनामध्ये हे जे एजंटची कामे करतात ना मग ठराविक रस्त्याची फाईल आली ना टेक्निकल सँक्शन झाल्यानंतर पुढे एक टेबल असतो. टेबलवर फाईल नाही थांबली पाहिजे. निवडणुका तीन महिन्यावर आल्यात. म्हणजे थोडासा डिले केला की या काळात की त्या काळात हा मुद्दा उपस्थित होतो. मग कोणाचीही कामे असुदे सत्ताधारी असो विरोधक असो ही लोकांची कामे आहेत लोकांची कामे ही १०० टक्के व्हायला पाहिजेत . सीमाताई तुमचं मनापासुन अभिनंदन करतो. म्हणजे मी तुमच्यापासुन प्रेरणा घेतो. निर्भीड असावे माणसानी. माई धन्यवाद मला बोलायची संधी दिलीत. जयहिंद जय महाराष्ट्र

मा. वैशाली काळभोर - मा. महापौर, मा. खासदार डॉ. अमोलजी कोल्हे, मा. आयुक्त, मा. नगरसचिव, मा. नगरसेवक, नगरसेविका, खरं तर महिलांच्या विषयी बोलायचे होते. आणि तुम्ही मला सर्वात शेवटी जवळ जवळ दोन अडीच तास झाले मी हात वरती करती. पण धन्यवाद माई. खरं तर आमच्या नगरसेवक मैत्रीण सुजाताताई पालांडेंनी जो महिलांचा विषय मांडला तो खुप महत्वाचा आहे. आपण बघतो की आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये महिलांच्या अत्याचाराविषयीचा ताईंनी विषय मांडला. स्मार्ट सिटीच्या अंतर्गत जी तळमळ व्यक्त केली. स्मार्ट सिटीमध्ये जो भ्रष्टाचार झाला परंतु स्मार्ट सिटीमध्ये तेच रस्ते, फ्लाय ओव्हर, पाणी, आरोग्य हा विषय नसुन स्मार्ट सिटीमध्ये नागरीकांच्या सुरक्षेचा पण विषय आहे महापौर. हया सुरक्षेमध्ये सर्वात प्रथम महिला आणि मुली येतात आणि आपण बघतो की त्या ठिकाणी कमिशनरांनी सांगितलं आता आपल्याला की आपण सी सी टीव्ही कॅमेरे बसवणार आहोत. पण सीसी टीव्ही कॅमेरे नुसते बसवुन उपयोग नाही. महत्वाचे ज्या ठिकाणी सेन्सिटिव्ह एरिया आहे मग त्यामध्ये शाळा असतील, कॉलेज असतील, हॉस्टेल्स असतील या ठिकाणी सर्वात जास्त लक्ष दिले पाहिजे. त्या ठिकाणी कॅमेरे बसवले पाहिजेत आणि दुसरी गोष्ट की ज्या ठिकाणी स्मार्ट सिटीमध्ये जे आपण स्मार्ट सिटी करणार आहोत त्या ठिकाणी स्मार्ट सिटीमध्ये पूर्ण शहरामध्ये मानसिक विकृती बिघडत चालली आहे. आणि त्याच्यामध्ये आपण सर्वांनी लक्ष घातले तर सर्वांनीच हयाच्यामध्ये मानसिक विकृतीच्या बाबतीत समुपदेशन केलं पाहिजे.

मानसिक विकृतीच्या बाबतीत समुपदेशन केंद्र सगळया शहरात आपण उघडले पाहिजे. आणि हयाच्यामध्ये सगळयांनी सहभाग केला पाहिजे तरच त्याच्यामध्ये बदल होईल. हयाच्यावर प्रत्येकावर दोष देऊन उपयोग नाही आणि सुजाताताईंनी जो विषय मांडला की जी महिला पोलीस चौकी असेल किंवा महिला पोलीस स्टेशन असेल तर राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने एक पोलीस आयुक्तांशी आम्ही पत्र दिलं आणि आपल्या जे पिंपरी चिंचवड शहरामध्ये जे पोलीस स्टेशन प्रस्तावित असतील त्या प्रस्तावितामध्ये महिला पोलीस स्टेशन आपल्या शहरात व्हावं. ते स्मार्ट भागात झालं तरी चालेल. साधारण आपल्या शहरामध्ये आय.टी.चे लोक आहे. आपलं श्हर औद्योगिक शहर आहे. येथे कामगार वेगवेगळया ठिकाणावरुन येतात. काम करतात आणि त्याच्यामध्ये कमिशनरांनी मला खुप प्रोत्साहन दिलं आणि कुठल्या ठिकाणी महिला पोलीस स्टेशन आहे तिथली माहिती घेतली आणि प्रस्ताव तयार करुन राज्य सरकारकडे ठेवलेला आहे आणि निश्चित आपल्या शहरामध्ये पोलीस महिला स्टेशन होईल. माई मला एकच सांगायचं आहे की जे आता कोविड योध्दयांबाबत सर्वजण बोलले आहेत त्यांच्यामुळेच या शहरामध्ये आतापर्यंत ते काम करीत आहेत कोविड योध्दयांना जो भत्ता दिला तो भत्ता सरसकट दिला पाहिजे. मी एवढंच या ठिकाणी सांगते. स्मार्ट सिटी अंतर्गत जो काही पिंपरी चिंचवड शहरामध्ये खड्डे झाले आहेत खड्डयांच्या बाबत पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांच्या आशा, आकांक्षा हया पायदळी तुडवल्या गेलेल्या आहेत या इतक्या मोठया प्रमाणात हया शहरात भ्रष्टाचार झाला आहे. मी एवढच बोलते आणि थांबते.

मा. मिनल यादव - सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, आणि मा. खासदार डॉ. अमोलजी कोल्हे , सन्मा. सभागृह व पत्रकार बंधु, सर्वात प्रथम खरंच सुजाताताईंचे धन्यवाद व्यक्त करते की महिलांसाठी जिव्हाळयाचा प्रश्न आहे. बिबवेवाडी मध्ये ज्या लहान मुलीचा खुन झाला त्याचा खरंच आम्ही महिला म्हणुन खुप वाईट वाटतं. याचा सगळया महिला मिळुन आम्ही जाहीर निषेध करतो. अशा पध्दतीचं वातावरण आपल्या शहरात असेल तर पुढील काळामध्ये महिलांचं आणि मुलींच भविष्य खुप धोक्यात आहे. माई मी सगळयांना कमिशनर साहेब तुम्हांला विनंती करते की झाल्या गेलेल्या गोष्टी हया आपण निदर्शनास आणुन आणि लक्षा ठेवून भविष्यकाळामध्ये आपण त्याच्यावर काय उपाय योजना करु शकतो हयाच्याकडे तुम्ही गांभीर्याने घेतलं पाहिजे. ज्या पध्दतीने आपण स्मार्ट सिटीबद्दल बोललात, प्रत्येक जण बोललं. प्रत्येकाला वाटतय की भविष्यामध्ये भ्रष्टाचार न होता पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्वच गोष्टींमध्ये कशी पुढे जाईल. प्रत्येक नगरसेवक ज्याच्या त्याच्या पध्दतीने बोलतोय पण हया सगळया प्रश्नामध्ये महिलांचा प्रश्न कमिशनर साहेब खरंच महत्वाचा आहे आणि हयाकडे तुम्ही गांभीर्याने घेतला पाहिजे. पोलीस कमिशनरांबरोबर सलंग्नपणे महिला नगरसेवकांशी बैठक लावुन हयाच्यावर उपाय योजना काय करु शकतो ज्या ठिकाणी महापालिकेच्या वास्तु आहेत , लेडीज जिम असतील, स्विमिंग पुल असतील अशा ठिकाणी महिला सुरक्षा रक्षकच नेमले गेले पाहिजेत. जे आपले पालिकेचे गार्डन असतील तिथे संध्याकाळच्या वेळेस जी गर्दी होती त्या

गर्दीमध्ये महिलांची छेडखानी जास्त होते त्यावेळेस पोलीसांचा एखादा राऊंड त्या त्या ठिकाणी केला पाहिजे आता कॉलेजेस सुरु झाले आहेत. कमिशनर साहेब मी तुम्हांला ब-याच वेळा सांगितलय की अनधिकृत टप-या आहेत जिथे त्या अनधिकृत टप-या चालू होतात तिथे ती टवाळखोर पोरे जमा होतात. आणि त्याच्यामुळे महिलांना सुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत नाही हे तुम्हांला खुप वेळा सांगुन झालं. सर्वात प्रथम त्या अनधिकृत टप-या आहेत त्याच्यावर कारवाई केली तर निश्चितच अशा प्रकारची जी मुलं आहेत जी महिलांची छेडछाडी करतात त्यांचं प्रमाण नक्कीच कमी होईल. कमिशनर साहेब मी तुम्हांला हे ब-याच वेळा सांगुन झालंय . हयाच्यावर तुम्ही त्वरीत कारवाई करा. त्याचबरोबर कॉलेज चालू झालेत. कॉलेजच्या प्रिमायसेसमध्ये मुलींवर रॅगिंगचे प्रमाण वाढलेलं आहे. कॉलेज चालू होताएत, शाळा चालू होताएत. अशा ठिकाणी ज्या अनधिकृत टप-या आहेत त्यांच्यावर सरसकट कारवाई करा. कुठल्याही गोष्टींची तुम्ही भिती न बाळगता एखादी टपरी ठेवायची आणि ४ टप-या उडवायच्या असं न करता ज्या टप-या अनधिकृत आहेत आणि ज्याच्यामुळे जे वातावरण आहे महिलांसाठी खराब होतय अशा ठिकाणी या साठी निश्चितच महापौर मॅडम कारवाई झाली पाहिजे. आणि त्याचबरोबर साहेब ताई जे बोलल्या महिलांसाठी स्वतंत्र पोलीस चौकी किंवा पोलीस स्टेशन व्हायला पाहिजे निश्चितच त्या प्रकारचं काम फक्त बोललं आणि आजच्या दिवसाकरीता न ठेवता कमिशनर सर त्यावर ठोस काही तरी पावलं उचलली गेली पाहिजेत. कारण आज आम्ही बोलुन जाणार. उद्या पेपरला बातमी येणार नंतर हयाच्यावर कुठल्याच प्रकारचं काम होत नसेल तर आमचा इथे बोलण्याचा काहीच उपयोग नाही. जर पिंपरी चिंचवड शहरासाठी जर काही तरी करायचे असेल तर प्रत्येकाने हया प्रकारचे डिसिझन्स लवकरात लवकर घेतले पाहिजेत. त्याचबरोबर आपण म्हणतो की २४ बाय ७ महिलांसाठी जे ऑनलाईन फोन नंबर आहेत कुठलेही नंबर हे चालत नाहीत. त्या पध्दतीने एखाद्या महिलेला जर अडचण आली कोणी छेडछाड केली तर एक नंबर आहे आयुक्तालयातुन तो डिक्लेअर केलेला. तो फोन सद्यस्थितीमध्ये बंद आहे. अशा पध्दतीच्या ज्या छोटया छोटया गोष्टी आहेत त्यामध्ये सुरुवात इथुन केली तर नक्कीच त्याचा फायदा होईल त्याचप्रमाणे मी तुम्हांला आताच बोलले की पालिकेच्या ज्या वास्तु आहेत जिम्स म्हणा स्वीमिंग पुल्स म्हणा ज्या ठिकाणी महिलांचा वावर आहे तिथे महिला सुरक्षा रक्षकच असली पाहिजे. तुम्ही दर वेळेस ठेकेदार पध्दतीने सहा सहा महिन्यांनी लोकं घेता. सहा महिने झाले की परत तुमचं नवीन काँट्रॅक्ट येईपर्यंत तिथेचार दोन महिने लोक भरता अशा वेळेस ठेकेदार पध्दतीने महापालिका प्रायव्हेट लिमिटेड करुन ठेवली आहे साहेब. त्यामुळे या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करा आणि आता जो विषय आहे महिलांच्या सुरक्षेचा हा फक्त आता बोलण्यापुरता मर्यादित न ठेवता हयाच्यावर काय ठोस उपाय योजना करु शकतो याच्यावर गांभीर्याने विचार करावा, धन्यवाद.

मा. स्वीनल म्हेत्रे - सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, सन्मा. सभागृह आणि आपले सर्वांचे लाडके मा. खासदार डॉ. अमोलजी कोल्हे, पत्रकार बंधुभगिनींनो, सुजाताताईंनी जो विषय मांडला होता महिलांच्या अत्याचाराविषयी माझ्या सगळया सभासद बंधु आणि भगिनींनी सांगितलं की त्यावर एक मिटींग घ्यावी. त्यावर एक चर्चा करावी, उपाय योजना कराव्यात, त्यांना न्याय मिळाला पाहिजे. मान्य आहे त्यांना न्याय मिळालाच पाहिजे. माई आदरणीय राहुलदादा जाधव ज्या वेळेस महापौर होते त्यावेळेस नवीनच कमिशनर कृष्ण प्रकाशजी यांची नियुक्ती झाली होती आणि त्यावेळेस आपण सर्वजण त्या बैठकीस उपस्थित होतो. त्यावेळेस देखील शहरात होणारे अत्याचार, अन्याय आणि गुन्हा या विषयी चर्चा झाली होती. कुठे कशा प्रकारे गुन्हयांचे प्रमाण आहे हे देखील नगरसेवकांनी मांडलं होतं. पण ते फक्त त्या मिटींगपुरतंच मर्यादित राहील. ज्यावेळेस आपण हया स्मार्ट सिटी असं आपण म्हणतो असं वाटतं माई की ज्या वेळी महिलांवर होणारे अत्याचार थांबतील आणि माझ्या पिंपरी चिंचवड शहरातील एकही दिवस येणार नाही हया पिंपरी चिंचवड शहरात स्त्रीवर अत्याचार झाला नाही महिलेवर अत्याचार झाला नाही त्या वेळेस माई आपलं हे शहर स्मार्ट होईल असं मला प्रामाणिकपणे वाटतं. आणि आपण ज्या संतांच्या भूमीत राहतो शिवाजी महाराजांनी ज्या प्रमाणे महिलांवर अत्याचार करणा-यांना दंड दिला होता त्याप्रमाणे दंड आपण त्यांना देऊया म्हणजे पुन्हा ते गुन्हेगार अशी क्रिया करण्यास धजावणार नाहीत, धन्यवाद.

मा. उषा मुंढे - सन्मा. महापौर, सन्मा. कोल्हे साहेब, आयुक्त साहेब, माझे सर्व सहकारी, पत्रकार बंधु आणि भगिनींनो, माई खरंच खंत वाटली आज सांगायला. आताच नवरात्रीमध्ये स्त्री शक्तीचा जागर झाला आणि आज आपण महिलांवर बोलत असताना कित्येक जण महिलांवर बोलायचे सोडून स्मार्ट सिटी बद्दल बोलतात. खरंच आता महिलांना ५० टक्के आरक्षण असतानाही आपल्या महिला सुरक्षित आहेत का. आपल्या महिला रस्त्यावरुन जाताना येताना सुरक्षित आहेत का. काही माझ्या महिला भगिनी भाजीला जात असतील ऑफीसमधून येत असतील किंवा जात असतील तर त्या महिलांना स्वत:चा जीव मुठीत घेऊन यावे लागते. या ठिकाणी आपल्या शहरातली महिला सुरक्षित आहे का हे पाहण्याची खरंच गरज आहे. आणि आता कोविडमध्ये संपुर्ण राज्यामध्ये महामारीचं संकट आलं त्या आपल्या भगिनी ज्या ज्या घरातला कर्ता पुरुष गेला त्या महिलेची काय अवस्था आहे त्या महिलेला आपण जे २५०००/- रुपये महिला बाल कल्याणमधुन देतो तिथे ते १,००,००० रुपये द्यावेत यासाठी कोणी भांडत नाही. परंतु स्मार्ट सिटीचं काय झालं टेंडर कितीचं होतं त्यात कितीचा भ्रष्टाचार झाला याच्यावर सर्व सरसावुन बोलण्यासाठी पुढे येतात. मला खरंच खंत वाटत आहे आज सांगायला आज माझे सहकारी एकजण बोलले की स्मार्ट सिटीमध्ये काम करत असताना स्मार्ट सिटीमध्ये भ्रष्टाचार झाला आणि पिंपळे गुरव मधील एक त्यांना पिंपळे गुरव नाव घ्यायला खुप आवडतं परंतु पिंपळे गुरवमध्ये असे माझे सहकारी बोलत असताना त्यांनी पिंपळे गुरवच्या नगरसेवकाचं नाव घेतलं तर वाटतच असेल तर त्या पिंपळे गुरवमधल्या नगरसेवकांचे कोण

नातेवाईक आहेत त्यांचीही नावे द्यावीत आणि तीही हया सभागृहाला कळावी अशी मी महापौर तुम्हांला माझं म्हणणं आहे की नावंही त्यांच्याकडून कळावी. दुसरी गोष्ट अशी की माई त्या गोष्टी मी जाणत नाही आणि भ्रष्टाचारात माझा काढायचा नाही आणि तो माझा पिंड नाही. परंतु माई मला एक गोष्ट सांगावीशी वाटती की कमिशनर साहेब आम्ही तीन नगरसेवक तुम्हांला आम्ही कमीत कमी ३ ते ४ वेळा भेटलो की आम्हांला तुमची वेळ द्या, वेळ द्या. फक्त तुम्हांला पत्र द्यायचं राहीलय की आम्हांला तुमची वेळ देऊन तुम्ही आमच्या प्रभागात तुमची व्हिजिट द्यावी तर का तर जे लोक हातगाडीवर जो मनमानी कारभार चाललाय जो तुमच्या प्रशासनाचा की हातगाडीवर कारवाई करायला येणार प्रभागात म्हटलं की आता पहिलं प्रशासनात होतं त्याच्यानंतर प्रभागात दिलं. प्रभागामध्ये कारवाई करायला अधिकारी येणार तेवढयात सगळया हातगाडीवाल्यांना हयांचे सगळयांचे फोन जाणार. का तर हयांचे हप्ते जातात अधिका-यांना हातगाडीचे. मी पुराव्या सकट देईल की कुठल्या अधिका-याला कोण हप्ता देतं आणि रोज हे किती पैसे येता ते ठरलेलं असतं. माई मला दुसरी गोष्ट सांगावीशी वाटते खंत वाटते आयुक्त साहेब तुमच्या अधिका-यांना ते अधिकारी म्हणुन घेण्याची पण. महापौर साहेब ज्या वेळेस अधिका-याला आपण सांगतो की तिथे जुगाराचा अड्डा चालू आहे , इथ मटका चालू आहे तर काही तरी बघा आपल्या प्रशासनाची जागा आहे. तिथे आपलं काही तरी देणं आहे ते सुरक्षित ठेवण्याची जागा आहे तर कमिशनर साहेब तुमचे अधिकारी डायरेक्ट त्यांना आमची नावे सांगणार, हा कुठला नियम आणि कुठल्या कायद्यात आणि कोणी अधिकर दिला आमची नावं सांगण्याचा. साहेब ही पहिली वेळ नाही सीमाताई चेअरमन असताना पण एकदा असं झालेलं की दोन ते तीन वेळा एक गाडी लागताना तरी प्रशासनाने अधिका-यांवर काय ॲकशन घेतली. साहेब हे कुठे तरी थांबले पाहिजे. आणि तुमच्या अधिका-यांना कुठतरी आळा बसला पाहिजे आम्ही नगरसेवक आहोत. जनतेनी आम्हांला निवडून दिलयं जनतेची कामं करण्यासाठी. आम्ही मुर्ख नाही आहोत तुम्हांला एवढा वेळ द्यायला तुम्हांला फोन करायला. आम्हांला काही दुसरी कामं नाही का. साहेब जे झालयं ते चुकीचे झालयं आणि इथुन पुढे जे चालवणार ते चुकीचच होणार आहे हे आम्हांला पण माहिती आहे. कारण तुम्हांला जो पर्यंत आदेश येत नाही तोपर्यंत तुम्ही कुठल्याही प्रभागाची व्हिजिट घेणार नाही. ते तुमच्या आम्ही चार व्हिजिट घेतल्यानंतर आमच्या लक्षात आलं का साहेब तुम्हांला आदेश लागतो की जावं त्या प्रभागात व्हिजिट करा. मग नगरसेवकांना काही किंमत नाही, महापौर कमिशनर साहेबांना काही तरी आदेश द्या आणि त्यांना काही तरी आम्हांला मी जे बोलले त्याच्यावर कमिशनर साहेबांना बोलायला लावा.

मा. झामाताई बारणे – मा. महापौर साहेब, मा. आयुक्त, आज या सभागृहामध्ये उपस्थित असलेले खासदार डॉ. कोल्हे साहेब तसेच नगरसचिव, सर्व नगरसेवक, नगरसेविका, माझे पत्रकार बंधु भगिनींनो महापौर साहेब खुप वेळ झालेला आहे. चर्चा चालली आहे. भ्रष्टाचारावर

अनेक काही मुद्दे, मा. सीमाताई असतील, सुजाताताई असतील, काळभोर ताईंनी जो विषय मांडलेला आहे आता मुंढे ताईंनी सांगितले की महिलांच्या बाबतीमध्ये जे आपल्या शहरामध्ये अत्याचार महिलांच्यावरती जे काही आपणां सर्वांना माहिती आहे तेच तेच विषय रिपीट करायला नको वाटतं. परंतु महिला सुरक्षित रहायला पाहिजे आपल्या शहरामध्ये. आता कॉलेज चालू झालेत शाळा चालू झाली, महिला बाहेर पडतात सर्व्हिससाठी जातात आणि दळणवळण भाजीपाला हे सर्व काम महिलांना करावे लागते. आयुक्त साहेब खरोखर आपण जे सी सी टीव्ही कॅमे-याचे जे नियोजन केलेले आहे परंतु ते पूर्ण झालेले नाही. ज्या ठिकाणी खरोखर अत्यंत गरज आहे अशा चौकामध्ये अशा ठिकाणी शहरामध्ये हया सीसी टीव्ही कॅमेराचे आपण चांगल्या पध्दतीने नियोजन केलय परंतु अजूनपर्यंत ते काम पूर्ण झालेलं नाही. आज या ठिकाणी आता आमच्याच डांगे चौकात असेल अशा काही ठिकाणी अशा काही घटना घडतात आणि ती घटना घडुन गेल्यानंतर आपण जागे होतो. त्याचा काही उपयोग होत नाही माई. आधी तिथे सुरक्षितता जे काही आहे ते चांगल्या पध्दतीने केलं पाहिजे. आता आपले पोलीस कमिशनर आलेले आहेत त्यांच पण चांगलं काम आहे. त्यांनी चांगलं पाऊल उचललेलं आहे. या अत्याचाराला आळा बसण्यासाठी ते त्यांच्या पध्दतीने त्यांचं काम करीत आहेत. महापौर साहेब आता मला एवढंच सांगायचय की सर्वांनी भ्रष्टाचाराचा जो काही उल्लेख केलेला आहे परंतु भ्रष्टाचारामध्ये सगळेच काही बरबटलेले नाहीत. सगळयांचे हात बरबटलेले नाहीत. जे काही भ्रष्टाचार करणारे आहेत ते खाऊन खाऊन दमले आणि देवपूजेला लागले असे मला या ठिकाणी मला म्हणायचय. आतापर्यंत जे महापालिकेमध्ये आपण जे २५ वर्ष आहोत तुमच्याबरोबर मी पण आता माझी पण ४ थी टर्म आहे २० वर्षे झाली आहेत परंतु असं काही कोणी सारखं सारखं उल्लेख करत नव्हतं कोणी, आणि आता निवडणूक जवळ आली आहे. दोन तीन महिन्यामध्ये निवडणूक आहे. एकामेकावर आरोप करतात. पक्षाचे असो सत्ताधारी असो परंतु मला हे वाटतं की नियमच सांगते की आपण एकमेकांवर आरोप करण्यापेक्षा नागरीकांमध्ये कसं काम करता येईल, लोकांचे प्रश्न कसे सोडवता येतील हे पाहील पाहीजे, आता आपल्याला राहीलेत तीन चार महिने. त्याच्यामध्ये आपल्याला चांगल्या पध्दतीने काम केलं पाहिजे हे गरजेचे आहे. आणि आपण जे सभागृहात ओरडतो ते नागरीकांच्यामध्ये हा मेसेज एक वेगळा जातो. त्यांच्यामध्ये एक चर्चेचा विषय होतो. व आपल्याला त्यांनी निवडून दिलेलं असतं. आपण सभागृहात आलोय त्यांच्या जीवावर आलेलो आहे. आपण त्यांच्यासाठी काय करावं हे प्रश्न मांडले पाहिजेत. मी माझ्या वॉर्डात अर्धवट कामे आहेत आयुक्त साहेब, मी आपल्याला व्हिजिटला बोलवले होते. प्रभागात तुम्ही आले. त्यातुन मी म्हटलं जाता जाता तुम्ही माझ्या वॉर्डात व्हिजिट द्या. अनेक कामे अर्धवट आहेत. कामांचा पाठपुरावा करत असताना कामं स्पीडमध्ये होत नाहीत. तुम्ही येतो म्हटले ४ दिवसांनी.येतो ८ दिवसानी. तुम्ही मला म्हणाले की आलो की कळवेन. तुम्हांला माहिती आहे आणि पाहू. ठीक आहे तुम्ही येऊन गेलात. मी आज पेपरला वाचलं. तुम्ही खासदारांच्या बरोबर व्हिजिट दिली काही ठिकाणी. परंतु जी कामं अर्धवट आहेत त्या

कामासाठी तुम्ही काय पाऊले उचलली आहेत. प्रभागाची मिटींग झाल्यावर काय कामं काढली महापौर साहेब आपला फोन आला होता. मी अनेक वेळा सांगते की प्रभागांमध्ये जी काय कामे चालली आहेत काम मंद म्हणजे स्पीडच नाही त्या कामांना. ती कामं कशी होतील. आपले रस्ते गटर पाणी हे रोजचेच काम चालू आहेत. आता सध्या बाकीची कामे काही डांबराची चालू आहेत, काँक्रीट चालू आहेत पण कुठच्या कामाला स्पीड नाही. साहेब तुम्ही आले येऊन गेले आता तुम्ही काय मार्ग काढणार आहे हे मला माहीत नाही. मला माहित असतं मी आज पेपरला वाचलं म्हणुन मी आज तुम्हांला म्हणते. कारण वॉर्डामधली काम महत्वाची आहेत. मी माझ्या सर्व नगरसेवक बंधु भगिनींना सांगते की आपण आपआपसातील वाद बंद करा तीन महिने आपल्या हातात आहेत. जी काय कामं आपल्याला करायचीत पक्षनेत्यांना सांगते आपण चांगल्या पध्दतीने झपाटयाने जी कामे करायची ती आपण करुयात आणि हया ठिकाणी एकामेकावर आरोप करण्याची जरा थोडीशी, कारण पक्षाची बदनामी होते कुठलाही पक्ष असुद्यात. पक्षाची बदनामी होती नागरीकांमध्ये वेगळा विचार करायला. आशाताईंवरती जे जेलमध्ये जायची वेळ आली कशामुळे नागरीकांची कामे खोदाईची कामं लोकांना त्रास होत होता म्हणुन त्यांनी इथे आंदोलन केलं साहेब आणि त्यांच्या सहकारी महिला त्यांना जेललाही जावं लागलं. अशा कुठच्या तरी कारणावरुन कशावरुन थोडासा आपण विचार करुनच केलं पाहिजे. महापौर ताई आपण या ठिकाणी महिला आहोत आपण महिलांचा विचार करावा महिलांच्या सुरक्षेसाठी आपल्याला काय करता येईल ती योजना आपण लवकर करावी. एवढंच मी सांगते आणि थांबते, धन्यवाद.

मा. नीता पाडाळे - मा. महापौर साहेब. मा. आयुक्त, आज या सभागृहामध्ये उपस्थित असलेले खासदार डॉ. कोल्हे साहेब तसेच नगरसचिव, सर्व नगरसेवक, नगरसेविका, माझे पत्रकार बंधु भगिनींनो आताच आपल्या सुजाताताईंनी माई खुप चांगल्या प्रकारचा हा विषय मांडलेला आहे की महिलांची सुरक्षितता. परंतु माई गेल्या आठ वर्षात आपण येथे बोलतोच आहे की महिला सुरक्षित राहील्या पाहिजेत. बरेचसे कोपर्डीच्या वगैरे अशा खुप काही घटना घडल्या परंतु त्याच्या साठी आपण असं पिंपरी चिंचवडसाठी ठोस पाऊल उचलले नाही की जेणेकरुन आपल्या महिला सुरक्षित राहतील. माई आपण पाहतोय माझी तर बरीच पत्र आहेत प्रशासनाला की ज्या काही भले महापालिकेच्या शाळा असुद्या प्रायव्हेट शाळा असुद्या, सार्वजनिक स्थळे असुदे तिथे आपले सी सी टी व्ही कॅमेरे बसलेच पाहिजेत. आता आपल्या स्मार्ट सिटी अंतर्गत काही ठिकाणी सी सी टी व्ही कॅमेरांची प्रोव्हिजन केली आहे. परंतु ज्या ठिकाणी माई महिलांची छेडछाड केली जाते जिथे महिलांना त्रास दिला जातो अशी ठिकाणे त्यात घेतली गेली नाहीत. माझी आयुक्तांना विनंती आहे. आयुक्त म्हणाजे येत्या आठ दिवसात टेंडर होईल. जे होईल ते होईल पण आयुक्त साहेब तुम्ही इथे बसलेल्या सगळया नगरसेवकांना एकदा विचारा की तुम्हांला कुठे वाटतय की कुठे सीसी कॅमेरे बसले पाहिजते. सगळयांची विचारपूस

करा. सगळयात महत्वाचे म्हणजे स्मशानभूमी आहेत तिथे टोळके बसतात. दारुडे असतात. आयुक्त सा ते सुध्दा इतके वेगवेगळे प्रकार करतात. कोण गांजा पितो कोण दारुच्या बाटल्या वगैरे प्रत्येक स्मशानभूमीत आयुक्त साहेब असं चाललेलं असतं. तिथे पण आयुक्त साहेब लक्ष दिले पाहिजे. आयुक्त साहेब आम्ही स्टँडींगला विषय पण केला की गार्डनमध्ये सुरक्षा रक्षकांचा. मला वाटतं माझ्या बरोबर अजुन ४-५ नगरसेवकांनी विषय केला. माझ्या काळेवाडीमध्ये ८ एकर गार्डन आहे. तिथे ३ वॉचमन आहेत. तीन शिफटमध्ये तीन वॉचमन. आता त्या बिचा-या वॉचमनने तिथे जवळपास हजारो लोक रोज येतात. तर त्या एका वॉचमनने कसं तेवढं पब्लिक हँडल करायचं. मी जरांडे साहेंबांना पण बोलले आपल्या पालिकेचे दोन वॉचमन द्या. तर आयुक्त साहेब तुमच्याकडे सुध्दा आम्ही आलो होतो आमचे नितीन लांडगे साहेबांना घेऊन आलो होतो की तिथे वॉचमनची संख्या तुम्ही वाढवुन द्या परंतु तुम्ही वॉचमेनची संख्या वाढवली नाही तरी ती वॉचमेनची संख्या लवकरात लवकर वाढवावी. आता काळेवाडी प्रभागात दोन शाळा आहेत साहेब शेजारी शेजारी आहेत. एका बिल्डींगला वॉचमन आहे आणि दुस-या बिल्डींगला वॉचमन नाही.तिथे सुध्दा आपण वॉचमन दिले पाहिजेत जेणेकरुन आता शाळा चालू होतील आतापर्यंत कोरोनाच्या काळात शाळा बंद होत्या. तेव्हा प्रॉब्लेम नव्हता. आता ज्या वेळेस शाळा चालू होतील तेथे वॉचमन नाही. अशा किती तरी शाळा आहेत की तेथे पुरेशे वॉचमन नाहीत. तिथे आपण प्रत्येक शाळेची माहिती मागवुन तिथे वॉचमन वाढवून तिथे मुली कशा सुरक्षित राहतील याचा आपण विचार केला पाहिजे. दुसरी एक गोष्ट म्हणजे आयुक्त साहेब मला वाटत महिन्यापूर्वी माझ्या प्रभागात व्हिजीट दिली काँक्रीटीकरणाच्या कामासाठी. आयुक्त साहेब मला इथे म्हणायचय की स्मार्ट सिटीचं काम जर टी.एस. नसताना टेंडर निघतं तर माझ्या काळेवाडी प्रभागातील काँक्रीटीकरणाचं एकच काम आहे गेली ३ वर्ष. मी त्या कामासाठी झटतेय. पहिल्यांदा हर्डीकर साहेबांनी तर मला असं उत्तर दिलं की मॅडम काळेवाडीतुन आम्हांला टॅक्स भेटत नाही म्हणुन आम्ही काळेवाडीला तरतुद देणार नाही त्यानंतर हर्डीकर साहेबांचे आणि माझे खुप झालं. त्यानंतर परत फाईल सही करुन दिल्या. दर वर्षी आयुक्तांकडे फाईल टी.एस.ला जाते आणि आयुक्त फाईल परत पाठवतात. आयुक्त साहेब जर तुम्ही २५० कोटीचा प्रोजेक्ट टीएस नसताना काढू शकता तर माझ्या काळेवाडी प्रभागातलं छोटं टेंडर का काढत नाही. टीएस तुम्ही का देत नाही. आयुक्त साहेब महिन्यापूर्वी तुम्ही व्हिजिट केली आणि म्हणाले मॅडम आपण तुमचे ते काम करु आणि तुम्ही रस्त्याची पाहणी केली. साहेब त्या रस्त्याला ड्रेनेज लाइन नाही. स्टॉर्म वॉटर लाईन जेव्हा पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापन झाली त्या वेळेस बाबासाहेब तापकीर नगरसेवक होते त्या वेळेसची लाईन आहे. माई अक्षरश: त्या स्टॉर्म वॉटर लाईनला लोकांनी मेनरोडला ड्रेनेज जोडलेल्या आहेत. माई, थोडाजरी पाऊस आला ना घरात ड्रेनेजचे पाणी येतय . पाण्याच्या लाईन्स सुध्दा त्याच वेळेच्या आहेत. एवढं सगळं असुन सुध्दा आयुक्त साहेबांनी आपले ते टेंडर सँक्शन केलं

नाही. उलट काय सांगितलं फक्त तुम्ही स्टॉर्म वॉटर आणि पाण्याच्या लाईनचं सेपरेट टेंडर काढा तर त्या टेंडरसाठी परत आता प्रत्येकाचं एस्टिमेट कारायचं हयाच्यात तीन महिने जाणार म्हणजे आमचा कार्यकाल संपला तरी आम्ही असं लोकांसमोर येणार की एवढया आमच्या समस्या असुन सुध्दा पाच वर्ष नगरसेवकांना साधं ते काम सुध्दा करता आलं नाही. माझी आयुक्तांना विनंती आहे की आयुक्त साहेब तुम्ही आहे ते टेंडर माझं पटकन टीएस करा आणि टेंडर काढा. आज तर तुम्ही एवढं काम काढू शकता तर आमच्या सारख्यांच गोरगरीब काळेवाडीत राहणारे सर्व सामान्य आहेत त्यांच्यासाठी एवढं काम जर तुम्ही केलं तर नक्कीच बर होईल. आयुक्त साहेब काळेवाडी प्रभागासाठी पाण्याची टाकीच डीसेंबर २०१६ साली भूमीपुजन झाल तो पण विषय मी तुम्हांला सांगीतलेला आहे परंतु आता पाच वर्ष होतील डिसेंबरला. तरी सुध्दा अजुन टाकीचं काम  पूर्ण झालेलं नाही. आयुक्त साहेब याला जबाबदार कोण. पहिला ठेकेदार त्याला ब्लॅकलिस्ट करायला २-३ वर्ष कशाला लावायला पाहिजेत. आयुक्त साहेब तो जर काम करत नव्हता तर त्याला २०१७ ला ब्लॅकलिस्ट करायला पाहिजे होत. आपल्या अधिका-यांना कोणतीच गोष्ट अंगावर घ्यायची नाही. कायम काळेवाडीला पाण्याचा प्रश्न आहे आयुक्त साहेब. आज सुध्दा काळेवाडीत महिना झालाय काही भागात पाणी नाहीय. माझ्याकडे मेसेज आहेत. अधिका-यांना मी प्रत्येक गोष्टीचा मेसेज पाठवते कॉलनी सहीत लोकांच्या नंबरसहीत मेसेज पाठवते. हो मॅडम करु,  हो मॅडम झालं. आयुक्त साहेब आता इलेक्शन आलय. चुक फक्त ही आहे ऑपरेटरची की तुमचे ऑपरेटर आहेत व्हॉलव्ह ऑपरेटर. ते कुठे तरी काही तरी चिरीमिरी घेतात आणि हा व्हॉल्व्ह उलटा फिरवा तो व्हॉल्व्ह उलटा फिरवा आयुक्त साहेब महिन्यापूर्वी जर पाणी चांगलं येत होतं अचानक महिन्यात एकदम लो प्रेशर पाणी कसं झालं. आयुक्त साहेब आपल्या एक्सिक्युटीव्हला जर आम्ही काही बोललो तर त्यांना इतका राग येतो इतका राग येतो की त्यांचा पाराच चढतो. मागे आयुक्त साहेब एकदा स्टँडींगच्या मिटींगला मी म्हटल होतं तुम्हांला पाण्याचा विषय घ्यायचा. मला बाहेर आल्यावर बोलले की मॅडम तिथ बोलला तुम्ही. आम्हांला किती वाईट वाटत शेवटी आयुक्त काम कोणाला आम्हांलाच सांगणार आहेत ना. म्हणजे आम्ही बोलायचंच नाही का आयुक्त साहेब. आज सकाळी सकाळी मी त्यांना फोन केला होता साहेब माझा महिना झालायं पाण्याचा प्रॉब्लेम आहे. हया रोडला मॅडम मला रोडचं सांगू नका. मला ठरावीक स्पेसिफीक माणुस सांगा की ज्याला प्रॉब्लेम आहे. आयुक्त साहेब ज्या वेळेस आम्ही रोडचं नाव घेतो, कॉलनीचं नाव घेतो त्यावेळेस त्या पूर्ण कॉलनीला प्रॉब्लेम असतो. आज महिना झाला आयुक्त साहेब काळेवाडीत एवढा पाण्याचा प्रॉब्लेम आहे की बास रे बास. सकाळी ते जे.ई होते बिचा-या त्या जे.ईचा हयात काही दोष नाही. दोन महीन्यापुर्वी तुम्ही डेप्युटीच्या बदल्या केल्यात.  त्या बिचा-यांना कळत नाही कुठे व्हॉल्व्ह आहेत कोणती लाइन त्यांना अभ्यास करता करता वर्ष लागेल. त्याच्यानंतर त्यांना जमेल. तरी त्या जेईना प्रत्येक कॉलनीतील २०० ते ३०० लेडीज त्यांना

भेटल्या असतील आणि साहेब काही करा पण आम्हांला पाणी द्या. अक्षरश: त्या लेडीज त्या जेईंना सांगत होत्या की अक्षरश: आम्ही अजुन आंघोळ केलेली नाही साहेब. साहेब आमचा पाण्याचा प्रश्न सोडवा. एकदम करंगळीपेक्षा बारीक पाणी येतय. पाणी ६.३० ला येतं आणि ७.३०/ ७.४५ ला येत, दोन दिवसाचं पाणी आम्ही कसं भरायचं ते सांगा. आयुक्त साहेब जास्त डोक्यावरुन पाणी गेलं तर तुमचे एक्झिक्युटीव्ह आदेश देतात जा त्यांचे रिडींग घ्या, रोज त्यांचे रिडींग चेक करा, हे करा. एका कुटुंबाला आपण पालिका किती लीटर पाणी देऊ शकते. मग आयुक्त साहेब तुम्ही नियमावर येता. तुमचे अधिकारी हे कुठं तरी चुकीचे आहे आयुक्त साहेब. तुम्ही सांगा एक जण घरमालक असेल त्याच्या बरोबर तीन भाऊ असतीलतर त्या तीन भावांनी पाणी कसं भरायचं एका कनेक्शनवरती. कुठे तरी तुम्ही प्रेशर द्या आयुक्त साहेब. मी संदीप भाऊंचं आभार मानते कुठे तरी काळेवाडीची कीव त्यांना आली. ते म्हटले की काळेवाडी, राहटणीला स्मार्ट सिटीत घ्या. आयुक्त साहेब खरच काळेवाडी ही पिंपरी नंतर विकसित झालेली काळेवाडी परंतु आयुक्त साहेब अजिबात काळेवाडीत कोणताच विकास झालेला नाही. कोणते आरक्षण ताब्यात घेतले नाहीत, रस्ते मोठमोठे नाहीत, काळेवाडीत काही सुविधा नाही. आज मी आपल्या आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांची पुण्याई म्हणुन तेवढे काळेवाडीत ज्योतिबा उद्यान झालेलं आहे. बाकी काळेवाडीत कोणतीच अशी सेवा सुविधा नाही. आयुक्त साहेब तुम्ही जात येत असाल काळेवाडीतुन, पाहताय की काय आहे काळेवाडीची परिस्थिती. आज जर मेनरोड असेल काळेवाडीचा त्याला जर ड्रेनेज लाईन, स्टॉर्म वॉटर लाईन नसेल ही किती दयनीय अवस्था आहे आमच्या काळेवाडीची आयुक्त साहेब ती बघा हेच मी या प्रसंगी सांगते. त्याचप्रमाणे काळेवाडीतील जो चौक आहे तो आपल्या शहरातील मेन चौक होणार आहे. तिथे शिवसृष्टी करण्यासाठी सगळं केलेलं आहे. तेथे कन्सलटंट वगैरे सगळं तयार केलेलं आहे. तिथे आमची मागणी तिथे मी आपणांला मागे पण बोलले की आपण जर तिथे ॲल्युमिनिअमचा पुतळा म्हणतोय आणि त्याला कमी खर्च आहे. लाईफ आहे ते १० वर्षाचं आहे. मला असं वाटत आणि आम्ही सर्व नगरसेवकांनी त्या वेळेस मागणी केली की तिथे ब्रॉंझचा पुतळा द्यावा ते पण आपण लवकर मान्य करुन काळेवाडीतील दोनंच कामं आहेत जे कॉंक्रीटीकरण करण्याचे आहे ते तर आयुक्त सो. माझी आपणांला विनंती आहे की आयुक्त साहेब लवकर कामं काढून डिसेंबर पर्यंत किंवा नोव्हेंबर पर्यंत चालू करावी आणि शिवसृष्टीचं सुध्दा आमचे आराध्य दैवत शिवाजी महाराज आहेत तो ब्रॉंझचा पुतळा करावा एवढं बोलून थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

मा. माया बारणे – सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, आदरणीय खासदार डॉ. अमोलजी कोल्हे, नगरसेवक , नगरसेविका आणि पत्रकार बंधु भगिनींनो खरं तर सुजाताताईंनी जो विषय मांडला आहे महिला सुरक्षिततेसंदर्भात. अतिशय कौतुकास्पद विषय होता. त्यांनी मुद्देही खुप सुंदर मांडलेले आणि आयुक्तांनी खुलासा त्यावर अप्रतिम केलेला आहे. त्यांनी मी

बघतो, करु, बघु हया भाषेमध्ये बोललेले. ठीक आहे त्यांनी त्यांची बाजू मांडुन मोकळे झालेले आहेत. माझंही हया सभागृहाला एक म्हणणं आहे आपण महिला जास्त आहोत. प्रत्येक ठिकाणी ५० टक्के सगळया क्षेत्रात घेतलेलं आहे. राजकारण असेल, शिक्षण असेल, प्रॉपर्टी मध्ये भागीदार आहोत सगळया गोष्टीत ५० टक्के भागीदार आहोत. तर मग सेल्फ डिफेन्सच्या बाबतीत आपण दुस-यावर अवलंबुन का राहतो. काही गोष्टीमध्ये बदल आपण स्वत:मध्ये केला पाहिजे. या ठिकाणी बसलेले सगळे पालक आहोत आपण. आम्हांलाही मुल आहेत मुली आहेत आमच्याही घरात. मला वाटतं कुठेतरी आपली मेन्टॅलिटी बदलली पाहिजे आणि आपल्या मुलींना आपल्या घरात ज्या लेडीज शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी घराबाहेर जातात त्यांना सेल्फ डिफेन्स कसा करायचा हया गोष्टी त्यांना आपण घरातनं शिकवल्या पाहिजेत. कारण सुधारलेली मंडळी आपण आहोत. सुशिक्षित आहोत. घरात तर आपण बसणार नाही. चुल आणि मुल हयाच्या पलिकडं आपण आपलं क्षेत्र विस्तारलं गेलय. तरी हया गोष्टी ज्या वेळेस हया गोष्टी मागे टाकून पुढे चालणार आहोत. त्या वेळेस हया गोष्टी आपण सक्षमपणे पेलल्या पाहिजेत असं माझं स्वत:च मत आहे. आज मी सीमाताईंचे अभिनंदन करेन की त्यांनी स्मार्ट सिटीच्या विषयाला खरंच त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले ते सत्ताधारी असुनही ते त्यावरती त्या बोलल्या. खरं तर हया सभागृहातमध्ये सत्ताधा-यांमधील बरेच नगरसेवक चुकीच्या गोष्टीला विरोध करतच होते परंतु त्यावेळेस त्यांची मुस्कटदाबी होत होती हेही नक्की आहे आणि आज अचानक ३ महिन्यानंतर इलेक्शन यायला लागले त्यावेळेस प्रत्येक जण आपल्या ज्या मनातल्या गोष्टी आहेत त्या बोलून दाखवायला लागला आहे. पण माझं एकच म्हणणे आहे की जेव्हाच्या तेव्हा गोष्टी बोलल्या तर क्लीअर होतात. आणि प्रशासनही हया बाबतीत ढिसाळ कारभार करीत आहे. मी गेल्या वेळेसही आयुक्तांना १५ दिवसापूर्वी फोन केला होता की स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मार्फत ज्या योजना आपल्या शहरात चालतात त्या योजनांच्या संदर्भात मी माहिती मागितली होती. तर त्या संस्थेचे जे मेन आहेत श्री. चंद्रकांत पाटील त्यांचा मला फोन आला की ताई तुम्ही जी माहिती मागवली आहे त्या संदर्भात तुमच्याशी भेटायचय. मी म्हटले ठीक आहे या ऑफीसला म्हटलं भेटू आपण. त्यांनी संबंधित ठेकेदाराला माझ्या घरी पाठवलं की ताई कुठल्याही प्रकारची माहिती मागवू नका. काय असेल ते काँप्रोमाईज करुन घेऊ, आम्हांला फक्त ते काम मिळू दया आपण काँप्रोमाईज करुन घेऊ. इथे मानसिकता ठेकेदारांची इतकी विचित्र झालेली आहे की इथे बसलेले सभागृहातील सगळे नगरसेवक भ्रष्टाचारी आहेत हे कुठंतरी ठेकेदारांच्या मनावरती बिंबलेलं आहे. मी त्याच वेळेस त्यांना म्हटलं साहेब माहिती मागणं हा माझा अधिकार आहे आणि तुम्ही जर चुकीची गोष्ट केली नसेल तर तुम्हांला घाबरण्याचं आणि माझ्या दारात येण्याचं काही कारणंच नाही असं मी म्हटल. मग म्हणाले ठीक आहे काय असेल ती माहिती द्यायला सांगतो. त्यांनी माहिती मला फक्त ४ पानाची दिली आहे. म्हणजे मोघम द्यायची म्हणुन मला माहिती दिली आहे. मी त्याच वेळेला

आयुक्त साहेबांनाही फोन केला की आयुक्त साहेब अशा प्रकारचे प्रकरण आहे. तुम्ही लक्ष घाला. आजतागायत आयुक्त साहेबांनी त्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. ते झाल्यानंतर सुध्दा वाकडचा जो रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरणाचा रस्ता आहे त्या रस्त्यावर दोन झाडं आहेत जी पूर्ण पोखरलेली आहेत. ती झाडं काढण्यासाठी स्वत: आपले जे एक्झिक्युटीव्ह आहेत त्यांनी वृक्षसंवर्धनला पत्र दिले होते की लवकरात लवकर ती झाडे काढून घेण्यासाठी. परंतु आज तीन हप्ते झालेत परंतु वृक्षसंवर्धनाच्या अधिका-यांनी ती झाडे काढण्याची तसदी घेतलेली नाही म्हणजे कुठेतरी प्रशासनामध्ये भोंगळ कारभार चाललाय. एकमेकांमध्ये कोऑर्डीनेशन नाहीए. कोणाची कोणाला व्हॅल्यु नाहीए आणि कोण काय हयाने बोलतय तळमळीने बोलतय त्याच्याशी देणंघेणं नाहीए. नगरसेवक अपशब्द वापरले तर तुम्हांला राग येण्याचं कारणच नाहीए. कारण ज्या वेळेस नगरसेवक म्हणुन ज्या वेळेस हया सभागृहात बसतो ना ते जनतेचं प्रतिनिधीत्व करत असतो. आम्ही आमची वैयक्तीक कुठलीही कामं तुम्हांला सांगत नसतो. तुमचं काम आहे नगरसेवक ज्या वेळेस तुमच्याकडे एखादर तक्रार घेऊन येतो, एखादी समस्या घेऊन येतो त्याच्यावरती तोडगा काढणे, केवळ चालढकल करणे हा तोडगा होवू शकत नाही. जेव्हा आशाताईनी खरं तर त्यांनी जे केलं त्यांच मी पूर्णत: समर्थनही नाही करणार. पण ज्यांनी जे केलं ते आकसापोटी नाही केलेलं. त्यांनी जे केलं जे कुठंतरी अनक गोष्टींचा पाठपुरावा केला असेल आणि तुमच्याकडून जर तो प्रश्न सुटला नसेल तर त्यामुळे त्यांनी ते केलं जनतेचं काम होत नाही ही मनात कुठंतरी मनात खंत होती त्या भावनेने त्यांच्याकडून ते घडून गेलं. पण ज्या वेळेस नगरसेवकांवर तुम्ही कारवाई करता त्यावेळेस अधिका-यांवर, अधिकारी तुमचे जावई आहेत का. त्यांच्यावरती तुम्ही का कुठल्या प्रकारची कारवाई करत नाही. ही दुटप्पी भूमिका तुम्ही घेता ना ती कुठतरी बदला. श्रीकर परदेशी सारखे अधिकारी होऊन गेले. त्यांचा आजही महापालिकेत दरारा होता. साहेब जर आले तर कोणाचीही टाप नव्हती वेडंवाकडं वागण्याची आणि बोलण्याची. पण आज अशी कंडीशन झाली आहे की आयुक्त साहेब तुम्हांला सुध्दा तुमचे अधिकारी डिमांड देत नाहीत. प्रत्येक गोष्टीला केराची टोपली दाखवली जाते. याचा अर्थ काय होतो. मग नगरसेवकांना ऑफीशियली एक तर आंदोलनं करावी लागतात. किंवा वेगळया वळणानं त्यांची कामे करुन घ्यावी लागतात. खरं तर सगळे जण आज या ठिकाणी पोटतिडीकीने बोलले. माई आज तुमचं अभिनंदन करेन की आज त्यांनी सगळयांना बोलण्याची संधी दिली. इन मीन राहित्या तीन जीबी. तीन जीबीमध्ये आपल्याला विकास कामांचंही पाहयचय आणि जे काय प्रत्येकाच्या प्रभागात अर्धवट राहिलेली कामे आहेत तीही आपल्याला या ठिकाणी करुन घ्यायची आहेत. माईंचे मी मनापासुन अभिनंदन करते आणि थांबते. धन्यवाद

मा. सुवर्णा बुर्डे – सन्मा. महापौर आपल्या शहराचे खासदार डॉ कोल्हे साहेब, आयुक्त साहेब, नगरसेवक, नगरसेविका, पत्रकार बंधु आणि सभागृह. आज पालांडे ताईंनी जो विषय घेतला की महिलांच्या सुरक्षिततेसाठी खरंच हा खुप गरजेचा विषय होता आणि तो पालांडे ताईंनी घेतला. मी त्यांचे मनापासुन आभार व्यक्त करेन. कारण की महिलांच्या सुरक्षिततेबाबत ज्या वेळेस भृणहत्या होतात त्या वेळेस भृणहत्या झाल्यानंतर आपण फक्त मेणबत्त्या लावायच काम करतो आणि श्रध्दांजली वाहण्याचं काम करतो. आजपर्यंत त्यावर कोणताही ठोस उपाय किंवा ठोस नियोजन आजपर्यंत तरी कोणीही केलेलं नाही. आता साडेचार वर्ष होत आले मी सभागृहात पाहते की फक्त आपण इथे बोलण्याचं काम करतो पण आज स्त्रियांवरती जे अत्याचार होतात मुलींवर जे अत्याचार होतात त्यांच्यावर आपण आजपर्यंत काहीही निर्णय घेतलेले नाही. निर्णय घेण्याची गरज आहे. आयुक्त साहेब मी तुम्हांला एक सांगेन आपण नागर वस्ती विकास योजना विभागाच्या अंतर्गत आपण जे काही प्रशिक्षण महिलांसाठी ठेवतो ते प्रशिक्षण ठेवत असताना एक प्रशिक्षण डिक्लेअर केलं आपण जे मोटर ड्रायव्हिंग प्रशिक्षण ठेवलय आपण महिलांसाठी त्यामध्ये २५ ते ४५ वयासाठीच प्रशिक्षण ठेवल आहे. मुलींसाठी आजपर्यंत महानगरपालिकेमध्ये किंवा महिलांच्या सुरक्षिततेसाठी कुठलही प्रशिक्षण राबवलं गेले नाही. जर असं प्रशिक्षण आपल्याकडे महानगरपालिकेत महिला बाल कल्याणच्या अंतर्गत राबवले गेले तर खरंच महिलांसाठी मुलींसाठी खूप चांगले होईल. आपल्याकडे महानगरपालिकेच्या शाळा आहेत या मनपाच्या शाळांमध्ये जर आपण प्रशिक्षण राबवले सेल्फ डिफेन्स सुरक्षेसाठी आता ताई म्हणाल्या कराटेचे जे प्रशिक्षण प्रत्येक शाळांमध्ये दिले तर ते खरंच फायद्याचे होईल. आज आपण महिलेला पायावर उभं राहण्यासाठी शिलाई मशिनचं काम देतो. शिलाई मशिनचे प्रशिक्षण देतो किंवा इतर प्रशिक्षण असतात त्या महिलेल्या पायावर उभे राहण्यासाठी ताकद निर्माण करुन देतो. पण मुलींसाठी काय. आजपर्यंत मुलींसाठी जे महापालिकेने कुठलेही निर्णय झालेले नाही. आजपर्यंत १० वी व १२ वी मध्ये ८० ते ९० टक्के मार्क घेवून उत्तीर्ण झालेल्या मुलांसाठी त्यांना मानधन दिलं गेलं त्यानंतर काही मुलांसाठी सायकली दिल्या जायच्या. मुलींसाठी सायकली दिल्या जायच्या. आता त्यांच्या खात्यावरती पैसे जमा करतो. पण मला एकच सांगायचय की जर आपण नागर वस्ती विकास योजना विभागांतर्गत महीलां व मुलींसाठी सुरक्षेच्या अंतर्गत काही प्रशिक्षणं राबवली तर ते खुप फायद्याच होणार आहे आणि सर तुम्ही सीसी टीव्ही कॅमेरे लावणार आहात पण सी सी टीव्ही कॅमेरे लावत असताना आपण कुठल्या दर्जाचे सीसी टीव्ही कॅमेरे लावणर हे आधी स्वत: पडताळुन घ्या कारण की आपण जर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जाऊन पाहिलं तर आणि जर ते सीसी टीव्ही कॅमेरे चेक केले तर थोडया अंतरावरचे सुध्दा चेहरे सुध्दा दिसत नाहीत हे तुम्ही स्वत: जाऊन चेक करा कारण हे मी स्वत: जाऊन पाहिलं आहे. एक घटना माझ्या घराच्या समोरच घडली होती आणि तेथे समोरच महानगरपालिकेची शाळा आहे तेथे मला पाहयच होतं की एक मुलगा एका मुलीची छेड काढून रस्त्यावरुन जोरात गाडीवरुन गेला. मला त्याचा चेहरा पाहायचा होता म्हणुन ते

मी चेक केलं तर त्याचा चेहरासुध्दा त्या सीसी टीव्ही कॅमेरात दिसत नव्हता. अक्षरश: आपण लावत असू कॅमेरे तर चांगल्या दर्जाचे लावा नाही तर नाही लावले तरी चालतील आणि दुसरी गोष्ट अशी की आज आमच्याकडे काही ठिकाणी शहरी भाग आहे काही ठिकाणी ग्रामीण भाग आहे. जर ग्रामीण भाग असताना जर आपण कॅमेरे तर लावणारच आहे पण जो शहरी भाग आहे त्या ठिकाणी चौकाचौकांमध्ये किंवा नगरसदस्य सांगतील तसे लावताल पण ग्रामीण भागामध्ये वाडया वस्त्यांच्या ठिकाणी आज तीन तीन चार किमी त्या मुलीचे घर आहे ज्या वेळेला ती मुलगी एकटीला जाव लागतं त्या वाडया वस्त्यांच्या रोडवरुन त्या साठी आपण सुरक्षिततेच काय करणार हयासाठी ही पण जबाबदारी आपण स्वीकारावी आणि त्याच्यासाठी काही ठोस निर्णय घ्यावेत. दुसरं सांगायचं म्हणजे आपले जे भूयारी मार्ग आहेत काही ठिकाणी भरपूर ठिकाणी भूयारी मार्ग आहेत त्या मार्गामध्ये लाईट खुप कमी आहेत. लाईट कमी असताना तिथे खूप विचित्र विचित्र प्रकार घडत असतात. त्या ठिकाणी आपण सीसी टीव्ही कॅमेराच नियोजन केलं तर लाईट थोडेस ठळक केल्यातर येणा-या जाणा-या व्यक्तींना मुलामुलींनाही तिथे काही त्रास होणार नाही. कारण माझ्या प्रभागात सुध्दा दोन तीन भुयारी मार्ग आहेत तीथे इतका भयानक त्रास होतो आहे आणि आमचा जो परिसर आहे तेथे पोलीस स्टेशन आहे सर आता माई म्हणाल्या सर्व ठिकाणी महिला पोलीस स्टेशन केलं पाहिजे. गरजेचे आहे पोलीस स्टेशन करायला पाहिजे. आज जो माझा एरिया आहे मॅगॅझिन पासुन फाटयापर्यंत जरी पाहिलं साई मंदिराचा परिसर मंदिर सुध्दा आहे पोलीस स्टेशन सुध्दा आहे. अशा ठिकाणी जर सर्व्हे जर केला तर चांगल्या घरातल्या महिलेला मुलीला घराच्या बाहेर पडण्याची इतकी भिती वाटते की ती जर भाजीला पिशवी घेऊन निघाली तर सांगायला मला लाज वाटते पण हरकत नाही पण सांगावच लागणार आहे. जर ती महिला किंवा मुलगी भाजीला निघाली तर एखादा व्यक्ती तिचा हात पकडतो आणि म्हणतो येणार आहे का तु. म्हणजे लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे सर. मी चार वर्ष इथे सभागृहात बोलेन म्हटलं पण संधी मिळाली नाही. पण आज विषय निघालाय तर मी हा विषय तुम्हांला सांगती. जर आज गर्दीच्या ठिकाणी अशा गोष्टी घडत असतील पोलीस स्टेशन शेजारी असेल तरी सुध्दा त्याची दखल घेतली जात नसेल तर तुम्ही महिलांच्या मुलींच्या सुरक्षिततेसाठी तुम्ही करणार काय हेही आम्हांला सांगा. कारण की काही गोष्टी अशा आहेत की आपण म्हणणार करणार आहे, करणार आहे पण आपण काही करत नाही कारण ७-८ वर्षाची मुलगी साई मंदिराच्या ठिकाणी अशीच एक दोन वर्षापूर्वी अशीच घटना घडली. मेणबत्या लावल्या, श्रध्दांजली वाहीली झाल काही नाही झालं. तिथे त्या परिसरात काही सुधारणा सुध्दा झाली नाही. जर तिथल्या पोलीस स्टेशनचे पी.आय वगैरे असतील तुम्ही त्यांच्या मिटींग वगैरे घेतल्या प्रत्येक पोलीस स्टेशनची प्रत्येक प्रभागाच्या पी.आय. च्या मिटींग घेतल्या व सांगितले पॅट्रोलींग वाढवा किंवा महिलांच्या सुरक्षेसाठी तुम्ही काही तरी कुठेतरी पुढे चला पोलीसांनी जर हे मनावर घेतलं तर सगळया गोष्टी सोप्या होतील सर कारण की कुठे तरी बोलायला पण हे वाटतं खरं सांगायला पण हरकत नाही.

महिलेच्या सुरक्षेसाठी बोलतो पण पोलीस सुध्दा कधी कधी सुरक्षेसाठी पुढे येत नाहीत आणि काहीही करत नाही. खरं तर तेही आज जबाबदारपणे राहिले तर आज त्या महिला व मुली सुरक्षित राहतील. सगळया गोष्टी आयुक्त साहेब तुम्हांला काही बोलून उपयोग नाही. कारण की काही गोष्टी डिक्लेअर केल्या पण कोविड योध्दा यांच्याकडे भत्ता केला त्यात वयाची अट घातली ती काढून टाकावी व त्यांना पूर्णपणे भत्ता देऊन न्याय द्यायचा प्रयत्न करावा. माई हे बोलण्याची आज ही संधी दिली त्याबद्दल धन्यवाद. आता ताई म्हणाल्या सिक्युरीटीबद्दल. तर आयुक्त साहेब मी तुम्हांला सिक्युरिटीसाठी आणि ढाकणे साहेबांना पत्र दिलं होत ज्ञानेश्वर महाराज गार्डनसाठी खुप मोठ काम केलेलं आहे तरी या गार्डनमध्ये खुप गर्दी होते पण सिक्युरीटी काहीच नाही मध्यंतरी तीथे चोरी पण झाली त्यानंतर काय होऊ शकते हे सुध्दा लक्षात घ्यायला पाहिजे. जिजामाता मंदिर तिथे आपले दोन एसटीपी प्लँट आहेत तेथील सिक्युरिटी आतमध्ये बसतात बाहेरच्या ठिकाणी सिक्युरीटी येत नाहीत, तिथे नदी आहे. नदीच्या ठिकाणी आमच्याकडे जर पाण्यामध्ये एखादी बॉडी वाहुन आली तर डायरेक्टली मंदिरासमोर येते. आता मागे तीन चार वर्षापूर्वी एक घटना घडली की ती महिला प्लँटच्या शेजारी मारुन टाकलं होतं तिला आणि दुसरी घटना जी घडली होती ती एका पुरुषाला तिथे मारुन टाकलं होतं. जर अशा घटना घडत असतील तर तिथे आपली सिक्युरिटी नाही. आपला प्लँट आहे मी काय म्हणते की वैयक्तिक आमच्या घरासाठी सिक्युरिटी मागत नाही सर पण तिथल्या काही आपले पालिकेचे दोन दोन प्लँट असताना सर सिक्युरिटी आपल्या कामाला येणार नसेल तर ते सिक्युरिटी बाहेर थांबले पाहिजे अशा घटना घडण्यापासुन टाळले पाहिजे. बोलण्याची संधी दिली माई या बद्दल धन्यवाद.

मा. महापौर – हे बघा सगळयांना संधी देते. दोन दोन मिनिटे बोला. कारण बरेच दिवस झाले पाच महिने जी.बी. ऑनलाईन होती. मलाही समजतय सगळयांना त्यांचे विचार मांडायचेत. विचार मांडताना तेच तेच विषय घेऊ नका ही विनंती.

मा.सीमा सावळे – मा.महापौर साहेब, मा. कमिशनर साहेब, आणि आतापर्यंत महिला अत्याचारावरती बोलणा-या सगळे माझ्या बंधु, भगिनींनो, महीलांनो. मी बोलले तर तुम्हांला सगळयांना खुप लागतं. आता एका पत्रकाराने पिंपरी चिंचवड टाईम्स भीमराव पवार नावाच्या पत्रकाराने काय भाषा वापरावी महिलांच्याबद्दल, तुम्ही सगळयांनी याचा विचार करायचा, हया गोष्टीचा. सीमा सावळे भुंकल्या, भाजपने हाकलुन दिलेल्या नगरसेविका सीमा सावळे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये पत्रकारांवरती भुंकल्या. हा माझा विनयभंग आहे. महापौर तुम्ही भाजपच्या आहात. त्याचबरोबर तुम्ही महिला सुध्दा आहात. असल्या पत्रकारांना महापालिकेत येण्याला बंदी करणार का? हा माझा विनयभंग आहे. आणि तो जाहीरपणे केला जातोय. काय करणार आहात सांगा आणि इथे बसणा-या तुम्ही सगळयाजणी उषा मुंढे, सुजाता पालांडे सगळयांनी उत्तर दयायच काय करणार तुम्ही याच. याला चपलेनं बडवून काढला पाहिजे मा. महापौर साहेब. हा जर का एखादया महीलेबद्दल

अशा प्रकारची भाषा करणार, सर्व बंधुनो सांगा तुम्ही. काय करणार आहात तुम्ही. कंम्प्लेंट तर देणारच आहे. परंतु या ठिकाणी या महानगरपालिकेत एखाद्या सामान्य सदस्यांचा अशा प्रकारे जर अवमान करणार असेल तर मा. महापौर साहेब याला या महापालिकेत बंदी करावी लागेल तुम्हांला, बंदी करावी लागेल तुम्हांला. तो कुठे बसतो, तो पत्रकार कोण पोसतोय आज, कोण पोसतोय आज. तो कुठे बसतो, कोण आहे त्याला पाठीराखा, कोण आहे त्याला पाठीराखा. ज्या महिलांच्या सुरक्षिततेवरती बेंबीच्या देठापासुन ओरडताएत येथून सगळया जणी, कोण पाठीराखा आहे. लाज वाटते मा. महापौर साहेब मला, लाज वाटतेय मला. त्यांनी काय त्याच्या आईला कुत्री म्हणलाय तो. मला म्हटलं ठीक आहे सीमा सावळेला. त्याने त्याच्या आईला कुत्रीच म्हणतोय तो. एका महिलेला कुत्री म्हटला म्हणजे त्याच्या आईला कुत्रीच म्हटलेल आहे. किती सहन करायच. म्हशी, टोणगे ही भाषा आहे पत्रकारांची. या सभागृहात बसलेल्या सर्व पत्रकारांना माझी हात जोडून विनंती आहे, अरे, कलंक लावताएत कलंक. भाषा तर किमान चांगली वापरा. अरे, तुला पोसणारा तुझा नेता त्याच्या घरात महिला नाहीएत का. लाज वाटत नाही. बाहेर भेट नाही चपलेनं बडवलंना, हिम्मत असेलतर. मा. महापौर साहेब, मगाशी मा. उषा मुंढे तुम्ही बोललात, सुजाताताई तुम्ही पण बोललात मी अभिनंदन केलं. हे जे बिस्कीट टाकायची काम आहेतनां आणि आमच्या अंगावर सोडायचे ते बंद करा. मगाशी सुजाताताई तुमचा मुद्दा होता, महीलांबद्दल तुमचा रोख होता राज्य शासनाला अडचणीत आणण्याचा आणि तो भाजपाचे आम्ही प्रतिनिधी म्हणुन पुरेपुर निभावला परंतु रोज उठुन सुपारी घेतल्यासारख माझे चारित्र्यहनन करतो, वैयक्तिक स्वरुपाचं. पत्रकार बंधुनो किंवा तुमच्यातले अध्यक्ष असतील त्यांना पण हात जोडून विनंती आहे, इतकं चारित्र्यहनन करु नका रे. महिलांवर अत्याचार झाला म्हणुन सरकारला दोष देतील. अरे ह्या झारीतील शुक्राचार्यांना ठोकू द्या. पहिले ठोकू द्या मला त्यांना. सीमा सवाळेची तेव्हाही ताकद होती आजही आहे आणि इथुन पुढे पण असणार आहे. आहे कुणाची हिम्मत, नाव घ्यायची. सीमा सावळेनी १० वर्ष नाव घेतल याच सभागृहात टिडीआरच्या प्रश्नावरुन. स्वत:ला म्हणवुन घेतात नेते.

मा. महापौर – सीमाताई तुम्ही......

मा. सीमा सावळे – मा. महापौर कमिशनर या गोष्टीचा आज सोक्षमोक्ष लागला पाहिजे ही काय भाषा आहे, ही काय भाषा आहे, ही काय भाषा आहे, ही काय भाषा आहे. मा. महापौर साहेब नुसता निषेध करुन चालणार नाही. मा.महापौर साहेब, नुसता निषेध करुन चालणार नाही.

मा. महापौर – मा. आयुक्त साहेब ज्या पध्दतीने सीमा ताईनी विषय मांडला आहे आणि सीमाताईंना जे पत्रकार बोलले त्या विषयाचा मी महिला या नात्याने निषेध करते. आपले जे पत्रकार बंधू आहेत सगळे त्यांनाही सांगते की ब-याच वेळा अशा काही चुका मला ऐकायला

मिळतात ब-याचवेळा आमच्याबद्दल काही पण देतात अशांचा निषेध करते त्यांच्यावर गुन्हे दाखल करा. सगळया महिलांच्या वतीने आणि त्यामध्ये जो कोणी पत्रकार असेल ज्या काय पध्दतीने तो पत्रकार महीलेबद्दल बोलला त्याचा निषेध करते.

मा.उषा मुंढे – मा.महापौर साहेब, गुन्हा दाखल करावा व प्रोसीडींगमधुन आमदार हा शब्द काढून टाकणेत याव.

मा.महापौर - प्रोसिडींगमधुन आमदार हा शब्द वगळणेत यावा.

मा. सीमा सावळे – मा.महापौर साहेब, मी नाव घेतलेलं नाही, नाव घेतलेल नाही.

मा. महापौर – विचित्रपणे जो पत्रकार महिलांबद्दल अशी बातमी देतो त्या पत्रका-यांच्यावर गुन्हा दाखल करा आयुक्त साहेब. सीमाताई मी एवढ म्हणल की ज्या भाजप आमदारांचे नाव घेतलय त्यांचं नाव यामधुन वगळा.

(गोंधळ)

मा. सीमा सावळे – नाव घेतलचं नाही. नाव नाही घेतलं, नाव घेतल नाही. मा. महापौर साहेब विनंती एकच होती की हे जे वारंवार घडत होतं. माझ्या सगळया माया भगिनींच मी हया ठिकाणी आभार मानते आणि परत मा. महापौर साहेब अत्यंत जबाबदारीने या ठिकाणी मी माझे शब्द मांडते की अशा प्रकारचं म्हशी, टोणगे, कुत्रे अशा खालच्या दर्जाचे जर का संभाषण होत असेल तर आणि पत्रकार बंधु तुम्हाला ही विनंती आहे की पत्रकारिता किती ते शब्द ढासळतात कारण आम्ही आई पण आहे, बायको पण आहे, बहिण आहे, कोणाची तरी लेक आहे. तुमच्या घरात तुमची बायको, तुमची आई, तुमची बहीण ही पण स्त्रीच आहे. तिचा सुध्दा असा जाहीरपणे जर विनयभंग झाला तर तुम्ही काय करणार आहात. कोणी तरी काहीतरी सांगतं आणि अशा प्रकारची भाषा जर होत असेल मा. महापौर साहेब तर त्याच्यावरती कारवाई झालीच पाहिजे. मा. महापौर साहेबांनी कमिशनर साहेब आज या सभागृहात ऑर्डर दिलेली आहे. माझी आपणांस हात जोडून विनंती आहे ज्या महिलांच्या सुरक्षिततेवरती आम्ही इतका वेळ घालवला आज ती सुरक्षितता आणि तो विनयभंग या २५ लाख लोकसंख्येच्या शहरात जाहीरपणे माझ्या सारख्या ज्येष्ठ नगरसेविकेचा होतोय आणि ही या शहराला अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे. जो कोण हयाचा पोशिंदा असेल त्या पोशिंद्याला माझा जाहीर आव्हान आहे, जाहीर आव्हान आहे इथं, सभागृहामध्ये हिम्मत असेल ना समोर येऊन बोलून दाखवा. येऊन दाखवा अशा प्रकारे खपवुन घेणार नाही. मा. महापौर माफ करा. माफ करा. माफ करा.

मा. महापौर – शांत व्हा. कमिशनरना आदेश देते. मी पण महिला आहे.

मा.सीमा सावळे – इथे बसलेल्या प्रत्येक महिला आणि इथे बससलेला माझा प्रत्येक भाऊ या सगळयांना माहिती आहे की कोण करतय आणि कोण करायला लावतय. आख्ख शहर जाणतय. सहन करायच, सहन करायचं किती दिवस सहन करायचं. किती दिवस. मा. महापौर पोरगा

तरुण आहे माझा. तो माथेफिरु होऊ नये, एकूलता एकच लेक आहे मला. उदया तो जर गुन्हेगार झालाना, माझं तर आयुष्य संपणार आहे. बाकीच्यांना फरक नाही पडत कारण अनेक आया बहीनीचे आयुष्य असं काय काय सांगून त्यांनी उद्धवस्त केलेल आहे, उद्ध्वस्त केलेल आहे. त्यामुळे मा.महापौर साहेब मी त्यातली नाही. मा.महापौर, आयुक्त साहेब महापालिकेत बंदी करायला लागेल त्याला. त्याला महापालिकेत बंदी करायला लागेल.

मा. अभिषेक बारणे – मा. महापौर, मा. सभागृह आज आपल्या सभागृहामध्ये उपस्थित असलेले आपल्या सर्वांचे जे आराध्य दैवत आहे छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्या सगळयांचे विचार संबंध जगभर पोहचवण्याचा प्रयत्न केला असे डॉ. अमोलजी कोल्हे यांचं मी स्वागत करतो आणि स्वागतरुपी मित्राला घोषणा द्यायला लावतो.

मा.सचिन चिंचवडे- अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत, आई तुळजा भवानीचे उपासक, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन आणि पवीत्र झालेल्या या महाराष्ट्राच्या पवीत्र मातीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, भारत माता की जय, जय जय जय जय भवानी जयजयजय जय जय शिवाजी, वंदे मातरम.

मा.अभिषेक बारणे – मा.महापौर साहेब, आज बराच वेळ झाला की चार साडेचार तास या गंभीर प्रश्नावरती जो सुजाताताईंनी विषय काढला होता त्या सर्व महिला भगिनींनी आज याठिकाणी सर्व, आपल्या सहकारी नगरसेवकांनी त्याच्या बद्दल आपण बोललो. ते बोलत असताना सगळयांनी आपआपल्या सूचना मांडल्या. आणि सूचना मांडत असताना आयुक्त साहेब काही गोष्टी आम्ही तुमच्या निदर्शनास आणून देतो. आमची अपेक्षा तुमच्याकडून हयासाठी आहे की तुमचा स्वभाव आम्हांला आम्ही सगळे मिळुन तुमच्याकडे गा-हाणी जी मांडतोय केवळ तुम्ही स्पिड पकडलाय कामांमध्ये. त्याच्यामुळे आज एवढे सगळया तक्रारी तुमच्या समोर आम्ही मांडतोय, त्याचं एकमेव कारण असू शकतं. आज आपल्याकडे कोविडच्या काळामध्ये ज्या ज्या ठिकाणी गर्दी व्हायची त्या त्या ठिकाणी आपण महिलांच्या सुरक्षिततेसाठी दुर्गा ब्रिगेड सारख्या संस्थांना आपण कामे दिली होती. त्या ठिकाणी ती काम दिली असताना त्या ठिकाणी त्या नियोजन व्यवस्थित झालं. अशाच पध्दतीने सुजाताताई, मीनलताई, सुवर्णाताई या सर्वांनी शाळेच्या, गार्डनच्या तक्रारी त्या सुचवतात तर अशा ठिकाणी आपण या दुर्गा ब्रिगेड सारख्या संस्थांना काम देऊन त्या ठिकाणी आपण अधिकच्या महिला प्रोटेक्शनसाठी आपल्या महानगरपालिकेची यंत्रणा त्या ठिकाणी ठेवू शकतो अशा काही सूचना आमच्या आहेत. मागच्या ३-४ वर्षापासुन आम्ही आमचे आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांचे मार्गदर्शनाखाली काम करत असताना आम्ही ज्या ज्या सूचना दिल्या या शहराच्या विकासाचा विचार केला. हया सूचना आम्ही वारंवार दिल्यांतर त्या पध्दतीची कामे काढण्याचा प्रयत्न केला पण आयुक्त साहेब मागच्या काळामध्ये कामं काढण्यामध्ये आमची जी दमछाक झाली की प्रत्येक अधिका-यापाशी एखाद काम काढायच असेल, एखादा रस्ता करायचा असेल, एखादं चांगल

गार्डन करायचं असेल आम्हाला त्या सिस्टीममध्ये जावं लागते की हया अधिका-याकडून त्या अधिका-याकडे, गार्डनल्यांकडून ड्रेनेज विभागाकडे. आमची तुमच्याकडून अपेक्षा असेल की आपल्या महापालिकेमध्ये एक अभियंता लेव्हलची जी जेई, डेप्युटी इंजिनिअर, एक्झिक्युटीव्ह लेव्हलची साधारणपण ४००० कर्मचारी आहेत. जर एका प्रभागाचा विचार केला तर प्रभागात १०० कर्मचारी येऊ शकतात. आमच्या एका कॉलनीला तुमचा एक अभियंता येऊ शकतो. कोणाच्या वैयक्तिक मानधनावरती उचित ठरणार नाही. लाख लाख रुपये आपण जेव्हा मानधन देतो आणि ते अधिकारी त्यांच्या सेवेचा पगार देतो त्या अधिका-यंना जर असे सुट्टीचे दिवस आले तर चार चार, पाच पाच दिवस सुट्टी घेणं फोन केले की फोन न उचलणे आणि वॉर्डातील कामाचे नियोजन नीट न करणं आज आम्हांला प्रत्येक ठिकाणी जावं लागतं हया विभागातुन त्या विभागात जा. आज हे काम आमचं नाही. आज आमच्या प्रभागातील ज्यावेळेला तुम्हांला खड्डयांबाबत सूचना दिली की रस्त्यांना भरपूर खड्डे पडलेलेत जायला जागा नाही. एखादा माणूस येतो आणि म्हणतो की ते काम बंद करा आणि आपला अधिकारी सुध्दा ते काम बंद करतो. त्यावेळेस आपला अधिकारी त्याचा अधिकार वापरत नाही. अशा वेळेस एक दोन तीन दिवसापूर्वी आमच्या प्रभागातील मिटींग झाली. त्या वेळेस एक असा रस्ता आहे त्या प्रभागामध्ये रस्ता चालू आहे. डांबर झालेलं आहे पण त्या ठिकाणी खड्डे पडलेत. त्या ठिकाणाहुन गाडया जाण्यासाठी जागा नाही आणि तो रस्ता नीट करण्यासाठी ज्यावेळेस आम्ही सुचवतो तर त्या वेळेस आठ दिवसांनंतर त्या लोकांकडून आपण सूचना मागून घेऊ. खड्डयांच्या ठिकाणी डांबर केलं तुम्ही तुमच्या अधिकारात तीथ डांबर करुन घेऊ शकता ना. कोणी अडवलं म्हणुन काम थांबवायचं नसतं ना. आयुक्त साहेब एखादा एरिया स्मार्ट दिसण्यासाठी आम्ही जे जे प्रयत्न केलेत त्या प्रयत्नांचं आता तुम्ही चांगल काम याठिकाणी करण्यासाठी इथ आलायत. आज तुमच्या सुचना तुमचे विचार आम्हांला पटतात. तुमच्या सुचनेनुसार काही चांगल्या गोष्टी या शहरात घडतात. आज कच-यांच नियोजन चांगल्या पध्दतीने करायच तुमचा प्रयत्न आहे तो तुम्ही चांगल्या पध्दतीने करण्याचा प्रयत्न तुम्ही करा आणि या ठिकाणी माईनी जो कोविड योध्दा म्हणुन मागच्या दोन वर्षाच्या काळात जे चांगले काम केलेलं आहे त्याबद्दल मी त्यांचे देखील मनापासुन अभिनंदन व्यक्त करतो. आज ज्या ज्या वेळेस आपण ऑनलाईन सभेला असायचो माई त्या ठिकाणी उपस्थित राहुन त्यांनी बरचसं काम केल आणि आता मगाशी जी घटना घडली त्या घटनेचा पण मी निषेध करतो. आणि त्या पत्रकाराला माई मी विनंती करतो की अशा पत्रकारांना प्रवेश आपल्या महापालिकेत टाळावा आणि सीमाताई जो काही निर्णय घेतील त्या पत्रकाराबद्दल तो आम्ही त्यांच्या बरोबर आहोत आणि जे मगाशी ताईंच्याकडून भावनेच्या भरामध्ये जे भाजप आमदार असा जो शब्दाचा उल्लेख झाला तो उल्लेख त्या प्रोसिडींग मधुन काढावा अशी मी विनंती करतो. सुजाताताईंना त्या विषयाला अनुमोदन द्यायला लावतो.

मा. सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, मी अनुमोदन देते.

मा. गिता मंचरकर - सन्मा. महापौर आपल्या शहराचे खासदार डॉ कोल्हे, नगरसेवक, नगरसेविका, पत्रकारबंधु भगिनींनो माई मला एक सांगायचं आहे की आपल्या येथे एच.ए. कंपनी आहे. एच.ए. मध्ये कॉलनी आहे त्या कॉलनीमध्ये एचए कंपनीची शाळा आहे. ती एच.ए. कंपनी प्रायव्हेट आहे पण ती शाळा आहे माई आयुक्तांना मी विनंती करते की त्या शाळेमध्ये माझ्या वॉर्डातील मुले शिकतात. गांधी नगर, खराळवाडी, कामगारनगर या भागातील मुलं एच.ए. कंपनीच्या शाळेत शिकतात. त्या कंपनीमध्ये घरं आहेत आणि ती घरं बंद पडलेली आहेत. त्या घरामध्ये ना माई मागच्या वेळेस अशी घटना झाली की मी सांगू शकत नाही. तिथे मुली मुले वगैरे खुप गैरप्रकार होतात माई तिथं. तर आयुक्तांना अशी विनंती करते की त्या एच.ए. कंपनीला आपण काय सांगू शकतो का. पत्र तरी देता येईल का. एच. ए. कंपनीला कारण तिथे शाळा आहे. आपली पिंपरीतील सर्व मुले तिथं शिकतात, मुली शिकतात. मी आयुक्तांना विनंती अशी करते की तुम्ही एच.ए.ला बोलून तरी बघा की ती एच.ए. ची शाळा कॅमेरे लावू शकता का. कंपनी प्रायव्हेट आहे माई. आपण प्रायव्हेट कंपनीमध्ये कॅमेरे लावू शकत नाही माई. आयुक्तांना विनंती करते की एच.ए. कंपनीशी एकदा मिटींग वगैरे घेऊन ते बोलून बघा. आणि तिथ मुलींचा जाण्याचा रस्ता आहेना तो फार कठीण आहे आणि तिथे असे गैरप्रकार झालेले आहेत. आणि पोलीस कम्पलेंटही केलेली आहे. माई तिथे माझे ऑफीस खुप जवळ आहे. मुली अक्षरश: तिथे माई शाळेत जायला घाबरतात. मला आयुक्तांना अशी विनंती करायची आहे की एच.ए. कंपनीला काय करता येईल का आपल्याला ते करुन द्या. आयुक्तांना दुसरी विनंती अशी करते की आता स्मार्ट सिटीची कामे चालू आहेत. माझ्या येथे पण आता लाईन वगैरे टाकली आहे. फक्त खांब बसवले आहेत. आयुक्त साहेब खांब बसवले तर कॅमेरे पण बसवा त्याच्यावरती एवढं मी बोलते, बोलण्यासाठी संधी दिली माई त्या बद्दल धन्यवाद.

मा.राहुलदादा जाधव – मा.महापौर साहेब, सन्मा. सभागृह, आयुक्त साहेब, सर्व नगरसेवक, नगरसेविका आणि आज ख-या अर्थाने हया सर्वसाधारण सभेच्या मिटींगसाठी आवर्जुन उपस्थित असलेले शिरुर लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार डॉ.अमोलजी कोल्हे यांचे मी पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने स्वागत करतो. आजच्या मिटींगमध्ये सुजाताताईनी महिलांच्या सुरक्षेसाठी जो काही विषय हया ठिकाणी मांडला आणि त्यानंतर तब्बल चार ते पाच तास हे सभागृह एकाच विषयावर चालता चालता पिंपरी चिंचवडच्या सर्वांगीण विकासावर व सर्वांगीण समस्यावर सर्वच नगरसेवक नगरसेविका हयांनी या ठिकाणी आपलं मत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ब-याच जणांनी काही आरोप देखील केले, आरोप करताना त्याच बरोबर बाकीच्या विषयावर बोलत असताना काही विषय असे पण आहेत की कायम भाषणामध्ये उल्लेख करतो की ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी. स्मार्ट सिटीच्या विषयासंदर्भात भ्रष्टाचार झाला की नाही झाला याची सखोल चौकशी आयुक्तांनी करावी. परंतु जो काही आरोप होतो ना महापौर माई त्यामध्ये जर आपण विचार केला प्रत्येक पक्षाचे सदस्य स्मार्ट

सिटीच्या बॉडीवर आहेत त्यामध्ये महापौर आहेत, स्थायी समिती अध्यक्ष आहेत, त्यामध्ये विरोधी पक्षनेता आहेत, गटनेते आहेत सर्वजण आहेत. त्यामुळे जो काही विषय आहे त्याची सखोल चौकशी ही १०० टक्के झाली पाहिजे यात काही वाद नाही. त्याचबरोबर सर्वांनी सर्व विषय बोलल्यामुळे मी काय सर्व विषयावर बोलणार नाही. परंतु जी सभा सभागृहामध्ये झाली अशी सभा कधी साडेचार वर्षात होणे गरजेचे होते १०० टक्के, आणि मला जर माहित असतं ना अशी सभा हाती तर मी आदरणीय खासदार साहेबांना २०१९ ला खासदार झाल्यानंतर आवर्जुन प्रत्येक मिटींगला मी निमंत्रित केलं असतं, तुम्ही या तुम्ही आल्यानंतर ख-या अर्थाने पिंपरी चिंचवड शहराच्या समस्यावर सभागृहामध्ये चांगली चर्चा होते. परंतु आता तीनच महिने राहिले आहेत आणि या मध्ये खासदार साहेब हया ठिकाणी उपस्थित राहिले सर्वजण बोलले आहेत. आताच योगेश बहल साहेबांनी पिक्चरचे उदाहरण दिले परंतु मला एका जाहीरातीचे उदाहरण द्यावे लागेल. एक जाहीरात आहे “उठा उठा दिवाळी आली मोती साबणाने स्नान करण्याची वेळ आली”. महापौर ताई अजुन बोलायचे आहे पुढे. आता असं आहे “बोला बोला निवडणूक आली उमेदवारी मिळवण्याची संधी आली” त्यामुळे सर्वच नगरसेवक या ठिकाणी बोललेले आहेत. महिलांच्या सुरक्षिततेबाबत बोलले पाहिजे. आयुक्त साहेब आम्हांला असं वाटतं प्रत्येक पक्षातील नगरसेवक प्रशासनावर जरी टीका करत असेल तरी ब-याच जणांना असे वाटते की सत्ताधारी पक्षावर नगरसेवक टीका करीत असतात. आता आयुक्त साहेब हया गोष्टीचा साक्षीदार मी सुध्दा आहे, तुम्ही सुध्दा आहात आणि आपले अधिकारी सुध्दा आहेत. ज्या वेळी पाण्यासाठी आम्ही तुम्हांला फोन करतो तुमच्या अधिका-यांना फोन करतो आजपर्यंत एवढे तरी अधिकारी हया पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे एवढे रागीट स्वभावाचे आम्ही कधी पाहिले नाहीत. परंतु तुमच्या अधिका-यांची भाषा, वागण्याची पध्दत तुम्ही आल्यापासुन अधिकारी असे वागायला लागलेत हा माझा स्पष्ट आरोप आहे. साहेब सर्व रेकॉर्डींग मी तुम्हाला पाठवलेले आहेत. लोकांना पाण्याची समस्या आहे लोक माझ्याशी काय बोलले तेही तुम्हांला पाठवलं. तुमचे अधिकारी काय बोलले हेही तुम्हांला पाठवलं. साहेब आमची एक विनंती आहे. ठीक आहे कोण कोणाच्या आदेशावर चालतं कोण कोणाच्या सांगण्यावरुन काम करतं याच्याशी आम्हांला घेणंदेणं नाही. पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांना कोणीही कोणत्याही विषयासाठी फितुर करु नये या मताचे आम्ही आहोत. १०० टक्के आपण त्या नागरीकांच्या जीवावर ही पालिका चालते. हया नागरीकांना कोणी वेठीस धरु नये. आम्ही सकाळी उठल्यानंतर सकाळी आपण आता जरी तुमचा मोबाईल चेक केला तरी ६ – ६ वाजता मी तुम्हांला मेसेज पाठवलेले आहेत. तुमचे अधिकारी का आमच्याशी असे वागतात. या साठी अधिका-यांवर वचक ठेवणं तुम्हांला क्रमप्राप्त आहे आणि तुम्ही ते अधिका-यांना सांगावं आणि आम्हांला या पिंपरी चिंचवड शहराला पुरेसं पाणी द्यावं ही तुम्हांला विनंती करतो. ज्यावेळी तुम्ही सांगता त्यावेळी पाणी बरोबर येते ज्यावेळी आम्ही सांगतो त्यावेळी

पाणीपुरवठा विस्कळीत होतो. निवडणूक जवळ आल्यामुळे आमची काय सुपारी तर दिली नाही ना असं आमच्या मनामध्ये येतं. कारण ब-याचे वेळा आम्ही आता पालिकेत यायचंही बंद केलेलं आहे. कारण कोणत्याही अधिका-याला सांगावं, कोणत्याही अधिका-याला सांगाव तर कोणताही अधिकारी आता मनावर घेऊन आता काम करत नाही आणि गेल्या १ वर्षापासुन आम्ही पाहतोय अधिकारी कोणतंही काम मनावर घेत नाही. आणि तुमच्याकडे आलो एखादे दिवशी तुमची भेट झाली की तुम्ही आम्हांला म्हणता काय साहेब येत नाही. परंतु साहेब ज्या वेळेस आम्ही येतो ना तेव्हा तुम्ही मिटींगमध्ये असता. त्यामुळे आपली भेट होत नाही. परंतु आपण आवर्जुन हया सर्व विषयांवर लक्ष देणे गरजेचे आहे आणि नगररचनाचा एक विषय आहे. एकच मिनिट घेतो साहेब आपण ज्या वेळी एखाद्या जागेच्या टीडीआर करतो आणि त्यांना डीआरसी देतो त्यावेळेस पिंपरी चिंचवड महानगरपालिका नगररचना विभाग, स्थापत्य विभागाला सांगुन त्या जागेला कंम्पाऊंड करतं किंवा ती जागा आपल्या ताब्यात घेतं. पिंपरी चिंचवड शहरामध्ये अशा ब-याच ठिकाणी अशा ब-याच मिळकती आहेत बरेच रस्ते आहेत की त्या ठिकाणी आपण डीआरसी देऊन त्या जागेचा मोबदला देऊन देखील त्या जागा आपल्या ताब्यात नाहीत. अजुनही मुळ मालक हया जागा वापरतात. या गोष्टींची आपण १०० टक्के शहानिशा करावी हे देखील सांगतो आणि दुसरा विषय आय टू आर च्या बदल्यात जे प्लॉट आपल्याला १५ टक्के येतात ते प्लॉट सुध्दा असेच पडलेले आहेत. ते सर्व प्लॉट आपण आपल्या ताब्यात घ्यावेत. त्यामध्ये आपल्या प्लॉटवर जर उद्या अतिक्रमण झालं तर जे प्लॉट आपल्या मालकी हक्क्चे आहेत ते प्लॉट आपल्याला मिळणार नाहीत त्यामुळे हयाही जागा आपल्या आपण ताब्यात द्यावयात ही विनंती करतो. माईंच मनापासुन आभार व्यक्त करतो आणि या ठिकाणी थांबतो.

मा.शीतल शिंदे - सन्मा. महापौर प्रथमत:आभार मानतो. मी कधीतरी बोलतो. त्यात तुम्ही आज संधी दिली मला.सन्मा. महापौर, आयुक्त साहेब, सभागृह त्याच प्रमाणं चांगल लेखण करणारे माझे पत्रकार बंधु भगिनी, वाईट करणारे माझे बंधु भगिनी नाहीत. आजचा विषय खूप संवेदनशील होता आणि संवेदनशील असताना देखील विषय थोडासा भरकटला गेला. आज इथ प्रत्येकजण बसलेला एका मातेच्या गर्भातुन जन्म घेऊन बसलेला आहे. आणि तिच्या सुरक्षेचा विषय असताना सभागृहात विषय भरकटला गेला. साहेब हे भालकर आल्यामुळे हा सगळा विषय भरकटला गेला. भालकर जेव्हा इथे आले पी.डब्ल्यू.डी.मधुन त्यांनी तिथे किती भ्रष्टाचार केला त्याचे लेखी स्वरुपात पुरावे देऊन त्यांच पत्र घेतल की अशा अधिका-याला इथे नेमू नका आणि त्यांचेकडून काम करुन घ्यायचे असेल तर त्यांना अतिक्रमण विभागाची जबाबदारी द्या. म्हणजे तिथे त्यांनी भ्रष्टाचार केला नसता किंवा केलाही असता माहिती नाही पण आजची ही वेळ आली नसती साहेब असो. अमावस्या पौर्णिमेप्रमाणे चंद्राच्या कलेत जसा बदल होतो त्याप्रमाणे आज सभागृहात बदल बघायला मिळाला. कारण २–३ महिन्यावर इलेक्शन येऊन

ठेपलेल्या आहेत. मी एकच सांगेन सर्व कामे होतील परंतु महिलेच्या सुरक्षेचा ठोस निर्णय आपल्या सभागृहाच्या वतीने झाला पाहिजे. एक आमची भगिनी नाव पण घेतो सीमाताई त्या महिलांच्या सुरक्षेवरती बोलल्या. आणि कोण तो कुठला पत्रकार त्याने लगेच विटंबना केली ती जी विटंबना केली ती नुसती निषेध करुन थांबणार नाही. आपल्या काही कायद्यानुसार सभागृहाच्या वतीने हया प्रिमायसेस मध्ये ज्या गोष्टी घडलेल्या आहेत त्याला अनुसरुन जर आपण जे काही कायदेशीररित्या पोलीस कम्प्लेंट वगैरे करु शकत असेल तर त्याची पाहणी करावी आणि त्या व्यक्तीवरती पोलीस कम्प्लेंट करुन त्याला तुरुंगात टाकावे. आज खासदार साहेब आलेले आहेत, मी जास्त बोलू नाही शकलो त्यांचं स्वागत. बोलणे शक्य नाही. माफी असावी. तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांची त्याचप्रमाणे संभाजी महाराजांची भुमिका साकार करणा-या मालिकांमध्ये काम केलेलं आहे. माझ्या पेक्षा इतिहास आपल्याला जास्त माहित आहे. ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज राजवटीमध्ये महिलेवर अत्याचार झाल्यानंतर त्या पाटलांचा चौपाळा करुन चौकात बसवलं जायच तसं कुठलातरी कडक कायदा सुव्यवस्था ताबडतोब त्या क्षणी करण्याची गरज आहे. आपण दिल्लीमध्ये आहात आपण केंद्रात हा विषय मांडावा आणि सभागृहाला एवढीच एक विनंती करतो की जसे विषय चालू असतात त्या विषयाला अनुसरुन दुसरे विषय तयार होतात. आजचा हा खुपच संवेदनशील विषय आहे कारण आपण प्रत्येक जण एका महिलेच्या गर्भातुन जन्म घेऊन आलेलो आहोत जर आपली ही महिला, माता सुरक्षित नसेल तर पुढे या समाजाचे काय होईल याचा विचार करुन त्या गोष्टीबाबत निर्णय प्रक्रिया सभागृहात राबवावी. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल महापौरांचे व सभागृहाचे मी धन्यवाद मानतो.

मा.आशा धायगुडे-शेंडगे – सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, नगरसेवक, नगरसेविका आणि पत्रकार बंधु भगिनींनो माई मला वाटलं २ ला सुरुवात झाली, ३ झाले, ४ झाले, ५ झाले ६ वाजत आले माई बहुतेक आता आपल्याला टाटा बाय बाय करुन कट मारतात की काय ही शंका होती. परंतु महापौर साहेब तुमचे मनापासुन धन्यवाद. मला असं वाटतय माई आज खरं तर तुम्ही अजिबात कंटाळा करु नकात. हया बाजूच्या कोप-यापासुन सुरुवात केली असा राऊंड घेऊन ज्यांना ज्यांना बोलायचय हया सभागृहात त्यांना खरंच बोलू द्यात. आज तुमच्या मागे एक नवीन विक्रम लागूद्यात की माईंनी दोन दिवस सभागृह चालवलं. एवढं आपण सगळे येऊद्यात. पुन्हा एकदा तुम्ही जर बोलवलं आणि आज जर विषय नाही संपले आपल्याकडनं तर उद्याला सभागृह घेतल्यानंतर आम्हांला पण फार बरं वाटेल की हया महापालिकेमध्ये आमच्या माईंनी इतकं बोलायला संधी दिली की माईंना दोन दिवस सभागृह चालवावं लागलं. ख-या अर्थानी माई आता आपण सगळे जण म्हणतो पण सुरुवात केल्यानंतर माई मी इथे आले आणि लोकांशी बोलताना तो विषय काढतीए. खरंय बोलायला पाहिजे हरकत नाही. बोललचं पाहिजे एखाद्या महिलेच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे आपण महिला आहोत आणि सुदैवाने पुन्हा आपण सभागृहात बसतो. कुणाचं नेतृत्व करण्याची संधी आपल्यात आहे. ती नेतृत्व संधी जर आपल्याला असेल तर या ठिकाणी आवाज उठवणं ही तुमची माझी जबाबदारीच आहे असं आमचं सदस्यांच बोलणं झालं सदस्यांनी सुरवात केली परंतु बोलेपर्यंत उशीर झाला आणि तेवढयात काय घडावं तर पुन्हा एकदा ज्या सभागृहामध्ये महिलांच्यावर होणा-या अत्याचार अन्यायावरती आपण

बोलतोय त्याचवेळेस हया महानगरपालिकेमध्ये येणारा एखादा पत्रकार जो कुठेतरी छोटा पत्रकार, संवाददार त्यांनी एखाद्या महिला त्या नगरसेविका आहेत सीमा सावळे हे म्हणण्यापेक्षा त्या समाजाचं प्रतिनिधीत्व करतात, या शहराचं प्रतिनिधीत्व करतात अशा महिलेला जाहीरपणे तिचा विनयभंग करण्याचा अधिकार त्यांना कोणी दिला आणि मा. महापौर साहेब तुम्ही एक महिला आहात म्हणुन मी तुमच्याकडून अपेक्षा करते की तुम्ही आज आता हया क्षणी सांगितलं पाहिजे की संबंधित जे कोणी पत्रकार आहेत त्यांनी हया सभागृहात हया महानगरपालिकेचा रस्ता त्यांच्यासाठी वर्ज्य आहे आहे. त्यांनी सामान्य नागरीक म्हणुन तुमच्याकडे आलं म्हणुन हरकत नाही पण पत्रकार म्हणुन त्यांनी हया महानगरपालिकेची पायरी चढणार नाहीत हयाची ग्वाही मा. महापौर साहेब तुम्ही हया सभागृहामध्ये दया, सीमाताई भक्कम आहेत का तर त्या नक्की भक्कम आहेत. त्यांना जे वाटेल ते त्या करतील. त्या पोलीस चौकीत जातील. कारण त्या पत्रकाराला फक्त सीमा सावळे आणि आशा शेंडगेच दिसतात. आणि सन्मा. महापौर साहेब लिहीलातर आम्हांला काही फरक पडत नाहीहो परंतु आज विषय कोणता चालू आहे इतका संवेदनशील विषय चालू असताना जर कोणी इतकी हिम्मत करत असेल तर हिम्मतच आहे मा. महापौर. असली घाणेरडी हिम्मत करणा-याला त्याची जागा त्याच ठिकाणी दाखवणं ही सुध्दा तुमची आणि मला वाटतं महिलाभगीनी म्हणुन आमची आणि आमचे बंधु म्हणुन आमच्या पाठीशी असणार याची खात्री, खात्री बाळगुन सांगतीए मा. महापौर साहेब की आज तुम्ही जर या ठिकाणी जाहीरपणे सांगितलं की संबंधित जे पत्रकार आहेत त्यांना हया महानगरपालिकेमध्ये येण्यास वर्ज्य करणार असालतर मा. महापौर साहेब निश्चितपणे तुमच्या पायाशी नतमस्तक व्हायला आशा शेंडगेला पण नक्की आवडणार आहे. जाहीर या ठिकाणी कोणालाही असली घाणेरडी परवानगी दिलेली नाही. कुठे तरी आम्ही सर्व महिला भगिनी आमचे बंधु असतील सगळेजण एकत्रितपणे या शहरातील महिलांवरील अन्याय अत्याचार कसे रोखता येतील कसे थांबवता येतील यासाठी प्रयत्न करतोय. यासाठी चर्चा करतोय. विचार विनिमय करत असताना नेमकं काय घडतय तर एखाद्या महिला बहिणीला कुत्री या शब्दात उपमा दिली जाते. या शब्दानं त्यांचा विनयभंग केला जातो. मा. महापौर साहेब मी विनंती करते की एक दोन मिनिट थांबते. तुमचा आदेश या ठिकाणी मला अपेक्षित आहे. तुम्ही आदेश दिल्यानंतर मला पुढच्या विषयावर बोलायचे आहे. माझी विनंती राहील महापौर साहेब की तुम्हांला की तुम्ही एकदा जाहीरपणे माईकवर सांगितलं पाहिजे, सभागृहातल्या डायसवरून सांगितलं पाहिजे तुमच्या पदाचा वापर करुन मा. महापौर साहेब तुम्ही सांगितलं पाहिजे .

मा. महापौर – हे पहा मी जाहीर निषेध केलेला आहे. तुम्हांला काय बोलायचय ते तुम्ही बोला. निषेध केलेला आहे. तुम्हांला काय बोलायचय ते बोलुन घ्या.

मा.आशा धायगुडे-शेंडगे – मा. महापौर साहेब, खरं तुम्ही हया ठिकाणी निषेध केला. निषेध करुन आणि कँडल मार्च काढुन जर विषय थांबले असते ना महापौर साहेब तुमचं नक्की स्वागत केल असत. निषेधावरती थांबत नाही हेच दु:ख आहे. निषेध करायचा. त्याकरता इथं यायचं गप्पा मारायच्या, बेंबीच्या देठापासुन बोलायचं आणि बोलल्यानंतर याठिकाणी फक्त कागदामध्ये त्याठिकाणी मिनीटसमध्ये आमचा तो विषय राहणार असेल

तर निश्चितपणे या सभागृहात येऊन सुध्दा बोलण्याचा आनंद समाधान मिळणार नाही. तुम्ही काय निर्णय घेतला मा. महापौर साहेब मी तुम्हांला सांगितलं होतं की ख-या अर्थानं अशा चुकीच्या माणसाला या सभागृहात येणं आपण थांबवलं पाहिजे अशी माझी तुमच्याकडून अपेक्षा आहे. तुम्ही विचार करा. विचार करायला वेळ घ्या. नाहीतर आम्हांला आमचे रस्ते मोकळेच आहेत. तसंही सत्तेत असलं काय आणि विरोधी पक्षात असलं काय आम्हांला सवय आहे मागचे पाच वर्ष आणि आताचे साडेचार वर्ष आम्ही हया सभागृहामध्ये आमचे विचार अत्यंत मुक्तपणे मांडतो. अनेक ठिकाणी होणा-या घटनांवर आम्ही बोलतो, थांबवण्याचा प्रयत्न करतो. नाही थांबवता आलं तर आमच्या मार्गाचा अवलंब सुध्दा करतो. सन्मा. महापौर साहेब तुम्ही मला बोलायची संधी दिली परंतु अनेक विषय आहेत आज हया शहरामध्ये महिला भगिनींचा विषय सुरु असताना आमच्या अजितभाऊंनी स्मार्टसिटीचा विषय काढला. खुप वर्ष हा धगधगणारा विषय चालू होता आणि अजितभाऊंनी सुरुवात केली आणि नंतर सीमाताई म्हणाल्या की हा विषय आज काढूनच टाकते आज बाहेर. मला वाटतं कमिशनर साहेब तुमचं स्टेटमेंट पाहिलं होतं की स्मार्ट सिटीवरती आशाताईंचं कोणतही पत्र त्या समस्यांचं निराकरण केलय हया ठिकाणी माझ्या सहीचं तुम्हांला १५ मुद्दयांच पत्र आहे मी आज जाणीवपुर्वक सभागृहात घेऊन आलेली आहे. मला वाटलं चुकुन माझ्या हातुन तुम्हांला एखादं पत्र द्यायचं राहयलय काय. कारण त्याच्यावरती आपली पोहोच जी असते ती पोहोच देखील या ठिकाणी आहे. त्यामुळे स्मार्ट सिटीमध्ये किती भ्रष्टाचार झाला कसा झाला कुणी केला या सगळयाची पायामुळं खोदण्यापेक्षा मला वाटतं आपण कुणावर राजकीय विचार करण्यापेक्षा मा. महापौर साहेब, मा. कमिशनर साहेब अधिकारी म्हणुन सर आम्ही सगळे ५ महिने, ५ वर्षाचे पाहुणे आहोत. पाच वर्षानंतर आम्ही पुन्हा किती भारी आहोत आम्ही नागरीकांचे प्रश्न मांडले, सभागृहात किती वेळ निषेध मांडला किती वेळा सभांत बोललो. मा. महापौरांचं कौतुक केलं पाहिजे. अनेकदा आम्ही बोलतो . तुम्ही आम्हांला आम्ही हात वरती केल्यानंतर नेहमी आम्हांला बोलण्याची संधी देता. इथे येऊन आम्ही आमच्या घरच्या गप्पा अजिबात मारत नाही. कुठेतरी आमच्या शहराचं किंबहुना आमच्या प्रभागात गेलो तरी ९९ टक्के टाळलं जातं. हे महान सभागृह आहे. हया सभागृहामध्ये हया शहराच्या विषयावर बोललं पाहिजे याची पूर्ण कल्पना असल्या कारणाने आपण शहराच्या विषयावर याठिकाणी बोलतो. पण स्मार्ट सिटीमध्ये भ्रष्टाचार झाला का, झाला. राजकीय पक्षापैकी आमची कोणाचीच सही नाही. आमच्या १२८ जणांची कोणाचीच नाही आणखीन कोणाची नाही आणखीन कोणाची नाही. परंतु अधिकारी म्हणुन तुमच्या सगळयांच्या सहया संबंधित विषयावरती आहेत. काय शिक्षा करणार साहेब तुम्ही सगळयांवरती. साहेब त्या स्मार्ट सिटीमध्ये जे काही चुकीचा गैरव्यवहार झालाय ते मुद्दे आम्ही मांडले आणि ते जे प्रकरण तुमच्यापर्यंत

आणलय किंवा आज सभागृहात अनेक नगरसेवकांनी सभागृहात सांगितले की ३ फुट खाली खोदलं तेव्हा ५ फुट खाली गेलच नाही. सीमाताई आणि माझ्या वॉर्डात आला तरी चालेल. १ आणि दीड फुटावर लाईन टाकलेली आहे. दीड फुट पण खुप झालं. परंतु या ठिकाणी महापौर साहेब तुमच्या वतीने मी कमिशनरांचे मी आभार मानणार आहे. साहेब तुमचं मनापासुन आभार. माझ्या बरोबरच्या १२८ नगरसेवकांना सांगू इच्छिते की साहेब मनापासुन ऐका माझ्या प्रभागातील सगळे रस्ते ४८ तासाच्या आत माई रिस्टोअर झाले. साहेब मनापासुन तुमचे अभिनंदन. म्हणजे खरंच अभिनंदन. इतक्या प्रायॉरिटीने तुम्ही माझ्या प्रभागात रात्रंदिवस पहाटे तीन तीन वाजेपर्यंत काम चालू होतं असं नागरीकांकडून कळालं आणि त्यासाठी आपलं आभार मानणं हे सुध्दा मला वाटतं माझं नैतिक कर्तव्य आहे आणि असं म्हटल पाहिजे आणि माझ्या प्रभागाच्या वतीने तुमचे मनापासुन कौतुक आणि आभार. मा. महापौर साहेब आपण सबळेजण फक्त भाजप नी सेनेला शिव्या द्यायच्या आणि सेनेने राष्ट्रवादीला द्यायच्या. परंतु हया सगळयांचा प्रशासन म्हणुन जे काम करतो कारण तुम्ही आणि मी नवीन खेळाडू असतो तिथ तुम्ही खुप सिनिअर आहात ४-५ वेळा निवडून आला असताल परंतु आमची सेकंड टर्म आहे. पुढच्या टर्मला पुन्हा सामोरं जायचय. परंतु अनेक वेळा सभागृहात अनेक विषय आम्ही मांडतो. परंतु फक्त आज काही विषया वरती नजर टाकायची इच्छा आहे साहेब. या ठिकाणी नदी सुधार प्रकल्प मा. महापौर तुम्हांला सांगते आवर्जुन तुमचा वेळ घेणार आहे तो नक्की घेणार आहे. आणि दोन दिवस सभा चालवावी का तर मला वाटतं नक्की चालवली पाहिजे. महानगरपालिकेत आल्यानंतर असं वाटल की आशा आपल्या घरासमोरुन नदी जाती. मा. महापौर साहेब २० पावलावर नदी आहे. नदी सुधार वरती आपण खुप बोलायच म्हणुन जवळपास १२ ला आल्यापासुन नदी सुधार प्रकल्पाचा खुप पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला.आणि नंतर कळालं की काहीच नाही आशाताई इथ काही होत नसतं. ज्यावेळेला माझ्या अधिका-यांना वाटतं ज्या वेळेला माझ्या प्रशासनाला वाटतं की त्यांना जर काहीतरी करायच त्याच वेळेला काम होतं. त्यामुळे तुम्ही यायचं तोंडाच्या वाफा वाया घालवायच्या आणि इथुन निघुन जायचं. नदी सुधार प्रकल्प मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब डीपीआर तयार करायला मागचे आठ वर्ष म्हणजे जवळपास ९ वर्षे आपण डीपीआर तयार करतोय. का अस होतं, नदी ही तुमची माझी किंवा माझ्या प्रभागाची नगरसेवक म्हणुन सोडून दया साहेब, या शहराचा नागरीक म्हणुन आणि या ठिकाणी कमिशनर म्हणुन तुम्ही आलात. आपली तीन वर्षाची कारकीर्द तुम्ही हया ठिकाणी करणार आहात. त्या कारकिर्दीमध्ये ही नदी सुधारली हयाचं एक मानसिक समाधान तुम्ही येथुन घेऊन गेलं पाहिजे. नदीमध्ये दिवसेंदिवस भराव टाकला जातो. मागच्या वेळेस मी माझ्या अधिका-यांना पर्सनल सांगुन तिथनं भराव उचलण्याचा

प्रयत्न केला. मला वाटतं मा.कमिशनर साहेब मी तुम्हांला एक फोटो टाकलेला आहे व्हॉटसऍपवरती. कमिशनर साहेबांनी अत्यंत फास्ट दखल घेतली, लगेच मला विचारलं ताई लोकेशन कोणचं. मी लगेच तुम्हांला लोकेशन पण टाकलं. परंतु साहेब, परंतु पुढे काय. पुढे काय पुन्हा माई प्रश्न अनुर्तीण राहतो. साहेब या ठिकाणी त्या नदीपात्रात तुम्ही सगळीकडे पहा शहरात तुम्ही पवना घ्या, तुम्ही इंद्रायणी घ्या कोणत्याही नदीपात्र घ्या. तुम्ही गेलात ना तुम्हांला डांबर सुध्दा दिसतो. अनेकदा तुम्ही सगळे म्हणता की नागरीक टाकतात नागरीक टाकतात तुमचं म्हणणं अगदी बरोबर आहे. मी घर बांधायला काढलं उरलेला राडारोडा मी उचलते आणि नदीपात्रात टाकते मीच टाकते, ठीक आहे. डांबर नागरीकाकडे मिळेल का. मा. महापौर साहेब डांबर नागरीकांना मिळेल का. डांबर टाकतात मग कोण टाकतं डांबर. खोदलेला डांबर त्या ठिकाणी नदी पात्रात तुम्हांला अनेक ठिकाणी दाखवते माझ्याकडे फोटो सुध्दा आहेत. मग तो कोण टाकतो. नक्की महापौर साहेब मला वाटतय त्या ठिकाणी अधिकार संबंधितांनी रस्ता खोदला चिंचवडचा रस्ता खोदला तर पिंपरीला जातो, पिंपरीचा खोदला तर भोसरीला जातो जे काय होत असेल ते साहेब या ठिकाणी इतकी मोठी लागेबांधी आहे म्हणजे इथं आपल्या टेंडरमधला क्लॉज आहे म्हणजे एखाद्या ठिकाणचं काढलय मटेरियल एक्स,वाय,झेड ठिकाणी टाकलय तुम्ही तुमच्याकडे नियुक्त केलेली ठिकाणं दिलेली असतात त्या ठिकाणी मटेरियल गेलेलं दाखवा तुम्ही साहेब मला. आशाताई तुम्ही खोटं बोलू नका. तुम्हांला खोटं बोलायची सवय आहे असे तुम्ही म्हणताल. अशा अनेक मुद्दे दाखवते की हयांनी त्या नदी पात्रात रस्त्यावरचा खोदलेला जो राडारोडा मटेरियल आहे, नाली सोडून द्या साहेब. आपले अधिकारी सांगू आपण. आपण फक्त अधिकारी प्रशासनावर बोलू साहेब. त्यांनी हे मटेरियल काढलं नदीपात्रातुन आणि डांबर अमक्या अमक्या ठिकाणी टाकलय हयाचं चलन आणि सर्व पुरावे आमच्याकडे आहेत असं तुमचं एका ठिकाणचं मला दाखवा म्हणजे आम्हांला तुमच्याबद्दल फार कौतुक वाटेल. साहेब भराव टाकायचा म्हणजे भराव टाकायचं टेंडर म्हणजे तिथलंच काढायच तीथ टाकलं आणि तिथनं मटेरियल घेऊन गेला. यातुन एवढंच सांगते की एकीकडे आपण स्मार्ट सिटीकडे वाटचाल करतोय माई स्मार्ट सिटीमध्ये सगळं स्मार्ट होणार आहे. नगरसेवक स्मार्ट होऊ न होऊ, आमचे नागरीक स्मार्ट होऊ न होऊ परंतु आमचे ठेकेदार साहेब स्मार्ट होतील आमचे अधिकारी स्मार्ट होतील कारण कसं टेंडर जिरवायचं, कसं टेंडर काढायच, कसं टेंडरमध्ये गोलमाल करायचा, कसं काय २५० कोटीचे टेंडर तांत्रिक मान्यते शिवाय साहेब माझ्या वॉर्डातले २ टेंडर काढतोय आपण. मागील तीन महिने झाले माई माझे अधिकारी फक्त तांत्रिक मान्यतेसाठी पाठपुरावा करत आहेत. कोण तो कन्सलटंट आहे कन्सलटंटच्या मागे लागताएत. तीन महिने झाले साहेब काय असेल पाच सहा कोटीचा करार पण मा. कमिशनर साहेब या ठिकाणी २५० कोटीचे टेंडर आपल्या निदर्शनास आणून

दिल्यानंतर सुध्दा आपल्याकडून संबंधितावरती कारवाई होत नसेल तर निश्चितपणे हे या शहराचं दुर्देव आहे. एवढंच नाही एक दिवशी अचानक आम्ही दोघी स्मार्ट सिटीच्या ऑफीसला गेलो तर सात आठ महिन्यापूर्वीची गोष्ट असेल. तिथे गेल्यानंतर आमचे सन्मा. कोल्हे साहेब होते. कोल्हे साहेबांशी गप्पा मारायला सुरुवात केली. साहेब म्हणाले दाखवतो काय काय केलय आणि फाईल समोर आली धक्काच बसला व्हाईटनर लावलेली बीले म्हणजे साहेब माझ्या घरात असतीलना ही बील इज कनसिडर परंतु माझ्या महानगरपालिकेच्या ऍथोराईज्ड ऑफीसमध्ये एक व्हाईटनर लावलेली बीले आपण ठेवू कशी शकतो. त्यावरचे एक ना अनेक मुद्दे या शहरामध्ये या स्मार्ट सिटीच्या घोटाळयातले आम्ही तुम्हांला सांगितले. परंतु तुमच्याकडून येत्या आठ दिवसात मा.महापौर साहेब तुम्हांला विनंती राहील स्मार्ट सिटीचा सोक्षमोक्ष सन्मा. आयुक्तांनी त्वरीत लावावा असा या ठिकाणी आदेश द्यावा. साहेब आता नदी सुधार प्रकल्प सांगितला. दुसरा प्रश्न २४ बाय ७ आमचे डोळस आता बोलले की २४ बाय ७ चा तमाशाच वेगळा. साहेब २४ बाय ७ मध्ये आपल्या नवीन सिस्टीम चालू केली की रस्ता खोदल्याशिवाय डांबर टाकून देत नाही अधिका-यांना. रस्ता खोदायचा आणि डांबर टाकायचं. रस्ता खोदायला सुध्दा सुरुवात केली ना माई पाण्याच्या लाईन वरती येतात आणि मग साहेब आमचा अधिकारी काय म्हणतो ताई आता कशाला खोदायला लावता बघा इतके जवळ पाईप आहेत. म्हणजे मा. आयुक्त साहेब अगदी ४, ५, ६ इंच जरी खाली गेलं ना म्हणजे पहिला एक थर काढायचा प्रयत्न केला ना माई तरी पाईप वरती येताएत. मग आपण कशाची बीलं देतो, कोण बीलं देतो. नक्कीच १२८ नगरसेवक आम्ही हे काम बरोबर आहे असं लिहून देत नक्की नाही. मग अधिकारी डोळे झाकून काम करतो का. अधिका-यावर खुप कामाचा दबाव आहे का किंवा त्यांना खूप प्रेशर आहे का त्यांना सगळयांना. याचा या ठिकाणी मा. महापौर साहेब उहापोह होणं गरजेचे आहे. हया २४ बाय ७ मध्ये अक्षरश: त्या अर्ध्या अर्ध्या ५ -६ इंचावर पाण्याच्या लाईन टाकल्या आहेत. असं काम केलेलं दिसतं. एवढंच नाही तर आता आमच्या एका नगरसेवकाने सांगितलं की पाण्याची गळती किती तर ४९ टक्के जवळपास आपल्याकडे पाण्याची गळती पाहायला मिळते. मला आठवतय मा. महापौर साहेब आणि आयुक्त साहेब आपल्याकडे हेलियम गॅस मधुन पाण्याची गळती जमिनीखालची गळती शोधायचं टेंडर सन्मा. लडकत साहेबांनी काढलं. म्हणजे पाणीपुरवठा लडकत साहेब आणि तांबेसाहेबांकडून वेगळं केलंना मग बघा तुम्ही पाणीपुरवठा काय सुधरेन. म्हणजे या ठिकाणी मी राज्य सरकारचं नक्की कौतुक करणार की त्यांनी या शहराला एक व्हिजन दिलं एक अँगल दिला एक काम करण्याची पध्दत आहे. सर एकदा एक राऊंड एका ठिकाणी वर्षानुवर्ष का म्हणुन साहेब. आणि हरकत नाही त्यांच्या वेळेला त्यांनी भविष्यात वाढणारी लोकसंख्या विचारात घेतली असती पिंपरी चिंचवड शहराची पाण्याचे नियोजन केलं असतं त्या ठिकाणी साहित्य बदललं असतं, आज पाणी खुप आहे पूर आला. आपण पाणी तिथनं रिस्टोअर करता आल

पाहिजे होतं. परंतु ऐकायला मिळतं, सर ऐकीव बाब आहे ही खरी नाही. तुम्हाला त्याची शहानिशा करावी लागेल. तरी तिथं साहित्य कमी पडतं जे पाणी उचलायला जी मशिनरी लागती ती मशिनरी कमी पडते. ती २४ तास चालून सुध्दा आपण तेवढंच पाणी उचलू शकतो म्हणुन तेवढं पाणी उचलावं लागतं. ज्या काळात पावसाळा असतो त्या काळात जास्त पाणी उचलुन या शहराला सुखी करु शकलो असतो परंतु नियोजनाचा अभाव . मा. महापौर तुम्ही येता, तुम्ही थांबवता त्यांना. १२८ नगरसेवकांनी सांगितलं की बाबा कोणतंही साहित्य घेऊ नका. साहेब नियोजनाचा भाग आहे तो तुमच्याकडे आहे ना. मग का होत नाही. अहो माई तुम्ही पण ऐकलं. तुम्ही महापौर असाल. तरी सुध्दा वॉर्डामध्ये एक नगरसेवक म्हणुन तुमचं जिव्हाळयाचं नातं नागरीकांशी असणार आहे. नागरीक सांगतात माई त्या आशाताई बघा काय पाऊस पडतोय आणि नळाला पाणीच येत नाही काय करता तुम्ही. माई, आशाताई तीकड नदी वाहून चालली पुर आलाय आणि आमच्या नळाला पाणी नाही. असं ऐकल्यानंतर साहेब इथं आम्ही जबाबदार नाही तुम्ही अधिकारी म्हणुन जे प्रशासन आहे ते निश्चितपणे या ठिकाणी जबाबदार आहे असं वाटत. परवा काय साहेब म्हणजे आता आम्ही तुम्हांला सांगायला लागलो तर तुम्ही माझ्या बिल्डींगमध्ये आले आणि तुम्हांला कुत्र चावले तर सर तुम्ही काय करताल. आशाताईंचं कुत्र चावलं त्यामुळे माझ्याच घरी येताल आणि माझ्याकडे तक्रारीचा पाढा वाचताल. आणि १०० टक्के साहेब ज्या कुत्र्याच्या गळयामध्ये माझा बेल्ट असेल त्या कुत्र्याच्या तक्रारी माझ्याकडे येऊन केली पाहिजे. तुम्ही दुस-याच्या दारात जाऊन नक्कीच नाही सांगितलं पाहिजे. मग अशा वेळेला जर महानगरपालिकेने मोकाट कुत्री एखाद्या नागरीकाला चावली, एखाद्या नागरीकाच्या गाडीला आडवी आली व त्यात नागरीकाचा जीव जर गेला तर मा. महापौर साहेब त्याला जबाबदार कोण. मानवहत्येचा गुन्हा कोणावर दाखल झाला पाहिजे. आता अजमेराचे प्रकरण ताईंच्याच वॉर्डातील जिवंत प्रकरण आहे. एक कॉलेजची मुलगी पडली आणि तिला जीव गमवावा लागला. माई त्यामुळे त्या कुटुंबाला वेदना आहेत. आपण लाखो कोटयावधी रुपये त्या कुत्र्यांच्या नसबंदीवरती करतोय. त्यांच्यावरती कंट्रोल राहण्याचा प्रयत्न करतोय पण ठोस उपाय कुठे. माझ्या वॉर्डातील शहाजी खंडाळकरांचा परवा ऍक्सिडेंट झाला सृष्टी चौकामध्ये ते आता कांबळे साईनाथ हॉस्पिटलला ऍडमिट आहेत आणि त्यांचं पायाचे ऑपरेशन आहे. माझ्या वॉर्डातील स्वामी नावाचा तरुण मुलगा मागच्या ६ महिन्यापूर्वी आपल्या सभागृहात मला वाटतं माझ्या डोळयात पाणी आलं होतं की त्या मुलाचा तरुण मुलाचा जीव गेला कुटुंब रस्त्यावर. मग हजारो कोटी रुपयांचे टेंडर काढतो डीनाय नाही साहेब याठिकाणी, मा. महापौर साहेब आपण टेंडर्स काढलेच पाहिजेत त्याशिवाय काम होणार नाही. परंतु त्या कामांना अंजाम देणं त्यांना निष्कर्षाला आणणं ही सुध्दा नैतिक

जबाबदारी नाहीए का. एवढंच नाही मा. कमिशनर साहेब माझ्या वॉर्डात एक मैदान आहे. ते मैदान मा. महापौर साहेब अनेक दिवस झाले मी माझ्या खर्चाने आयुक्त साहेब माझ्या खर्चाने मी आपल्या महापालिकेच्या कर्मचा-यांना बोलवले. त्यांच्याकडून गवताचं औषध घेऊन मारुन घेतलं. श्रमदान केलं ज्येष्ठ नागरीकांनी अख्ख्या गवतावर औषध मारलं मा. महापौर साहेब. का मारलं माहितीए तिथे खूप साप निघताएत. त्यांच्या कॉलनीमध्ये त्यांच्याच पायाखाली साप आला तर मी स्वत:ला माफ करु शकणार नाही असं मला वाटलं आणि म्हणुन मी काल श्रमदानाचं निमित्त केलं आणि सगळया जेष्ठ नागरीकांना बोलवले. स्वच्छता मोहीम घेतली आणि स्वच्छता मोहिमेमध्ये सगळं काम केलं. पण मा. महापौर साहेब ते मैदान जेव्हा आपल्या नियमात बसत नाही अस सन्मा. शिंदे मॅडमनी मला सांगितलं. त्यांची पण भाषा साहेब मगाशी राहुलदादा म्हटले आमचे भाषेवरती सर्वांनी विचार केला पाहिजे साहेब. मी त्याना फोन लावला. त्या म्हटल्या ताई कामाचं बोला ना. आता मी त्यांना तुमचे मिस्टर काय करतात, मुलं काय करतात हे नक्कीच विचारलं नव्हतं. त्या दोन दिवस बाहेरगावी होत्या पालिकेच्या कामानिमित्त. त्या म्हणाल्या मी आऊट ऑफ महाराष्ट्र, मी म्हटलं इटस ओके आल्यानंतर बोलू. आल्यानंतर मी दुपारी २ ची ३ ची वाट बघितली. नक्कीच दहाच्या आत ९९ टक्के पाणीपुरवठयाचे अधिकारी सोडले तर कोणत्याही अधिका-याला निश्चितपणे फोन करीत नाही. अगदी आणीबाणी असेल तर चुकूनमाकुन एखाद्या अधिका-यांना फोन होत असेल. मग मा. महापौर साहेब मा. आयुक्त साहेब जर असं मैदान तुम्ही द्या नागरीकाला आणि आपल्या क्लॉज आहे त्या क्लॉजमध्ये देता येत नाही. त्यांना आम्ही असंही सांगितलं की एक पत्र लिहुन दिलं की जर एखाद्या राष्ट्रीय खेळाडूला किंवा आपल्या शहरातील खेळाडू असेल तर त्याला ते लागत असेल तर त्या वेळेला संबंधित एक महिन्याच्या नोटीसच्या आत आम्ही ते मैदान तुम्हांला रिकामं करुन देऊ. कारण शेवटी शहरातील खेळाडू घडलेच पाहिजेत ही आत्मियता आमची पण आहे. परंतु आज येथे जे बकालपणा येतोय त्या ठिकाणी मा. महापौर साहेब हे सभागृहात बोलू नये परंतु त्या ठिकाणी रुम काढल्या होत्या, समजा आपण एखादा कार्यक्रम घेतला आयुक्तांना आणि महापौरांना आलेतर त्यांना बसायला एक प्रशस्त जागा होईल म्हणून त्या खोल्या काढल्या, त्या खोल्यांची कुलपं परस्पर उघडली जातात त्या ठिकाणी महिला सुध्दा आणल्या जातात. कुणाला सांगायचं महापौर साहेब आम्ही हे. म्हणजे जिकडे तिकडे आपण महिलांचा आदर ठेवायचा म्हणायचा आणि दुसरीकडे आपलं वस्त्रहरण आपल्याच समोर होत असतं आणि आपण मात्र पुन्हा डोळे बांधायचे आणि गांधारी म्हणुन या शहरात वागायचं शक्य नाही मा. महापौर साहेब, आता ते गांधारी होणं निश्चितपणे शक्य नाही. कारण इतकं सोपं पण नाही. मा. कमिशनर साहेब आपण त्यांना खूप आग्रह करतोय की तुम्ही ते द्या शहरातील विद्यार्थी खेळतील मुलं खेळतील. ते ग्राऊंड एंगेज राहील. पण त्यात

सुध्दा कोणतीच हालचाल केलेली दिसत नाही. आणखी एक विषय मध्यंतरी खुप पेपरला वाचलं फ्लेक्स संदर्भातलं. साहेब आपण फ्लेक्सवरती कारवाई गुन्हे का दाखल केले नाहीत. हे मला खरच कळलं नाही. खरं तर तुमच्याकडून आदेश व्हायला हवा होता. ज्या नागरीकांनी ज्या ठेकेदारांनी हया शहरातील फ्लेक्सची जागा आमची वापरली महापालिकेची जागा त्यांनी वापरली त्यांना जो काय मागच्या चार पाच सात वर्षाचा जो काही त्यांचा दंड असेल ती दंडात्मक कारवाई त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन आपण करणं लागत होतं. का चुक, कोणाचे फायदे कोण घेत होतं कोटयावधी रुपये हयाची एकदा शहानिशा करा. तुम्हांला हवं असलं नावानिशी सांगु साहेब आम्ही तुम्हांला. त्या तेलकर ताई आणि माई तुम्ही घरी जाताना आमच्या शंकरवाडीच्या पूला खालुन जात असतात. तुम्ही आता जाताना कमिशनर तुम्ही पण आवर्जुन बघा त्या शंकराच्या पूलाच्या अपोझिट साईडला एक मोठा फ्लेक्स लागला आहे होर्डीगसाठी एक मोठं जाळं उभ केले होते. पत्रकारांनी काही बातमी छापली त्यामुळे ते संबंधितांनी काढलं. साहेब काढलं चांगली गोष्ट आहे. पत्रकार बंधुंचही मनापासुन आभार. तुम्ही ती बातमी लावली कोणत्या पेपरने बातमी लावली होती आठवत नाही आणि ते काढलं गेलं. सन्मा. आयुक्त साहेब किमान ही ३ महिन्यापूर्वीची घटना असेल अजुनही मातीचा ढीग आता मी म्हटल तुम्ही मागच्या प्रश्नांची उत्तरं दिलेली नाहीत तर पाचवा प्रश्न कसा टाकायचा तुम्हांला. म्हणुन सन्मा. आयुक्त साहेब तुम्हांला ते टाकलं नाही पण आज सभागृहा समोर मांडते. कारण तो रस्ता आहे तो माझ्या प्रभागातला आहे का अजिबात नाही. तो हायवे आहे आपला. एखादी घटना एखादी टु व्हिलर तिथुन गेली एखादी फोरव्हीलर तिथुन गेली कोणाचा ऍक्सिडेंट झाला जीवीतहानी झाली साहेब तर पुन्हा मग काय आम्ही मग आता आमच्या प्रभागात आपण ऑफीस बॉय ठेवतो कामाला मग आपण वॉर्डातील कामं बघायला ठेवतो मग ऑफीसची कामं बघायला आपण माणुस ठेवतो, आपण पत्रव्यवहाराला एखादी व्यक्ती ठेवतो. आता साहेब महानगरपालिकेवरती गुन्हा दाखल करायला माणुस ठेवावा लागेल साहेब. कारण उषा मुंढे किंवा चंदाताई लोखंडे यांच्या वॉर्डामध्ये ड्रेनेजच्या चेंबरमध्ये गाडीसहीत माणुस पडला हेता. गाडीसहीत माणुस पडला तुमचं नशीव चांगलं आमच्यासाठी त्या माणसांच नशीब खुप चांगलं की त्याला जीवीतहानी काही झाली नाही त्या ठिकाणी. परंतु हया बाबी सगळयाच बाबी तीतक्याच महत्वाच्या आहेत. त्याच बरोबर माई या ठिकाणी माझ्या प्रभागात माई तुम्ही आल्या होत्या ह प्रभागात आणि आपण अनेक विषयांवरती बोललो आणि त्या वेळेस नक्की म्हटले होते की आज महापौर येतात कमिशनर येतात आमची सगळयांची इच्छा फार बरं वाटतय आम्हांला. परंतु त्याला निर्णय देणे त्या वेळेस तुम्हांला थोडा राग आला होता वाटतं. त्याला निर्णय देणं अंजाम देणे महत्वाचे आहे. साहेब तुम्ही आलात आम्ही किती बोललो त्याला मजा नाही. चार चार मुद्दयांचा प्रश्न मांडलेला असतो आम्ही नक्की तुम्ही समजुन घेताल याची खात्री आहे तुमच्या बद्दल. कारण तुम्ही अत्यंत

कार्यक्षमतेने काम करता. त्यात अजिबात शंका असण्याचं काही कारण नाही. माझ्या येथे स्मशानभूमी दफनभूमी आहे. तुम्हांला दाखवलां ना १८ मीटरचं अंतर आहे साहेब फक्त् स्मशानभूमी आणि लोकांच रहिवासी ठिकाण. माई एखादी मयत जर जाळली तर धुर माझ्या तिकडच्या नागरीकांच्या बाल्कनीत येतो. मागील चार वर्ष मी पाठपुरावा करत आहे विषयाचा. परंतु हो, नाही हो, नाही आता कुठं तरी त्याला जोर बसला आणि बघतीए तर आता तो टी.एस.च होत नाहीए. मग कधी तरी कमिशनरांच नाव सांगितले की हा आदेश काढला हे पत्र काढलं फक्त ह्यात खरं खोटं तुमचं तुम्हीच कन्फर्म करा आणि आम्हांला सांगितले आम्हांला बोलवलतर आम्ही नक्की तुमच्यापर्यंत येवू. पण तीथ माई स्मशानभूमीचे काम आहे ते होणं माई खूप महत्वाचे आहे. त्याच्यावर नुसतं स्मशान बांधणं हे काही टार्गेट नाही नाही कारण तिथं आता मयत जाळण्यासाठी जागा आहे कातर नक्की आहे, नक्की आहे. तिथं अडचण काय आहे माझी त्याच्यावरती एक्झॉस्ट सिस्टीम असणे महत्वाचे आहे. त्याचा धूर माई माझ्या इथल्या नागरीकांच्या मी समोर राहते तिथल्या बाल्कनीमध्ये ती काजळी असते ना ती काजळी मा.कमिशनर साहेब त्या ठिकाणी जमा होते आहे. नागरीकांच्या गॅलरीमध्ये काजळी जमा होते, समोर राहते. मा. महापौर साहेब लगेच फोन येतो ताई या ना आमच्या गॅलरीमध्ये. काय झालं, आता एक मयत झाली ताई आणि बघा ना खिडक्या दरवाजे बंद केलं तर घरात गुदमरायला होतय वास येतोय साहेब तुम्हाला मला नक्की मरायचय. आपल्याला पण स्मशानभूमीतच जायचय. परंतु जात असताना किमान एक समाधान मिळालं पाहिजे की ही स्मशानभूमी मी अद्ययावत केली होती त्याचं एक मानसिक समाधान मिळावं म्हणुन आपण स्मशानभूमी असेल दफनभूमी तर माई नदीला लागून असते तुम्हांला नवीन सांगायची गरज नाही. पावसाळयामध्ये ना आता साहेब माझ्या येथील दफनभुमीतील काही मयती उघडया पडल्या. हेळसांड झाली साहेब. कुणाच्याही घरचा माणूस गेल्यानंतर त्याच्याबद्दल संवेदना ह्याबाबत मी तुम्हांला सांगायची आवश्यकता नाही साहेब, आणि त्यामुळे ह्या दोन गोष्टी दोन कामं ही अत्यंत महत्वाची आहेत. कासारवाडीचा मानाचा तुरा म्हणुन ह्या ठिकाणी आपण सगळयात महत्वाचा भाग टाकत होतो तो एन्व्हायर्नमेंटल पार्क तयार करण्याचा त्याचं पुढं काय झालं पत्ता नाही. एन्व्हार्यनमेंटल एज्युकेशन पार्क ह्या सर्व गोष्टीवर मा. महापौर साहेब आपण लक्षं घालणं खुप गरजेचे आहे आणि एक महत्वाचा भाग मला कळाला की मा. कमिशनर साहेब आपण मला वाटतयं की हायवेचा रस्ता जो आहे त्याच्या वरती १०० कोटीची निविदा काढतोय. जर हे खरं असेल मा. महापौर साहेब तर मला एक सांगायचय की या रस्त्याच्या कडेला असणारे जे जे नगरसेवक आहेत मग आम्ही दापोडीचे चौघे जण असु, कासारवाडीचे इकडचे असतील, सुजाताताई असतील त्या हायवेच्या कोणत्या नगरसेवकांनी मा. आयुक्त साहेब तुम्हांला पत्रव्यवहार केला की आमचा हायवे बदलून द्या. मा. महापौर साहेब तुमच्याकडे कोणी कोणाचा नातेवाईक येऊद्यात कोणताही पाहुणा

येऊद्या कोणताही अधिकारी येऊद्या कोणतेही नेते येऊ द्या ते सांगतात की पिंपरी चिंचवडमध्ये आल्यानंतर दापोडीतुन थोडासा भाग पुढे आलो की एकदम सुसाटपणे निगडी पर्यंत निघुन येता येतं. इतके सुंदर रस्ते साहेब आपल्याकडचे आहेत. तुम्ही करताय तुमचं स्वागत आहे. परंतु नक्की प्रयोगशाळा आहे आमची, आमचे नगरसेवक, आमची महापालिका १०० कोटी रुपये उधळण्यासाठी ही प्रयोगशाळा नाही साहेब. हया ठिकाणी मा. महापौर साहेब नवीन कमिशनर आले की त्यांचा नवीन दृष्टीकोन. आतापर्यंत आम्हाला इंदोरचा दृष्टीकोन. हरकत नाही साहेब. इंदोरचा दृष्टीकोन लावत असताना मागच्या टेंडरमधील आपण १० का २० कोटीचं काम होतं ते आज ५४ कोटीवर नेऊन ठेवलयं. करायला हरकत नाही परंतु मा. महापौर साहेब शहरातील नगरसदस्य आपल्या इथे १२८ आहेत ते या शहराचे ट्रस्टी आहेत. ट्रस्टीचा अर्थ मला वाटतं तुम्हांला मी सांगण्याची आवश्यकता नक्की नाही. ट्रस्टी आहोत मा. महापौर साहेब आपण. आपल्यावरती नागरीकांचा विश्वास बसलाय. त्यांना आपल्याबद्दल खात्री वाटते. त्यांना माहिती असतं की आपल्या शहरातील आपल्या प्रभागातील अडचणी, समस्या ज्या काही माझ्या प्रभागाचा गंज आहे त्या मी हया सभागृहात बोलते माझ्या महापौरांना सांगू शकते, माझ्या कमिशनरांना मी सांगू शकते आणि हयाच्यावरती काम करुन घेण्याची ताकद क्षमता असणा-या माणसाला प्रभागातील नगरसेवक म्हणुन निवडुन देतात नागरीक आणि मला वाटतय इथ साहेब आम्ही सगळेजण २ कोटीच काम करा ना साहेब आमच्या वॉर्डातलं, ४ कोटीच काम कराना, ५० लाखाची निविदा काढा ना माझ्या नागरीकांची गरज आहे असं आम्ही गयावया करुन का तुम्हांला सांगायचं. कमिशनरांना वाटतं १०० कोटीचं काम काढायचं. नो डाऊट, HE CAN DO IT. मग आम्ही कुठं जायचं साहेब. आम्ही सगळया नगरसेवकांनी कुठं जायचं. माझ्या नागरीकांना धूर लागतो, धुराचा त्रास होतो. तिथे छोटी मुलं राहायला नाही म्हणतात मग त्या लोकांचे प्रश्न मी किती वर्ष मांडायचे. मा. महापौर साहेब ते शेवाळे नाला आहे ना तिथला एक ड्रेनचा पाईप आहे नाल्यावरती त्यामुळे तिथे पाणी तुंबतं. तो काढायला पाच वर्षाचा पाठपुरावा साहेब. किती वर्ष साहेब पाच वर्ष, कशासाठी साहेब कार्यक्षम सर्व अधिकारी आहेत माझे त्यामुळे मा. महापौर साहेब, खरं तर हे कमिशनर नवीन येतात ना मा. महापौर ते प्रत्येक जण आपआपल्या पध्दतीने महापालिकेचा पुरेसा वापर करतात . मी पण सायन्स फॅक्लटीची आहे. साहेब तुम्ही पण सायन्स फॅक्लटीचे असाल असं मला वाटतयं. मला माहित नाही तुमचे बेसीक क्वालिफिकेशन काय आहे परंतु आयएएस ऑफीसर आहात तुम्ही सर. मी प्रयोगशाळेत गेले होते १२ वी सायन्सला. बेडुक कापायचं प्रशिक्षण घेतलं खुप आनंद व्हायचा आज मी बेडुक कापला आज गांडुळ कापलं एक नवीन प्रयोग केला. तसं तुम्ही सगळेजण हया महानगरपालिकेला, या महानगरपालिकेतील तिजारीला आणि या माझ्या प्रभागातील नागरीकांना तुम्ही बेडुक समजता का त्यांना गांडुळ समजता का साहेब

तुम्ही. की तुम्ही प्रत्येंकानी यायचं तुमचा तीन वर्षाचा कार्यकाल पूर्ण करणार तुम्हांला तुमचा कारभार मोठा करण्यासाठी तुम्ही या महापालिकेच्या पैशांना तुम्ही चक्क प्रयोगशाळा म्हणुन वापर करता. आमच्या महानगरपालिकेतील पैशांवरती डल्ला मारता. आताच मला वाटतं या ठिकाणी सीमाताईंच्या हयाच्यावर पाहिलं की कबड्डीपटटू मुलगी होती तिचा खुन करणारा जो माणूस होता तो सापडला आहे. त्यांनी त्या मुलीबरोबर अन्यायकारक वागला, त्या मुलीवरती बलात्कार केला तिचा खुन केला त्या नराधमाला आज कोर्टात हजर केलं आणि त्या ठिकाणी सर्वपक्षीय महिलांनी भर न्यायालयात त्याला बेदम चोपलं. मा. महापौर साहेब आणि आयुक्त साहेब तुमच्या सगळयांच्या, सभागृहाच्या साक्षीनीं, सगळयांच्या वतीनी मी त्या सगळया महिला भगिनींचे  या ठिकाणी मनापासुन अभिनंदन करते की त्यांनी त्याला शिक्षा दिली. सन्मा. आयुक्त साहेब सन्मा. महापौर साहेब आज जे जे काही मी मुद्दे मांडलेत त्याची निश्चितपणे आपण दखल घ्याल या खात्रीने थांबते. जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.राहुल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्म.सभागृह, ऑन लाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरं तर आता पाच तास झालेत. पालांडे ताईंनी एक महिलांच्या अत्याचाराचा विषय या ठिकाणी उपस्थित केला होता. त्यांचे इन्टेंशन काहीही असेल परंतु शहरातील महिलांच्या दृष्टीकोनातुन तो महत्वाचा होता. पुण्यात बिबवेवाडीतच ही घटना घडली ती खरंच काळीमा फासणारी होती परंतु हैद्राबादने जे केलं त्याची पुनरावृत्ती हया ठिकाणी व्हायला पाहिजे होती. गुन्हेगार एवढे निर्ढावलेत की ते करुन ते स्वत: चौकीत जाऊन हजर झाले, की आम्ही असं असं करुन आलोय. परंतु त्याची पुनरावृत्ती आपल्या शहरात नाही व्हावी यासाठी आपण आयुक्त साहेबांना उत्तर द्यायला सांगितले. साहेबांनी साहेबांच्या हातात जे आहे ते सांगितले. पोलीसांना इन्फ्रास्ट्रक्चर पुरवत असताना आम्ही सीसी टीव्ही कॅमेरा त्या ठिकाणी देऊ परंतु माई आपल्याला माझी विनंती आहे पूर्वी देखील सभागृहात महिलांच्या विषयावर खुप चर्चा झालेली आहे. आपण देखील दोन्ही शहरात सीपी असतील कृष्ण प्रकाश साहेब असतील किंवा पाटील साहेब असतील हयांची एकत्रितपणे एक मिटींग लावा आणि शहरातील महत्वाच्या ज्या सर्व महिला आहेत त्यांना त्या ठिकाणी बोलवा. सीसी टीव्हीची खरंच कुठे गरज आहे साहेब आपण आमच्याकडून पत्र घेतली ती आम्ही दिली की हया हया ठिकाणी प्रत्येक नगरसेवकानी दिली असतील हया हया ठिकाणी सी सी टीव्ही कॅमेरे लावले जावेत. परंतु अशा प्रकारे मायक्रो लेव्हलला जाऊन जर काम केलं आणि त्याच्या बरोबरच खरं तरी आयुक्त साहेबांचा खुप हातखंडा आहे त्यांची जर आपण ओरीसाची क्लीप पाहिली शाळेतली तर हया शाळेतल्या सर्व मुलांना खरंच ऍवरनेसची गरज आहे. आज आपण महापालिकेच्या शाळा पाहिल्या त्या ठिकाणी असलेल्या मुली पाहिल्या त्या ठिकाणी असलेली मुले पाहिली तर मला वाटते की हया सभागृहातल्या कोणाचाच मुलगा/मुलगी

महापालिकेच्या शाळेत शिकत नसेल परंतु त्या शाळेतल्या त्या लहान मुलांच्या मनावर खरंच चांगल्या गोष्टींचा चांगला परिणाम करण्याची जबाबदारी पण आपल्या महानगरपालिकेची आहे. कारण की हया मुलांना खरंच शिक्षणाची गरज आहे. शिक्षण झाल्यानंतर खरंच नोकरीची गरज आहे. मला वाटतं साहेब मी आपल्याकडनं ती पण अपेक्षा व्यक्त करतो की कालावधी इलेक्शनचा आहे, आरोप प्रत्यारोप होत आहेत. पण शाळेसारख्या फिल्डमध्ये देखील आपल्याला ओरीसा सारखं काम करावं लागेल. ती क्लीप पाहिली तर त्या भागात एकही मुलगा तुम्ही जिल्हयातला शिक्षणापासुन वंचित नाही ठेवला. तुम्ही त्याच्या तिथे गेलात त्याला शिक्षणाला लावला. त्याचा खर्च तुम्ही केला. त्याचं तुम्ही कौन्सिलींग केलं त्या प्रकारे खरंच मुली हया शहरातील मुलं ही पुढची पिढी आहे ती जर सुरक्षित ठेवायची असेल तर आपल्याला खरं तर हया सर्व गोष्टी करण्याची गरज आहे. आता सीमाताईंनी सांगितलं स्मार्ट सिटींच आता अजितभाऊंना महापौरांनी सांगितलं विषयांतर करु नका परंतु विषयांतर होणारंच ना. आताच नामदेवरावांनी सांगितलं तुमचे खासदार मागे बसलेत. कशी काय आम्ही जी.बी.चालवली. तर मी म्हटलं ते पण शेवटपर्यंत असतील कारण त्यांच्यात पण पेशन्स आहेत. आता तुम्हांला खरं धोक्याची घंटा आहे. आता तुम्हांला खरं धोक्याची घंटा आहे. मला राष्ट्रवादीवाल्यांची अपेक्षा होती आज अमोलजींसमोर ते स्वत:चे प्रेझेंटेशन करतील की मी किती चांगलं काम करतोय पण भारतीय जनता पार्टीवाले पण जास्त मला वाटतं त्यांच्या संपर्कात आहेत मला वाटतं तेच बावरले आहेत. मला वाटतं तेच बावरले आहेत की आम्हांला खासदारांनी पहायला पाहिजे आम्ही किती चांगलं काम करतोय. आम्ही किती टीका करतोय ते तासभर मला जाणवतयं. हयाच वाक्याची मला तुमच्याकडून अपेक्षा होती तेच सीमाताई सांगत होत्या. तेच सीमाताई सांगत होत्या. आमदार, खासदार कुठल्या पक्षाचा नसतो. तो सगळयांचा असतो. सगळया शहराचा असतो म्हणुन त्यांनी सांगितलं विनयभंग आपल्या सर्वांची जबाबदारी आहे त्यांच्या बरोबर उभं राहण्याची. महापौरांनी पण ठराव केलेला आहे. अशी भाषा एका महिलेबद्दल आता त्यावेळेस तुम्ही ही जी वृत्ती आहे तिथे दाखवा. तो कोण कुठल्या पक्षाचा नाही. तो कुठल्या पक्षाचा असू दे भीमराव. आम्ही एका महिलेबरोबर उभे राहणार ही भुमिका कायम ठेवा, ठेवणार का कायम. आयुक्त साहेब स्मार्ट सिटीचं सीमाताईंनी सांगत असताना एल अँड टी च्या खूप गोष्टी सांगितल्या. त्यांनी एक एक करुन त्यांचा भ्रष्टाचार उघडकीस आणला. त्यातली एक गोष्ट आदरणीस माजी महापौरांच्या निदर्शनास आणून द्यायची आहे. त्यांनी सांगितलं त्या ठिकाणी सर्व पक्षाची लोक आहेत. मी गेल्या ५ वर्षापासून स्मार्ट सिटीवर बोलतोय. संदीपने जे सांगितले ना, मतदान घेतलं आमचं. मला पिंपळे गुरवच्या नागरीकांबद्दल कुठलाही रोष नाही. मतदान घेतलं आमच आणि सबमीट केला पिंपरी चिंचवडचा प्लॅन. पिंपळे गुरवचा प्लॅन. म्हणजे स्मार्ट सिटी ही डे वन पासुन

स्मार्ट सिटीत आपण नव्हतो आपल्याला बेस्ट सिटीचा ऍवॉर्ड होता या शहराला. तुम्ही जे म्हणता ना पूर्वी काय झालं, पूर्वी काय झालं पूर्वीच हया शहराला बेस्ट सिटीचा ऍवॉर्ड होता त्यामुळे स्मार्ट सिटीत हे शहर नव्हतं. योगायोगाने नवी मुंबईनं नाकारलं त्यानंतर मला वाटतं पळत पळत गेले इथले सत्ताधारी आम्हांला घ्या, आम्हांला घ्या. त्यांना माहित होत ना पुढ आम्हाला काय करायचय. भालकर साहेबांना खुराडं उघडायचं होतं पुढं आणि ते त्यांनी उघडले. आज पाहिलं तर सगळया पक्षाची लोक बोलताएत. टोटल भ्रष्टाचार भ्रष्टाचार, भ्रष्टाचार, भ्रष्टाचार. एकच उदाहरण मी तुम्हांला देतो, ताईंनी खूप उदाहरणे दिली ती मी देणार नाही. एक साधं टेक महिंद्रानं एक जनसेट घेतला २५० केव्हीएचा. त्याची बाजारात किंमत काय आहे २० लाख रुपये. स्मार्ट सिटीत तो केवढयात घेतला ३ कोटी रुपयाला. हयाच्यात तर राहुलजी मला वाटत नाही हयात अजुन कोणाला काय आकडे सांगायचेत परंतु भारतीय जनता पार्टीने काय केलं आमचे पण सभासद घेतले पण स्वत:च्या मनाप्रमाणे घेतले आत गेल्यावर गप्प बसायला पाहिजे. स्मार्ट सिटीत काय बोलला नाही पाहिजे, आजही ती केस पेंडींग आहे. आम्ही म्हटलो आता कशाला वाद विवाद करायचे म्हणुन नाही फॉलोअप केला, नाही त्या ठिकाणी गेलो. आमचा पण अधिकार हा तुम्ही वापरला. माऊली शेठनी सांगितलं त्याच्यामुळे जे काही स्मार्ट सिटीत चाललयं सगळीकडे तेच चाललय. संदीपनी नदी सुधारचं सांगितले. विषय कसा होतो भ्रष्टाचार, भ्रष्टाचार, भ्रष्टाचार आता बरोबर सगळयांच्या लक्षात आल आणि नामदेवराव तुम्ही ज्या वेळेस म्हणता ना बोट करता ना हे एवढया दिवस गप्प होते, एवढा वेळ गप्प होते. हया शहरातील नागरीकांनी तुम्हांला सत्ता दिली कशासाठी दिली प्रशासनावर अंकुश ठेवायला दिली तो तुम्ही प्रशासनावर अंकुश ठेवू शकले नाही, होतय काय. संध्याकाळी आयुक्त कार्यालयाच्या बाहेर दिसले की पक्षनेते चेअरमन कुठल्यातरी ठेक्याची सही घ्यायला आहे. तुम्ही काय म्हणायचे हर्डीकर साहेब आपल्या दबावाला बळी पडायचे. तुम्हांला आठवत असेल ना वाघमारे साहेब. सगळे witness इथे आहेत. सीमाताईही wtness आहेत. महापालिकेच्या इलेक्शनच्या आधी वर्षभर या ठिकाणी वाघमारे साहेब आले. साधं निगडीच्या पुलाच्या निविदेचा विषय होता. साहेब जे १५ दिवस नागपुरला गेले ते परत आलेच नाहीत, परत इलेक्शनलाच आले. मला वाटत त्याच बाबतीत पाटील साहेबांना मानायला पाहिजे. आमचं तुमचं न करता जी शहराच्या नागरीकांची हिताची कामे आहेत ना ते करत आहेत. तुम्हांला या साठी मुख्यमंत्र्यांकडून उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन कराव लागेल असं यांनी सांगून नाही पाठवलं हे कर ते करु नको. पण आज ज्या पध्दतीने तुम्ही सगळे दोष देताय ना स्वत:च काम नाही झालं ना साहेब सहीच करत नाही. मला आतच घेत नाही. साहेब एक गोष्ट ही नक्कीच आपल्याकडून चुकलेली आहे. शेंडगे ताई

आल्या होत्या आपणही नवीन होते. मी आपल्याकडे आलो परंतु त्या ठिकाणी जो माहोल होता त्या ठिकाणी आपल्याला हे सांगण्यात आले की त्यांना शाईच फेकायची, त्यांच्या बरोबर त्या ठिकाणचे नागरीक होते. मी ३५३ चा दोन वेळा शिकार झालोय. पॉलीटिकल शिकार मी हया पालिकेत आणि आधी पण. त्या केसचा प्रॉब्लेम असा होतो खुप त्रास होतो. एकवेळ ३०७ परवडली कॉंप्रोमाईज होते पण ३५३ कॉंप्रोमाईज होत नाही. माझी आपल्याला एक विनंती आहे आता जे झालं ते झालं ताईंबरोबर त्या भागातले नागरीक होते खुप त्रास झाला. मला वाटत  माऊलीन हे पोटतीडकीन सांगीतल मला वाटत पॅनेल करायचय ताईंबरोबर कारण की आतापर्यंत मी ऐकलं नाही तुम्ही एवढ पोटतिडीकीनं बोलताना आणि शेंडगे ताईंबद्दल. मी ऐकतोय ना आता आज सगळे जण चेंजच दिसत आहेत. तर मला असं वाटतं की साहेब आपण एखादं पत्र दिलं की कायद्याची ती प्रोव्हीजन आपल्याला माहित आहे. पण आपलं एक इंटेंशन होतं इंटेंशन म्हणण्यापेक्षा काय होतं की एकानी एक डेअरींग केली की मुंढे ताई आपलं डेअरींग अजुन होतं. त्यांच्यावर गुन्हा दाखल केला की आम्हांला चहाची टपरी खाली करुन पाहिजे. म्हणुन आपण पत्र देऊ. मुंढे ताईंना प्रेमाचा चहा दिला आपल्याला गुळाचा चहा द्यावा. पालिकेत चर्चा होती की महापौरांनी सांगितले होतं की प्रेमाचा चहाला जागा द्यायची प्रीमायसेस मध्ये. मला जसं कळलं तसं मी पण पत्र तयार केले. मी पण पत्र तसं दिलं सत्ताधा-यांना जर प्रेमाचा दिला तर आम्हांला गुळाचा द्या. म्हणजे मग साहेबांना निर्णय घ्यायाला सोपं होतं. निर्णय घ्यायला सोपं होतंना आता दोन्ही मागताएत. विरोधक पण मागताएत आणि सत्ताधारी पण मागताएत. मग आम्ही नाही देऊ शकत. परंतु ताई मला एकच म्हणायचय माई तुम्ही आज एक डेअरींग करुनच टाका. सगळे म्हणताएत ना भ्रष्टाचार, भ्रष्टाचार, भ्रष्टाचार. तुम्ही एकदा ए.सी.बी.ला एक पत्र देऊनच टाका. आज आपण समजू माई भ्रष्टाचाराया विरोधात आहेत माई आज १०० टकके पत्र देणार. जर तुम्ही आज सांगितलं ना पत्रकाराच्या हयाचं पालिकेत यायला बंदी तसं तुम्ही माई पत्र देऊनच टाका. आम्ही इथुनच लोटांगण घालू तुम्हांला सगळे घालू. एकदा दुध का दुध पानी का पानी होऊन जाऊ द्याना. आम्ही म्हणतोय भ्रष्टाचार तुम्ही म्हणताय नाही. आता नामदेवराव भाषणाला उभे राहणारच आहेत. आणि नामदेवरावांच भाषण आज पर्यंतचं जाहीर सभेतील भाषण असतं ते सभागृहातलं वाटतच नाही. ते पक्षाचीच बाजू मांडतात आणि परत तुम्ही सांगा माई भाजपाचं नाव नका घेऊ.  ते थोडं जरा कुठंतरी गल्लत होती परंतु मला वाटतं माऊली थोरातांनी सांगितलं कासारवाडीचं. १०-१२ वर्षापासुन ते अधिकारी बीआरटीत आहेत. त्यांच्या सदसदविवेकबुध्दीचा पण सत्कार करायला लागेल आपल्याला. आदरणीय सवणेंनी नाव घेतल त्यांनी नाव नाही घेतलं. १२ वर्षापासुन ठिय्या मांडून आहेत बीआरटीमध्ये.

त्यांनी आता नवीन टेंडर काढलय, पहिलं त्यांनी सुरुवात केली. औंध रावेत रोडला सुशोभित करणे १०० कोटी मग स्मार्ट सिटीतील टेंडर मग स्मार्ट सिटीतलं टेंडर १६ नगरसेवकांची पत्र पण नंतर साहेबांनी सांगितलं स्मार्ट सिटीला स्मार्ट सिटीबाहेर काम करता येत नाही. मग आता नवीन डोकं कसं चालवायचं मग आता नवीन चेंबरचे समतलीकरण आणि डांबरीकरण ६० कोटी. नामदेवराव इलेक्शन फंड जमा करायचाय का. नक्की चाललय काय हे. निविदा प्रसिध्द झाली आणि हे तुम्हांला शिव्या देत आहेत आणि तुम्ही पण निविदा प्रसिध्द करायला परवानगी दिली. आता हे कसं काय. आता हया बाबतीत त्यांना थँक यु तरी म्हणा. आमचं काम तर आम्ही करतोय. आम्ही पत्र देतोय. १०० कोटीचं काम ६० कोटीला नाही करता आलं तर ६० कोटीच काम बीआरटी विभागामार्फत वा,वा,वा. सर सवणेंचा एक किस्सा सांगतो. आम्ही स्टँडींगला होतो तीथ आल्यावर योगायोगाने सगळं सभागृह फुल होतं. उल्हासराव बसलेले होते. आता उल्हासरावांकडे जबाबदारी खुर्ची द्यायची. तण, तण, तण खुर्ची नाही मला, खुर्ची नाही, खुर्ची नाही म्हणुन कसे तरी जावून पलिकडे बसले नंतर माझी वेळ आल्यावर मी भाषणातच म्हटलं मी आतापर्यंत आमची भांडणं पाहिली होती खुर्चीसाठी. अधिका-यांची पहिल्यांदा पाहिली सवणेंच्या रुपात. ते काय समोर उल्हासराव आहेत. सर तर अशी बारा बारा वर्ष जे अधिकारी ठाण मांडून बसलेत ना डिपार्टमेंटमध्ये हीच परिस्थिती नगररचनाची आहे खाली, मनी मिळत नाही तोवर फाईलच वर जात नाही. परवा पण साहेब मी एक अधिका-यांच सांगितले एक आमदारांचा पुतण्या आहे ठेकेदार. इतका घाण घाण बोलला बाहेर नीघ बघतो, कोण सही करतो ते, हे कन्सलटंट तीन महिन्यापासुन पेमेंट नाही. इलेक्शन सगळयांच्या समोर आहेत जर कामं करायची असेल तर ठेकेदारांना आणि त्या कन्सलटंटना पेमेंटच नाही दिलं तर आणि काम बंद झाली तर त्याचा परिणाम कोणावर होणार, आमच्यावर कमी परिणाम होईल तुमच्यावर जास्त होईल. तुम्ही ७८ आहात त्यातले १५–२० जण इकडच येणार आहेत. नामदेवरावांना आताच सांगुन ठेवतो कारण जाहीरपणे बोललेलं बरं ना. आजपर्यंत मला वाटलेलं होत की हे नाही यायचे पण जसे अमोलजी आले आणि जो परफॉर्मन्स वाढला तसं मला पटायला लागलं १०० टक्के हे येणार. परंतु टेक महिंद्रा बरोबर आपण मला वाटतं जिओ कडे पण जायला पाहिजे. मला आता प्रशांतनी सांगितलं तू काही नको तु हे कर एल अँड टी लुटारु, टेक महिंद्रा लुटारु हयांना कंट्रोल करायचं म्हणजे काय करायचं. त्यांना लुटारु म्हणायच का सत्ताधारी म्हणायचं. त्याच पण मला वाटत आपण आम्हाला सगळयांना मार्गदर्शन करावं. काय होतं कधी कधी शंका अशी येती की आता कारवाही होणार आहे, सत्ता बदलणार आहे आपण पण विरोध करा. पण सीमाताईंच वेगळ आहे सीमाताई पहिल्या दिवसापासुन विरोध करत आहेत पण आता काही काहीं मध्ये मला अचानक बदल जाणवतोय. शाम लांडेनी जस सांगितलं आता

स्मार्ट सिटीचं काय झालय. स्मार्ट सिटी नवी मुंबईला गेली पण गडबड झाली सत्ताधा-यांची. आम्ही काय करायचं मंत्रीपद पण नाही. आम्ही काय करायचं मग ते गेले सी.एम. कडे. स्मार्ट सिटी तरी द्या. मंत्रीपदाएवढे पैसे तरी आम्हांला मिळतील. आणि त्यावेळी आम्हांला खोटं वाटलं त्यावेळेस नीलमताई म्हणाल्या नको जाऊ स्मार्ट सिटीवर मग त्या वेळेस वाटलं काहीतरी भलतं आहे पण आता मला पटायला लागलय. आता जसं ताईंनी सांगितलं ५०० स्क्वे.मी.च क्षेत्रफळ असताना टेंडरमध्ये ७५० एरिया पकडला म्हणजे सरळ सरळ २५० स्क्वे.मी.चा भ्रष्टाचार आता याला भ्रष्टाचार म्हणायचा का थोडी टेक्निकल चुक म्हणायची. मला वाटतं हयाची म्हणजे सगळयांचा सावळा गोंधळ चालला आहे. कारण मुंढे ताईंनी आणि सागर आंगोळकरांनी सांगितले एक तर तुम्ही आमची स्मार्ट सिटी नेली एकतर आमच्यावर अन्याय आहे आणि परत तुम्ही वर म्हणताय आमच्या भागांवरुन उठताय, आमच्या भागावरुन उठताय. जसं संदीपने सांगितलं व्होटींग पिंपळे सौदागर आणि वाकडचं क्लब केल का तर राजू मिसाळला स्मार्ट सिटी नाही गेली पाहिजे आणि क्लब केल्यानंतर साधा नियम आहे की स्मार्ट सिटीचा की ५०० हेक्टर सलग लॅण्ड पाहिजे म्हणुन ड्रॉइंग करताना वाकडचे ऐवजी ५०० हेक्टर उजव्या हाताला यायचं आणि ५०० हेक्टर डाव्या हाताला घ्यायचं जे सबमीट करताना पिंपळे सौदागर आणि पिंपळे गुरव येईल. वाकड त्यातुन कट झालं असो ते पण या शहराचे नागरीक आहेत. त्याच्या अगोदरही बेस्ट सिटीचं प्राईज घेतलं गेलेलं होतं. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर हे तसं डेव्हलप्ड होतं. आता माऊलींनी आता कासारवाडीचं रॅंपचे जसं सांगितले तसं पवना जलवाहिनीचं सांगितले. माऊली शेठ दिल्लीपासुन गल्ली पर्यंत मागची अडीच वर्ष आपण होतात आम्ही तर पवना जलवाहिनीतुन कधी पाणी येतच याची वाट बघतोय. एका बाजूला तुम्ही पाणी पण आणत नाही अन दुस-या बाजूला टॅंकर पण देताय. आम्ही काय विचार करायचा तुम्ही टॅंकरनी पाणी देणार होते का पाईपने देणार होते. आमच्याकडे टॅंकर पण चालू आहेत. टॅंकर आमदार निधीतुन टॅंकर मग पवना जलवाहिनीच्या पाईपवर खर्च करताय का टॅंकरवर खर्च करताय. हयाच्या पेक्षा जर आज साडेचार वर्षाच्या स्मार्ट सिटीकडे लक्ष देण्यापेक्षा शहराच्या मुलभुत गरजांकडे योग्य लक्ष दिलं असतं तर आज पाण्याचा प्रश्न सुटला असता. आता तुम्ही म्हणता शहराच्या हया भागात तो आलाय आंध्रामधुन पण आमचं काही तरी करा. आता चांगल्या प्लॅनिंगमधुन आम्ही ब-यापैकी ब-यापैकी थोडं थोडं थोडं वाढवत आलोय. पण आम्हांला १०० टक्के बाजूला व्हायचं असेल तर या शहरानं डॉक्टर भरती पाहिली. शिक्षक भरती पाहिली. एल अॅंड टी पाहताय २४X७ च वाटोळं झालेलं पाहिले. मला वाटतं पाण्याच्या द्रुष्टीकोनातुन आपण काम करत नाही. स्मार्ट सिटीत तर प्रचंड भ्रष्टाचार आहे. शाळेचं एज्युकेशन डिपार्टमेंट वेगळंच आहे. त्याच्यावर एक सेपरेट जीबी घेतली तरी ती कमी पडेल. त्याच्यातल्या काही गोष्टी मी आज बोलत नाही पण लवकरच ८-१० दिवसात त्याच्यावर पण बोलावे लागेल,किती भ्रष्टाचार म्हणजे एकाच कामावर १००-१००

कोटीचा भ्रष्टाचार आणि त्याची कागदं आहेत असं नाही की कागदं नाहीत. सीमाताईंनी जसा पाठपुरावा केला तसा आता इलेक्शन आलं की सगळेच एक एक गोष्टीचा पाठपुरावा करतील. कारण की आता परफॉर्मन्स दाखवण्याची हीच वेळ आहे. शीतल म्हटला मला नाही बोलायचं, आता खासदार बसलेत मला परफॉर्मन्स दाखवायचाय म्हणुन त्याने शिवाजी महाराजांचा डायलॉग काढला. डॉ. पाठीमागे आहेत बरं वाटलं असेल म्हणजे आदर्श आहे ना शितलला मी म्हटल तरी तो म्हणतो मला पक्ष नाही सोडायचा. मी त्याला म्हणल एकतर ५ वर्षात काही दिलं नाही आणि आता पुढे तरी देतील की नाही हे काय करणार. आज काय झालय खुप एकमेकांवर आरडा ओरडी झाली. सभागृहात आज भांडणं व्हायला पाहिजे होती. आता मी तुम्हांला सांगतो आता मी भारतीय जनता पार्टीला ओपन आव्हान करतोय तुम्ही म्हणल्यानां मुंढे ताई सब कॉंट्रॅक्ट कोणाला दिलं नाव घ्या. माई म्हटल्या भारतीय जनता पार्टीच नाव घ्यायचं नाही. आहे का तुमची हिम्मत मी रेकॉर्डींग ऐकवतो, पूर्ण रेकॉर्डींग तुम्ही ऐकायचं. हिम्मत आहे तुमच्यात. भारतीय जनता पार्टीला माझं ओपन आव्हान आहे तुम्हांला. मी रेकॉर्डींग ऐकवतो. हिम्मत आहे का हा म्हणा आम्ही भ्रष्टाचाराला पाठीशी घालणार नाही म्हणा. रेकॉर्डींग एकायची ताकद आहे का तुमची मुंढेताई तुमच्याकडून ऐकवा तुमची तयारी आहे का मी रेकॉर्डींग ऐकवतो. मग तुम्ही पण म्हणु नका ठेवा, बदला. माई माझं आव्हान आहे. तुम्ही शहराच्या प्रथम नागरीक आहात. हे शहर भ्रष्टाचार मुक्त राहणं तुमचंही परम कर्तव्य आहे. तुम्ही तुमच्या मनानं निर्णय घ्या आज. ऐकायचय ना मी ऐकवतो मी ऐकवतो. आम्ही पण विरोधी पक्षात आहे.

मा. महापौर – तुम्हांला संधी दिली हयाचा अर्थ याच उकरुन काढत त्याच उकरुन काढ ही जनरल बॉडी आहे. पाच तास झालेले आहेत. तुम्ही खाली बसा, राहूल तुम्ही खाली बसा. तुम्हांला आता बोलू दिलं जाणार नाही. तुम्हांला निलंबित कराव लागेल. चुकीच्या विषयावर बोलताय. कामाबद्दल बोला. कामे झाली नाही या बद्दल बोला सगळयांनी.

(सभागृहात गोंधळ)

मा. राजू मिसाळ- आदरणीय महापौर, आदरणीय आयुक्त, आदरणीय आमचे लोकप्रिय खासदार डॉ. अमोलजी कोल्हे तसेच माई तुम्ही २ वाजल्यापासुन सर्वात महत्वाचं म्हणजे सुजाताताईंनी एक आपल्या पुणे जिल्हयामध्ये जी घटना घडली ज्या मुलीवर ज्या पध्दतीने तिची निघृण हत्या करण्यात आली त्या संदर्भात माई हा विषय आपल्या महापालिकेत आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये त्यांनी स्वत:च्या डोळयांनी पाहिलेला प्रकार हा आपल्या समोर उघडकीस आणून दिला आणि दोन वाजल्यापासुन सभा सुरु झाली आणि पावणे सात वाजायला आले आहेत. माई आता राहिले तीन महिने, त्यामध्ये आमचे सन्मा. खासदार हया सभागृहाचे काम बघण्यासाठी आले आणि ते अजुनही सभागृहाचं काम बघण्यासाठी स्वत:चा एवढा

मौल्यवान वेळ देऊन आज इथे ते बसलेले आहेत. कारण तुमच्या ऑनलाईन जीबीने आम्हांला जे म्हणणं मांडायचं होतं ते आम्हांला मांडता येत नव्हतं म्हणुन आम्ही पक्षाच्या वतीने आम्ही मुख्यमंत्र्यांना, मा. अजितदादांना पत्र दिलं होतं की जसा कोविड कमी होतोय तशी सभागृहामध्ये, इलेक्शन आलेल सगळयांना स्वत:चं मत मांडण्यासाठी सभागृहामध्ये सभा हया ऑफलाईन आपण घ्यावी. तुमचे खुप मी आभार मानतो कारण पत्र आल्यानंतर ऍक्च्युअली गेल्या २० तारखेला व्हायला पाहिजे होती. खरं तुम्ही म्हटले की पत्रावर २० तारखेला सही झाली आणि हया २० तारखेला ऑफलाईन सभा घेतोय. विषय महिलांच्या सुरक्षिततेसाठी सुरुवात झाली. सर्वच भगिनींनी सर्वच माझ्या सहका-यांनी हया विषयावरती जी काय आपल्या शहरातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी सर्वांनीच माई आतापर्यंत चार-पाच तासामध्ये विषय आपल्या समोर मांडला. त्यामध्ये स्मार्ट सिटीच्या संदर्भामध्ये ज्या ज्या वेळी प्रत्येक म्हणजे सीमाताई असतील, इव्हन आपले सदस्य असतील राहुलदादा असतील, अजितदादा असतील, योगेशभाई असतील त्यांनी वारंवार सभागृहात ज्यांना अनुभव वाईट आला त्यांनी तो विषय आपल्या समोर सभागृहामध्ये काढण्याचा प्रयत्न केला. मी जवळ जवळ साधारण वर्ष होऊन गेल मेंबर होऊन स्मार्ट सिटीचा. जवळ जवळ ९ पत्र माई आयुक्त साहेब आपण आता आलात. या अगोदरच आपण ही पत्र स्मार्ट सिटीच्या संदर्भातील दिलेली आहेत. माई थोडसं जे काही घडलय ना थोडंसं वाईट वाटून घेऊ नका. जे घडलय ते लोकांना या साडेचार वर्षातला लोकांनी अनुभव घेऊन तो आपल्या समोर मांडलाय. प्रत्येकाच्या वॉर्डात जो अनुभव आला मग तो आला स्मार्टसिटीच्या खोदाईचा. सर्वांना त्या खोदाईच्या संदर्भामध्ये प्रत्येकाने म्हणजे जसं आमच्या माजी महापौरांनी पण सांगितलं. आम्ही चकाचक रोड केल्यानंतर सुध्दा आपण त्याच्यामध्ये स्थापत्य आणि स्मार्ट सिटीचा अजिबात कोणताही सुसंवाद नव्हता किंवा आमच्या जेईला स्मार्ट सिटीत कुठं खोदणार आहे हयाची कुठलीही कल्पना नव्हती. पाणीपुरवठयाला नव्हती. विद्युतला नव्हती की आपल्या इतर डिपार्टमेंटला कल्पना नव्हती. आणि हे थोडंसं बोलल्यानंतर वाईट वाटेल तुम्हांला. महापौर साहेब दोन भाग झाले शहराचे दोपाडी पासुन आमच्या भक्ती शक्तीपर्यंत. एक उजवी साइड वेगळया माणसाकडे डावी साईड वेगळया माणसाकडे. अक्षरश: वाटप झालं. कारण आम्ही हे काम करणारा पहिला शहरामध्ये जे रिलायन्सचे काम आलं ते आम्ही ९०००/- प्रति मीटर असे पैसे भरुन त्या कंपनीनी परमिशन घेतली.माई मी तर म्हणेन तो बीचारा व्यक्ती त्या भोसरीमध्ये एक आपले एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर प्रेशरपाई एक्सपायर झाले. त्यांच नाव आहे जीवन गायकवाड. माई without permission ४० ते ६० किमी माई काम झालय कारण माई त्या क्षेत्रात मी पण काम करतो. सीमाताई सगळयांना माहिती आहे त्या कामातलं मला पण नॉलेज आहे. आता हया सर्व मंडळींनी सांगितले की किती फुटावर ते पाईप आपलं डक्टींग पडलं पाहिजे. ५ फुट पाहिजे का ४ फुट पाहिजे या सर्वच गोष्टींची

जवळजवळ सर्व नगरसेवकांना ब-यापैकी माहिती झालेली आहे. मी तर म्हणेन मा.महापौर आणि आयुक्त साहेब त्या भागामध्ये मला वाटतं एकाने तुमच्याकडे तक्रार केली आहे की काहींच नेटवर्क जे ऑलरेडी टाकलेले आहे जवळ जवळ १५० किमी आहे त्याला आम्ही ते नेटवर्क शोधून देतो म्हणुन सीमाताई एकानं पत्र पण दिलय. आयुक्त साहेब ती लोकं तुम्हांला भेटली पण म्हणजे हयाचा अर्थ माई हयाच्यामध्ये किती मोठया प्रकारचा भ्रष्टाचार झालाय आणि आपल्या शहरातील नागरीकांच्या पैशाची जी लूट झाली ती तुम्हांला आजही साडेचार वर्षामध्ये हे जेवढे नगरसेवक बोललेत त्याच्या माध्यमामध्ये प्रत्येकाला त्या गोष्टीचा अनुभव आलाय त्यामुळे म्हणुन बोलतोय त्यामुळे माई वाईट वाटुन घ्यायचं थोडसं तुम्ही आज इतके पेशन्स ठेवले सभागृह चालवताय तुम्ही माई. सर्वांना बोलायला संधी पण देताय त्यामुळे  माई तुम्ही पण तुमचा थोडासा तोल ढळू देऊ नका. ठीक आहे. राहुलदादा थोडासा वेगळया पध्दतीने बोलतो ते तुम्हांला वेगळया पध्दतीने वाटतं. तुम्ही जस घेंता तसं त्यामुळ  त्याचं पण तुम्ही एवढ मनावर घेऊ नका. कारण तो पण सभागृहामध्ये जी घटना घडली ती सातत्याने मांडण्याचा प्रयत्न करत असतो. आज तुम्ही पाहताय की सर्वात महत्वाचं की आज आपल्या सत्ताधारी पक्षातील लोकांनी जो त्यांना साडेचार वर्षामध्ये अनुभव आला त्या अनुभवामधुन प्रत्येकाने आपली व्यथा मांडली. मगाशी सांगितलं गेलं की जी स्मार्ट सिटी झाली ना ती कशी पळवण्यात आली. मला वाटतं संदीप वाघेरेंनी त्याचा खुलासा केला. हयाच्या मध्ये पोमण साहेब हे पूर्ण दोषी आहेत. हे सर्व पोमण साहेबांनी त्या काळात केलं होतं. कारण वाकड आणि ते जोडायचा प्रयत्न केला कारण त्यांना  तिकडं न्यायचं होतं. ठीक आहे त्यांची सत्ता होती. खरं माझ्या प्रभागात पण भारतीय जनता पार्टीचे दोन सहकारी होते ना त्यांच्यावर पण अन्याय झाला ना. म्हणजे स्वत:च्या हितासाठी त्यांनी पक्षातल्या नगरसेवकांचा सुध्दा विचार केला नाही. त्यांनी तो स्वत:च्या हयाच्या मध्ये  घेण्यासाठी स्मार्ट सिटी तिकडे घेऊन गेले ठीक आहे. आम्ही तुम्हांला परवा बोललो अर्बन डेव्हलपमेंटचे रोड झालेत, माझ्या वॉर्डात झाला, मोरेश्वरभाऊंच्या वॉर्डात झाला साहेब आम्ही वारंवार तुम्हाला सांगतोय की त्या एवढया मोठया फुटपाथवर आज अतिक्रमाणाची दुकानं झाली आहेत. गुरुद्वाराचा रोड पाहा तिथं महापौर साहेब पूर्ण तो फुटपाथ पादचा-यांना चालण्यासाटी होता. आपण स्मार्ट म्हणुन तो कशासाठी लोकांना केला होता आणि त्याचा उपयोग कोण करतय म्हणजे त्या वेळी हर्डीकर साहेब होते. हर्डीकर साहेबांनी त्यावेळेस आम्हांला सांगितलं होतं की आम्ही याच्यावर स्क्वॉड ठेवणार आहे जसं तुमचा रोड कंम्प्लीट होईल तसा तुम्हांला फुटपाथवर एकही मनुष्य दिसणार नाही हातगाडी घेऊन. साहेब काय झालं  त्याचं. साहेब आज वर्ष होऊन गेलं तरी त्याच्यावर रोज एक एक दुकान थाटतय साहेब. दुसरी गोष्ट स्मार्ट सिटीतलं ते काम झालं साहेब, हर्डीकर साहेबांना आम्ही त्यांना सांगितलं होतं कारण जिथं क्रॉसींग असतं तिथे जी आय पाईप टाकला जातो. महापौर साहेब मी त्या वेळी त्यांना सांगितलं होत की तक्रार केल्या होत्या हयाच्यामध्ये भालकर साहेबांना पण ती तक्रार माहिती आहे की इथे जी आय पाईप टाकलेला नाही. साहेब ते काम करत असताना

कोणालाच त्या कामातला, कोणतीही लेव्हल काय, काय पाइप टाकला पाहिजे जी आय पाई टाकला महापौर कोणालाच माहिती नव्हतं. ते सांगितलं ना ७५० किमी दाखवलं ५५० किमी काम झालय. आज मला सांगा तुम्ही स्मार्ट सिटींच काम डंपिंग करुन झालय त्याचा जनतेला युज आहे का हो. आज कनेक्टीव्हीटी पूर्ण झाली का, अजिबात नाही. तुम्ही जे काही साडेचार वर्ष काम करताय ना त्याची कनेक्टिव्हिटी अजुन पूर्ण नाही माई. त्याचा उपयोग हा शहरातील नागरीकांना अजुनही झालेला नाही. त्यामुळे ही जी काय तुम्ही कामं केलेली आहेत महापौर माझी विनंती आहे तुम्हांला हयाची चौकशी ही झालीच पाहिजे. आम्ही पण आमच्या नेते मंडळींना, मा. मुख्यमंत्र्यांना निवेदन दिलयं. मला वाटतं काही ८-१० दिवसामध्ये सुध्दा पत्र येऊ शकतं चौकशीचं त्सामुळे त्याची चौकशी ही लवकरात लवकर लागेल त्याला दुमत नाही. दुसरी गोष्ट जर बोलायची झाली तर आज सत्ताधा-यांमधलेच नगरसेवक पहा माई म्हणजे नगरसेवकांना त्यांच्या वॉर्डात काम करतात स्मार्ट सिटीतलं त्यांना कल्पना पण नाही, त्यांना अंदाज नाही. तो बिचारा फुटपाथचं टेंडर काढतोय, रोडचं काढतोय. ड्रेनेजचं काढतोय, काम कम्पलीट झालं त्याच्यानंतर परत खोदाईच काम येतय. आयुक्त साहेब तुम्ही ना जेवढं ६०० किमी काम झालय तेवढया किमी चे एस्क्लेशन हे त्या एजन्सीचे काम होतं. आयुक्त साहेब माझी तुम्हांला विनंती आहे त्याच किमी वर महापालिकेच्या स्थापत्य मार्फत किती काम झालय याचीही चौकशी करा म्हणजे दोन्ही बाजुनी आता मगाशी जसे बोलले तसं दोन्ही बाजूना खर्च आपला, ही मा. महापौर लुट झालेली आहे कारण त्यांचं काम होतं ते. त्यांनी करुन द्यायचं होतं. तर आयुक्त साहेब ते काम त्यांनी केलेलं नव्हतं. ते काम पुन्हा आपल्याकडं आमच्या प्रभागात खोदलय त्याच्यावर डांबर पडलं नाही. आम्ही आमच्या जेईला सांगायचो. आम्ही आमच्या एक्झिक्युटीव्हला सांगायचो. प्रत्येक नगरसेवक सांगायचा की त्याच्यावर पटकन डांबर टाका. मग त्या प्रेशरपोटी स्थापत्यानी जे दुसरीकडचं काम काढलं होतं ते स्मार्ट सिटीच्या खोदाईच्या कामावर आयुक्त साहेब पुन्हा त्याच्यावर हे आपल्या माध्यमातुन झालेलं आहे. तुम्ही हयाची नक्की चौकशी करावी अशी माझी तुम्हांला विनंती आहे आणि मगाशी सीमाताईंनी जो काही आज आपण महिलांच्या बाबतीमध्ये माई तुम्ही निषेध केला किंवा आदेश दिलाय तर ही अशी घटना या महापालिकेत आज ज्या गोष्टीसाठी आपण जो विषय घेऊन समोर आलो होतो पण लगेच अशी घटना घडते तरी ही नक्कीच चुकीची घटना आहे. माई हयाच्या बाबतीत पण तुम्ही विचार करावा आणि आम्ही राष्ट्रवादी पक्षातर्फे अशा पध्दतीचा आम्ही ज्यांनी कोणी हे कृत्य केलय आम्ही पण निषेध करतोय. जाहीर निषेध करतो कारण की अशी घटना एका बहिणीच्या बाबतीत सभागृहात अशी एखादी महिला बोलत असताना लगेचच अशी घटना घडणं ही चुकीची गोष्ट आहे याबाबत माई गांभीर्यांने विचार करावा. दुसरी गोष्ट साहेब आज जे काही पेपरमधुन वाचलय माई आम्ही माध्यमाच्या कडून वाचलय ऐकायला मिळालं आज भाजपच्या एका नगरसेवकांनी दोन्ही आमदारांवर आरोप केले. त्यांनी पार म्हणजे मुख्यमंत्र्यांना पत्र दिलयच आहे त्यांनी त्यांच्या मोठया नेत्यांना तीथपर्यंत मला वाटतं विरोधी पक्षनेता श्री.

फडणवीस साहेबांना पण पत्र दिलयं आणि मला वाटतं शहा साहेबांपर्यंत पत्र पोहोचवलय. तरी माझी विनंती आयुक्त साहेब मा. महापौर साहेब की हयामध्ये नक्कीच काहीतरी गडबड दिसते आणि मोठा घोटाळा काहीतरी दिसतोय. त्या मुळे महापौर साहेब माझी विनंती आहे माझी विनंती आहे माझी विनंती आहे जर त्यामध्ये मला बोलायचा अधिकार आहे तो मी बोलणार.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर – जाधव साहेब बोलतात ते बरोबर आहे. जे पक्षाचे बोलतात ते आम्ही आमचं बघुन घेऊ. राजू आम्ही आमचा कारभार बघु. जो विषय आहे विकासाच्या बाबतीत बोला. बाकीच वैयक्तिक कोणाला बोलू नका तुम्ही बसा. आम्ही आमच पाहून घेऊ काय आरोप आहेत केले ते.

( सभागृहात गोंधळ)

मा.नामदेव ढाके – मा. महापौर, मा. आयुक्त साहेब पत्रकार बंधु खरं म्हणजे गेल्या पाच तासापासुन आपण सर्व सन्मा. सदस्यांनी भुमिका या ठिकाणी मांडण्याचं त्यांना स्वातंत्र्य दिलं. सगळयांनी आपली भुमिका हया ठिकाणी मांडली. सन्मा. महापौर या संदर्भामध्ये वेगवेगळया नगरसेवकांच्या वेगवेगळया भुमिका या ठिकाणी होत्या. परंतु आमच्या ज्या महिला सदस्यांनी सुरुवातीलाच याठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न मांडला आणि तो घेऊन खरं म्हणजे महिलांच्या सुरक्षिततेच्या बद्दल ज्या ज्या गोष्टी आपल्याला महानगरपालिका म्हणुन करायच्या त्या संदर्भात आयुक्तांकडून आपण त्या ठिकाणी खुलासा केला आणि त्यातुन हा विषय या ठिकाणी आला. स्मार्ट सिटीच्या संदर्भात अजित गव्हाणेंनी हया ठिकाणी भूमिका मांडली. खरं म्हणजे मी सर्व सभागृहाला विनंती करणार आहे की स्मार्ट सिटीच्या संदर्भामध्ये खरं म्हणजे स्मार्ट सिटीचा ज्या वेळेला पिंपरी चिंचवड शहराचा समावेश स्मार्टसिटीमध्ये झाला आपल्या देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रभाई मोदी यांच्या माध्यमामधुन १०० शहरांची निवड केली. यामध्ये पिंपरी चिंचवड शहराचा समावेश झाला आणि खरं म्हणजे पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी याकडे वाटचाल करीत असताना स्मार्ट सिटीच्या मध्ये सन्मा. महापौर आपण सुध्दा त्यामध्ये संचालक आहेत, मी स्वत: संचालक आहे, स्थायी समिती सभापती संचालक आहेत, विरोधी पक्षनेता, शिवसेनेचा एक नगरसेवक त्यामध्ये संचालक आहे, मनसेचे गटनेते संचालक आहेत. बरोबरीनं हयात स्मार्ट सिटीचे जे अध्यक्ष आहेत ते आपल्या महाराष्ट्र शासनाचे सचिव आहेत. सचिव म्हणजे डॉ. नितीन करीर साहेब या स्मार्ट सिटीचे अध्यक्ष आहेत. विभागीय आयुक्त सुध्दा त्यावरती संचालक आहेत, जिल्हाधिकारी संचालक आहेत, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड ते संचालक आहेत, कार्यकारी अधिकारी म्हणुन आपले महापालिकेचे आयुक्त त्या ठिकाणी आहेत, पीएमपीएमएल सीईओ त्या ठिकाणी संचालक आहेत. आणि केंद्र सरकारच्या उपसचिव लेव्हलच्या अधिकारी आपल्या स्मार्ट सिटीसाठी त्यांची नियुक्ती केलेली आहे आणि एवढया मोठया प्रमाणामध्ये हया ठिकाणी जवळपास ६ आयएएस अधिकारी हया स्मार्ट

सिटीला नियुक्त केलेले आहेत. केंद्र शासनाचा प्रतिनिधी हयावरती नियुक्त केलेला आहे. आपण स्मार्ट सिटीमध्ये किती निधी केंद्राचा आहे, किती निधी राज्याचा आहे, किती निधी आपण या ठिकाणी करतोय, कोणती कामं कुठली काढलेली आहेत, कामाची कुठपर्यंत कामं आलेली आहे या संदर्भामध्ये प्रत्येक जण बीओडी त्या त्या ठिकाणी होत असते जस स्टँडींगचा अजेंडा येत असतो तसा बीओडी मध्ये अजेंडा येतो आणि त्या अजेंडयावरती येणा-या विषयावरती संपूर्ण त्या ठिकाणी चर्चा होते. अध्यक्ष त्याला ऍप्रुव्हल करतात आणि मग तो विषय त्या ठिकाणी पुढे जातो. कारण मा. महापौर या ठिकाणी स्मार्ट सिटीच्या घोटाळयाच्या संदर्भामध्ये सांगितलं मी या ठिकाणी सन्मा. महापौर आपल्याला विनंती करणार आहे की जे काय आहे स्मार्ट सिटीच्या संदर्भामध्ये या ठिकाणी तांत्रिक मान्यता न घेतल्यामुळे २५० कोटीची कामे या ठिकाणी काढल्याचा आरोप या ठिकाणी केला गेलेला आहे. सन्मा. महापौर पण ज्या वेळेला ही कामे काढली गेली त्या सल्लागारांच्या अनेक अटी व शर्ती काय होत्या त्यानूसार इतर महानगरपालिकेच्या जशा पॅनसिटी आणि एबीडी ऐरीया असतो तशा पध्दतीने टेंडर प्रक्रिया राबविली जाते. त्याला कुठल्या प्रकारच्या अटी आणि शर्ती त्या ठिकाणी मागवल्या जातात. इतर शहरांमध्ये स्मार्ट सिटी मध्ये जशी कामे केली जातात तशी आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये त्याच धर्तीवरती या ठिकाणी टेंडर काढलय का काय या संदर्भामध्ये आणि संपूर्ण स्मार्ट सिटीच्या संदर्भामध्ये मागच्या बीओडीला सर्व संचालक मंडळाने त्या ठिकाणी आपल्या आयुक्त साहेबांना विनंती केली होती की ही कामे लवकरात लवकर पूर्ण झाली पाहीजेत आणि म्हणुन आपण त्या ठिकाणी स्मार्ट सिटीमध्ये ज्या वेळेला संपूर्ण कामाचा आढावा घेतला होता त्या वेळेला किती कामं हया ठिकाणी स्मार्ट सिटीच्या माध्यमातुन पूर्ण केली जाणार आहेत. पुढचं महानगरपालिका हे पेपरलेस कशा पध्दतीनं केलं जाणार आहे. अशा पध्दतीचं आणि सुरक्षिततेच्या माध्यमातुन या ठिकाणी कमांड कंट्रोल सेंटरची निर्मीती या ठिकाणी केलीं जाणार आहे. शहरामध्ये कॅमेरे लावले जाणार आहेत. पेपरलेस कारभार हया ठिकाणी स्मार्ट सिटीच्या माध्यमातुन जे प्रोजेक्ट आपण हया ठिकाणी चालू केलेले आहेत त्या माध्यमातुन या ठिकाणी होणार आहेत आणि म्हणुन सन्मा. महापौर यावरती आपण ज्या संदर्भामध्ये जी जी कामे हया ठिकाणी स्मार्ट सिटी मध्ये समाविष्ट केलेली आहेत त्यामध्ये कुठली काम किती परसेंटमध्ये त्या ठिकाणी झालेली आहेत आणि किती दिवसात ती पूर्ण होणार आहेत त्याचा आढावा आपण स्मार्ट सिटीमध्ये घेतलेला आहे. इतर शहरांच्या स्मार्ट सिटीच्या तुलनेमध्ये आपल्याला केंद्र सरकारची आणि राज्याचे जे सचिव आहेत करीर साहेब त्यांनी सुध्दा सांगितलं की इतर शहरांच्या तुलनेत मोठया प्रमाणात आपल्या स्मार्ट सिटीची कामे हया ठिकाणी झालेली आहेत आणि अशा प्रकारची आपल्या शहरामध्ये कामाची स्पीड असताना कामे चांगली होत असताना जर कुठला एखादा आरएफटीच्या माध्यमातुन जर इतर स्मार्ट सिटीच्या तुलनेमध्ये पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीच्या अधिका-यांनी जर वेगळया काही पध्दतीने जर काही केलं असेल तर मला वाटतं त्या अधिका-यांना सुध्दा जाब विचारला पाहिजे त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे आणि म्हणुन सन्मा. महापौर या संदर्भामध्ये मी प्रथमत:

आपल्याला विनंती करतो की जो काय या ठिकाणी स्मार्ट सिटीच्या संदर्भामध्ये गेल्या ४–५ तासापासुन या ठिकाणी उल्लेख केला जातोय त्या स्मार्ट सिटीच्या कामांची पूर्णपणे माहिती हया सभागृहाला देण तसेच हया स्मार्ट सिटीच्या कामाच्या माध्यमातुन तांत्रिक २५० कोटीचे का टेक्निकल सँक्शन का घेतली गेली नाही खरं म्हणजे टेक्निकल सँक्शनची या ठिकाणी आवश्ययकता आहे का इतर महानगरपालिकांमध्ये टेंडर जे काढलय पॅनसिटी म्हणुन त्या ठिकाणी काय काय अटी शर्ती वापरल्या आहेत याचा पूर्णपणे खुलासा हया ठि काणी सन्मा. महापौर आयुक्तांच्या मार्फत या ठिकाणी सभागृहाला करावा असं मी या ठिकाणी वाटते. कारण स्मार्ट सिटीकडे ज्यावेळेला आपण वाटचाल करतोय त्या वेळेला स्मार्ट सिटीला पुढच्या २५-३० वर्षाचा विचार या शहराचा आपण घेऊन जातोय. पिंपरी चिंचवड शहर हे स्मार्ट सिटीच्या माध्यमातुन जात असताना पेपरलेस कारभार करण्याच्या हया माध्यमातुन स्मार्ट सिटी काम करतय आणि मला अभिमानाने सांगावस वाटतं की या ठिकाणी नवीन आयुक्त आल्याच्यानंतर त्यांनी सातत्याने या संदर्भामध्ये आयुक्त सो असतील, सी.पी. साहेब असतील त्यांनी सातत्याने कमांड कंट्रोल सेंटर लवकरात लवकर चालू झाले पाहिजे. या ठिकाणी डक्टीनच्या माध्यमातून, एल अँड टी च्या माध्यमातुन ती कामे पूर्ण झाली पाहिजेत. एकमेकांच्या रिलेशन्समध्ये असणारी ही कामं असल्यामुळे त्या मागे लागून फायदा नाही. एके ठिकाणी केबल टाकल्या गेल्या पाहिजेत डक्ट तयार झाले पाहिजेत, लिंक तयार झाली पाहिजे. अशा प्रकारची भूमिका हया ठिकाणी आपण बीओडीच्या माध्यमातुन सविस्तर रित्या त्या ठिकाणी चर्चा करतो आणि या शहराला सुरक्षित ठेवण्याच्या माध्यमातुन या शहराला शाळेच्या विद्यार्थ्यांना इ-क्लासरुम तयार करण्याच्या माध्यमातुन अनेक वेगवेगळे उपक्रम या स्मार्ट सिटीच्या माध्यमातुन ज्या वेळेला आपण बीओडी च्या मिटींगमध्ये घेतो त्यामध्ये सहा सहा आयएएस अधिकारी त्या मिटींगला असताना मला वाटतं तरीही अशा प्रकारचे चुकीचे काम होऊन आणि त्याच खापर राजकीय दृष्टया जर कोणी या ठिकाणी आमच्यावर फोडण्याचा प्रयत्न करत असेल तर सन्मा. महापौर या संदर्भामध्ये या पूर्णपणे या प्रोजेक्टची माहिती आणि विशेष करुन तांत्रिक मान्यता २५० कोटीची एल अँड टी ला काम मिळालेले आहे. इतर महानगरपालिकेच्या स्मार्ट सिटीमध्ये कुठल्या पध्दतीने कामं दिली जातात आपल्या महानगरपालिकेला सुध्दा त्याच पध्दतीने कामं दिली का अशा प्रकारचा खुलासा सविस्तर प्रोजेक्टचा आपण करायला सांगावा म्हणजे मी सन्मा. महापौर आपल्याला या ठिकाणी विनंती करतो. खरं म्हणजे सन्मा. महापौर या ठिकाणी अनेक आपल्या सदस्यांनी आज मघाशी राहुलदादांनी सांगितलं विकास डोळस आमचे नगरसेवक त्यांनी सांगितले की आज खरं म्हणजे जो स्मार्ट सिटीच्या संदर्भामध्ये आज स्मार्टपणा आमच्या याठिकाणी असणा-या नगरसेवकांनी दाखवला आणि निरीक्षकांच्या समोर या ठिकाणी आपलं मेरीट दाखवण्याचा प्रयत्न या ठिकाणी केलां. खरे म्हणजे चांगल त्यांच कौतुक हया ठिकाणी सभागृहामध्ये मी सुध्दा या ठिकाणी करतो की आपल्या निरीक्षकांच्या समोर खासदार डॉ. अमोलजी कोल्हे साहेब या ठिकाणी आलेले आहेत आणि त्यांच्यासमोर आपला हया ठिकाणी परफॉरमन्स दाखवण्याचा या ठिकाणी केविलवाणा प्रकार या ठिकाणी झालेला दिसतोय. मी खरं म्हणजे या ठिकाणी

आव्हान करीन की साडेचार वर्षामध्ये ज्या वेळेस स्मार्ट सिटीची स्थापना झाली आणि एल अँड टी चे टेंडर काढल गेलं २०१७-१८ च्या कालावधीमध्ये तेव्हा पासुन त्या वेळेला टेंडर काढून आपण गप्प का बसलो होतो. रस्त्यावर का उतरलो नाही. अपण त्या संदर्भामध्ये भूमिका का त्या ठिकाणी सभागृहामध्ये का वारंवार मांडली नाही. परंतु या ठिकाणी सन्मा. महापौर आता येऊ घातलेल्या २०२२ च्या निवडणुका लक्षात घेता या ठिकाणी आपण आता स्वत: काहीतरी अस्तित्व दाखवण्याचा आटापीटा हया ठिकाणी करण्यात आलेला दिसतोय. सन्मा. महापौर मी कोणाच नाव घेतलेलं नाही. राहुलदादा या ठिकाणी मा. महापौर एका सन्मा. सदस्यांनी उल्लेख केला टेंडरच्या संदर्भामध्ये सन्मा. महापौर आम्ही हया ठिकाणी पैसे कमवण्यासाठी आलेलो नाहीत. जनतेने या ठिकाणी आमच्यावर विश्वास टाकलेला आहे. या ठिकाणी विश्वास टाकलेल्या फक्त जनतेला पात्र राहण्यासाठी आम्ही काम करतोय. ३०–३० वर्षासाठी कुठलं हॉस्पिटल आम्ही लीजवर घेतलेलं नाही. महानगरपालिकेमध्ये स्वच्छ चांगलं काम हया ठिकाणी जनतेच्या कमिटमेंटसाठी या ठिकाणी काम करतोय. आम्ही कुठल्याही मेहरबानीमध्ये या ठिकाणी काम करत नाही आणि चुकीच्या पध्दतीने आपली स्वत:ची जहागिरी प्यारी असल्यागत या ठिकाणच्या हॉस्पिटलमध्ये स्वत:च या ठिकाणी हॉस्पिटल तयार करायच. एका महानगरपालिकेच्या जागेमध्ये हॉटेल तयार करायच्या अशा प्रकारचे कृत्य करणारे हया ठिकाणचे नगरसेवक लोक आम्ही नक्कीच नाही. सन्मा. महापौर आणि म्हणुन कोणीही सांगावं ज्यांनी हे केलं त्यांनी बोलावं ज्यांना कुठलाही अधिकार नाही ज्यांनी महानगरपालिकेमध्ये आपलं स्वत:च फुकटच पुंगी वाजवाण्याचं काम याठिकाणी केल अशा प्रकारच्या सन्माननीयांच्या बद्दल या ठिकाणी बोलणं सन्मा. महापौर राहुल कलाटेंनी या ठिकाणी सांगितलं आजच्या विषयपत्रिकेवरती ६१ कोटी रुपयाच काम राहुल कलाटे आपल्या वॉर्डातील आणि कुठल्याही प्रकारे आम्ही विकासाला आडकाठी करत नाही. उलट आपल्या भागामध्ये असणा-या रस्त्यांना आपण त्या ठिकाणी अडवलेले आहे. रस्ते अडवतात त्यांना एवढया मोठया प्रमाणात निधी वाकडला दिलेला असताना सुध्दा आम्ही कुठलाही भेदभाव शहराच्या हितासाठी, नागरीकांच्यासाठी दुजाभाव केलेला नाही आणि म्हणुन सन्मा. महापौर आज ही वेळ आलेली आहे. म्हणुन आता साडेचार वर्ष गप्प बसायचं आणि निवडणूक जवळ आल्याच्यानंतर जसं या ठिकाणी आमच्या एका सहका-यांनी सांगितलं की "चला उठा उठा दिवाळी आली, मोती स्नानाची वेळ झाली" आणि मी शहराच्या समोर २०२२ च्या आमची त्या ठिकाणी वेळ आली पात्रता दाखवण्याची अशी परिस्थिती हया ठिकाणी झालेली आहे. सन्मा. महापौर आणि म्हणुन मी या ठिकाणी आमच्या हया भगिनींच्या या ठिकाणी ज्या भगिनींनी हया ठिकाणी खरं म्हणजे सीमाताईंनी हया ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख केला. महिलांच्या साठी पोटतिडीकीने त्या सर्व नगरसेविका भगिनी हया ठिकाणी बोलल्या आणि त्या संदर्भामध्ये जर कुठला पत्रकार कोणी जर अशा प्रकारचे वेगळया प्रकारचं खरं म्हणजे लोकशाहीमध्ये पत्रकारीता हा चौथा स्तंभ आहे आणि

चौथा स्तंभ असतानाही लोकशाहीमध्ये पत्रकारितेच्या संदर्भामध्ये जर अशा कुठल्याही वेगळया पध्दतीने आमच्या भगिनीकडे बघण्याचा जर कोणी प्रयत्न करीत असेल तर त्यांना हीन दर्जाची लिखाणाच्या माध्यमातुन करत असेल तर त्या ठिकाणी मी स्वत: पक्षनेता म्हणुन भारतीय जनता पार्टीकडून या ठिकाणी त्या पत्रकाराचा निषेध व्यक्त करतो. सन्मा. महापौर आणि नक्कीच महिलांचा आदर करणारे आम्ही सर्व नगरसेवक आहोत आणि म्हणुन ॲक्शनच्या बद्दल मा. महापौरांनी सांगितलय त्यामुळे सन्मा. महापौरांनी त्या संदर्भामध्ये सुध्दा निषेध केलेला आहे आणि हया ज्या काय गोष्टी या ठिकाणी आपण स्मार्ट सिटीच्या संदर्भामध्ये मला या सभागृहामध्ये आमच्या सन्माननीयांनी जो उल्लेख केला स्मार्ट सिटीच्या कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबद्दल बोललं खरं म्हणजे ज्या वेळेला स्मार्टसिटीचं एल अँड टीचं काम चालू झालं आता काम पूर्णत्वाला आलेले आहे आणि पुर्णत्वाला आल्यानंतर आम्ही त्या ठिकाणी जागे होतो आणि ६-६ आयएएस अधिकारी त्या स्मार्ट सिटीच्या संचालक पदावरती असताना ६ आयएएस अधिका-यांचे त्याच्याकडे लक्ष नाही आणि म्हणुन सन्मा. महापौर या संदर्भामध्ये स्मार्ट सिटीच्या कामाची माहिती स्मार्ट सिटीमध्ये जे की २५० कोटीचा टेक्निकल सँक्शन बाबत या ठिकाणी आरोप झालेलाय तो या ठिकाणी आरोप सिध्द होत असेल जो चुकीच काम करणारा अधिकारी असेल त्याच्यावर कारवाई सुध्दा झाली पाहिजे अशा प्रकारची भुमिका हया ठिकाणी करतोय. सन्मा. महापौर आणि या संदर्भामध्ये मी मगाशीच उल्लेख केला की स्मार्ट सिटीच्या संदर्भामध्ये जे काही कामं पूर्ण झालेली आहेत, काय काम होणार आहेत आणि आरएफपीच्या माध्यमातुन कुठलाही त्याच्यामध्ये बदल केलेला नाही आणि काय काय आपण अटी शर्तीच्या अधिन राहुन टेंडर काढलय सन्मा. सभागृहाला आता पूर्णपणे हया स्मार्ट सिटीच्या संदर्भात माहिती आपण आयुक्त साहेबांना सांगावी आणि सभागृहाला त्या संदर्भात अवगत कराव असं मी या ठिकाणी विनंती करतो आणि सन्मा. महापौर खरं म्हणजे या ठिकाणी विरोधी पक्षनेते यांनी उल्लेख केला की ऑनलाईन सभा विरोधी पक्षनेता यांना मी सांगतो की महाराष्ट्र शासन हे आपलं होतं आणि शासनाने ऑनलाईन सभा घेण्याचे निर्देश या ठिकाणी सर्व महाराष्ट्राच्या पालिका, नगरपरिषदांना/नगरपालीकांना दिलेले होते त्यामुळे ज्या वेळेला इतर शहरामध्ये सभा ऑनलाईन होत्या त्यावेळेला सुध्दा पिंपरी चिंचवड महानगरपालिका म्हणुन आपण ऑफलाईन सभा घेतलेल्या होत्या. पण शासनाचे पत्र आल्यामुळे आपण त्या ऑनलाईन घेतल्या आणि तातडीने पत्र ज्या वेळेला पुनर्वसन खात्याचे पत्र आल्याच्यानंतर आपण ही सभा ऑफलाईन घेतली आहे आणि जे काय या ठिकाणी मांडणार आहोत किंवा बोलणार आहोत ते प्रामाणिकपणे बोलणारे कार्यकर्ते आहोत. आपण सांगितले की आपल्या काळामध्ये खोदाईच्या संदर्भात खरं म्हणजे वेळ झालाय सन्मा. महापौर साहेब परंतु खोदाईच्या संदर्भात ज्या वेळेला हर्डीकर साहेब ज्या वेळेला हया शहरामध्ये आयुक्त म्हणुन आले त्या अगोदर जे खोदाई केलेलं रिलायन्सचे काम असेल इतर कंपन्यांचे काम असेल त्या माध्यमातुन किती रॉयल्टी आपण आणली आणि पाच वर्षातली आम्ही हया महानगरपालिकेला खोदकामात हयाच्या माध्यमातुन वेगवेगळया कंपन्या असतील खाजगी कंपन्या असतील कॉंट्रॅक्टर असतील त्यांच्या माध्यमातुन किती रॉयल्टी आणली होवून जावुदेत हिशोब किती आहे तो मागच्या दहा वर्षाचा आणि पाच वर्षात किती पैसे या महानगरपालिकेत आणले ते आकडे याठिकाणी सांगणार आहे आणि म्हणुन

सन्मा. महापौर या ठिकाणी  हे चुकीच्या पध्दतीने हया ठिकाणी दिशाभूल करण्याचं काम सभागृहात केलं जातय म्हणुन मी त्यांना आव्हान करतो की आपण मागच्या काळामध्ये खोदाईसाठी किती पैसे हया रॉयल्टीच्या माध्यमातुन घेतले आणि पाच वर्षामध्ये आम्ही किती या ठिकाणी महानगरपालिकेला उत्पन्न मिळवून दिले अशा संदर्भातल खुल आवाहन याठिकाणी मी विरोधकांना देतो आणि सन्मा. महापौर आपण आयुक्तांना सूचना करावी की स्मार्ट सिटीच्या संदर्भामध्ये स्मार्ट सिटीच्या कामांच्या आणि २५०च तांत्रीक जे काही सँक्शन असेल त्या संदर्भातील सविस्तर खुलासा या ठिकाणी सांगावा अशी मी या ठिकाणी विनंती करतो, धन्यवाद.

मा.महापौर– सभागृहाच्या वतीनं त्याचप्रमाणे शिरुर लोकसभेचे खासदार आपल्या सभेचं कामकाज पाहण्यासाठी खास आलेले आहेत. डॉ. अमोलजी कोल्हें साहेब त्यांच्या साक्षीनं काय चाललय आपण पाहताय. सभागृहाचा जे काही ऑनलाईन मिटींगमध्ये ब-याचशा इच्छा या अपु-या राहिलेल्या होत्या विरोधक म्हणल की विरोधकासारख बोलणार, सत्ताधारी म्हणले की त्यांच्यासारखे बोलणार हे आपल्याला नवीन नाही आज २७-२८ वर्षे झाली आम्ही पाहतो. ज्यांनी त्यांनी आपआपल्या पध्दतीने प्रश्न सभागृहामध्ये मांडलेले आहेत खरं तर मुख्य प्रश्न आमच्या सुजाताताई पालांडे यांनी मांडला. आयुक्त साहेब मी आपल्याला कडक शब्दात आदेश देते की सी. पी. साहेब यांचे समवेत दोन दिवसात मिटींग घेऊन आपल्या तीथ महिला पोलीस चौकी तांबडतोब करावी नंतर पोलीस स्टेशन बांधाव. ज्या नगरसेवकांनी कामाचा आढावा घेतलाय काही कारणासाठी जर गेली दीड पावणेदोन वर्ष अमोल साहेब आपण आज आठ दिवसाला विधान भवनात मिटींगही घेत होतो आणि त्यामध्ये जो अहवाल कोरोनाचा आपण ऐकत होतो की परिस्थिती आपण पालकमंत्र्यांचे समवेत जे काही आपल्याला आदेश होते त्या पध्दतीने काम करीत, काही कामं ही रेंगाळली गेली आणि त्याला उशीर झाला, आपोआपच त्यामध्ये थोडफार कमी जास्त असू शकत. तर आयुक्त साहेब आपल्याला सांगू इच्छिते की ज्या कामांचा अभाव झाल, जी काम अपूरी झालेली आहेत, कामगार नव्हते पळून गेले होते आणि त्यामध्ये आपल्याला उशीर झालेला आहे तर त्या कामांचा स्पीड हा वाढवण्यात यावा बाकीचे काही मला माहित नाही, सगळे नगरसेवक माझेच आहेत, मी सर्वपक्षीय महापौर आहे. त्यामुळे मी सांगते आपल्या सगळयांचा कामांचा स्पीड कसा वाढेल या कडे लक्ष द्यावे. आयटीआयचा प्रश्न हया ठिकाणी आपल्या समोर आला होता की आयटीआय मध्ये शिवछत्रपती जयंती साजरी झाली नाही काय नेमका प्रश्न उभा केलेला आहे, काय नेमकी परिस्थिती आहे. आयटीआय मध्ये आयुक्त साहेब आपली व्हिजिट होती का कारण मुंढेताईंनी मला सांगितलं की आम्ही किती  दिवस झाले आपली व्हिजिट मागतोय तरी एवढं काय तुम्ही काम करताय की तुम्हांला त्यांच्या वॉर्डामध्ये जायला वेळ नाही का मुद्दाम टाळता हे पण आम्हांला उत्तर पाहिजे. माऊलींनी बरेचसे प्रश्न सभागृहात मांडलेले आहेत आणि अतिशय पोटतिडीकीने ते प्रश्न मांडलेले आहेत. माऊली आपल जे पत्र आहे ते आमच्या समोर तुम्ही द्यावे. नीता ताई पाडाळेंनी जे प्रश्न मांडलेत ते अतिशय त्या कळकळीने मांडत होत्या की अधिकारी त्या ठिकाणी म्हणात कमिशनरला सांगा हा काय प्रकार आहे, हा प्रकार काय आहे, आयुक्त साहेब तुम्ही काय बॉसिंग

करता का कामे करु नका म्हणून. आतून एक सांगता वरुन एक सांगता नेमकं काय चाललय कामं करायची असतीलतर पिंपरी चिंचवड मध्ये सर्वानी थांबावं नाही तर होते तिथे परत जावे. अधिकारी पवार साहेबांना अशा पध्दतीने या सभागृहामध्ये मला काही आदेश द्यावे लागले आणि त्याचा अहवाल हा आपल्यासमोर मांडीन अशा पध्दतीचं आश्वासन हर्डीकर साहेबांनी आपल्याला दिलं होत तो अहवाल आजही दिलेला नाही. तो पुढच्या मिटींगला अहवाल आमच्या ममोर मांडण्यात यावा अशी मी आयुक्तांना विनंती करते. त्याचप्रमाणे आमच्या बुर्डे ताईंनी जे कॅमेराबद्दल सांगितलं की महिलांची सुरक्षा ही नाहीच आहे, १०० टक्के नाहीच हे मी सुध्दा हया ठिकाणी महिला महापौर म्हणून मान्य करते की हया शहरामध्ये कोविड येऊन गेला तेव्हापासुन अतिशय अन्याय अत्याचार महीलांच्यावर पूर्ण महाराष्ट्रात, पूर्ण शहरामध्ये चाललेला आहे. त्यातच्या त्यात महापालिकेच्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये जास्त प्रमाण आहे. मग आयुक्तालय याठिकाणी ओपन करुन उपयोग काय ती जागा महीला पोलीस आयुक्तालयाला दिली तर मला वाटतं खुप बरे होईल कारण आयुक्त सी.पी. साहेब यांना जे काय काम करायचं होतं ते त्यांच्या पध्दतीने त्यांनी केलेलं नाही मी त्यांच्यावर नाराज आहे. ती जागा माझ्या महिला पोलीस आयुक्तालयाला दिली तर त्या चांगल्या प्रकारे काम करतील. आयुक्त साहेब आपण चर्चा करावी आणि त्याप्रमाणे कार्यवाही करावी आणि आपण लवकरात लवकर दोन दिवसात मिटींग घ्यावी आणि कडक शब्दामध्ये सी.पी. साहेबांना विचाराव. शहरातील युवतींना मग आपल्या मनपाच्या शाळेतील असतील किंवा इतर काही असतील मी आपल्याला सांगितलं की महिलांचं स्वत:चं संरक्षण कस करता येईल अशा प्रकारचे प्रशिक्षण हे शहरभर महिलांना, युवतींना दिलं गेलं पाहिजे आणि ते लवकरात लवकर चालू करावे की जे आता सभागृहात म्हणत होते की जे बोलले जाते ते कागदावर राहतं. आजचा जर हा विषय कागदावर राहिला तर ती शिक्षा कोणाला करायची हे आपण आता सांगावे. लवकरात लवकर माझ्या महिलांना युवतींना स्वत:चे संरक्षणासाठी जे काही प्रशिक्षण आहे, कराटे असेल, दांडपट्टा असेल, तलवारबाजी असेल ती सर्व प्रशिक्षणं त्यांना देण्यात यावीत. त्याच बरोबर स्मार्ट सिटीचे सह शहर अभियता श्री. भालकर साहेब आहेत त्यांनी आम्हांला माहिती सांगावी की हा सर्व कारभार काय आहे कशा पध्दतीचे आरोप झालेत आणि तुम्ही अधिका-यांनी चुका करायच्या आणि एखाद्या चांगल्या व्यक्तीला आपण दोषी करायच हे पूर्णपणे अधिका-यांच्या बाबतीत आयुक्त साहेब चुकीचे आहे. भयंकर चुकीचे आहे. तुम्ही जर अधिका-यांना पाठीशी घालत असाल कोणत्या एका बाजूने तुम्ही जर राहत असाल तर अधिकारी महणुन आम्हांला म्हणायचा अधिकार नाही. आपण लवकरात लवकर हयाकडे लक्ष द्यावे. स्मार्ट सिटीमध्ये जे जे अधिकारी काम करतात त्यांना समज देणे आणि कामांची पुर्तता करुन करण्यासाठी लवकरात लवकर जी काय चुकीची कामे केलीत ती स्वत:च्या खर्चातुन करुन त्यांच्याकडून घ्यावी असा आदेश मी आपल्याला देते. अशा पध्दतीचे कामकाज आज या ठिकाणी झालेले आहे आणि वैशालीताईंनी जो काही प्रश्न मांडलेला आहे त्याबाबत लवकरात लवकर वैशालीताई समवेत घेऊन कोविड योध्दयांचा प्रश्न आहे तो आपण मिटींग घेऊन तो सोडवण्यात यावा. स्मार्ट सिटीच्या

माध्यमातुन ज्या कामांचे बद्दल आरोप प्रत्यारोप या ठिकाणी झालेत त्याबाबतची माहिती त्याची उत्तरं द्यावीत की प्रत्येक वेळेला स्मार्ट सिटी, स्मार्ट सिटी, स्मार्ट सिटी हे चाललय का. मुळात म्हणजे आयुक्त तुमची बॉसिंग तुमच्या अधिका-यांवर नाही. तुमची लोक तुम्हांला सांभाळता येत नाही आणि ते आमच्या सारख्याला हे करणार. आम्ही पब्लिक आहोत आम्ही काम करण्यासाठी आहोत ती कामं कशा पध्दतीने करायची निविदा कितीची आहे कागदावर कितीची आहे तोंडी कितीची आहे. लेखी कितीची आहे कितीने बिलो आहे कितीने अबोव्ह आहे हे आम्हांला काही येत नाही. माझ्या सारखीला येत नाही. सीमाताईंना येतय. मी तर सांगू शकते त्या पध्दतीचं एखादे टेंडर येत असेल तर त्याच्याकड पूर्ण पणे तुम्ही अभ्यास केला पाहिजे आणि तुमच्या मागे जे अधिकारी लपतात अशा अधिका-यांना, आता आरोग्याची परिस्थिती काय आहे. जाता येता येत नाही पूर्ण रस्त्याने कचरा, गवत. पाऊस येऊन गेलाय तरी तुमचे अधिकारी कोण संबंधित आहेत त्यांना निलंबित करण्यात याव, त्यांना काम जमत नाही. दुसरा कोण असेल त्यांना काम द्यावे असं सांगू इच्छिते. मी मा.खासदार कोल्हे यांना विनंती करते की आमचा गदारोळ पाहिला आता आमचा सत्कार स्वीकारावा अशी मी आपल्याला विनंती करते.

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.अध्यक्ष स्थायी समिती, मा. आयुक्त, मा.पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, सर्व पक्षांचे गटनेते व इतर सर्व मान्यवरांच्या हस्ते शिरुर लोकसभा मतदार संघाचे खासदार मा.डॉ. अमोल कोल्हे यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.)

मा. महापौर – भालकर साहेबांनी खुलासा करावा.

मा.भालकर (सह शहर अभियंता) – मा.महापौर, मा. खासदार, मा.आयुक्त, मा.सभागृह जवळपास साडेपाच तास स्मार्ट सिटी विषयीची चर्चा झाली. त्याच्यात काही वादाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याबद्दल खुलासा देण्यासाठी मी इथं उभा आहे. स्मार्ट सिटी लि. ही स्पेशल पर्पज व्हेईकलची स्थापना प्रामुख्याने स्मार्ट सिटी मिशनच्या स्वतंत्र कार्यपध्दती व स्वतंत्र निर्णय घेऊन स्मार्ट सिटी मिशन जलद गतीने पूर्ण करण्यासाठी करण्यात आलेली आहे. पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड एस.पी.व्ही. ही कंपनी ऍक्ट २०१३ नुसार स्वायत्त कंपनी आहे आणि हया कंपनीचा मेन उद्देश असा आहे की प्रोजेक्ट प्लॅनिंग आणि प्रोजेक्ट इम्प्लिमेंटेशन. स्मार्ट सिटी मिशनच्या ऍडव्हायजरी नोट २ नुसार ३०/०२/२०१६ नुसार सदर प्रकल्पासाठी कार्यपध्दती अवलंबलेली आहे. प्रकल्प राबविण्याची कार्यपध्दती जी आहे ती स्मार्ट सिटी मिशनने आपल्याला ठरवुन दिलेली आहे. शक्यतो टेक्निकल सँक्शन ही जी काय डेफिनिशन आहे ही मी पहिले एक्सप्लेन करतो. टेक्निकल सँक्शन हा मुळचा सार्वजनिक बांधकाम विभाग यामध्ये जी संहिता पाळली जाते म्हणजे मॅन्युअल जे आहे त्यानुसार Technical Sancion which the order of a competent authority sanctioning a properly detailed estimate of the cost of the work of construction and repair work. म्हणजे सिव्हील वर्क जे असतं

आणि इलेक्ट्रीकल वर्क हयाच्यासाठी शासनाने म्हणजे पूर्वी District Street Rules असायचे त्यानंतर ते SSR झाला म्हणजे State Schedule of Rates हे दरवर्षी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रसारीत केले जातात आणि त्यावर आधारीत सिव्हील वर्क आणि इलेक्ट्रीकल वर्क्स या वर्क्सना टेक्निकल सँक्शन दिले जाते तर स्मार्ट सिटीमध्ये जी आता वेगवेगळया प्रकारची कामे आहेत त्यामध्ये जे काम चालू आहे शिर्केंचे ते पूर्णपणे सिव्हील वर्क असल्यामुळ त्या कामाला आपण टेक्निकल सँक्शन दिलेली आहे परंतु हे एल अँड टी चे जे काम आहे हे पूर्णपणे आय.टी.शी निगडीत आहे आणि आय.टी. साठी ठोस अशी डी.एस.आर.ची पध्दत शासनाने अजुन घालुन दिलेली नाही. यासाठी आपण काय करतो.

मा. सीमा सावळे – भालकर साहेब ऑब्जेक्शन आहे.

मा. भालकर – मी पूर्ण बोलून घेतो.

मा. सीमा सावळे – खोटं बोलू नका

मा. भालकर – माझं पूर्ण होऊ दया ना. माझं बोलणं पूर्ण होऊ द्या ना.

मा. सीमा सावळे – ऐका महापौर साहेब ते खोटं बोलत आहेत. पहिलं तिथच तुम्हांला थांबवू देत.

मा. भालकर – माझं पूर्ण होऊ द्या मग तुम्ही बोला ना.

मा. सीमा सावळे – सर तुम्ही कोर्ट नाही आहात. आमची विनंती अशी आहे की तुमचं केलेलं पाप आमच्या डोक्यावरती ठेवायचं नाही.

मा. भालकर – माझे एक्सप्लनेशन होऊ देत मग त्याच्यावर बोलू शकतो.

मा. महापौर –सिमाताई आपण त्यांच ऐकूयात.

मा.सीमा सावळे – ते सुरुवातच खोटयापासुन करत आहेत

भालकर – तुम्हांला बोलायची संधी दिली जाईल. माझं पूर्ण होऊ दे

मा. महापौर – ऐका सीमाताई ऐका

मा. सीमा सावळे – भालकर साहेब तुम्ही महापौर नाहीत. काय भाषा करताय तुम्ही. काय भाषा करताय तुम्ही.

मा. महापौर – भालकर साहेब इथं येऊन अशी उत्तरं द्यायची नाहीत. लहान बाळाची समजुत खुळखुळा वाजवुन तशी उत्तरं द्यायची नाहीत. जी आहे ती खरी परिस्थिती सभागृहात मांडा.

मा. सीमा सावळे – तुम्ही काही महापौर नाहीत. आम्ही तुम्हांला बांधील नाहीत. तुम्ही खोटं बोलताय, तुम्ही खोटं बोलताय, खर सांगयच.

मा. भालकर – मा.महापौर साहेब, सदरचे काम माहिती व तंत्रज्ञान नेटवर्कसंबंधीत असल्याने ठोस अशी दरसूची उपलब्ध नाही. त्यामुळे विविध संस्थांमार्फत वर्कशॉप घेवून इमेल द्वारे दर घेऊन विविध स्मार्ट सिटीना प्राप्त झालेले दर तसेच बाजारभावाप्रमाणे दर निश्चित करुन आय.टी. नॉन आय.टी. पायाभूत सुविधांच्या आवश्यकतेनुसार तसेच सॉफ्टवेअर ऍप्लीकेशन

विकसित करुन पाच वर्षाची देखभाल दुरुस्ती व भविष्यातील गरजानुसार अंदाजपत्रक व डीपीआर तयार करण्यात आलेले आहेत. सदरचे अंदाजपत्रक व डीपीआरला पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. संचालक मंडळाच्या चौथ्या बैठकीत.......

मा. महापौर – भालकर साहेब दोन मिनिट थांबा.

मा.सीमा सावळे – मा. महापौर साहेब ते जे म्हणतात ते आय.टी चे काम आहे. आय.टी.चे काम हे १०२ कोटीचे आहे. उर्वरीत काम हे सिव्हील वर्क आहे आणि सिव्हील वर्कला त्यांना एस.एस.आर. लागूच होतो. त्याच्याशिवाय काम करताच येत नाही हे तितकचं खरं आहे. टेक्निकल सँक्शन घ्यावच लागतं. मुळात भालकरांवरती अँटी करप्शनचा ट्रॅप झालेला आहे त्यात ते सापडलेले आहेत. त्यातुनही निर्दोष सुटलेले आहेत आणि आता ते पूर्ते अडकलेले आहेत म्हणुन ते वारंवार खोटं बोलत आहेत. मा. महापौर साहेब आमची विनंती अशी आहे तुम्हांला की खुलासा करताना यांचं काम आपल्या डोक्यावर घेऊन का चालायचं ते खोटं बोलत आहेत. ते रेटून बोलत आहेत. ते इथं सांगतात मी काय म्हणतो ते तुम्ही हया सभागृहात खुलासा देण्यासाठी उपस्थित आहात. आमच्याशी बॉसिंग करण्यासाठी नाही आणि तुम्ही पी.डब्ल्यु.डी.ला काम करताना रेंडहँड कॅच झाला अँटी करप्शनला आणि म्हणुन तुम्हांला त्यांचे नियम माहित नाहीत असं जर तुम्हांला म्हणायचे असेल तर मा. महापौर साहेब माझी आपणांस हात जोडून विनंती आहे की यांच्यामुळे आपल्यावर जो करप्शनचा आरोप लागलेला आहे भालकरांना तात्काळ आपण इथुन मुक्त कराव व त्यांना शासन सेवेत परत पाठवावं कारण आय.टी.चं काम हे फक्त १०२ कोटीचे काम आहे आणि उर्वरीत काम हे सिव्हील वर्क असल्यामुळे मा. राजन पाटील साहेबांना पाचारण करण्यात यावे ज्यांनी हजारो कोटीची कामं या ठिकाणी सिव्हील वर्कची केलेली आहेत ते सांगतील हयाला टेक्निकल सँक्शन लागतं का नाही लागतं आणि हा स्मार्ट घोटाळा फक्त या महापालिकेत नाही केला तर संपूर्ण राज्यभर केलेला आहे.

मा. महापौर – सीमाताई बसा. जो खुलासा करायचा आहे तो खराखुरा खुलासा करा.

मा. राजू मिसाळ – मा.महापौर साहेब, मला एक मिनिट बोलायचे आहे. आम्हांला बोलू द्या नंतर आदेश द्या. सर्वात महत्वाचं ते आमच्या सन्मा. सदस्यांचा अपमान करत आहेत. मा.महापौर तुम्ही पीठासीन अधिकारी आहात त्यांना हा सांगायचा अधिकार नाही तुम्हांला बोलायला संधी दिली जाईल, ते कोण सांगणारे, ते कोण सांगणारे मा.महापौर याबाबतीत त्यांच्यावर पहीली कारवाई करा. सभागृह कसं चालवायचं हे तुम्हांला शिकवतात ते हे पहिलं त्यांना मागे घ्यायला लावा.

मा. महापौर – मी बोलते माझ्या पध्दतीने बोलते तुमचे जे म्हणणं आहे ते मी ऐकलं आहे. त्यांना सांगते.

मा. अजित गव्हाणे – मा.महापौर साहेब, त्यांनी सुरुवातच अशी केली की हे स्पेशल पर्पज व्हेईकल आहे सांगतानाच त्यांची सुरुवातच अशी केली आमची ही स्वयत्त संस्था आहे आणि

तीथे वेगवेगळे नियम आहेत. सगळीकडे नियम सारखेच असतात. तुम्ही राजन पाटलांना बोलवा. त्यांना विचारा आपल्यांकडचं एक तरी काम १ लाखाचे, २ लाखाचे कुठचे टेक्निकल सँक्शन शिवाय काम केलय. मगाशी आपल्या महिला सहका-यांनी बोलांना सांगितलं कोणीतरी की त्यांच्या वॉर्डातलं काम करताना त्यांना टेक्निकल सँक्शन घ्यायला सांगितलं, आम्हांला. माहिती आहे ना एवढे वर्ष काम करतो. टेक्निकल सँक्शन शिवाय कामच करत नाही आणि सरळसरळ तुम्ही राजना पाटलांना खुलासा करायला लावा या विषयावर.

मा. महापौर – ठीक आहे. त्यांचा खुलासा होऊ द्या मग मी तुमचे जे काही म्हणणे आहे ते मांडायला सांगते आणि आता त्यांचा खुलासा ऐकू आपण. मी तुम्हांला पण संधी देते. भालकर बोला आणि खोट बोलू नका, रेटून बोलू नका. खरं खर सांगा.

मा. भालकर (सह शहर अभियंता) – मा.महापौर साहेब, स्मार्ट सिटीच्या ऍ़डव्हायजरी नोट २ नुसार स्मार्ट सिटी मिशनच्या ज्या गाईडलाईन्स आहेत त्यानुसार स्मार्ट सिटीमध्ये डीपीआर सादर करण्याची पध्दत आहे. ज्यामध्ये प्रकल्पाची पार्श्वभुमी, प्रकल्पाचा उद्देश, प्रकल्पाची व्याप्ती, इक्विपमेंट डिव्हायसेस हे तांत्रिक स्पेसिफीकेशन साहित्याचे दर आणि अंदाजपत्रक बजेटरी एस्टिमेट इत्यादी बाबींचा समावेश केला जातो. तसं हा डीपीआर ऍ़प्रुव्हलची जी प्रोसीजर आहे की आपल्या बीओडी मध्ये हा डीपीआर ठेवला जातो. त्या अगोदर तांत्रिक समिती जी तांत्रिक अधिकारी आहे ती त्याला मान्यता देतात. सेम पॅरालल आपण कॉर्पोरेशनचे काम करत असताना किंवा शासनाची जी काही कामं करतो त्यामध्ये डीपीआर ऐवजी टेक्निकल सँक्शन आपण एस्टिमेटला घेतो त्यामुळे आपण जो काही आरोप केलेला आहात किंवा जे काय लोकांना शंका आहे की या कामांना टेक्निकल सँक्शन घेतलेली नाही. Technical Sanction in the form of DPR. ही प्रोसीजर आपण फॉलो करुन कोणतीही आपण अनियमितता यामध्ये केलेली नाही तसेच काही नगरसेवकांनी व्हाइटनर लावून बीले ही सादर केली आहेत असे मुद्दे उपस्थित केले होते. त्याबाबत मला क्लॅरिटी अशी द्यायची आहे की आपण आरएफटी तयार केलेली आहे त्या आरएफटीमध्ये जे कोणी व्हेंडर असतील किंवा मटेरियल सप्लायर असतील तर त्यांची बीले आरएफटी नुसार मेन कॉंट्रॅक्टरनी किंवा मेन एजन्सीने सादर करण्याची पध्दत नाही. आपण बिलं कशासाठी मागतो फक्त क्वांटिटी व्हेरिफाय करण्यासाठी डिलीव्हरी चलन किती क्वांटिटीचे मटेरियल प्राप्त झालं हयाच्यासाठी आपण त्यांच्याकडे हयाच डिलीव्हरी चलन मागतो त्याच्याऐवजी त्यानी बीलं दिली होती तर जो काय टेक्निकल सँक्शन घेतलीं नाही याबाबत आपण डीपीआरला ऍ़प्रुव्हल घेतलेली आहे आणि राज्य शासनाकडे किंवा सिव्हील वर्क आणि इलेक्ट्रीकल वर्कला टेक्निकल सँक्शन पी.डब्ल्यु.डी.नुसार घेतलीं जाते तरी याबाबत मी एवढा खुलासा करत आहे.

मा.सीमा सावळे – मा. महापौर साहेब, स्मार्ट सिटी जरी एसपीव्ही असली तरी त्या ठिकाणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सुध्दा निधी वापरला गेलेला आहे, राज्याचा निधी आहे, केंद्राचा नाही आणि हे सर्व निधी हे लोकांच्या, करदात्या नागरीकांच्या कराच्या स्वरुपातुन

आलेला हा पैसा असतो आणि त्याचा एक-एक रुपयाचा हिशोब किंवा एक-एक पैशाचा विनियोग हा योग्य पध्दतीने झाला पाहिजे. प्रचलित पध्दत काय आहे तर प्रचलित पध्दत अशी आहे की त्याच टेक्निकल सँक्शन घेतली पाहिजे सिव्हील वर्कच्यासाठी. सिव्हील वर्क कितीचं आहे १४८ कोटीचं सिव्हील वर्क आहे. मघाशी मा. विरोधी पक्षनेत्यांनी सांगितलं की त्या ठिकाणी एअरटेल असेल, जिओ असेल त्या सर्व कंपन्यांना काय मीटरला ९०००/- रु.पर मीटर खोदाईचा खर्च आपण कसा काढला तर तो आपण पूर्वी डीएसआर होता आणि आता एसएसआर वापरतो आपण. भारतीय जनता पार्टीची ज्यावेळेस या राज्यामध्ये सत्ता आली त्या वेळेस आपण डीएसआर जाऊन आपला एसएसआर आला आणि त्याच्यानुसारच हया सगळया किमंती कळतात. आता इथे काय केलं स्मार्ट सिटीतला स्मार्ट घोटाळा तो सर्वसामान्यांच्या लक्षात येऊ नये म्हणुन सल्लागारांना हाताशी धरुन असं काही आहे का की आयएएस ऑफीसर असतील म्हणजे ते काय घोटाळा करत नाहीत ते काय भ्रष्टाचार करत नाहीत आणि समजा त्यांचा उद्देश जर इतका पवित्र असेल तर एसएसआर नुसार जायला त्यांना काय प्रॉब्लेम होता जर आपल्या महानगरपालिकेचे each and every tender जर सिव्हीलचे दर एसएसआर नुसार निघत असतील तर स्मार्ट सिटी असं कुठलं वेगळं काम करत होती की त्यांना एसएसआर लागू झाला नाही. तुम्ही किंमती काळू दिल्या नाहीत. डीएसआर जाऊन एसएसआर आला तर तो का नाही केला आणि हयांच जे मत आहे मला असं वाटतं की भालकर साहेबांचा जो उद्देश आहे भालकर साहेब वाईट वाटून घेऊ नका तुम्ही जे आता एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर म्हणुन काम करा आणि तुम्ही हे जे सांगता डीपीआर, डीपीआर म्हणजे काय. सांगा नवीन नगरसेवकांना डीपीआर म्हणजे काय, डीपीआर म्हणजे Detailed Project Report. तो कोणी तयार केला तर तो केला एनएमआरएस नावाची जी सल्लागार कंपनी आहे त्यांनी तयार केला. ती कंपनी कुठे काय काम करते. ती नागपूर महानगरपालिकेला काम करते. वेगवेगळया महानगरपालिकेत काम करतात आणि देशभरामध्ये काम केल्यानंतर त्यांनी काय केल की नागपूर महानगरपालिकेने काय काम केल त्याचा दाखला देत आपल्याकडे टेंडरींग केल. एखादी वस्तु घ्यायची असेल तर त्यावेळेस ठीक आहे. परंतु जर सिव्हील वर्क असेल तर त्या ठिकाणी कुठल्याही परिस्थितीमध्ये तिथे तुम्ही एसएसआर वापरायलाच पाहिजे होता. टेक्निकल सँक्शन घ्यायलाच पाहिजे होतं. हया बाबतीत आज तुम्ही कितीही खोटं बोला. हे जे काय तुम्ही करताय ती तुमची कातडी बचावाचं काम चाललेल आहे याच्यातुन तुम्ही वाचू शकणार नाहीत तुम्हांला ते करायलाच पाहिजे होतं. सल्लागार, अधिकारी यांनी मिळून केलेला हा भ्रष्टाचार आहे आणि म्हणुन तुम्ही जे बोलताय त्याच्यावरती आमचा कवडीचाही विश्वास याच्यासाठी नाही की या महानगरपालिका नव्हेतर देशभराच्या मनपा किंवा स्वायत्त ज्या संस्था आहेत मग आमदारकीची असुदेत खासदारकीची असु दे घ्या सर्वांना जर एसएसआर लागू असेल तर हे सुध्दा स्पेशल पर्पज व्हेईकल असताना सुध्दा यांना सुध्दा तो नियम लागूच असला पाहिजे, नव्हे तर त्यात चोरी केली म्हणुन त्या सल्लागारांवरती गुन्हा दाखल झाला गेला पाहिजे. आजपर्यंत जे बिलींग एल अँड टी ने घेतलं आहे त्यांच्यावरती फौजदारी दाखल झाली पाहिजे. तुम्ही

सहया केल्यात म्हणुन तुम्ही सुध्दा जेलला गेले पाहिजे. मा.महापौर साहेब, डीपीआर प्रोजेक्ट रिपोर्ट मध्ये काय केलंय, तुम्ही तुलना कशी केली. नागपूर महानगरपालिकेनी काय केलं म्हणुन इथे हे केलं पाहिजे, सिव्हीलवर्कमध्ये आणि तुम्ही छातीठोकपणे सांगताय आम्हांला. या ठिकाणी बसताना प्रत्येक व्यक्ती इथे बसलेले प्रत्येक अधिकारी आणि पाठीमागे बसुन त्यांच्या त्यांच्या दालनात बसुन ऐकणारे अधिकारी असतील मा. महापौर साहेब राजन पाटील सोडून द्या. कुठल्या पण एखादया आपल्या अधिका-याला बोलवा. अगदी आपल्या ज्युनिअर इंजिनिअरला बोलवा. जेईला सोडा आपला असिस्टंट असतो ना जेईला स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक त्याला बोलवा ते सुध्दा सांगतील हयाला टेक्निकल सँक्शन घेणं किती गरजेचे होते आणि म्हणुन हयांना इथे भ्रष्टाचारास वाव आहे. दुसरा त्यांनी मुद्दा मांडला की त्या ठिकाणी कॉंट्रॅक्टरनी आपण म्हणतो क्वांटिटी मोजतो, ऍग्री आहे क्वांटिटीच मोजली पाहिजे क्वालिटीचं कोण बघणार. क्वालिटी बघण्याचं काम कोणाचं होत. केबल कुठल्या क्वालिटीची आहे, किती कोअरची आहे हे बघण्याचं काम कोणाचं होतं. १८ टक्के आपण जीएसटी दिला तो पूर्ण टेंडरच्या रकमेवरती आपण जीएसटी दिला आणि म्हणुन जर तुम्हांला ते सांगायला काहीच वाटत नसेल की ते व्हाईटनर लावून तीथे फायदा आहे. आश्चर्य वाटतं, वाईट वाटतं, लाज वाटते मला की मी हया सभागृहात का बसते म्हणुन याची. कॉस्ट कशी काढली तुम्ही ते सांगाच आम्हांला एकदा. खरं सांगा आम्हांला समजुन सांगा तुम्ही कॉस्ट कशी काढली ते. केबलची कॉस्ट कशी काढली. खोदाईला जो खर्च आला तो कसा तुम्ही गृहीत धरला. तुम्ही ७५० किमीची लाईन टाकणार होतात खोदून ते कसं जस्टीफाय केलं त्यासाठी काय नियमावली वापरली. त्याच्यासाठी काय नियमावली वापरली. अहो अनेक प्रश्न आहेत तुम्ही बोला. आम्ही परत बोलणार आहेत.

मा.भालकर (सह शहर अभियंता) – मा.महापौर साहेब, स्मार्ट सिटीच्या मिशनच्या गाईडलाईन्सनुसार स्मार्ट सिटी नाशिक, नागपूर, सुरत, वडोदरा, नांदशी, गंगटोक, कोहिमा या शहरांनी देखील हीच प्रोसिजर ऍडॉप्ट केलेली आहे. तो डीपीआर आपण जी पध्दत वापरलेली आहे तर स्मार्ट सिटीच्या ज्या गाईडलाईन्स आहेत आणि ही जी आता नावे सांगितली शहरांची तिथे देखील हीच प्रोसिजर वापरण्यात आलेली आहे. हया दोन वर्षामध्ये वापरली आहे आणि मॅडमनी जो मुद्दा उपस्थित केला क्वालिटीच्या बाबतीत तर क्वालिटीच्या बाबतीत आपण डक्ट किंवा केबल हे टेस्ट रिपोर्ट, मॅन्युफॅक्चरर किंवा इतर प्राप्त झाल्यानंतर मान्यता प्राप्त ज्या काय इन्स्टिटयुट आहेत त्यांच्याकडून चेक करुन घेतलेले आहे ते कधीही आपणांला पाहता येईल.

मा. सीमा सावळे - मा. महापौर साहेब डीएसआर नाही एसएसआर नाही १४८ कोटीचं खोदाईचं डक्टींगचे काम कुठल्या आधारे केलं डीएसआर घेतलातर नियम काय सांगतो की आपण काय केलं पाहिजे सांगा साहेब.

मा.भालकर (सह शहर अभियंता) – मा.महापौर साहेब, तर या मध्ये आपण रेट वर्कींग करण्यासाठी विविध संस्थांमार्फत वर्कशॉप घेऊन तसेच इमेलद्वारे विविध स्मार्ट सिटीमध्ये जे काय दर ऍव्हेलेबल झालेले होते आपल्या अगोदर जी काय टेंडर्स झालेली होती तसेच

बाजारभावामध्ये चौकशी करुन विविध आय.टी. व नॉन आय.टी. पायाभूत सुविधांच्या आवश्यकतेनुसार ते दर आपण मार्केटमधुन घेतलेले आहेत.....

मा. सीमा सावळे – मा. महापौर साहेब, मी फक्त सिव्हील वर्कच्या बाबतीत बोलते. तुम्ही असं गोलगोल करताय ना. आहो, किमान आम्ही हया सभागृहात १५ वर्ष काढली आहेत. स्टँडींग चेअरमन म्हणुन या ठिकाणी साडे पाच हजार कोटीच्या वर्क ऑर्डर दिल्या. नॉट अ सिंगल केस एकही केस अशी नाही की ज्याला एसएसआर आम्ही लागू केला नाही आणि हे जे तुम्ही सांगताय ना तुमच्या त्या सगळया फाईल मी माहितीच्या अधिकारात गेल्या वर्षभरात तुम्ही कोविड लागला आणि म्हणुन हया ठिकाणी आम्हांला आमचं म्हणणं मांडता आलं नाही. आम्ही त्या वेळेस पासुन या विषयाचा पाठपुरावा करतोय मा. महापौर साहेब. विषय असा आहे की ते जे जस्टीफाय करायला जातात की देशभरामध्ये केलं. पिंपरी चिंचवडला काय झालं हयाच्याशी माझा concern आहे. Because of that मी इथे लोकप्रतिनिधी आहे. मी इथे काम करते. माझ्या महापालिकेचा भ्रष्टाचार अधिका-यांच्या आणि सल्लागारांच्या संगनमताने झालेला आहे. त्या भ्रष्टाचारावरती १०० टक्के बोलण्याचा माझा अधिकार आहे आणि आता तुम्ही मला कितीही सांगा तुम्ही माझं म्हणणं deny करा Second day मी कोर्टामध्ये तुमच्या नावासहित तर तुम्ही जे आता बोललात हे रेकॉर्ड झालेलं आहे आणि तुमच्याकडून अपेक्षितच होत. तुमच्याकडून मी अपेक्षाच करत होती त्या विषयाची तुम्ही काय केलं की महिना, दोन महिने, तीन महिने दुर्दैवाने इलेक्शनच्या तोंडावरती निर्णय आला, दुर्दैवाने कारण तुम्ही जे जस्टीफाय करायला जाता ते कायदयामध्ये कुठेही जस्टीफाय होऊ शकत नाही आणि त्याचबरोबर सगळयाच महानगरपालिकांची सगळयाच ठिकाणच्या स्मार्ट सिटीची एनक्वायरी लागेल. हा नागरीकांचा पैसा आहे. नागरीकांचे पैसे योग्य रितीने वापर झाला नाही तर भ्रष्टाचाराच्या उद्देशाने या ठिकाणी सल्लागारांनी अधिका-यांनी संगनमत करुन अशा प्रकारचे काम केलेल आहे. त्यामुळ तुम्ही किती जरी सांगितलं तरी डीएसआर, एसएसआर हे कशासाठी होते हे आम्हांला इथे समजुन सांगा. तुम्ही जे सांगताय ते नियमाला धरुन नाही. डीपीआर मध्ये चुकलात हे तुम्ही पहिलं मान्य करा. तुम्ही नियम पाळला नाही, स्मार्ट सिटीने नियम पाळले नाही म्हणुन आणि हे इथे काय झाल. हे तुमच्या सगळयांकडे झालेलं आहे. आय.टी.चे एस्टिमेट प्रमाणे त्याच्यामध्ये सुध्दा भ्रष्टाचार आहे. स्मार्ट सिटीची कुठलीही नियमावली नाही पहिली गोष्टतर, कुठलीच नियमावली नाही स्मार्ट सिटीची.

मा. भालकर (सह शहर अभियंता) – मा.महापौर साहेब, स्मार्ट सिटीच्या मिशन गाईडलाईन्स आहेत.

मा. सीमा सावळे – मा.महापौर साहेब, सर मिशन गाईडलाईन्स वेगळया आहेत. मिशन गाईडलाईन्स वेगळया आहेत. तुम्ही या ठिकाणी सिव्हील वर्कला टेक्निकल सँक्शन घेतलं नाही

आमचा मुद्दा तेवढाच आहे. गाईडलाईन्स ही कधीही कायद्याला सुपरसिट होऊ शकत नाही आणि हयाच मुद्दयावरती जवाहरलाल नेहरु पुनरुथ्थान योजनेमध्ये मी झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये मी कोर्टामध्ये .........

मा. महापौर - भालकर साहेब, टेक्निकल सँक्शन घेतलेल आहे का नाही.

मा. भालकर (सह शहर अभियंता) – मा.महापौर साहेब, टेक्निकल सँक्शन हे सिव्हील आणि इलेक्ट्रीकल वर्कला घेतलं जातं. आपलं हे काम आयटी + सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट + सिव्हील वर्क असल्यामुळे आपण डीपीआर वापरलेला आहे.

मा.सीमा सावळे – मा.महापौर साहेब, भालकर साहेब आपण डक्ट खोदले, आपण रस्ते खोदलेत, सिमेंट वापरले, स्टील वापरले, आपण सगळच वापरल.

मा.भालकर (सह शहर अभियंता) - मा.महापौर साहेब, आपण जरी रस्ते खोदले असले तरी आपण रेट देताना टोटल........

मा. नामदेवराव ढाके – सन्मा. महापौर, आता याठिकाणी भालकर साहेबांनी जे काही स्मार्ट सिटीचे गाईडलाईन्स आहेत ते सांगितले की मला असं वाटतं की या संदर्भामध्ये जे डिटेल्स आता टेक्निकल सँक्शन किंवा बाकीच्या कामाबद्दल एसएसआरच्या रेटच्या संदर्भामध्ये, सिव्हील कामांना कुठ, कुठ, काय, काय त्या संदर्भामध्ये आपण उद्याच आयुक्तांच्या तिथे याच्या संदर्भामध्ये डिटेल मिटींग लावा आणि....

(गोंधळ)

मा. महापौर – खाली बसा घोडेकर ताई. पक्षनेते बोलतात बसा ना. त्यांनी तो विषय मांडलाय विषय तर मांडू दया. बहल साहेब खाली बसाना, मी देते ना आदेश.

मा. नामदेवराव ढाके – सन्मा. महापौर त्यांचा खुलासा सभागृहाला किंवा आम्हां सगळयांना समजू देत आणि त्याच्या नंतर ज्यांना ज्यांना शंका असेल त्याच्यासाठी आपण आयुक्तांच्या दालनामध्ये सेपरेट एकच विषय घेऊन त्या संदर्भामध्ये जे काय काय म्हणणं असेल ते आपण त्याठिकाणी मांडू. आमच्या सगळया सभागृहाल नेमक त्यांच काय म्हणणं आहे, स्मार्ट सिटी काय आहे हयाच्यामध्ये टेक्निकल सँक्शन काय भानगड असते कुठल्या कुठल्या स्मार्ट सिटीच्या मिशनमध्ये काय आहे हे समजून द्यावे आम्हां सगळयांना. सांगू दया त्यांना या संदर्भामध्ये डिटेल्स.

मा.महापौर- आयुक्त साहेब, जे काय भालकर साहेबांनी उत्तरे दिली आहेत ती असमाधानकारक उत्तरे दिलेली आहेत. ज्या ज्या पध्दतीने स्मार्ट सिटीतले कामांची नियमावली आहे त्या नियमातील पध्दतीने हे काम झाले पाहिजे. त्या बद्दल जो काही गैरसमज आहे तर त्यांची शहानिशा झाली पाहिजे. उद्या दुपारपर्यंत त्यांची सगळी डिटेल माहिती घेवून भालकर साहेब आणि त्यांचे अधिकारी हयांना ताबडतोब बोलवा आणि ज्यांना ज्यांना शंका आहे ते सगळे आपण एकत्र बसु आणि आयुक्तांच्या केबीनमध्ये मिटींग घेऊ.

(गोंधळ)

मा. सीमा सावळे – मा. महापौर साहेब, माझी या ठिकाणी राज्यामध्ये असलेल्या सत्ताधा-यांना विनंती आहे. टेक्निकल सँक्शन गरजेचं आहे का नाही हे आपण माननीय उपमुख्यमंत्र्यांना आणि इथे बसलेल्या खासदारांना विनंती आहे की राज्यात असणा-या आता महापालिकांना राज्य शासनाने कानटोचणी करणे किती गरजेचे आहे. विनंती आहे आमची तुम्हांला की तुम्ही राज्य शासनाला सांगायला सांगा की खरंच टेक्निकल सँक्शन न घेता अशा प्रकारचं काम करु शकते का महानगरपालिका. आमची विनंती आहे की........

मा. महापौर – सीमाताई, तुमचा प्रश्न ऐकला, विषय क्रमांक १ वाचावा.

**मा.नगरसचिव- विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे खालील ०५ (पाच) विशेष समित्या नेमणे-

१) **विधी समिती –**

(टिप – विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत)

२) **महिला व बालकल्याण समिती –**

अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.
ब) महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

३) **शहर सुधारणा समिती -**

(टिप–शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

४) **क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती -**

(टिप – क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

५) **मा.शिक्षण समिती-**

(टिप – शिक्षण समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(टिप – उपरोक्त क्र.०१ ते ०५ प्रमाणेच्या विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत.)

------

**मा.नगरसचिव -** विषय क्रमांक १ - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे खालील ०५ (पाच) विशेष समित्या नेमणे- विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करावयाच्या आहेत.

१) **विधी समिती-** विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

अधिकारी/ कर्मचारी सन २०२०-२१ मध्ये सेवानिलंबित झाले आहेत. अशांच्या बाबतीत त्यांची वेतनश्रेणीतील सेवा व सेवानिलंबन कालावधीतील निर्वाह वेतन विचारात घेऊन यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु.२०,०००/- देय राहील. तसेच गैरहजर/ विनावेतनी रजेवरील कर्मचा-यांचे बाबतीत यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व यथाप्रमाण जादा र.रु. २०,०००/- देय राहील.

८) जे अधिकारी / कर्मचारी सन २०२०-२१ या वर्षात महापालिका सेवेत होते. तथापि नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त,मयत किंवा स्वेच्छा व वैद्यकिय कारणास्तव सेवानिवृत्त झाले आहेत, राजीनामा दिलेले, सेवेतून कमी केलेले / सेवा समाप्त केलेले अधिकारी/कर्मचारी यांचा सेवाकाल विचारात घेऊन तसेच बदली झालेले प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी यांचा सहा महिन्यापेक्षा जास्त असलेला सेवाकाल विचारात घेऊन त्यांना यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व यथाप्रमाण जादा र.रु.२०,०००/- देय राहील.

९) महापालिका अधिकारी व कर्मचा-यांना ज्या प्रमाणे ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु.२०,०००/- मंजूर करण्यात आले आहे. त्याच दराने शिक्षण विभागातील(शिक्षण मंडळ) अधिकारी व कर्मचारी यांना ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु.२०,०००/- मंजूर करण्याची कार्यवाही शिक्षण विभागाने(शिक्षण मंडळ)करावी.

१०) उपरोक्त निकषानुसार महापालिका व शिक्षण विभाग आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचा-यांना सन २०२० - २१ करिता व पुढील ४ वर्षासाठी मान्यता प्राप्त संघटनेशी करारनामा करुन ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु.२०,०००/- मंजूर करण्यासाठी मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर मान्यता देण्यात येत आहे, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवर सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात अधिसंख्य पदावर काम करीत असलेल्या तसेच नियमित वेतनश्रेणीतून अधिसंख्य पदावर नियुक्ती दिलेल्या कर्मचा-यांना यथाप्रमाणे ८.३३% सानुग्रह व जादा र.रु.२०,०००/- देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपा कर्मचा-याप्रमाणे पीएमपीएमएलच्या कर्मचा-यांना, घंटागाडी कामगारांनाही बोनस व सानुग्रह अनुदान देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल --८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.कदम शशिकांत व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०४२८ दि.६/१०/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने बी.आर.टी. विभागामार्फत प्रभाग क्र. २५ व २६ येथे अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार ४५ मीटर डी.पी. रस्ता विकसित करण्यात येणार आहे.

नुकतीच त्याची निविदा देखील प्रसिध्द झाली. त्यामध्ये सदरिल कामाचे शीर्षक हे “प्रभाग क्र.२५ मधील दत्तमंदिर, वाकड डी.पी.रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे” असे आहे. परंतू सदरिल रस्ता हा प्रभाग क्र. २५ व २६ मध्ये समांतर आहे. त्यामुळे सदरिल कामाचे शीर्षक तात्काळ बदलून ते “प्रभाग क्र.२५ व २६ मधील दत्तमंदिर, वाकड डी.पी.रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे” असे करणेस व सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात वरिलप्रमाणे नावात दुरूस्ती करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.संदीप कस्पटे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.माया बारणे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते--थेरगाव परिसरात विविध कामात डांगे परिवारांचे मोठे योगदान आहे डांगे परिवाराने आपल्या महानगरपालिकेस डांगे चौक येथे बॅडमिंटन हॉल तसेच सांस्कृतिक भवनास विना मोबदला जागा आपल्या महानगरपालिकेस दिलेल्या आहेत. त्यांच्या कुटूंबियांच्या मागणीवरुन डांगे चौक येथील ग्रेड सेप्रेटरचे “ कै.मथाई शंकरराव डांगे ” असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.झामाबाई बारणे – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

मा.राहुल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्म.सभागृह, ऑन लाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. माई हा विषय आमच्यासाठी फार महत्वाचा आहे. हा सदस्य ठराव आणलेला आहे मला वाटत शशिकांत आप्पा आणि अंबरनाथ कांबळे यांनी हा स्टॅण्डीगला प्रस्ताव केला. याची ज्यावेळेस मी माहीती घेतली तेव्हा मला सवणे साहेबांनी सांगीतल की नगरसेवक पतींचा फोन आला आणि त्यांनी सांगीतल या बाजूला आम्ही आहेत आणि त्या बाजूला तो प्रभाग आहे परंतु सगळयात पहील्यांदा मी पत्र दिलं. शेवटच्या स्टॅण्डीगला त्याला कन्सलटंट नेमला. ३०/७ ला मी आयुक्त साहेबांना पत्र दिल, ३०/८ ला निवीदा प्रसिध्द झाली हे सगळ करत असताना त्याठिकाणी तरतूद ठेवली होती मी नामदेवरांवाना सांगीतल, त्यांनी म्हणले तरतूद घ्यायची असेलतर तुमच्या प्रभागातलीच घ्या त्याच्याशिवाय आपण जीबीला एकही उपसूचना घेणार नाही. शेजारच्या प्रभागाच नाव असेलतर माझ काहीही दुमत नाही परंतु गेल्या तीन वर्षापासून त्याचा मेन्टनन्स हा प्र.क्र. २५ मधुन होतो. अस असताना माजी पदाधिकारी तो जर फोन करुन सांगतो की या प्रभागाच्या पलीकड आम्ही आहोत आमचही नाव त्यात घ्या ते याठिकाणी स्टॅण्डीग चेअरमन होते मग साडेचार वर्षे त्यांनी या टेंडरला हात का नाही घातला. आमच्या कुटूंबातल्या जवळ जवळ सगळयाच कलाटे कुटूंबीयाची त्याठिकाणी जागा आहे. या रोडसाठी आपण आशिष शर्मा आयुक्त असताना हा रोड २४ मी.चा करावा अशाप्रकारची सर्व ठिकाणची मंजूरी घेवून म्हणजे आपण महापालिकेत मंजूरी घेतली, आपण राज्यशासनाकडे टीपीसी घेतली परंतु त्यावेळेस पृथ्वीराज चव्हाण साहेब सीएम होते ते म्हणाले परत रस्ता बारीक करायचा ठराव आणू नका मोठा करायचा आणा त्यामुळ त्याठिकाणी तो रोड रिजेक्ट झाला. कारण की त्या रोडवरती आपल दत्त मंदीर आहे म्हणून तो रोड २४ मी. करावा त्याला प्यारलल आजून तीन २४ मी.चे रस्ते आहेत परंतु नंतर मी म्हणल एकदा आपण टेंडर काढू. जस आता आपण ४५ मी. भूजबळ वस्ती ते हिंजवडी आल त्याठिकाणी पण अशी तक्रार आली की टेंडर काढू नका ताब्यात नाही परंतु टेंडर काढल्यानंतर आम्ही सर्व नागरीकांची मनस्थिती बदलून बदलून आज तो ९५ टक्के रोड पुर्ण झाला परंतु असं असताना फक्त राजकारण म्हणून कुठलातरी एक पदाधिकारी सांगतो ते

याठिकाणी स्टॅण्डींग चेअरमन होते त्यांनी साडेचार वर्षात रस्ता करायचा होता परंतु आता तो पुर्ण झाला त्याची निवीदा उघडली त्याच तुम्ही हेड कसं बदलणार, आता प्रक्रीया पुर्ण झाली, टेंडर ओपन झाल अस असताना कुठलाही विषय वादात न जाता तुम्ही मंजूर केलातरी मला काही हरकत नाही. चार वर्षापासून बजेटला हेड असच होतं, बजेटच हेड वेगळ नव्हतं. हार्डीकर साहेब असतांना आम्ही बजेट मिळण्यासाठी खुप प्रयत्न केला, नाही मिळाले. रस्ता होणं महत्वाच आहे फक्त त्यांला तुम्ही कुठल्या राजकारणात आणू नका नाहीतर फेटाळलतर परत आम्ही पळायचो मुंबईला असं काही करु नका. त्यामुळ माझी तुम्हांला विनंती आहे की या रस्त्याला कुठल्याही राजकारणात टाकू नका आमची जर लोक दुखावली गेलीतर हा रोड होणार नाही आणि मग ज्यांनी कोणी संबंधितांनी फोन केलाना त्यांनी जबाबदारी घ्यायची आणि त्यानी रोड करायचा आणि त्यानीं सगळया लोकांना म्हणायच की मी रोड करतो म्हणून. मा.महापौर साहेब, त्यामुळ माझी तुम्हांला विनंती आहे की या रस्त्याला पुर्वी सारख कुठल्याही राजकारणात घेवू नका. याची प्रक्रीया पुर्ण झालेली आहे, टेंडर पण ओपन झालेल आहे त्या रोडला आपल्याला मदत करता येणार नाही हे मी ज्यावेळेस माहीती घेतली तेव्हा मला समजल आणि परत तुम्ही त्यांना टेक्निकली काही तरी थांबवायला जाताल. तरी त्या रस्त्याला कुठल्याही राजकारणात ओढू नये अशी मा.महापौर आपल्याला माझी विनंती आहे.

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्म.सभागृ, ऑन लाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. हा जो विषय आहे तो अर्बन स्ट्रिटच्या रिलेटेड आहे. आयुक्त साहेब मी अनेकवेळा आपल्याला आणि हार्डीकर साहेबांना या संदर्भात भेटलो होतो. आमच्या भोसरीमध्ये जे अर्बन स्ट्रिटच काम महापालिकेनी काढल ते उड्डाण पुला खाली आणि बाजूनी फुटपाथ आणि त्याच्या खाली काही ठिकाणी गार्डन काही ठिकाणी हॉकर्स आणि काही ठिकाणी पार्कींग अशाप्रकारच डिझाईन त्यांनी केल आणि त्याच टेंडर काढल आणि आम्ही सर्वपक्षीय नगरसेवकांनी या अर्बन स्ट्रिटच्या कामाला विरोध केला, आमचा विरोध यासाठी होता तुम्ही जे काही डिझाईन केल आहे ते तीथल्या स्थानीक परिस्थितीला अनुसरुन नाही. आयुक्त साहेब तुम्ही उड्डाण पुलाखाली गार्डन केल आहे, भोसरीची जर ट्रॅफिक तुम्ही पाहीलीतर एवढा उड्डाणपुल करुन सुध्दा संध्याकाळी खुप वाहतूकीची कोंडी असते. त्यांनी आम्हांला हे सांगीतल की ज्येष्ठ नागरीकांसाठी गार्डन. ज्येष्ठ नागरीकांना शक्य आहे का तो रोड ओलांडून त्याठिकाणी गार्डनमध्ये जाणं आणि तीथ गेल्यावर तीथ जे काही प्रदुषण आहे म्हणजे आपण ज्येष्ठ नागरीकांना आजारी पाडण्यासाठीच ते केल, मग त्यावेळेस भिमाताई फुगे, नगरसेवीका त्यांनी विरोध केला. वास्तवीक तीथ पार्कींगची गरज होती परंतु तीथ इतक्या चुकीच्या पध्दतीने आणि रेटून नेण्याच काम चालल आहे. मला सांगा नियमान तीथ गार्डन करता येतं का. तो हायवे आहे, आम्ही ज्यावेळेस म्हणल हा नाशिक हायवे आहे त्यावेळेस आम्हांला उत्तर दिल नाशिक हायवे हा वरुन उड्डाणपुलावरुन आणि हा खालचा तुमचा लोकल रोड आहे. मी आयुक्त साहेबांना पण म्हणलो तुम्ही कधीपण व्हिजीट करा कशी ट्रॅफिक जाम होती आज सुदैवाने तीथ लग्न मोठया प्रमाणात होत नाहीत. जेव्हा आमच्या भोसरीमध्ये कोवीड नव्हता तेव्हा मोठया प्रमाणात लग्नसमारंभ होत होती आणि आमच्याकड खुप मंगल कार्यालय आहेत त्याच्यामुळ आमच्या भोसरीमध्ये जवळपास सहा, सात, आठ महीने पुर्ण ट्रॅफिक जाम असते. त्यांनी सुरवातील मॅक्झिमम आठ मी. आणि मिनीमम चार मी. फुटपाथ करायचे ठरवले होत आणि त्याच्यानंतर पार्कींग आणि पार्कींग सुध्दा प्यारलल पार्कींग दाखवल होतं. म्हणजे तो माणूस गाडी लावणार गाडीतून उतरणार की डायरेक्ट त्याची धडकच होणार मग नंतर आम्ही ज्यावेळेस मागणी केली त्यानंतर त्याच्यामध्ये त्यांनी चेंजेस केले आणि फुटपाथची विडथ कमी केली आणि रोडची विडथ थोडी जास्त ठेवली परंतु आजही त्याठिकाणी खाऊगल्ली केली.

मा.महापौर, नाटयगृहाच्या समोर तुम्ही जर आलातर खाऊगल्ली दिसेल. मुळात भोसरीमध्ये मोठयाप्रमाणात कामगार राहतात. रोजच्या रोज कामगार कामावर जातात, सकाळी जर तुम्ही आलातर दिसेल की हजारोच्या संख्येनी कामगार तीथ उभे असतात. वास्तविक पाहता त्यांना मागच्या बाजूला जागा करुन दयायला पाहीजे होती आणि खाऊगल्ली जी केली आहे ती रोडला आहे त्यामुळे रोडची विडथ छोटी झाली आहे. आता राहूल कलाटेंनी मगाशी उल्लेख केला होता की जीथ अर्बन स्ट्रिटचे रोड झाले आहेत तीथ काय परिस्थिती आहे आज, तीथ सगळीकडे टप-या झाल्या आहेत. आम्हांला त्यावेळेस असं आश्वासन दिल की अर्बन स्ट्रिटचे जेव्हा फुटपाथ होतील तेव्हा एकही सिंगल टपरी आणि सिंगल हातगाडी तीथ होणार नाही अशाप्रकारच आश्वासन आम्हांला अधिका-यांनी दिलं. मुळात भोसरीची आणि संपुर्ण पिंपरी चिंचवड शहराची जर परिस्थिती पाहीलीतर सगळया फुटपाथवरती हातगाडया आणि टप-या आहेत, कुठेही टपरी सोडून आत फुटपाथ नाही ही आख्ख्या शहराची परिस्थिती आहे. मा.महापौर साहेब, मुळात आपण हॉकर्सची पॉलीसी ठरवतोय, जे काही हॉकर्स तयार होतात त्यांना आपण वेगळया जागा दिल्या पाहीजेत आणि तशा पध्दतीच प्लॅनिंग व्हायला पाहीजे होतं. आज ठिक आहे ती लोक सुध्दा त्याठिकाणी पोट भरतात परंतु चुकीच्या ठिकाणी त्यांना त्यांच पोट भराव लागतय. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आमच्या भोसरी परिसरामध्ये त्या लोकांकडून काही मंडळी पैसे गोळा करतात याच दुर्दैव आहे आणि ती सर्वसामान्य माणस आहेत. अशा पध्दतीच तीथ सगळ चुकीच चालू आहे आयुक्त साहेब आपण त्याच्यामध्ये ताबडतोब लक्ष घालाव माझे माहीती प्रमाणे ते ३८ कोटीच काम आहे. मुळात ३८ कोटीचा खर्च तीथ करणे खरच योग्य आहे का. त्याच्या ऐवजी ते पैसे जर आपण इतर ठिकाणी वापरले असतेतर, आपल्याला मुलभूत सुविधा शहरातील नागरीकांना देणे गरजेचे आहे त्याठिकाणी ते पैसे वापरले असतेतर बर झाल असतं. आयुक्त साहेब मी सगळया ठिकाणचे फोटो काढलेले आहेत, व्हिडीओज काढलेले आहेत, आज तीथ जी काही तुम्ही जागा तयार केलीना तात्पुरत्या स्वरुपात आमच्या तीथ काय चालत, तीथ तीन चार वाईनशॉप एका बाजूला आहेत आणि त्या वाईनशॉपमुळ तीथ त्याठिकाणी सगळ वेगळया प्रकारच काम चालतं आणि आमच्या भागातील महीला भगीनीनां अक्षरशा: संध्याकाळच्या वेळेमध्ये त्याठिकाणावरुन जाता पण येत नाही अशी परिस्थिती आहे. मगाशी सुजाताताईनी विषय मांडला त्या विषयाला अनुसरुन अशा पध्दतीच आपण जर त्याला अनुकूल काही करत गेलोतर त्या भागातील नागरीकांवरती हा एकप्रकारचा अन्याय आहे आणि चुकीच काम आपल्याकडन होतय. त्याच्यामुळ ताबडतोब आपण त्या कामाच्या संदर्भात लक्ष घालाव आणि जे काही चुकीच होतय ते काम ताबडतोब थांबवाव आणि जे त्या परिसरातील नागरीकांच्या दृष्टीने करणे गरजेच आहे पार्कींग असेल आणि हॉकर्सची काही वेगळी सुविधा करायची असेलतर करा आणि त्या खाऊ गल्लीच्या संदर्भातही आयुक्त साहेब तुम्ही व्हिजीट करा आणि मग निर्णय घ्या.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-- पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रं.२० संत तुकाराम नगर येथील महेशनगर चौकास छत्रपती शिवाजी महाराज चौक व लगत असलेल्या मैत्री चौक ते डी.वाय.पाटील मेडिकल कॉलेजकडे जाणा-या मार्गास कै.धनंजय नाईक सर असे नाव देण्यास मान्यता देणेत यावी.

मा.अजित गव्हाणे - मा.महापौर साहेब, उपसूचनेला मी अनुमोदन देतो.

मा.राजू मिसाळ – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची एकूण ४ नाट्यगृहे महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात आहेत. सदर

नाट्यगृहात अनेक प्रकारचे वाणिज्य नाटके, सामाजिक उपक्रमे, शालेय कार्यक्रम तसेच शासकीय व राजकीय कार्यक्रम होत असतात. सदर नाट्यगृहामध्ये शासकीय कार्यक्रम मोफत होत असतात. व इतर कार्यक्रमाकरिता शुल्क अदा करावे लागते. महानगरपालिकेमध्ये नागरिकांमधून निवडून आलेले लोकप्रतिनिधी म्हणजे नगरसेवक हे शहरातील नागरिकांकरिता अनेक लोक उपयोगी उपक्रम राबवीत असतात परंतु त्यांना सदरची नाट्यगृहे या उपक्रमाकरिता वापरावयाचे असल्यास पूर्ण शुल्क भरावे लागते. सदरची उपक्रमे नागरिकांकरिता असल्याने व त्यामध्ये वाणिज्य विचार नसल्याने सदर उपक्रमांकरिता नाट्यगृह आरक्षित करताना शहरातील नगरसदस्य यांना शुल्कामध्ये स्वच्छता व वीज बिल वगळता इतर शुल्क माफ करणेच्या विषयास मान्यता देणेत यावी.

तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन इमारतीतील सार्वजनिक वाचनालय व स्पर्धा परीक्षा केंद्राचे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र १० मधील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले इमारतीच्या पहिल्या मजल्यावर सार्वजनिक वाचनालय व दुसऱ्या मजल्यावर स्पर्धा परीक्षा केंद्र तयार करण्यात आले असून सदर वाचनालय नागरिकांसाठी खुले करण्यात येणार आहे. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन इमारतीतील सार्वजनिक वाचनालयास " ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालय " असे व स्पर्धा परीक्षा केंद्रास " ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्पर्धा केंद्र असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच चिंचवड स्टेशन येथील ग्रेड सेप्रेटरला क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे ग्रेड सेप्रेटर असे नामकरण करणेस मान्यता देण्यात यावी.

तसेच प्रभाग क्र. ३ मध्ये खालील प्रकल्प/रस्ते नव्याने पुर्ण झाले असुन नागरिकांना माहिती होण्याच्या दृष्टीने त्यांचे खालीलप्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | ठिकाणाचे /प्रकल्पाचे नाव | नामकरण |
|---|---|---|
| १ | सर्वे न. २२७ आणि सर्वे नं. ११ येथील चौकाला नाव देणे. चऱ्होली बु. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, चऱ्होली बु. |
| २ | सर्वे नं. ४०५/१ (कोतवालवाडी चऱ्होली बु.) | राणी चौक (कोतवालवाडी चऱ्होली बु.) |

तरी वरीलप्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी. अप्पूघर ते सिध्दीविनायक नगरी रस्त्यास कै.आशा विश्वंभर गाथाडे मार्ग असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात यावी. निगडी येथील भक्ती शक्ती चौकाकडून निसर्ग दर्शन जाणा-या चौकास संविधान चौक असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी.

मा.अमीत गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, उपसूचनां स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ७१३ विषय क्रमांक – ५

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.कदम शशिकांत व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०४२८ दि.६/१०/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने बी.आर.टी. विभागामार्फत प्रभाग क्र. २५ व २६ येथे अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार ४५ मीटर डी.पी. रस्ता विकसित करण्यात येणार आहे. नुकतीच त्याची निविदा देखील प्रसिध्द झाली. त्यामध्ये सदरिल कामाचे शीर्षक हे "प्रभाग क्र.२५ मधील दत्तमंदिर, वाकड डी.पी.रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे" असे आहे. परंतू सदरिल रस्ता हा प्रभाग क्र. २५ व २६ मध्ये समांतर आहे. त्यामुळे सदरिल कामाचे शीर्षक तात्काळ बदलून ते "प्रभाग क्र.२५ व २६ मधील दत्तमंदिर, वाकड डी.पी.रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे" असे करणेस व सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात वरिलप्रमाणे नावात दुरूस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच थेरगाव परिसरात विविध कामात डांगे परिवारांचे मोठे योगदान आहे डांगे परिवाराने आपल्या महानगरपालिकेस डांगे चौक येथे बॅडमिंटन हॉल तसेच सांस्कृतिक भवनास विना मोबदला जागा आपल्या महानगरपालिकेस दिलेल्या आहेत. त्यांच्या कुटूंबियांच्या मागणीवरुन डांगे चौक येथील ग्रेड सेप्रेटरचे " कै.मथाई शंकरराव डांगे " असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रं. २० संत तुकाराम नगर येथील महेशनगर चौकास छत्रपती शिवाजी महाराज चौक व लगत असलेल्या मैत्री चौक ते डी.वाय.पाटील मेडिकल कॉलेजकडे जाणा-या मार्गास कै.धनंजय नाईक सर असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची एकूण ४ नाट्यगृहे महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात आहेत. सदर नाट्यगृहात अनेक प्रकारचे वाणिज्य नाटके, सामाजिक उपक्रमे, शालेय कार्यक्रम तसेच शासकीय व राजकीय कार्यक्रम होत असतात. सदर नाट्यगृहामध्ये शासकीय कार्यक्रम मोफत होत असतात. व इतर कार्यक्रमाकरिता शुल्क अदा करावे लागते. महानगरपालिकेमध्ये नागरिकांमधून निवडून आलेले लोकप्रतिनिधी म्हणजे नगरसेवक हे शहरातील नागरिकांकरिता अनेक लोक उपयोगी उपक्रम राबवीत असतात परंतु त्यांना सदरची नाट्यगृहे या उपक्रमाकरिता वापरावयाचे असल्यास पूर्ण शुल्क भरावे लागते. सदरची उपक्रमे नागरिकांकरिता असल्याने व त्यामध्ये वाणिज्य विचार नसल्याने सदर उपक्रमांकरिता नाट्यगृह आरक्षित करताना शहरातील नगरसदस्य यांना शुल्कामध्ये स्वच्छता व वीज बिल वगळता इतर शुल्क माफ करणेच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन इमारतीतील सार्वजनिक वाचनालय व स्पर्धा परीक्षा केंद्राचे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र १० मधील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले इमारतीच्या पहिल्या मजल्यावर सार्वजनिक वाचनालय व दुसऱ्या मजल्यावर स्पर्धा परीक्षा केंद्र तयार करण्यात आले असून सदर वाचनालय नागरिकांसाठी खुले करण्यात येणार आहे. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन इमारतीतील सार्वजनिक

वाचनालयास " ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालय " असे व स्पर्धा परीक्षा केंद्रास " ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्पर्धा केंद्र असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच चिंचवड स्टेशन येथील ग्रेड सेप्रेटरला क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे ग्रेड सेप्रेटर असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच प्रभाग क्र. ३ मध्ये खालील प्रकल्प/रस्ते नव्याने पुर्ण झाले असुन नागरिकांना माहिती होण्याच्या दृष्टीने त्यांचे खालीलप्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | ठिकाणाचे /प्रकल्पाचे नाव | नामकरण |
|---|---|---|
| १ | सर्वे न. २२७ आणि सर्वे नं. ११ येथील चौकाला नाव देणे. चऱ्होली बु. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, चऱ्होली बु. |
| २ | सर्वे नं. ४०५/१ (कोतवालवाडी चऱ्होली बु.) | राणी चौक (कोतवालवाडी चऱ्होली बु.) |

तरी वरीलप्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच अप्पूघर ते सिध्दिविनायक नगरी रस्त्यास कै.आशा विश्वंभर गाथाडे मार्ग असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच निगडी येथील भक्ती शक्ती चौकाकडून निसर्ग दर्शन जाणा-या चौकास संविधान चौक असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल --८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ६

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अतिरीक्त आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.प्रशा/१/कावि/९५७/२०२१, दि.१४/०९/२०२१
२) मा.विधी समितीकडील ठ. क्र.५६ दि.१७/९/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरीता स्थायी आस्थापनेवरील गट “अ”मधील रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात क्र.७३/२०१९ दि.१३/०९/२०१९ प्रसिद्ध करण्यात आली होती. न्यूरो सर्जन व प्लॅस्टीक सर्जन ह्या विशेषतज्ञ अभिनामाची रिक्त पदे भरणेकामी उमेदवारांचे वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रवर्ग व समांतर आरक्षण इत्यादि विषयक कागदपत्रांची तपासणी होणे आवश्यक असल्याने ऑनलाईनद्वारे अर्ज केलेले उमेदवारांना जाहिर निवेदन, ई-मेल द्वारे कागदपत्रे तपासणी व मौखिक मुलाखतीस उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी मौखिक मुलाखतीस उपस्थित राहीलेल्या व सेवायोजन

कार्यालयाकडील संकेतस्थळावरुन उपलब्ध झालेल्या उमेदवारांचे कागदपत्रांची पडताळणी व मौखिक मुलाखती दिनांक १८/०९/२०२० रोजी घेण्यात आलेल्या आहेत.

१) नामनिर्देशनाव्दारे अर्ज मागविण्याची पध्दती :- www.pcmcindia.gov.in या महापालिकेच्या संकेतस्थळामार्फत Online पध्दतीने

२) विशेषतज्ञ पदांची वेतनश्रेणी :- र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु. ७६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार)

३) नामनिर्देशनाव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल, उमेदवाराचे नाव, नेमणूक प्रवर्ग :- सोबतचे प्रपत्र “अ”नुसार

निवड समितीने उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेतल्या असून मुलाखती दरम्यान जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, अनुभव, विषयातील ज्ञान इत्यादीनुसार उमेदवारांना गुण देण्यात आलेले आहेत. सदर गुण तक्ता विचारात घेऊन सोबतचे प्रपत्र ‘अ’नुसार  पात्र उमेदवारांची निवड यादी सादर केली आहे. त्या यादीमधील न्युरो सर्जन व प्लॅस्टिक सर्जन अभिनामाची गट अ मधील पदे सरळसेवेने भरण्यास मान्यता देणेत यावी.

मा.हर्षल ढोरे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० यास शासनाची मान्यता प्राप्त आहे.

सदर सेवा नियमात “ भांडार विभागाकरीता” भांडार नियंत्रक (गट-अ) या पदाकरीता शैक्षणिक व अनुभव अर्हता निश्चित करणेत आली आहे. तरी त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास व सदर पद १००% पदोन्नतीने भरण्यासाठी सेवा नियमात शासन मान्यतेने दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत यावी.

## सुधारीत अर्हता

| अ.क्रं. | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | वेतनश्रेणी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकिय सेवा<br>(गट -अ) | भांडार नियंत्रक | पदोन्नती १००% | S 23<br>र.रु.<br>67700-208700 | १) मान्यताप्राप्त विदयापीठाकडील कोणत्याही शाखेचा पदवीधारक आवश्यक<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील भांडार अधिकारी (गट-ब) पदावरील किमान ३ वर्षे सेवा पुर्ण |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | झालेल्या अधिका-याची सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग-१, तज्ञ वैद्यकीय अधिकारी या पदावर डॉ. उज्वला सुमेध अंदुरकर या सन-२००५ पासून वैद्यकीय विभागात कार्यरत आहेत. त्यांची प्रथम नियुक्ती यशवंत चव्हाण स्मृती रूग्णालयात करण्यात आली होती. सदर कालावधी मध्ये वायसीएमएच रूग्णालय येथे भुलतज्ञ म्हणून विभागात कामकाज केले आहे. सध्या त्या भुलतज्ञ या पदावर कार्यरत आहे. शिवाय वर्ग-१, तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा ज्येष्ठता सुची क्र.१२/प्रशा/कावि/१९/२०२० अन्वये त्या " वैद्यकीय उपअधिक्षक" या पदोन्नतीच्या पदासाठी पात्र आहे. तरी डॉ. उज्वला सुमेध अंदुरकर यांना " वैद्यकीय उप अधिक्षक " या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग-१, तज्ञ वैद्यकीय अधिकारी, या पदावर डॉ. मनिषा राजेंद्रकुमार सुर्यवंशी या सन-२०११ पासून वैद्यकीय विभागात कार्यरत आहेत. त्यांची प्रथम नियुक्ती यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात करण्यात आली होती. सदर कालावधी मध्ये वायसीएमएच रूग्णालय येथे वर्ग-१ स्त्रीरोग तज्ञ म्हणून विभागात कामकाज केले आहे. सध्या त्या वर्ग-१, स्त्रीरोग तज्ञ या पदावर तालेरा रूग्णालय येथे कार्यरत आहे. शिवाय वर्ग-१, तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा ज्येष्ठता सुची क्र.१२/प्रशा/कावि/२२/२०२१ अन्वये त्या " वैद्यकीय उपअधिक्षक " या पदोन्नतीच्या पदासाठी पात्र आहे. तरी डॉ.मनिषा राजेंद्रकुमार सुर्यवंशी यांना " वैद्यकीय उप अधिक्षक " या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री.गणेश शंकर देशपांडे हे १९८८ साली आरोग्य निरिक्षक या पदावर नियुक्त झालेले असून २०१८ पासून सहा.आरोग्याधिकारी या वर्ग २ च्या पदावर कार्यरत आहेत. सहा.आरोग्याधिकारी पदाच्या सेवाजेष्ठता सूचीनुसार श्री.देशपांडे हे पदोन्नतीसाठी पात्र आहेत. सबब, श्री.गणेश शंकर देशपांडे, सहा.आरोग्याधिकारी यांना आरोग्य कार्यकारी अधिकारी अभिनामाचे पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत यावी.

मा.संदीप वाघेरे – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, उपसुचना स्विकारली आहे.

मा.संदीप वाघेरे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. साधारण दिड वर्षापुर्वी पीजी इन्स्टिटयूटसाठी ११८ ची निवीदा काढली होती आणि त्यातले आपण ५८ घेतले आणि ६० राहीले. मा.आयुक्त साहेब आपण जे पीजी चालू केल आहे. वास्तविक पाहता आपल्याकडे श्रीकर परदेशी साहेब होते त्यांनी पीजी इन्स्टिटयूट चालू करण्याच डोक्यात घेतल आणि त्यावेळेला त्यांनी ती प्रोसिजर

चालू केली म्हणजे साधारण पणे २०१२-१३ च्या दरम्यान. त्याच्यानंतर पीजी चालू होता होता २०१९ उजाडलं, म्हणजे सातवर्षे झाले त्याच्यात बरच काही काही झाल सात विषयाची मान्यता आली. प्रत्येक विषयात दोन लाख भरायचे होते, दोनच लाख भरले आणि सात विषय मंजूर करायचे म्हणून पण तो विषय तीथ लटकला गेला त्याच्यानंतर मा.हार्डीकर साहेब, डॉ. पंडीत तीथ गेले आणि डॉ.वाबळेना भेटले हे सगळ झालेल आहे. मा.महापौर साहेब, मला याच्यात असं म्हणायच आहे की आता आपल्याला प्लॅस्टिक सर्जरीचे डॉक्टर घ्यायचे आहेत पीजीआयचे आजून आपल्याला ६० डॉक्टर घ्यायचे आहेत. आपण वेगवेगळे पाच नवीन हॉस्पिटल केलेले आहेत. जिजामाता हॉस्पिटल आहे, थेरगावच हॉस्पिटल आहे, आकुर्डीच हॉस्पिटल आहे, भोसरीच हॉस्पिटल आहे असे पाच हॉस्पिटल केले आहेत. मा.महापौर साहेब, मला हे म्हणायच आहे की कोवीड काळामध्ये आपल्या महापालिकेच्या अस्थापनेवरील जे डॉक्टर होते त्यांनी चांगल काम केलं. म्हणजे वायसीएम मध्ये चांगल काम झाल का तर झाल, थोडस वाईट झाल का तर झालं. पीजीआयचे जे डॉक्टर होते म्हणजे प्रोफेसर, असिस्टंट प्रोफेसर किंवा एचओडी वगैरे काही नियुक्त केलेले आहेत आयुक्त साहेब, याच्यातले अनिकेत लाठी जर सोडलेतर बाकीच कुणाच म्हणाव असं काम नाही. याच्यामध्ये कटप्रॅक्टीस करणारे डॉक्टर्स डॉ.स्वामी, डॉ.वाघ, डॉ.सोनी हे वायसीएम मध्ये कट प्रॅक्टीस करतात म्हणजे आपण दोन तीन लाख रुपये तर त्यांना देतोच पण त्यांचे त्यांचे बाहेर उदयोग चालूच आहेत. इथले सिरीअस कंडीशनला आलेले पेशंट त्यांच्या हॉस्पिटलमध्ये पाठवतात. कोवीड काळात ब-याचशा डॉक्टरांनी असा बिझनेस केला. त्यावेळेला ५८ डॉक्टर्स घेण्यात आले त्यावेळेस जी काही कमिटी होती डॉ. लहाने, हार्डीकर साहेब आणि जे मेन एचओडी आहेत डॉ.पवन साळवी त्यांना त्याच्यात घेतल नाही. त्यावेळेला अति.आयुक्त संतोष पाटील होते त्यांना त्या कमिटीत घेतल ही कुठली पध्दत. बरं घेतलतर घेतल पण ३५ मार्क तोंडी परीक्षेचे आणि ६५ मार्क लेखी परीक्षेचे म्हणजे आता समजा माऊली थोरात माझ्या कनेक्टेडमधला विदयार्थी आहे मी त्याला ३५ मार्क दिले आणि आता लेखीमध्ये ५० मार्क पडले म्हणजे दोन्ही मिळून ८५ मार्क झाले आणि केशव घोळवे आले त्याला पण दोन्ही परीक्षेमध्ये २० मार्क दिले आणि इकड मी ५० मार्क दिलेतर एकूण ७० मार्क झाले. म्हणजे मला माऊलीला सिलेक्ट करायच होतं अशा पध्दतीने ही सिलेक्शन कमिटी झाली बाकीचे बरेच उदयोग झाले त्यावेळेला योगेशभाई पण भरपूर बोलले, मी पण बोललो विषय मंजूर करु नका वगैरे वगैरे सगळया गोष्टी झाल्या तरी विषय मंजूर करण्यात आला. मला त्यावेळेला आमच्या नेतेमंडळीचे पण फोन आले. आयुक्त साहेब परिस्थिती अशी आहे की या सगळया विषयामध्ये वेगवेगळया लोकांचे फोन वगैरे येवून तो दबावामध्ये विषय मंजूर करण्यात आला. त्याच्यानंतर योगेश भाई आणि मी म्हणजे ते राष्ट्रवादीचे मी बीजीपीचा असं म्हणून नाही पण सर्वसामान्य जनतेचे पैसे कर रुपाने जमा होणार आहेत म्हणून आम्ही कोर्टामध्ये पिटीशन दाखल केलं. कोवीड काळ होता डॉक्टरांची आपल्याला गरज आहे म्हणून मी थांबलो पण ते आता मी मुव्ह करायला आलो. आता आपण हे जे चार पाच हॉस्पिटल उघडले आहेत आणि सगळयात महत्वाच आपल वायसीएम हॉस्पिटल जे आहे याच्यासाठी आपण पीजी आणलेल आहे, पीजीसाठी वायसीएम नाही. पण आपले आतापर्यंतचे डॉक्टरानी कोवीड काळात तीथ चांगल काम केल आहे कुणीही सांगेल. कालच एक उदा. सांगतो सोनल चव्हाण म्हणून पिंपळेनिलख मधली तेरा ते चौदा वर्षे वयाची मुलगी डेड झाली तीच वीस हजार रु. बील होतं. तीथ मी बाकी सगळयांना फोन केले, डॉ. वाबळेंचा फोन लागला नाही तीन वेळा ट्राय केला, मॅसेज सोडला तरी रिकॉल आला नाही. नंतर अनिकेत

लाठीला फोन केला. पहील म्हणजे मयत माणसाच आपण काही घेत नाहीत परत ती आपल्या हद्दीतली होती बाहेरची नव्हती तरी तीथ सांगण्यात आल की ३० टक्के नगरसेवकांच आहे म्हणून आम्ही माफ करु. परंतु त्या माणसाची गरीब परिस्थिती आहे, मग डॉ. लाठीला सांगीतल डॉ.लाठीन तीथ सीएमओला सांगीतल या सगळया गोष्टी झाल्या व ते बील माफ झालं. आपल्या पिंपरी चिंचवड मधल्या माणसाची ही परिस्थिती असेलतर बाहेरुन केरळ मधुन इकडून तीकडून पंचक्रोशीतली माणस इथ आलेले आहेत. सगळयात महत्वाच रात्रीचा पेशंट आला किंवा दिवसाचा आला एक आमच्या इथला मोना अंकल म्हणून आहेत हेल्दी आहे. ऑपरेशन थेटरवरती नेल त्याला बेडवरती झोपवील तो बेड तुटला. त्याच्यानंतर त्याला ऑपरेशनला पाठवल ते ससूणला अशी बरीच परिस्थिती आहे की पीजीआय चालू झाल्यानंतर तीथ कुठलीही ट्रिटमेंट होत नाही. फक्त सुटाबुटात सगळेजण येणार इंग्लीश टॉकींग करणार कारण की ब-यापैकी आम्हांला इंग्लीश चांगल कळत नाही, अशा पध्दतीने ते काम करणार आणि तुम्हांला येवून तीथ काहीतरी सांगणार की सर आपण असं करु तसं करु तुम्ही पण म्हणणार हो खरच चांगल आहे. लोकांना ज्या सुविधा पाहीजे त्या दया आता जिजामाता हॉस्पिटल चालू करुन बरेच दिवस झाले तीथ आपण व्हेन्टीलेटर बेड वगैरे पण दिलेत. सीएसआर माध्यमातून पण आलेत सगळया गोष्टी झाल्या. आज तीथ एखादी प्रेगनंन्ट बाई आली डिलेव्हरीसाठी तर अजून आपण तीथ ऑपरेशन थेअटर चालू करु शकलो नाहीत. आतापर्यंत महापालिकेच्या अस्थापनेवरती ओव्हर ऑल डॉक्टर किती आहेत. साधारणपणे ४५० ते ५०० डॉक्टर्स आहेत अशी माझी ऐकीव माहीती आहे खर खोट काय आहे हे मला माहीती नाही. म्हणजे शिकणारे विदयार्थी जे प्रोफेसर, असीस्टंट प्रोफेसर आणि आपले जे अस्थापनेचे डॉक्टर्स असे सगळे मिळून किती आहेत. मग हे नेमके करतात काय आपण हे सगळे आतापर्यंत इम्प्लीमेंट करायला पाहीजे होतं. आयुक्त साहेब या शहराच हे पोटॅन्शिअल आहे हे स्वत:च स्वत: उपजिवीका करु शकतं. इथ लोकांना जर सुविधा चांगल्या भेटल्या, आरोग्याच्या पण सुविधा चांगल्या भेटल्या, पर्यावरणाच्या जर सुविधा चांगल्या भेटल्यातर हे शहर सिंगापूर होवू शकतं, मनात आणलतर. आयुक्त साहेब तुम्ही पर्सनल लक्ष दया. पिंपरी चिंचवड मध्ये जे काही लोक राहणार आहेत किंवा बाहेरचा जर मयत झालातर त्याच्याकडन आपण पैसे घेत नाहीत तरी त्या सोनल चव्हाण यांची आडवणूक केली याची मा.महापौर साहेब, तुम्ही माहीती घ्यायला लावा आणि कारवाई करा. सर्वात महत्वाच म्हणजे जसं वायसीएम हॉस्पिटल पहील होतं म्हणजे ते महापालिकेच्या अस्थापनेमध्ये चालायच वायसीएमसाठी पीजीआय चालू केलेल आहे त्यांच्या अंडरमध्ये सिस्टीम चालू आहे. आता साहेब, परिस्थती अशी आहे की आपले १२८ नगरसेवक आहेत यांना कुणाला माहीत नाही फक्त तेवढे डॉ. वाबळे माहीती आहेत. अस्थापनेचे डॉक्टर आपल्या इथे रॉय असतील, पवन साळवे असतील, गोफणे असतील किंवा दादेवार हे अस्थापनेचे डॉक्टर्स सर्वांना माहीती आहेत. पीजीआयचे डॉक्टर फक्त वाबळे सोडलेतर कुणालाच काही माहीती नाही. वायसीएम हे महापालिकेच्या अंडरमध्येच घ्याव पीजीआय चालू केलेल आहे त्याला तीन वर्षाचीच मान्यता आहे दर तीन वर्षानी आपल्याला मान्यता घ्यायची आहे. आपण जे डॉक्टर किंवा प्रोफेसर, असिस्टंट प्रोफेसर भरले आहेत जर पुढच्या तीन वर्षात मान्यता कॅन्सल केलीतर त्या डॉक्टरांच काय होणार. शेजारीच डी.वाय.पाटीलच पीजीआय चालू आहे ६५० कर्मचारी तीथ मानधनावरती काम करतात आणि जी ऍड करायला पाहीजे होतीना ती राज्यशासनाच्या लेव्हलवरती करायला पाहीजे होती आणि त्याची परीक्षा एमसीएनी घेतली असती. सर्वात महत्वाच जे इथ त्या काळात मानधनावरती डॉक्टर आले

होतेना त्यात ८५ ते ९० टक्के त्यांचच सिलेक्शन झालं बाकीचे जे बाहेरुन आलेले आहेत त्यांच सिलेक्शन झालेल नाही. तुम्ही जे मानधनावरती डॉक्टर आले होते त्यांची लीस्ट आणि यांची लीस्ट काढून बघा. तुम्हांला जर ८० टक्क्याच्या वरती मॅच नाही झालीतर तुम्ही म्हणाल ते आम्ही ऐकू. हे सगळ लांगेबांध्यामुळ या गोष्टी झालेल्या आहेत. आयुक्त साहेब तुम्ही थोडशे स्ट्रिक्ट आहेत असं सांगतात आणि तो स्ट्रिक्टपणा तुमचा दिसला पाहीजे. हे जे डॉक्टर भरले आहेत ते दोन वर्षे प्रोबेशन पिरीएड वरती आहेत म्हणजे अजून त्यांचे सहा महीने राहीलेले आहेत त्याच्यामध्ये आपण निर्णय घेवू शकतो. मा.महापौर साहेब, तुम्ही क्लेअरकट या गोष्टींचा आदेश दया एवढ बोलून थांबतो, जयहींद जय महाराष्ट्र.

मा.आशा धायगूडे-शेंडगे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. खरतर मगाशी मा. खासदार अमोलजी कोल्हे हे मला असं वाटल इथून ते गेले म्हणून मी त्यांचा नामोल्लेख केला नव्हता, तरी संपुर्ण सभागृह आणि खरतर आज मा.कोल्हे साहेब आल्यामुळे आपण सगळेजण बोललो आणि इथल सभागृह कस चालतय याची पाहणी मा.खासदारांच्या माध्यमातून केली जाते. मा.महापौर साहेब, आता ख-या अर्थाने संदीपने बरच काही सांगीतल आणि त्याच्यावरती मी पुन्हा काही अजीबात चर्चा करणार नाही परंतु त्यांनी बोलताना सांगीतल की वाघ सारखे डॉक्टर सन्मा.महापौर साहेब, खरच पहा की ते महानगरपालिकेच्या वायसीएम हॉस्पिटलमध्ये असतात का? आणि मागच्यावेळेस तुम्हीच पिठासीन अधिकारी असताना सन्मा.आयुक्त साहेबांना आदेश दिले होते की आपण महानगरपालिकेच्या सेवेत असूतर आपण खाजगी प्रॅक्टीस करु शकतो का? आपले जे जुने डॉक्टर्स आहेत त्यावेळेस जे जे डॉक्टर्स, हो त्या सगळयांवर महानगरपालिकेनी कारवाई केली होती मग हे पीजीआयचे डॉक्टर आपल्या महानगरपालिकेची सेवा करण्यासाठी आलेत त्यांच्याकडून सेवा करुन घेतली पाहीजे उलट किंबहूना आपल्या डॉक्टरापेक्षा यांचा पगार सुध्दा जास्त आहे पण ठिक आहे त्याच्यावरती आपण बोलण्यात अर्थ नाही परंतु नियमाला धरुन याठिकाणी मा.आयुक्त साहेब काम होणं आवश्यक आहे. माझ्या माहीतीनुसार डॉ.वाघ साहेबांच तुम्ही रेकॉर्ड पाहीलतर ते महानगरपालिकेच्या वायसीएम रुग्णालयामध्ये, तीथल साहेब टिव्हीच फुटेज मागवाना ते कितीवेळ त्या दवाखान्यामध्ये असतात किती पेशंट त्यांनी तपासले हे सगळा चार्ट असतो मला सांगालतर मी आणुन देते. ते कोणत्या महीन्यात कितीवेळ वायसीएम हॉस्पिटलमध्ये असतात त्यांनी किती पेशंट तपासले, समजा मी डॉक्टर म्हणून आहे तर माझी जबाबदारी असेल त्या फ्लोअरची तर त्यांच्या सहया किती ठिकाणी आहेत याची आपण पाहणी करावी. आपण किती खर्च करतो, डॉक्टर्स किती नेमले, कितीला किती पगार देतो हे महत्वाच नाही परंतु आयुक्त साहेब याठिकाणी वायसीएम जर का दवाखाना आपला आहे तर त्याठिकाणी डायलेसिसची हेपॅटायटीस-बी साठीची मशिन आपल्याकडे शहरामध्ये उपलब्ध नाही. आपण हजारो, कोटयावधी रुपयाच टेंडर काढतो परंतु जर हेपॅटायटीस-बी चा पेशंट आपल्याकडे आला आणि त्याला डायलेसिस लागत असेलतर आपल्याला इथून ससूणला त्या पेशंटला पाठवाव लागतं, का एवढी अवहेलना ? ज्यांना भाजल त्यांना आपण पुण्यात पाठवतो इथपर्यंत ठिक आहे. परंतु हेपॅटायटीस-बीच्या पेशंटना डायलेसिस लागण ही आजकालची खुप कॉमन गोष्ट होत चाललेली आहे आणि हयासाठी जर आपण कधी विचारणा महानगरपालिकेत केलीतर आपल्याला असं ऐकायला मिळत की हेपॅटायटीस-बी साठी आपल्याकडे कोणतही डायलेसिसच मशिन नाही तरी आपण त्वरीत आदेश दयावेत की

हेपॅटायटीस-बी साठी जी काही मशिनरी असेल, जो काही खर्च लागणार असेल तो त्वरीत महानगरपालिकेनी केला पाहीजे जेणेकरुन शहरातील नागरीकांसाठी सुविधा उपलब्ध होईल, धन्यवाद.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. मा.आयुक्त साहेब मलाही आपल्याला विनंती करायची आहे की वायसीएम सारख हॉस्पिटल हे संबंध महाराष्ट्रामध्ये ओळखल जातं. पुणे जिल्हयातूनच नव्हेतर संबंध महाराष्ट्रातून गोरगरीब पेशंट तीथे येत असतात आणि आताच संदीपने उल्लेख केल्याप्रमाणे हया पध्दतीने जी डॉक्टरांची भरती झाली त्या भरती बद्दल आम्ही ओरडून दमलो परंतु जे चुकीच करायच ते केल, एजबार झालेले डॉक्टर सुध्दा घेतले गेले. आपल्या डॉक्टरांना बाजूला ठेवून दुस-या डॉक्टरांना त्या वेळेला आलेल्या लोकांना वेगळया मार्गाने, थोडक्यात भ्रष्टाचाराच्या मार्गाने मार्क देवून सरळ करुन घेतल गेलं. आता जे काही जुने डॉक्टर आहेत त्या जुन्या डॉक्टरांना तुम्ही न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे त्याबद्दल आपल अभिनंदन. परंतु आयुक्त साहेब आपल्याला एक विनंती अशी आहे की तुम्ही नसताना तुमच्या आदि साधारणत: वर्ष दोन वर्षामध्ये जी काही घाण झालेली आहे त्याबाबत आम्ही ओरडतोय त्याच्या कागदपत्राचे पुरावे आहेत त्याकड तुम्हांला कुठेतरी लक्ष घालाव लागेल. दुसरी गोष्ट आशाताईनी सांगीतल्याप्रमाणे डायलेसिसची अवस्था वाईट आहे, संदीपने सांगीतल्याप्रमाणे आज आपल्याकडे जेवढे पीजेचे डॉक्टर्स भरलेले आहेत पोस्ट ग्रॅज्यूएट डॉक्टरांची आता आपल्याकडे जी टिम आहे परंतू ऑपरेशन थिएटरची काय अवस्था आहे, ते जुने टेबल, मागच्यावेळेला ऑपरेशन होतेवेळेस टेबल तुटला, मागे अख्खा लॅंप पेशंटवर वरुन पडला, सुदैवाने पेशंट दगावला नाही, एवढी वाईट आणि दयनीय अवस्था ऑपरेशन थिएटरची आहे आणि एवढे पेशंट म्हणजे गायनीकसाठी आपल्याकडे गर्दी असतेच असते. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब एक एक पेशंटला शुक्रवार दिला जातो म्हणजे त्याला आज त्रास असेलतर त्याला दहा दिवसाची तारीख दिली जाते आणि दहा दिवसानंतर त्याला पुन्हा सांगीतल जातं की एमर्जन्सी पेशंट घेतला गेला तुला पुन्हा आठ दिवस पुढे गेली अशी वाईट परिस्थिती आज वायसीएमची आहे. दुस-या बाजूला आपण मोठमोठे हॉस्पिटल काढतो. बाकीच्या कामावर आपण कोटयावधी रुपये खर्च करतो आणि आज वायसीएमकडे आपण दुर्लक्ष करतो. मग एवढे पगार देवून आपल्याला डॉक्टर घ्यायचे आहेत आणि नागरीकांची गैरसोय करायची आहेतर मग कशाला करायच आपण हे. मा.महापौर साहेब, तेथील ओटी सुधारले पाहीजे. डॉक्टरांसाठी साधी स्कोपी नाही त्यासाठी हे डॉक्टर सांगतात की तुम्ही जर इथ केलतर चिरफाड करावी लागेल आणि एवढा खर्च जातो आणि तुम्हांला मध्ये वेदना होतील, तुम्हांला सेफ्टीक होवू शकत, तुम्हांला अमुक होवू शकतं. तुम्ही माझ्याकडे प्रायव्हेट हॉस्पिटलला या तुमच साठ हजारामध्ये काम होईल, तुमच स्कोपी करतो फक्त तुम्हांला दोन टाके पडतील, दोन दिवसामध्ये तुम्हांला डिस्चार्ज देतो अशा प्रकारचा व्यावसाय ही मंडळी करतात. संदीपने सांगीतल्याप्रमाणे, ताईनी सांगीतल्याप्रमाणे डॉक्टरांची आयुक्त साहेब तुम्ही माहीती घ्या की किती डॉक्टर काम करतात. मागच्यावेळेला त्या ठिकाणी डीन साहेब बसले होते डीन साहेबांना सांगीतल की तुम्ही माहीती घ्या की किती डॉक्टर्स काम करतात आणि जे खरच काम करतात त्या लोकांचे मा.आयुक्त तुम्हांला त्यांचे पत्र आहेत. तुमच्या पर्यंत ते पत्र येतात का नाही हे मला माहीती नाही. वायसीएममध्ये आपण ऑक्सिजनचे प्लॅन्ट लावलेले आहेत ती ऑक्सिजनची जी लाईन आहेना ती जवळपास बावीस वर्षापुर्वीची जूनी लाईन आहे ती सगळी लाईन तुम्हांला बदली करावी

लागणार आहे फक्त टँक घेवून काही होणार नाही. कुठतरी एखादयावेळेस ती लाईन भष्ट होईल, चोक होईल काहीतरी होईल त्याच्यामुळे येथून मागे दोन वर्ष पत्र दिल, तुम्ही आल्यानंतर पत्र दिल नाही परंतु तुम्ही माहीती घ्या की काय परिस्थिती आहे. आपण आज दुसरीकडे अजून एक टाकी बसवायची म्हणतो, बाकी ठिकाणी आपण बसवली मान्य आहे परंतु तीथली दुरुस्ती ही तुम्हांला करावीच लागेल. ओ.टी. तुम्हांला दुरुस्त करावे लागतील. त्याठिकाणी आता सांगीतल्याप्रमाणे डायलेसिसची परिस्थिती अतीशय भयंकर आहे. आज तीथ आपण कॅन्सरचा पेशंट ट्रिट करत नाहीत तो आपण बाहेर पाठवतो. आपण काय करतो प्राथमिक उपचारासाठी सिया मशिनद्वारे बघतो ती सिया मशिन सुध्दा बंद आहे. कितीतरी मशिन्स अशा आहेत की छोटया छोटया कारणासाठी त्या बंद आहेत. मा.आयुक्त साहेब प्रत्येक मशिन्सच एक लाईफ असतं आणि त्या नंतर त्याला बदलल गेलच पाहीजे. अस असताना सुध्दा आज वायसीएम मधले जे इन्स्ट्रूमेंटस आहेत ते पंधरा- सोळा वर्ष जुने इन्स्ट्रूमेंटस आहेत त्याच्यावरच डॉक्टरांना काम कराव लागतं, वास्तविक पाहता त्याची लाईफ संपलेली आहे. ते इन्स्ट्रूमेंटस बदललेच गेले पाहीजे परंतु वाईट परिस्थिती आणि अतीशय दयनीय परिस्थिती आहे. दुस-या बाजुला आपण त्यांना स्टाफ देतो, त्यांना पॅरामेडीकल स्टाफ देतो, त्यांना बाकीचे डॉक्टर दया हे सगळ देतो आपण ते बरोबर आहे ही लोक तीथ बसून पेशंट दुसरीकडे पाठवतात किंवा स्वत:च्या हॉस्पिटलला बोलवतात. आता शेंडगे ताईनी सांगीतल्याप्रमाणे या सगळया लोकांकडून बॉण्ड लिहून घ्या, जसे आमच्या डॉक्टरांकडून बॉण्ड लिहून घेतले होत तसे यांच्याकडून बॉण्ड लिहून घ्या. एखादा उपचार आपल्याकडे होतच नाही तो रेफर केल्यानंतर ती सुध्दा डिनची परवानगी घेवून रेफर केल पाहीजे, परस्पर यांनी रेफर केल नाही पाहीजे. परस्पर रेफर करायचा यांनी व्यावसाय सुरु केलेला आहे. ओ.टी. मध्ये लागणार जे बाकीच मटेरीअल आहे त्या मटेरीअलचा पण यांनी व्यावसाय सुरु केलेला आहे त्यामध्ये यांना कमिशन पाहीजे अशी स्थिती वायसीएमची आहे. मी आपला जास्त वेळ घेत नाही, आयुक्त साहेब मी आपल्याला डिटेल्समध्ये पत्र देईल कृपया आपण वायसीएममध्ये लक्ष घालाव, धन्यवाद.

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका, तसेच मा.खासदार अमोलजी कोल्हे हे उपस्थित आहेत त्यांच पण स्वागत करते. वायसीएमचा विषय आला की माई आमच्या प्रभागातील एक मोठा विषय येतो कारण माझ्या प्रभागामध्ये यशवंतराव चव्हाण रुग्णालय आहे. मला वाटत वायसीएम हे पीसीएमसीच्या प्रत्येक नागरीकाचा श्वास आहे. आज आपण डॉक्टरची भरती करतो पण डॉक्टरची भरती करत असताना ती कुठल्या पध्दतीने करतो हे माझ्या दोन सहकार्यानी तुम्हांला सांगीतल कारण त्या भरतीमध्ये झालेला भ्रष्टाचार हा जवळ जवळ सगळयांनाच ज्ञात आहे. पण ज्यावेळेला आपण भरती चालू करतो ती चालू करत असताना आपण पीजीला लागणा-या इन्फ्रास्ट्रक्चरचा कधीही विचार केला गेला का. की आपण एक मेडीकल कॉलेज चालू करतो आणि मेडीकल कॉलेजच्या अनुषंगाने आपण फक्त तीथे नॉर्म्स काय होणार, त्या नॉर्म्सचा वापर कसा केला जाणार, त्या नियमामध्ये आपल हॉस्पिटल बसत का, तेवढे नियमामध्ये हॉस्पिटल बसवण्याचा प्रयत्न केला. पण त्यानंतर मात्र त्या हॉस्पिटलकडे दुर्लक्ष करण्यासाठी करण्याचा प्रयत्न सुरु झाला. आज दोन वर्षे कोवीडमध्ये सगळया डॉक्टर्सनी काम केल, नर्सेसनी काम केलं पण मा.महापौर तुम्ही तीथे जावुन कधीतरी अवस्था बघीतली असेल की तीथली नर्स आहेना ती बारा बारा तास उभी असते. ती जेव्हा नर्स उभी असतेना तीच्या बरोबर असलेला तो टेबल आहेना तो सुध्दा तीच्या उंचीचा नसतो आणि ती त्या

पध्दतीने ती सुध्दा आयुक्त साहेब आज त्या सगळया शारीरीक दृष्टिकोनातून आणि मानसीक दृष्टिकोनातून सुध्दा त्या खुप हालाकीच्या परिस्थितीमध्ये जगतात. आज आपण बघीतलतर बारा तासाला तुम्ही एक डॉक्टर दिला, बारा तासामध्ये एक डॉक्टर डयुटी करतो तीथे. दोन माणसच दिले तुम्ही रात्रीला त्या डयुटीवर फक्त एक नर्स दिली आणि एक डॉक्टर दिला. एका वॉर्डामध्ये कमीत कमी सातशे बेड आहेत वायसीएमचे. ते वायसीएमच सातशेच बेड हे सातशेच नसततर ते बाराशे ते पंधराशेमध्ये कन्व्हर्ट झालेल असतं तर हया नर्सेस कुठल्या पध्दतीने काम करणार आहेत. मला त्यादिवशी माझ्या वॉर्डामधला एक पंचवीस वर्षाचा मुलगा अभिजीत पोतरकर गेला. अभिजीत गेल्यानंतर जी परिस्थिती वेळेला कॅज्यूलटीमध्ये होती ती परिस्थिती सांगण्यासारखी नाही. डॉक्टर्सना बोलवायला सुध्दा वीस ते पंचवीस मिनीटे लागलेत. आम्हांला असं वाटतय की जर वीस ते पंचवीस मिनीटाच्या अगोदर ते डॉक्टर्स आले असतेतर एखादयावेळेस ते पोरग आमच वाचल असतं. आज ज्या पध्दतीने नर्सेस काम करतात, अक्षरश: आयुक्त साहेब रडकूंडीला येवून तीथला पॅरामेडीकल स्टाफ काम करतो. आज आपल्याकडे तीकडे ऍक्सिडेंटल केसेस सगळयात जास्ती असतात. ऍक्सिडेंट केसेस झाल्यानंतर त्यांच्यासाठी काही इम्प्लान्ट लागतात ते इम्प्लान्ट आल्यानंतर तीथे काही असे एजंट आहेत ते एजंट ऑलरेडी ऑपरेशन थिअटरमध्ये जावून ते तीथे इम्प्लान्ट देण्याच काम करतात. आज वायसीएममध्ये येणारा रुग्ण हा गरीब रुग्ण आहे, फिनान्शिल कंडीशन त्याची अतीशय हालाखीची आहे तो पेशंट तीथे येत असतो आणि त्या पेशंटला तो इम्प्लान्ट समजा पाच हजाराचा असेलतर तो पंधरा हजार रुपयापर्यंत घ्यायला लागतो. माझी आयुक्त साहेबांना एक विनंती आणि विचारना आहे की आतापर्यंत इम्प्लान्टच टेंडर का काढल गेल नाही. महात्मा फुले योजनेमध्ये इम्प्लान्ट बसवले गेले का नाही, त्या पध्दतीने गोरगरीबांच काम का केल गेल नाही. मागे एक इम्प्लान्टच तुम्ही टेंडर काढल होत पण ते टेंडर असं काढल होत की स्क्रू एकाला तर माझी विनंती आहे माई आपण आयुक्तांना आदेश दयावेत आणि इम्प्लान्टसच लवकरात लवकर टेंडर काढून त्या गोरगरीब रुग्णांसाठी महात्मा फुले योजने अंतर्गत ते काम कराव. माई, ज्या पध्दतीने आपण काम करतो, ज्या पध्दतीने आठ हॉस्पिटल झाली आपली, अठ्ठावीस ओपीडी झाल्या, मी दोन दिवसापुर्वी आयुक्तांना एक लेटर दिलय की हया ओपीडी रवीवारी बंद असतात. तरी आयुक्त साहेब कृपया एक डॉक्टरी तरी रवीवारी देवून या ओपीडी बंद करु नका. पंचवीस लाख नागरीक असलेली ही पीसीएमसी आहे, आपल्याकडे दहा झोपडपट्टया आहेत त्याच्यामध्ये जर तुम्ही नागरीकांची संख्या बघीतलीतर ती कितीतरी हजारोंच्या संख्येमध्ये जाते. म्हणजे त्या दिवशी जर ओपीडी चालू नसेलतर खाजगी रुग्णालयामध्ये जावून तेवढे पैसे देण्याची त्यांची ताकद नाही. माझी आयुक्तांना विनंती असेल की रवीवारच्या ओपडी चालू ठेवा निदान एक डॉक्टर तरी तीथे तुम्ही दयावा ही माझी नंम्र विनंती आहे. आताच माझ्या एका सहकार्यानी ऑपरेशन थिएटर बद्दल बोलले, आज आपण म्हणतोय अगदी मॉडयूलर ऑपरेशन थिएटर करणार पण आज ऑपरेशन थिएटरची जर वायसीएमची परिस्थिती पाहीलीतर वायसीएमच्या ऑपरेशन थिएटरमध्ये अक्षरश: कुठल्या पध्दतीने रुग्णांच ऑपरेशन करायच हे आपल्याला बघुन त्यांना टेन्शन येतं. दोन महीन्यापुर्वीचा विषय आहे माझ्या आईचच ऑपरेशन तीथे झाल त्यावेळेला जी स्कोपी होती ती बंद पडली, त्यावेळेला डॉ.थोरात वगैरे असतील त्यांनी त्यांच स्वत:च प्रायव्हेट इन्स्ट्रूमेंट आणल्यामुळे त्यावेळेला ते ऑपरेशन करण्यात आलं. पण समजा इथे जर दुसरा कुणी रुग्ण असतातर ही जर अव्हेलॅबिलीटी अव्हेलेबल झाली नसती तर आयुक्त साहेब आपण काय केल असतं. आज जर तीथे बेडची अवस्था बघीतलीतर माई तीथे दो-या

बांधुन ठेवल्यात बेडला. आपण एवढा पैसा खर्च करतो आणि बेडला दो-या बांधुन ठेवल्यात. एखादयाला श्वास घ्यायला त्रास होत असेलना तर खालून आपल्याला पेव्हींग ब्लॉक किंवा विटा ठेवाव्या लागतात तेव्हा तो बेड वरती येतो. आता आपण मॅकेनाईज बेड घेतलेले आहेत पण त्या मॅकेनाईज बेडची अवस्थाजर पाहीलीतर आयुक्त साहेब आपल्याला रडू कोसळतय की आपण गोरगरीबांच्या आपल्याच करदात्यांच्या पैशामधुन घेतलेल्या वस्तूंची ही अवस्था कुठल्या पध्दतीची आहे. आज जेव्हा पीजी केल तेव्हा ऑपरेशन थिएटरमध्ये आपल्याला त्यांच्या नॉर्म्स प्रमाणे अगदी सिजर पासून सगळे इन्स्ट्रूमेंटस दयावे लागतात पण आपल्याकडे कुठलही एकही इन्स्ट्रूमेंटस त्या पध्दतीच नॉर्म्समधल नाहीच. आज आपण रुबी एलकेअर चालवतो, चांगल्या प्रकारे रुबी एलकेअर चालवल जात, कमी पैशामध्ये हार्टच्या पेशंटसाठी काम केल जातं. एका आठवडयाला फक्त दोन ऑपरेशन तीथ होतात. आपल्याकड लहान मुलांचा सर्जन नाही. थोडया दिवसापूर्वी एक बाळ जन्माला आलं त्याची अन्ननलीका नव्हती आणि त्याच्या पाठीला होल होता त्यावेळेला आपल्याला त्या बाळाला ससूणला पाठवाव लागलं. आपण एवढा मोठा गाजावाजा करतोय की आम्ही पीजी केल, आम्ही एवढे डॉक्टर्स घेतो, आम्ही या पध्दतीने जातो, स्पेशालीस्ट येतात. आताच माझा सहकारी संदीपभाऊ ज्या पध्दतीने बोलला, खरोखरच काही डॉक्टर्स फक्त नावाला आहेत. कोवीडच्या काळामध्ये फक्त जसा आपला एखादा प्रोफेसर असतो, आपण म्हणतो नाही का शाळेचा प्रिन्सिपल आहे तो प्रिन्सिपल शिक्षकाना सांगत असतो की हे हे करा त्या पध्दतीचे बरेचसे डॉक्टर्स तीथे आहेत. फक्त सांगीतल जात पण त्यांच्याकडून काही होत नाही. खरोखर ज्या पध्दतीने आपल्या पहील्या जून्या डॉक्टर्सना बॉण्ड लिहून घेतले तसे त्यांच्याकडून सुध्दा बॉण्ड लिहून घेतला पाहीजे आणि त्यांनी सुध्दा बाहेर खाजगी कुठलेही काम करता कामा नये. माई आपल्याला या गोष्टीवर फार लक्ष दयाव लागेल. आपण गोरगरीबांसाठी काम करतोय पण ते खरोखर वायसीएम असेल किंवा बाकीचे जी आपली हॉस्पिटल झालेली आहेत ती खरोखर फक्त गोरगरीबांसाठी त्यांच्या उपयोगात येतात का. आज जर बघीतलतर आपल प्रसूतीगृह आहे ते फार चुकीच्या पध्दतीने पहील्यापासून ठेवल्या गेल आहे. आज एखादी बाईजर वेदनेनी कळवळत असेलतर बाहेर एखादया खीडकीमधुन एखादा पुरुष सुध्दा आतमध्ये डोकावत असतो त्याबाईची काय अवस्था आहे ते बघायला. त्यावेळेला लाज वाटते आयुक्त साहेब आम्ही ब-याचदा या गोष्टीवर सुध्दा चर्चा केली आहे आणि आज आपण अत्याधुनिक प्रसूतीगृह करणार कधी. त्या बाईला ज्या वेदना होतात, आम्ही सिजर करुन मोकळे होतो पण अत्याधुनिक प्रसूतीगृह कुठल्या पध्दतीने करणार त्या बरोबर त्या बाईच्या सिक्यूरीटी पेक्षा त्या बाईला कुठल्या पध्दतीने आतमध्ये ट्रिट केल जातं याच तुम्हांला गांभीर्य ओळखता आल पाहीजे. आज दोन दिवसापूर्वी मी एका बाईसाठी ज्यावेळेला डिलेव्हरी वॉर्डमध्ये गेले होते, आयुक्त साहेब तीथ चार खीडक्या आहेत त्या चार खीडक्यामध्ये डिलेव्हरी होण्याच्या अगोदर ज्या रुम मध्ये ठेवल जातं किंवा रिकव्हरी रुममध्ये ठेवल जातं, माई त्या खीडकीमधुन सर्व पुरुष डोकवत होते ठिक आहे एखादे स्वत:च्या बहीणीला बघत असतील, आईला बघत असतील, बायकोला बघत असतील पण त्याच बरोबर बाकीच्या बायका तीथे डिलेव्हरीसाठी आलेल्या असतात त्यावेळेला त्या बायकानी कुठल्या पध्दतीने जगायच. आज आपण सिक्यूरीटीला तीन एजन्सी दिल्यात. आज आपल्याकडे मिलीटरी रिटायर लोक सुध्दा तीथे सिक्यूरीटीमध्ये आलेले आहेत जे आयसीयूच्या बाहेर बसतात. आम्हांला पण कधी कधी लाज वाटते की त्यांना कुठल्या पध्दतीने मोठयानी बोलायचं कारण देशभक्ती त्यांनी केलेली आहे, देशासाठी त्यांनी सेवा केलेली आहे ती लोक आपल्या समोर बसलेली असतात. मग ज्या

त्या सिक्युरीटीच काम काय, अक्षरश: रेबनसारखा गॉगल्स घालायचा, सिंगम सारख बसायचं, काठी हातात हालवायची म्हणजे सिक्यूरीटी होते का याचा सुध्दा आपल्याला विचार करावा लागेल. फक्त डामडोम करुन चालणार नाही, डॉक्टर्स घेवून चालणार नाही त्याच्या बरोबर पॅरामेडीकल स्टाफ असेल त्याच्या बरोबर कनेक्टेड बाकीचा स्टाफ असेल त्याच्या बरोबरचे असलेले इन्स्ट्रूमेंट असतील त्याच्या बरोबरची आपली असलेली सेवा याच्यामध्ये तुम्हांला प्रचंड असा बचाव करावा लागेल. साहेब तुम्ही कर्तव्यनीष्ठ आहात मी तुम्हांला आल्यापासून पाहते तुम्ही काम करतात तरी हा सुध्दा बदल तुम्हांला करावा लागेल. श्रीकर परदेशीना त्यावेळेला लेटर दिल होत आम्ही, आपल सभागृह आहे त्या सभागृहामधली परिस्थिती थोडीशी त्यावेळेला सुधारली गेली पण त्यानंतर आम्ही म्हणल होत फॉरेन्सींक लॅब करा. आज आपल्याला नर्सिंग स्टाफ कमी पडतो, मग का नाही आपण नर्सींगच एखाद इन्सिटयूट सुरु करत. वायसीएमच्या मागे एक जागा सुध्दा रीकामी आहे तीथ तरी तुम्ही आरक्षण बदलून ते केल तरी आम्हांला बरे वाटेल. त्याच बरोबर आपण आता पीजीसाठीची बिल्डींग उभारतो त्याच्यामध्ये पहील्या दुस-या मजल्यावर एक तात्पुरत नर्सींग इन्सिटीटयूट केलतरी चालेल त्या नर्सेसचा वापर तुम्हांला वायसीएम हॉस्पिटलमध्ये किंवा दुस-या ऑदर हॉस्पिटलमध्ये करता येईल. माझी विनंती आहे की फक्त डॉक्टर्स फक्त काही प्रेसेन्सी वाढवण्यापेक्षा तीथे चांगल्या पध्दतीची सेवा कशी देता येईल याकडे लक्ष दयाव एवढच बोलते आणि इथेच थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.उषा मुंढे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका, तसेच मा.खासदार अमोलजी कोल्हे साहेब. आयुक्त साहेब, ज्यावेळेस वायसीएममध्ये खेड, अंबेगाव, जुन्नर मधुन पेशंट येतात त्या अगोदर ते ग्रामीण हॉस्पिटलमध्ये जातात परंतु त्यांची तीथे सोय न झाल्यामुळे ते वायसीएमचा ऍड्रेस देतात आणि आपल्या वायसीएममध्ये आल्यानंतर आपल्या वायसीएममधुन त्यांना ट्रिटमेंट दिली जात नाही. परवाचीच एक गोष्ट आहे लता डिंगे म्हणून पिंपरवाडीची एक लेडीज होती ती मंचरमध्ये डिलेव्हरीसाठी गेली मंचरमधुन त्यांना वायसीएमचा आणि ससूण हॉस्पिटलचा पत्ता दिला परंतु आपल्या वायसीएम हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर आपल्या हॉस्पिटलमधे डॉक्टराकडून सांगण्यात आल की आपल्याकडे बेड शिल्लक नाही. आपण गोरगरीब रुग्णांना कितीतरी रुग्णांना वायसीएममध्ये उपचार घेवून तंदुरुस्त करुन पाठवतो. परंतु माझ्या आदिवासी ग्रामीण भागातून आलेल्या नागरीकांना तीथ वायसीएमला नेईपर्यंत तीच बाळ पोटत एक्सपायर झाल, सांगायला वाईट वाटत जर आपल्या वायसीएममधून असं होत असेलतर गरजू आणि गरीब लोकांना तीथे काय ट्रिटमेंट दिली जात असेल आणि जे लोक वायसीएममध्ये येतात त्यांची परिस्थिती एवढी चांगली नसती परंतु आपण त्यांना नक्कीच चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करतो परंतु आपले डॉक्टर्स, नर्स लोक आहेत ते त्यांना चांगली ट्रिटमेंट देत नाहीत, त्यांना वॉर्डमध्ये घेत नाहीत. रात्री-अपरात्री कुठल्याही वेळेत आलेतर त्या डॉक्टरांना पहील सांगाव लागत तुम्ही आमच्याकडे पहीली ट्रिटमेंट घेतली होती का, नाव नोंदणी केली होती का परंतु जे ग्रामीण भागातून पेशंट येतात त्यांच्या बद्दल थोडी सहानुभूती दाखवून आपल्या डॉक्टरांनी त्यांनाही ऍडमीट करुन घेवून ट्रिटमेंट दिली पाहीजे. आपण महानगरपालिकेच्या जागेमध्ये अनेक ठिकाणी मोठमोठया बिल्डींग उभ्या करतो मग वायसीएमच्या डिलेव्हरी वॉर्डमध्ये साठच बेड कसे काय देवू शकतो. तरी असं न होता येणा-या प्रत्येक नागरीकांना वायसीएममध्ये ट्रिटमेंट दिली गेली पाहीजे, मला बोलण्याची संधी दिली धन्यवाद.

मा.आशा धायगूडे-शेंडगे- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. मगाशी मी सांगीतल होत की हेपॅटायटीस-बी साठी डायलेसीस मशिन नाही त्यात योगेशभाई असतील, मुंढे ताई असतील सगळयांनी अनेक विषय सांगीतले. मा.आयुक्त आपण आता मध्ये एक टेंडर केल ज्यामध्ये आपण तीन लोकांना डॉक्टर्स, स्टाफ असे वेगवेगळे वाटून दिले मगाशी इथे कुणीतरी बोलल की पाच टक्के सर्व्हिस टॅक्स टाकला जाईल. माझ काहीच म्हणण नाही स्टाफ लागणारी गोष्ट आहे तुम्ही टेंडर काढल नक्की शहरतील हीताचच काढल असेल त्यात काही शंका नाही, हेतूवर मी शंका घेण्याच काहीच कारण नाही. २०१३ ला आपल्या महापालिकेचा साफसफाईच टेंडर होतं, ती साफसफाई स्माशनभूमीची होती त्याच्यामध्ये ईएसआय, पीएफचे पैसे त्या तीथल्या कर्मचा-यांना पगार दिला जात नव्हता. हे २०१३ पासून पीएफचा फॉलोअप घेवून पीएफचे माझ्याकडे सगळे पुरावे होते त्यानंतर त्या संबंधित कंपनीने पीएफला पैसे भरले हे माझ्या कामाला त्यावेळेस यश मिळाल परंतु आज पुन्हा सहा सात वर्षे लोटल्यानंतर अवस्था आहे तशीच आहे. मी अनेक अधिका-यांशी बोलताना म्हणते की आम्ही सगळेजण काय नवीनच असतो परंतु अधिकारी म्हणून तुम्ही काही जुने आहात का. समजा तुमच्याकडे मी कर्मचारी म्हणून कामाला आहे तर पालिकेनी कर्मचा-यांच्या अकौंटवरती पैसे टाकले पाहीजेत जे काही पेमेंट देय रक्कम असेलतर ती डायरेक्टली माझ्या अकौंटवर जमा झाली पाहीजे आणि ज्या संबंधित संस्थेनी काम घेतल आहे, ठेका घेतला आहे, पाच टक्के सर्व्हिस चार्ज मागतो त्याच्या नावावरती आपण फक्त पाच टक्केच सर्व्हिस चार्जच दिला पाहीजे. म्हणजे आता काय झाल आहे की झाडू खात्यातली महीला आणि आमचे डॉक्टर एकाच केडरला आहेत. अस म्हणू नये आम्ही परंतु हे दोन्ही सेवा देणारेच घटक आहेत फॅक्ट अशी आहे की आमच्या झाडू खात्यातील महीला कर्मचारी आमच्याकडे येतात आणि सांगतात की ताई मला याठिकाणी कुठतरी नऊ हजार, दहा हजार पगार मिळतो. मिनीमम ऍक्टप्रमाणे वीस ते तेवीस हजार पर्यंत या कर्मचा-यांना असताना त्यांच्या हातावरतील कवडी, पावली दिली जाते. मग हे जर काही तुमच्या डॉक्टरांच्या बाबतीत झाल किंवा आता मला वाटते आता घोडेकर बाई सांगत होत्या की डॉक्टराचा पगार कट होतो वगैरे ते डॉक्टर बिलकूल सेवा देत नाहीत. ज्यांचा पगार आहे त्याला तो न्याय देणं ही तुमची इच्छा असणारच तशी माझीही इच्छा आहे. मग आपल्याला अडचण काय आहे, डायरेक्टली जे काही नियोजन आहे, त्यांचा जो काही पगार आहे ती संबंधित जी काही संस्था आहे त्यांनी तुमच्याकडे नाव दयायचे, त्यांचे अकौंट नंबर दयायचे आणि आपण त्यांच्या नावावरती पगार पाठवायचे आणि फक्त जो काही सर्व्हिस चार्ज आहे तो संबंधित संस्थेला दयावा. ते आपल्याला शक्य आहे का हे सांगाव.

मा.महापौर - मा.आयुक्त साहेब या विषयावर बरीचसी चर्चा झाली आहे, योगेश बहल, पालांडेताईनी चर्चा केलेली आहे या विषयी संबंधित डॉक्टर वाबळे असतील, गोफणे असतील तीथले कोण कोण असतील त्यांना या परिस्थितीची कडक शब्दात जाणीव करुन दयावी, हा वैदयकीय विभाग आहे त्या ठिकाणी ज्या अडचणी असतील त्या आपल्याला टाळता येणार नाहीत. तेथील जे डीन आहेत त्यांनी या अडचणीकडे जास्त सिरिएसपणे लक्ष दिले पाहीजे. जे त्याठिकाणी काम करतात त्यांनी आपली बाजू व्यवस्थीतपणे सांभाळावी, फक्त चाणक्य मध्ये बसून काही दिसत नाही. डॉ. गोफणे साहेबांना सुध्दा सांगावे. एका मागे एक अनेक हॉस्पिटल उभे करण्याच्या ते नादात आहेत ते कुठल्या भ्रमात आहेत हे सगळ सांभाळता येईल का याचा पुढचा मागचा सुध्दा विचार करावा. आपल्याला जे बजेट मिळणार आहे आणि जे उत्पन्न

मिळणार आहे ते फक्त आपल्याला वैदयकीयवरच खर्च करायच का, डेव्हलपमेंट काही करायची नाही का हा सर्वांगीन विचार करा. बरेचसे अधिकार डॉ. गोफणे यांना दिलेले आहेत ते अनुभवी अति. वैदयकीय अधिकारी आहेत त्यांना देखील काही अधिकार देणेचे काम कराव. एकालाच सगळे अधिकार दिलेतर तो त्यामध्ये गडबडून जातो त्यामुळे त्यांना त्यांच भान राहत नाही. याचा विचार करावा अशी मी आपल्याला विनंती करते आणि आदेशही देते. तरी आपण त्या पध्दतीने सिरीएसली घ्याव. डीन डॉ. वाबळे यांनाही समजावून सांगावे. पुर्ण कारभार सांभाळतांना पुर्वनियोजन कराव. हे डॉ. घ्यायचे आहेत ते अभ्यासपुर्वक घेतलेले आहेत का नाहीत, त्यांना अनुभव आहेत का नाही हा सर्वांगीन विचार करावा. या माझ्या सगळया अटी आपल्या समोर राहतील याचा पुन्हा एकदा आपण विचार करा. विषय क्रं. ६ उपसूचनेसहीत मंजुर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७१४ विषय क्रमांक – ६

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अतिरीक्त आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.प्रशा/१/कावि/९५७/२०२१, दि.१४/०९/२०२१
२) मा.विधी समितीकडील ठ. क्र.५६ दि.१७/९/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरीता स्थायी आस्थापनेवरील गट “अ”मधील रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात क्र.७३/२०१९ दि.१३/०९/२०१९ प्रसिद्ध करण्यात आली होती. न्यूरो सर्जन व प्लॅस्टीक सर्जन ह्या विशेषतज्ञ अभिनामाची रिक्त पदे भरणेकामी उमेदवारांचे वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रवर्ग व समांतर आरक्षण इत्यादि विषयक कागदपत्रांची तपासणी होणे आवश्यक असल्याने ऑनलाईनद्वारे अर्ज केलेले उमेदवारांना जाहिर निवेदन, ई-मेल द्वारे कागदपत्रे तपासणी व मौखिक मुलाखतीस उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी मौखिक मुलाखतीस उपस्थित राहीलेल्या व सेवायोजन कार्यालयाकडील संकेतस्थळावरुन उपलब्ध झालेल्या उमेदवारांचे कागदपत्रांची पडताळणी व मौखिक मुलाखती दिनांक १८/०९/२०२० रोजी घेण्यात आलेल्या आहेत.

१) नामनिर्देशनाव्दारे अर्ज मागविण्याची पध्दती :- www.pcmcindia.gov.in या महापालिकेच्या संकेतस्थळामार्फत Online पध्दतीने

२) विशेषतज्ञ पदांची वेतनश्रेणी :- र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु. ७६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार)

३) नामनिर्देशनाव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल, उमेदवाराचे नाव, नेमणूक प्रवर्ग :- सोबतचे प्रपत्र “अ” नुसार

निवड समितीने उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेतल्या असून मुलाखती दरम्यान जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे , अनुभव, विषयातील ज्ञान इत्यादीनुसार उमेदवारांना गुण देण्यात आलेले आहेत .सदर गुण

तक्ता विचारात घेऊन सोबतचे प्रपत्र 'अ'नुसार पात्र उमेदवारांची निवड यादी सादर केली आहे .त्या यादीमधील न्युरो सर्जन व प्लॅस्टिक सर्जन अभिनामाची गट अ मधील पदे सरळसेवेने भरण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० यास शासनाची मान्यता प्राप्त आहे.

सदर सेवा नियमात " भांडार विभागाकरीता" भांडार नियंत्रक (गट-अ) या पदाकरीता शैक्षणिक व अनुभव अर्हता निश्चित करणेत आली आहे. तरी त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास व सदर पद १००% पदोन्नतीने भरण्यासाठी सेवा नियमात शासन मान्यतेने दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

## सुधारीत अर्हता

| अक्रं. | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | वेतनश्रेणी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकिय सेवा<br>(गट -अ) | भांडार नियंत्रक | पदोन्नती १००% | S 23<br>र.रु.<br>67700-208700 | ४) मान्यताप्राप्त विदयापीठाकडील कोणत्याही शाखेचा पदवीधारक आवश्यक<br>५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील भांडार अधिकारी (गट-ब) पदावरील किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिका-याची सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग-१, तज्ञ वैद्यकीय अधिकारी या पदावर डॉ. उज्वला सुमेध अंदुरकर या सन-२००५ पासून वैद्यकीय विभागात कार्यरत आहेत. त्यांची प्रथम नियुक्ती यशवंत चव्हाण स्मृती रूग्णालयात करण्यात आली होती. सदर कालावधी मध्ये वायसीएमएच रूग्णालय येथे भुलतज्ञ म्हणून विभागात कामकाज केले आहे. सध्या त्या भुलतज्ञ या पदावर कार्यरत आहे. शिवाय वर्ग-१, तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा ज्येष्ठता सुची क्र.१२/प्रशा/कावि/१९/२०२० अन्वये त्या " वैद्यकीय उपअधिक्षक" या पदोन्नतीच्या पदासाठी पात्र आहे. तरी डॉ. उज्वला सुमेध अंदुरकर यांना " वैद्यकीय उप अधिक्षक " या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग-१, तज्ञ वैद्यकीय अधिकारी, या पदावर डॉ. मनिषा राजेंद्रकुमार सुर्यवंशी या सन-२०११ पासून वैद्यकीय विभागात कार्यरत आहेत. त्यांची प्रथम नियुक्ती यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात करण्यात आली होती.

सदर कालावधी मध्ये वायसीएमएच रूग्णालय येथे वर्ग-१ स्त्रीरोग तज्ञ म्हणून विभागात कामकाज केले आहे. सध्या त्या वर्ग-१, स्त्रीरोग तज्ञ या पदावर तालेरा रूग्णालय येथे कार्यरत आहे. शिवाय वर्ग-१, तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा ज्येष्ठता सुची क्र.१२/प्रशा/कावि/२२/२०२१ अन्वये त्या " वैद्यकीय उपअधिक्षक " या पदोन्नतीच्या पदासाठी पात्र आहे. तरी डॉ.मनिषा राजेंद्रकुमार सुर्यवंशी यांना " वैद्यकीय उप अधिक्षक " या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री.गणेश शंकर देशपांडे हे १९८८ साली आरोग्य निरिक्षक या पदावर नियुक्त झालेले असून २०१८ पासून सहा.आरोग्याधिकारी या वर्ग २ च्या पदावर कार्यरत आहेत. सहा.आरोग्याधिकारी पदाच्या सेवाजेष्ठता सूचीनुसार श्री.देशपांडे हे पदोन्नतीसाठी पात्र आहेत. सबब, श्री.गणेश शंकर देशपांडे, सहा.आरोग्याधिकारी यांना आरोग्य कार्यकारी अधिकारी अभिनामाचे पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ७

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/२६७/२०२१, दिनांक २८/०९/२०२१
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. ३१ दि.८/१०/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०५।नवि-१३, दि. ३०।०५।२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस- १८०८।८९४।सीआर-१७२७।०९।नवि-१३, दि. १८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस-१८१२।१६०।सीआर-५८।१२, पुर्नरचना नं.।२७।१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि. ०२।०३।२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील स.नं. ८, ९, १०, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहूरोड कँन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा

लगतचे १२.०० मी. चे दोन सर्व्हीस रस्त्याने प्रस्तावित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता. हवेली, जि.पुणे. येथील मंजूर विकास योजने मधील स.नं. ८, ९, १०, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहूरोड कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा लगतचे १२.०० मी.चे दोन सर्व्हीस रस्त्याचा विकास करणे सदर भागातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाहतूकीच्या दळणवळणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर रस्त्याने बाधीत जागा टि.डी.आर./एफ.एस.आय.चे बदल्यात मनपाचे ताब्यात देणेस जागा मालक तयार नाहीत. त्यामुळे सदर रस्त्याच्या जागेचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील स.नं. ८, ९, १०, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहूरोड कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा लगतचे १२.०० मी.चे दोन सर्व्हीस रस्त्या खालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

मा.हर्षल ढोरे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.संदीप वाघेरे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- ग प्रभागातील प्रभाग क्र. 21 मधील खालील रस्ता व चौकाचे नामकरण करणेसाठी नागरिकांच्या मागणी आहे. कै. श्री. बबनराव दशरथ कुदळे, नायब तहसीलदार व साथी दामुअण्णा कुदळे, प्रथम सरपंच होते. त्यांचे कार्य चांगले असल्यामुळे तसेच नागरिकांना चांगल्या कामाचा आदर्श घेणेकामी नामकरण करणे योग्य राहील असे वाटते.

| क्र . | ठिकाण | नामकरण |
|---|---|---|
| 1 | वैभवनगर सोसायटीमागील 15 मी.डी.पी. रस्ता | कै.श्री. बबनराव दशरथ कुदळे पथ, नायब तहसीलदार |
| 2 | 18 मी.डी.पी. रस्ता चौक. (सर्जा हॉटेल जवळील चोक) | कै.श्री. साथी दामुअण्णा कुदळे चौक, प्रथम सरपंच |

तरी उपरोक्त प्रभाग क्र. 21 मधील रस्ता व चौकाचे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. तसेच मौजे वाकड येथील भुमकर वस्तीकडुन वाकडकर वस्तीकडे जाणा-या कॉर्नरला कै. वामन भिमाजी भुमकर असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी तसेच आरक्षण क्र. ३/१८ उदयानास कै. तानाजीभाऊ तुकाराम कलाटे असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी तसेच

हिंजवडी व वाकड हद्दीवरील मधुबन हॉटेल येथील चौकास कै. पै. मारुतीराव दामोदर जमदाडे असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी तसेच सर्वे नं. १०५ वाकड येथे असणा-या चौकास " आल्हाट चौक " असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी

मा.शितल शिंदे – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- तसेच मौजे भोसरी हद्दीतील सं.नं. २०४ मधुन जाणारा १२ मी. (बनाचा ओढा) रस्ता यापुर्वी प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये १२ मी. रस्ता आंळदी रोड ते दिघी – भोसरी शिव जोडणारा बनाचे ओढया लगत असलेला रस्ता. सं.नं २०४ मधून जाणारा घोषित करणेत आलेला होता परंतु सद्यास्थितीत जागेवर रस्ता झालेला नाही, त्याचा पर्यायी रस्ता आळंदी रोड ते दिघी शिवेने लगत जागेवर डांबरीकरण करणेत आलेला आहे तर बनाचे ओढ्यालगत असलेला उपरोक्त स.नं. २०४ मधुन जाणारा रस्ता रद्द करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०५/नवि-१३, दि. ३०/०५/२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र. टिपीएस १८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३, दि. १८/०८/२००९ व अधिसुचना क्र. टिपीएस-१८१२/१६०/सीआर-५८/१२, पुर्नरचना नं./२७/१२ ईपी मंजुर /युडी-१३, दि. ०२/०३/२०१५ अन्वये विकास योजना मंजुर आहे. वाढीव हद्दीच्या मौजे रावेत येथील स.नं. १७ , १९ , २५, २६, २७, २८, ३१, ३२, ३३, ३४, ४१, ४२, ४३, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५८, ६०, ६१, ६२, ६४, ६५ मधील मंजुर विकास योजनेतील पवना नदी ते किवळे हद्दीपर्यंत मुंबई-पुणे बाह्यवळण महामार्गालगतचे १२.०० मी. चे दोन सर्व्हिस रस्त्याने प्रस्तावित आहे. सदरचे दोन्ही सर्व्हिस रस्त्याचा विकास करणे सदर भागातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाहतुकीच्या दळणवळणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर रस्त्याने बाधित जागा टीडीआर/एफएसआयचे बदल्यात मनपाच्या ताब्यात देणेस जागा मालक तयार नाहीत. त्यामुळे सदर रस्त्याच्या जागेचे भुसंपादन करणे आवश्यक आहे.

तरी सदर मौजे रावेत येथील पवना नदी ते किवळे हद्दीपर्यंत मुंबई-पुणे महामार्गालगतचे दोन १२.००मी. सर्व्हिस रस्त्याखालील जमीनीचे भुसंपादन करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भुमीसंपादन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळणेचा आणि पारदर्शकता राखणेचा हक्क अधिनियम-२०१३ (नवीन भुसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०५/नवि-१३, दि. ३०/०५/२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र. टिपीएस १८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३, दि. १८/०८/२००९ व अधिसुचना क्र. टिपीएस-१८१२/१६०/सीआर-५८/१२, पुर्नरचना नं./२७/१२ ईपी मंजुर /युडी-१३, दि. ०२/०३/२०१५ अन्वये विकास योजना मंजुर आहे. वाढीव हद्दीच्या मौजे पुनावळे येथील मधील पवना नदी ते ताथवडे हद्दीपर्यंत मुंबई-पुणे बाह्यवळण महामार्गालगतचे १२.००मी. चे

दोन सर्व्हिस रस्त्याने प्रस्तावित आहे. सदरचे दोन्ही सर्व्हिस रस्त्याचा विकास करणे सदर भागातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाहतुकीच्या दळणवळणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर रस्त्याने बाधित जागा टीडीआर/एफएसआयचे बदल्यात मनपाच्या ताब्यात देणेस जागा मालक तयार नाहीत. त्यामुळे सदर रस्त्याच्या जागेचे भुसंपादन करणे आवश्यक आहे.

तरी सदर मौजे पुनावळे येथील पवना नदी ते ताथवडे हद्दीपर्यंत मुंबई-पुणे महामार्गालगतचे दोन १२.००मी. सर्व्हिस रस्त्याखालील जमीनीचे भुसंपादन करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भुमीसंपादन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळणेचा आणि पारदर्शकता राखणेचा हक्क अधिनियम-२०१३ (नवीन भुसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी. तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद ही लोकमान्य टिळक साहित्य सम्राट न.ची.केळकर आणि न्यायाधीश रानडे यांनी ११५ वर्षापुर्वी स्थापन केलेली मराठीची मातृ संस्था आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेची पिंपरी चिंचवड शाखा ३० वर्षापासून पिंपरी चिंचवडमध्ये साहित्य चळवळ राबवित आहे. तसेच मराठी भाषेचा प्रचार, प्रसार आणि साहित्यिक उपक्रमही राबवित आहेत.

वाचन संस्कृतिच्या समृध्दी साठी राबणा-या या संस्थेला कोणतेही अनूदान किंवा उत्पन्न नाही तसेच स्वत:चे कार्यालय किंवा उपक्रमासाठी हक्काचे सभागृह अथवा जागा नाही.

प्राधिकरण येथील तुकाराम संकुलमध्ये सी विंग मधील २ मजल्यावरील ११७२ चौ.फूट गाळा ब-याच वर्षापासून रिकामा आहे. सदर जागा महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड साठी पुरेशी असून साहित्यिक उपक्रम राबविण्यासाठी उपयुक्त आहे. तरी सदर गाळा ३० वर्षासाठी नाममाञ दराने मिळण्यास मान्यता देणेत यावी.

मा.संदीप कस्पटे – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, उपसूचनां स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणत आला असता-

ठराव क्रमांक – ७१५ विषय क्रमांक – ७

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/२६७/२०२१, दिनांक २८/०९/२०२१

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. ३१ दि.८/१०/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०५।नवि-१३, दि. ३०।०५।२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस- १८०८।८९४।सीआर-१७२७।०९।नवि-१३, दि.१८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस- १८१२।१६०।सीआर-५८।१२, पुर्नरचना नं.।२७।१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि. ०२।०३।२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील स.नं. ८, ९,

१०, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहूरोड कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा लगतचे १२.०० मी. चे दोन सर्व्हीस रस्त्याने प्रस्तावित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता. हवेली, जि.पुणे. येथील मंजूर विकास योजने मधील स.नं. ८, ९, १०, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहूरोड कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा लगतचे १२.०० मी.चे दोन सर्व्हीस रस्त्याचा विकास करणे सदर भागातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाहतूकीच्या दळणवळणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर रस्त्याने बाधीत जागा टि.डी.आर./एफ.एस.आय.चे बदल्यात मनपाचे ताब्यात देणेस जागा मालक तयार नाहीत. त्यामुळे सदर रस्त्याच्या जागेचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील स.नं. ८, ९, १०, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहूरोड कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा लगतचे १२.०० मी.चे दोन सर्व्हीस रस्त्या खालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच ग प्रभागातील प्रभाग क्र. 21 मधील खालील रस्ता व चौकाचे नामकरण करणेसाठी नागरिकांच्या मागणी आहे. कै. श्री. बबनराव दशरथ कुदळे, नायब तहसीलदार व साथी दामुअण्णा कुदळे, प्रथम सरपंच होते. त्यांचे कार्य चांगले असल्यामुळे तसेच नागरिकांना चांगल्या कामाचा आदर्श घेणेकामी नामकरण करणे योग्य राहील असे वाटते.

| क्र . | ठिकाण | नामकरण |
|---|---|---|
| 1 | वैभवनगर सोसायटीमागील 15 मी.डी.पी. रस्ता | कै.श्री. बबनराव दशरथ कुदळे पथ, नायब तहसीलदार |
| 2 | 18 मी.डी.पी. रस्ता चौक. (सर्जा हॉटेल जवळील चोक) | कै.श्री. साथी दामुअण्णा कुदळे चौक, प्रथम सरपंच |

तरी उपरोक्त प्रभाग क्र. 21 मधील रस्ता व चौकाचे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे वाकड येथील भुमकर वस्तीकडुन वाकडकर वस्तीकडे जाणा-या कॉर्नरला कै. वामन भिमाजी भुमकर असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच आरक्षण क्र. ३/१८ उदयानास कै. तानाजीभाऊ तुकाराम कलाटे असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच हिंजवडी व वाकड हद्दीवरील मधुबन हॉटेल येथील चौकास कै. पै. मारुतीराव

दामोदर जमदाडे असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सर्वे नं. १०५ वाकड येथे असणा-या चौकास " आल्हाट चौक " असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे भोसरी हद्दीतील सं.नं. २०४ मधुन जाणारा १२ मी. (बनाचा ओढा) रस्ता यापुर्वी प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये १२ मी. रस्ता आंळदी रोड ते दिघी – भोसरी शिव जोडणारा बनाचे ओढया लगत असलेला रस्ता. सं.नं २०४ मधून जाणारा घोषित करणेत आलेला होता परंतु सद्यास्थितीत जागेवर रस्ता झालेला नाही. त्याचा पर्यायी रस्ता आळंदी रोड ते दिघी शिवेने लगत जागेवर डांबरीकरण करणेत आलेला आहे तर बनाचे ओढ्यालगत असलेला उपरोक्त स.नं. २०४ मधुन जाणारा रस्ता रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०५/नवि-१३, दि. ३०/०५/२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र. टिपीएस १८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३, दि. १८/०८/२००९ व अधिसुचना क्र. टिपीएस-१८१२/१६०/सीआर-५८/१२, पुर्नरचना नं./२७/१२ ईपी मंजुर /युडी-१३, दि. ०२/०३/२०१५ अन्वये विकास योजना मंजुर आहे. वाढीव हद्दीच्या मौजे रावेत येथील स.नं. १७ , १९ , २५, २६, २७, २८, ३१, ३२, ३३, ३४, ४१, ४२, ४३, ४५, ४६,४७,४८,४९,५०, ५८, ६०,६१,६२,६४,६५ मधील मंजुर विकास योजनेतील पवना नदी ते किवळे हद्दीपर्यंत मुंबई-पुणे बाह्यवळण महामार्गालगतचे १२.००मी. चे दोन सर्व्हिस रस्त्याने प्रस्तावित आहे. सदरचे दोन्ही सर्व्हिस रस्त्याचा विकास करणे सदर भागातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाहतुकीच्या दळणवळणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर रस्त्याने बाधित जागा टीडीआर/एफएसआयचे बदल्यात मनपाच्या ताब्यात देणेस जागा मालक तयार नाहीत. त्यामुळे सदर रस्त्याच्या जागेचे भुसंपादन करणे आवश्यक आहे.

तरी सदर मौजे रावेत येथील पवना नदी ते किवळे हद्दीपर्यंत मुंबई-पुणे महामार्गालगतचे दोन १२.००मी. सर्व्हिस रस्त्याखालील जमीनीचे भुसंपादन करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भुमीसंपादन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळणेचा आणि पारदर्शकता राखणेचा हक्क अधिनियम-२०१३ (नवीन भुसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०५/नवि-१३, दि. ३०/०५/२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र. टिपीएस १८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३, दि. १८/०८/२००९ व अधिसुचना क्र. टिपीएस-१८१२/१६०/सीआर-५८/१२, पुर्नरचना नं./२७/१२ ईपी मंजुर /युडी-१३, दि. ०२/०३/२०१५ अन्वये विकास योजना मंजुर आहे. वाढीव हद्दीच्या मौजे पुनावळे येथील मधील पवना नदी ते ताथवडे हद्दीपर्यंत मुंबई-पुणे बाह्यवळण महामार्गालगतचे १२.००मी. चे दोन सर्व्हिस रस्त्याने प्रस्तावित आहे. सदरचे दोन्ही सर्व्हिस रस्त्याचा विकास करणे सदर

भागातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाहतुकीच्या दळणवळणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर रस्त्याने बाधित जागा टीडीआर/एफएसआयचे बदल्यात मनपाच्या ताब्यात देणेस जागा मालक तयार नाहीत. त्यामुळे सदर रस्त्याच्या जागेचे भुसंपादन करणे आवश्यक आहे.

तरी सदर मौजे पुनावळे येथील पवना नदी ते ताथवडे हद्दीपर्यंत मुंबई-पुणे महामार्गालगतचे दोन १२.००मी. सर्व्हिस रस्त्याखालील जमीनीचे भुसंपादन करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भुमीसंपादन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळणेचा आणि पारदर्शकता राखणेचा हक्क अधिनियम-२०१३ (नवीन भुसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद ही लोकमान्य टिळक साहित्य सम्राट न.ची.केळकर आणि न्यायाधीश रानडे यांनी ११५ वर्षापुर्वी स्थापन केलेली मराठीची मातृ संस्था आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेची पिंपरी चिंचवड शाखा ३० वर्षापासून पिंपरी चिंचवडमध्ये साहित्य चळवळ राबवित आहे. तसेच मराठी भाषेचा प्रचार, प्रसार आणि साहित्यिक उपक्रमही राबवित आहेत.

वाचन संस्कृतिच्या समृध्दी साठी राबणा-या या संस्थेला कोणतेही अनूदान किंवा उत्पन्न नाही तसेच स्वत:चे कार्यालय किंवा उपक्रमासाठी हक्काचे सभागृह अथवा जागा नाही.

प्राधिकरण येथील तुकाराम संकुलमध्ये सी विंग मधील २ मजल्यावरील ११७२ चौ.फूट गाळा ब-याच वर्षापासून रिकामा आहे. सदर जागा महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड साठी पुरेशी असून साहित्यिक उपक्रम राबविण्यासाठी उपयुक्त आहे. तरी सदर गाळा ३० वर्षासाठी नाममात्र दराने मिळण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.रेखा दर्शले व मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव.
२) मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कतिक समतीकडील ठ.क्र.४६ दि.२४/९/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, यमुनानगर निगडी येथे स्केटिंग मैदान नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे .सदर स्केटिंग मैदान यास प.पु.माधव सदाशिव गोळवलकर असे नाव दिलेले आहे. परंतु त्याची म.न.पा.दप्तरी नोंद घेतलेली नाही. तरी यमुनानगर निगडी येथील स्केटिंग मैदान यास, प.पु.माधव सदाशिव गोळवलकर तथा श्री गुरुजी असे नाव देऊन त्याची म.न.पा दप्तरी नोंद घेणेस मान्यता देणेत यावी.

मा.हर्षल ढोरे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सागर आंगोळकर - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.उत्तम केंदळे  -  मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७१६ विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.रेखा दर्शले व मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव.
२) मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कतिक समितीकडील ठ.क्र.४६ दि.२४/९/२०२१

विषय क्रमांक ८ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७१७ विषय क्रमांक – ९

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.वायसीएमएच/७/कावि/२४३/२०२१ दि.१६/०९/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयांकरीता स्थायी आस्थापनेवरील गट अ व ब मधील विविध संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहीरात क्र. ७३/२०१९, क्र. प्रशा/०१/कावि/७०१/२०१९, दिनांक-१३/०९/२०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती. जाहीरातीच्या अनुषंगाने उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेऊन महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दिनांक- ४ मार्च, २०१४ अन्वये एकुण मंजूर पद संख्येच्या ११८ पद संख्येपैकी ७४ पात्र उमेदवारांची निवड करण्यात आलेली होती व सरळसेवा प्रवेशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाच्या स्थायी आस्थापनेवर नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्या प्रक्रिये अंतर्गत आजपर्यंत ५८ उमेदवार रूजू झाले आहेत. शासन निर्णयाच्या अन्वये ११८ पदांपैकी ६० उमेदवारांची संख्या रिक्त आहे. तसेच सद्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात ९ विषयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झालेला असून नविन ४ विषय प्रस्तावित आहेत. आगामी वर्षामध्ये राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग यांची तपासणी अपेक्षित आहे. उत्तम दर्जाची रूग्णसेवा, संस्थेचे विस्तारीकरण व आगामी वर्षातील राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग यांच्या तपासणीचा विचार करता व कोरोना-१९ महामारीच्या दरम्यान जाणवणारी मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता ३५ पदांची पदभरती हंगामी स्वरूपात ३ वर्ष कालावधीकरीता करणेकामी वृत्तपत्रात जाहिरात क्र. ९०४ दिनांक-०४/०६/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दिनांक- ४ मार्च, २०१४ अन्वये एकुण मंजूर पद संख्येच्या ११८ मंजूर पदांपैकी सद्या पदव्युत्तर संस्थेत ५८ अध्यापक स्थायी अस्थापनेवर कार्यरत आहेत. शासन मंजूर ११८ पदांपैकी मा. महापालिका सभेने यापूर्वी ९० पदांना ३ वर्ष कालावधीकरीता हंगामी स्वरूपात भरतीकरणेकामी मान्यता दिलेली आहे. उर्वरीत एकुण २८ पदांपैकी १४ पदे ही प्राध्यापक संवर्गातील आहेत व १४ पदे ही शिक्षकेतर आहेत. सदर एकुण २८ पदे पदव्युत्तर संस्थेकरीता हंगामी स्वरूपात ३ वर्षे कालावधीसाठी भरणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल प्रपत्र-‘अ’ व प्रपत्र-‘ब’ मध्ये सादर करणेत आलेला आहे.

प्रपत्र–‘अ’

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पद संख्या | मानधनावर ३वर्षासाठी मान्यता घ्यावयाची पदे |
|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक त्वचारोग शास्त्र | ०१ | ०१ |
| २ | सहयोगी प्राध्यापक नेत्ररोग चिकित्सा | ०१ | ०१ |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा | ०७ | ०२ |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक मेडीसीन | ०९ | ०४ |
| ५ | सहाय्यक प्राध्यापक स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | ०९ | ०३ |
| ६ | सहाय्यक प्राध्यापक त्वचारोग शास्त्र | ०१ | ०१ |
| ७ | सहाय्यक प्राध्यापक उरोरोग शास्त्र(पल्मोनोलॉजी) | ०१ | ०१ |
| ८ | Epidemiologist-cum-Assistant Professor | ०१ | ०१ |
| | एकुण | | १४ |

शिक्षकेतरपदे, पदव्युत्तर संस्था, वायसीएम रूग्णालय स्थायी अस्थापना, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दिनांक-४ मार्च, २०१४

प्रपत्र– ‘ब’

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पद संख्या | मानधना वर ३ वर्षासाठी मान्यता घ्यावयाची पदे |
|---|---|---|---|
| १ | आरोग्य शिक्षक | ०३ | ०३ |
| २ | Occupational Therepists | ०१ | ०१ |
| ३ | Vocational Counselor | ०१ | ०१ |
| ४ | Prosthetic and Orthotic technicians | ०१ | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | Medico-rehabilitation workers /(MRW) Technician/Therapist | ०१ | ०१ |
| ६ | Documentalist | ०१ | ०१ |
| ७ | Cataloguer | ०१ | ०१ |
| ८ | Coding Clerks | ०२ | ०२ |
| ९ | Photographers | ०१ | ०१ |
| १० | Artist Modelers | ०१ | ०१ |
| ११ | Technicians in Audio-Visual aids Photography and Artist | ०१ | ०१ |
| | **एकुण** | | **१४** |

जाहिरात क्र. ९०४ दिनांक-०४/०६/२०२१ रोजी रिक्त ३५ पदे भरण्याकरीता दिनांक-०४/०६/२०२१ ते दिनांक-२१/०६/२०२१ रोजी अखेर उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले असता प्राप्त झालेल्या अर्जांची निवड समिती मार्फत छाननी करून पात्र ठरलेल्या उमेदवारांची दिनांक-०५/०७/२०२१ ते दिनांक-०७/०७/२०२१ रोजी मौखिक मुलाखती घेऊन निवड समिती मार्फत गुणांकनानूसार विविध विषयातील एकुण १३ अध्यापकांची निवड समितीने निवड केली आहे. सदर निवड झालेल्या १३ अध्यापकांपैकी ०९ अध्यापक रूजू झालेले आहेत व ०२ अध्यापक हे प्रतिक्षा यादीतील आहेत. तरी मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/२०१/२०२१, दिनांक-१२/०८/२०२१ अन्वये पदव्युत्तर संस्था, वायसीएम रूग्णालय येथे नियुक्ती देण्यात आलेली आहे. जाहिरात क्र. ९०४ मधील उर्वरीत २४ पदे रिक्त राहिलेली आहेत. सदरची पदे लवकरात लवकर जाहीरातीत नमूद केलेल्या विहित अटी व शर्ती नुसार अस्थायी अस्थापनेवर भरणे आवश्यक आहे. तसेच सदरची २४ रिक्त पदे दर सोमवारी (Walk in Interview) मौखिक मुलाखती द्वारे भरण्यास मा. महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागणार आहे. सदरच्या एकुण ३५ पदांना दरमहा अदा करावयाचे एकुण मानधन र. रू. ३२,३२,७७५/- (अक्षरी र. रू. बत्तीस लाख बत्तीस हजार सातशे पंच्याहत्तर फक्त) इतक्या संभाव्य खर्चास मा. महापालिका सभेची कार्योत्तर मान्यता घेऊन सदरचा खर्च सन २०२१- २०२२ च्या अंदाजपत्रकामधील वैद्यकीय पदव्युत्तर संस्था, वायसीएमएच पीसीएमसी मानधनावरील अध्यापक व कर्मचारी मानधन/वेतन या लेखाशिर्षावर केलेल्या र. रू. ६,५०,००,०००/- (अक्षरी र. रू. सहा कोटी पन्नास लाख फक्त) इतक्या तरतूदी मधून करण्यात येईल.

सबब, पदव्युत्तर संस्था, वायसीएम रूग्णालयात जाहिरात क्र. ९०४ मधील निवड झालेल्या १३ अध्यापक व उर्वरीत २२ पदे जाहिराती द्वारे उपलब्ध न झाल्याने दर सोमवारी Walk in Interview द्वारे ३ वर्षे कालावधीकरीता हंगामी स्वरूपात भरणेकामी व एकुण ३५ अध्यापकांना दरमहा अदा करावयाचे मानधन अंदाजे र. रू. ३२,३२,७७५/- (अक्षरी र. रू.

बत्तीस लाख बत्तीस हजार सातशे पंच्याहत्तर फक्त) इतक्या संभाव्य खर्चास मान्यता देणेत येत आहे.

तसेच महाराष्ट्र शासनाकडील दिनांक-०४ मार्च, २०१४ रोजीच्या शासन निर्णयाचे अवलोकन व्हावे. त्या अनुषंगाने प्रपत्र-'ब' मधील अनुक्रमांक १ ते ११ असे एकुण १४ शिक्षकेत्तर कर्मचारी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे मानांकानूसार विविध विभागामध्ये कामकाज सूरळीतपणे चालविण्याकरीता आवश्यक आहेत. सदर पदे ३ वर्षे कालावधीसाठी हंगामी स्वरुपात मानधनावर भरणे आवश्यक असल्यामुळे सोबतचे नमूद प्रपत्र-'ब' मधील एकुण १४ शिक्षकेत्तर पदांना बाह्यस्त्रोत (Out Sourcing) द्वारे अथवा जाहिरात प्रसिध्द करून आवश्यकतेनूसार ३ वर्षे कालावधीसाठी हंगामी स्वरूपात मानधनावर भरणेस मान्यता देणेत येत आहे. प्रस्तूतचे प्रपत्र- 'अ' मधील १४ पदे व प्रपत्र- 'ब' मधील १४ पदे अशा एकुण २८ पदांच्या मान्यता देणेत येत आहे.

मा.हर्षल ढोरे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १०

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.नरवि/कावि/१६/५७६/२०२१ दि.३०/०९/२०२१

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ सह कलम ३८ अन्वये सुधारित विकास योजना तयार करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा. महापालिका सभा ठराव क्र. ४५३, दि. ०७/०९/२०१९ व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने ठराव क्र. ३४०/१७, दि. ०९/०७/२०१९ रोजी इरादा जाहिर केला आहे. सदर इरादा महाराष्ट्र शासन राजपत्र पुणे विभाग, पुणे पुरवणीमध्ये पृष्ठ क्रमांक १ ते ३ दि. २०/११/२०१९ अन्वये प्रसिध्द झाला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची विकास योजना दुस-यांदा सुधारित करण्याची कार्यवाही शासन नियुक्त उपसंचालक, नगररचना, विकास योजना विशेष घटक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण या कर्यालयामार्फत करण्यात येत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २५ अन्वये जमिनीचे सर्वेक्षण करणे व त्या क्षेत्राचा विद्यमान जमीन वापर

नकाशा तयार करणेसाठी खाजगी तज्ञ संस्था एच.सी.पी.डिसाईन,प्लॅनिंग अँड मॅनेजमेंट, अहमदाबाद यांची नेमणूक केलेली आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस-१८२१/२२१/प्र.क्र.४३/२०२१/नवि-१३, दि.०७/०६/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण विसर्जित करण्यात येऊन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणमध्ये व पिंपरी चिंचवड महानगरपालिकामध्ये विलीन करण्यात आलेले आहे. सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक, पुणे विभागीय पुरवणी मध्ये दि. ११ जून २०२१ रोजी प्रसिध्द झाली आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विसर्जित झालेल्या क्षेत्रापैकी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची ३७५.९० हेक्टर क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण व उर्वरित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१ब) नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरणाने अधिसूचित क्षेत्रासाठी भूमापन करून विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणे तसेच प्रस्तावित जमीन वापर नकाशा तयार करणे अपेक्षित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका विशेषनियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेल्या क्षेत्राची विकास योजना तयार करण्यासाठी महानगरपालिकेचा सर्वसाधारण सभेचा ठराव व पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. तरी महानगरपालिकेला नियुक्त केलेल्या क्षेत्रासाठी वेगळा सर्वसाधारण सभेचा ठराव पारित करण्यात यावे असे संदर्भिय पत्रान्वये विकास योजना विशेष घटक पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी महानगरपालिकेस कळविले आहे.

सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१) अन्वये शासनाचे दि. ०७/०६/२०२१ रोजीचे अधिसूचनेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त असलेल्या अधिसूचित क्षेत्रासाठी भूमापन करून विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणे तदअनुषंगिक पुढील विहीत वैधानिक कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.हर्षल ढोरे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सिमा सावळे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- राज्य शासनाने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण बरखास्त केले असून प्राधिकरण क्षेत्रातील विकसित पेठा व अतिक्रमण झालेले क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले आहे. प्राधिकरण क्षेत्रातील व विशेष करुन पेठ क्रं. १ ते १३ या भागातील विकसित इमारतीचे Conveyance Deed अदयापही झालेले नाही. तसेच सदर क्षेत्रातील सदनिका हस्तांतरीत करताना यापूर्वी प्राधिकरणाकडून भरमसाट हस्तांतरण शुल्क आकारले जात होते. एकाच सदनिकेचे एका पेक्षा जास्त वेळा हस्तांतरण होताना देखील प्रत्येक हस्तांतरणाच्या वेळी हस्तांतरण शुल्क आकारले जात होते. तरी नागरिकांच्या हितासाठी प्राधिकरण क्षेत्रातील

विकसित इमारतींचे Conveyance Deed करण्यासाठीची प्रक्रिया सोपी करण्यात यावी व Conveyance Deed करताना कोणताही अधिभार लावू नये आणि नाममात्र दराने हस्तांतरण शुल्क आकारण्यात यावे यास मान्यता देणेत यावी.

मा.आशा धायगूडे- शेंडगे - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.अजीत गव्हाणे- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. प्राधिकरणाच जे क्षेत्र आपल्याकडे आलेल आहे त्याच्या संदर्भात हा विषय आहे पण याला अनुसरुन आपल्याकडे जी टिम अपॉईंट केलेली आहे प्राधिकरणाच प्रोसेस आपल्याकडे हॅण्डवर्कसाठी त्यांच इतक्या धिम्या गतीने काम चालू आहे आणि नागरीकाना अजूनही त्याच्यामध्ये त्रास होतो. तरी ते काम स्पीडअप होण्यासाठी तुम्ही तुमच्या ऑफिसरची मिटींग घ्यावी आणि त्याच्यामध्ये एकटया शिंपीना नगररचनाकडून नेमणुक केलेली आहे तरी त्याच्यामध्ये बारकाईने लवकरात लवकर लक्ष घालून हे काम स्पीडअप करण्याची गरज आहे.

मा.राहूल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. या विषयाचे पाठीमागे अपॉईंटेड अधिकारी पण आहेत परंतु हा विषय तसा महत्वाचा आहे, जीबीलाही उशिर झालेला आहे तरी या विषयाशी संबंधित विस्तृत पणे माहीती दिली गेली पाहीजे. आज तुम्ही विषय मंजूर करा परंतु याची माहीती सभागृहाला सर्वाना दया कारण प्रत्येकाच्या ऐरीयामध्ये काही काही भाग प्राधिकरणाचा आहे की जो महापालिकेकडे वर्ग झाला आहे, धन्यवाद.

मा.महापौर – विषय क्रमांक १० उपसूचनेसहीत मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७१८ विषय क्रमांक – १०

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.नरवि/कावि/१६/५७६/२०२१ दि.३०/०९/२०२१

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ सह कलम ३८ अन्वये सुधारित विकास योजना तयार करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा. महापालिका सभा ठराव क्र. ४५३, दि. ०७/०९/२०१९ व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने ठराव क्र. ३४०/१७, दि. ०९/०७/२०१९ रोजी इरादा जाहिर केला आहे. सदर इरादा महाराष्ट्र शासन राजपत्र पुणे विभाग, पुणे पुरवणीमध्ये पृष्ठ क्रमांक १ ते ३ दि. २०/११/२०१९ अन्वये प्रसिध्द झाला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची विकास योजना दुस-यांदा सुधारित करण्याची कार्यवाही शासन नियुक्त उपसंचालक, नगररचना, विकास योजना विशेष घटक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण या कर्यालयामार्फत करण्यात येत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २५ अन्वये जमिनीचे सर्वेक्षण करणे व त्या क्षेत्राचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणेसाठी

खाजगी तज्ञ संस्था एच.सी.पी.डिसाईन,प्लॅनिंग अँड मॅनेजमेंट, अहमदाबाद यांची नेमणूक केलेली आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस-१८२१/२२१/प्र.क्र.४३/२०२१/नवि-१३, दि.०७/०६/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण विसर्जित करण्यात येऊन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणमध्ये व पिंपरी चिंचवड महानगरपालिकामध्ये विलीन करण्यात आलेले आहे. सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक, पुणे विभागीय पुरवणी मध्ये दि. ११ जून २०२१ रोजी प्रसिध्द झाली आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विसर्जित झालेल्या क्षेत्रापैकी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची ३७५.९० हेक्टर क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण व उर्वरित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१ब) नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरणाने अधिसूचित क्षेत्रासाठी भूमापन करून विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणे तसेच प्रस्तावित जमीन वापर नकाशा तयार करणे अपेक्षित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका विशेषनियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेल्या क्षेत्राची विकास योजना तयार करण्यासाठी महानगरपालिकेचा सर्वसाधारण सभेचा ठराव व पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. तरी महानगरपालिकेला नियुक्त केलेल्या क्षेत्रासाठी वेगळा सर्वसाधारण सभेचा ठराव पारित करण्यात यावे असे संदर्भिय पत्रान्वये विकास योजना विशेष घटक पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी महानगरपालिकेस कळविले आहे.

सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१) अन्वये शासनाचे दि.०७/०६/२०२१ रोजीचे अधिसूचनेनुसार पिंपरी चिंचवड क्षेत्रासाठी महानगरपालिका विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त असलेल्या अधिसूचित भूमापन करून विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणे तदअनुषंगिक पुढील विहीत वैधानिक कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच राज्य शासनाने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण बरखास्त केले असून प्राधिकरण क्षेत्रातील विकसित पेठा व अतिक्रमण झालेले क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले आहे. प्राधिकरण क्षेत्रातील व विशेष करुन पेठ क्रं. १ ते १३ या भागातील विकसित इमारतीचे Conveyance Deed अदयापही झालेले नाही. तसेच सदर क्षेत्रातील सदनिका हस्तांतरीत करताना यापूर्वी प्राधिकरणाकडून भरमसाट हस्तांतरण शुल्क आकारले जात होते. एकाच सदनिकेचे एका पेक्षा जास्त वेळा हस्तांतरण होताना देखील प्रत्येक हस्तांतरणाच्या वेळी हस्तांतरण शुल्क आकारले जात होते. तरी नागरिकांच्या हितासाठी प्राधिकरण क्षेत्रातील विकसित इमारतींचे Conveyance Deed करण्यासाठीची प्रक्रिया सोपी करण्यात यावी व Conveyance Deed करताना कोणताही अधिभार लावू नये आणि नाममात्र दराने हस्तांतरण शुल्क आकारण्यात यावे यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७१९ विषय क्रमांक – ११

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र स्वभाअक/१/कावि/१४३/ २०२१दि.४/१०/२०२१

शासन निर्णय नगर विकास विभागाकडील क्र. स्वअम २०१५/प्र.क्र. २३/ नवि ३४ दिनांक १५ मे २०१५ नुसार संपुर्ण राज्यामध्ये मिशन मोड पध्दतीने अभियान सुरु करण्यात आलेले आहे. या अभियानाअंतर्गत सर्व शहरे हागणदारी मुक्त करणे व घनकचरा व्यवस्थापनांतर्गत स्वच्छ करणे या दोन मुख्य बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. स्वच्छ भारत अभियान कार्यक्रमा अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्वच्छ सर्वेक्षण २०२२ ची अंमलबजावणी करीत आहे त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहराची हागणदारी मुक्त शहराचे पुढील उददीष्ट वॉटर प्लस व कचरामुक्त शहराचे स्टार रेंटींग जाहिर करणे आवश्यक आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरास वॉटर प्लस व कचरामुक्त शहरांच्या सात तारांकित नामांकन (7 स्टार रँकीग) कचरा मुक्त शहर (गारबेज फ्री सिटी) करीता केंद्र शासनाने तयार केलेल्या नियमावली, मार्गदर्शक सुचना व कार्यपध्दतीनुसार उपाययोजना करीत आहे. पिंपरी चिंचवड शहरातील घरोघरी कचरा संकलन करणे, घरोघरी कच-याचे वर्गीकरण करणे, कच-याची वाहतूक करणे व प्रक्रिया करणे करीता केलेली व्यवस्था, गटर, नाले व सार्वजनिक स्वच्छता, स्वच्छता ऍपचा वापर, प्लास्टिक बंदी कार्यवाही तसेच ५०० टीपीडी चे मॅकेनिकल कंपोस्ट प्लॉन्ट, ५ टीपीडी प्लास्टीक टू फयुअल ची व्यवस्था केलेली आहे.

वॉटर प्लस करीता करीता केंद्र शासनाने तयार केलेल्या नियमावली, मार्गदर्शक सुचना व कार्यपध्दतीनुसार उपाययोजना करीत आहे. सांडपाणी, भुयारी गटारे यांची व्यवस्था आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता प्लॅंट उभारण्यात आले आहेत. शहर पातळीवर सांडपाण्यावर प्रक्रिया करुन किमान २५% पाण्याचा पुर्नवापर जसे बांधकाम, फलोत्पादन, उदयान, रस्ते साफसफाई इ. करीता वापर केला जातो. ड्रेनेज लाईन सुस्थितीत असुन त्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात येते.

याबाबत जनतेकडुन हरकती व सूचना १५ दिवसांच्या कालावधीत मागवुन घेऊन प्राप्त हरकती व सूचनांची पडताळणी करुन घेऊन मानंकाबाबत समाधान असल्याचा प्रस्ताव शासनास सादर करेल व मानांकनासाठी शासनाने दिलेल्या स्वयंघोषणा करावयाची आहे.

सबब, पिंपरी चिंचवड शहर सात तारांकित नामांकन (7 स्टार रँकीग) व वॉटर प्लस प्रमाणिकरण करीता शासनाने नमुद केलेले सर्व नियम पुर्ण करीत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अंतर्गत सात तारांकीत नामांकन (7 स्टार रँकीग) कचरा मुक्त शहर व वॉटर प्लस शहर म्हणुन मान्यता देणेत येत आहे.

मा.हर्षल ढोरे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७२० विषय क्रमांक – १२

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र वैद्य/०९/कावि/४८२८/२०२१ दि. ४/१०/२०२१

महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुचा COVID -19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कामकाजाचे नियोजन करून उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यानुषंगाने COVID -19 चे संदर्भात शासनाकडून किंवा शासकिय अधिका-याकडून प्राप्त झालेले शासन निर्णय, आदेश, निर्देश, अधिसूचना, परिपत्रके, पत्रे मा. महापालिका सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार वैद्यकीय विभागाकडे सोबतचे प्रपत्र "**अ**" नुसार COVID -19 चे संदर्भात शासनाकडून किंवा शासकिय अधिका-याकडून प्राप्त झालेले शासन निर्णय, आदेश, निर्देश, अधिसूचना, परिपत्रके, पत्रे आदींची माहिती सन्मा. सदस्यांना होणेकामी सभा कामकाज नियमातील तरतुदीनुसार शासनाकडून किंवा शासकिय अधिका-याकडून प्राप्त झालेली पत्रे मा. महापालिका सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेबाबत.

महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुचा COVID -19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कामकाजाचे नियोजन करून उपाययोजना करण्यात येत आहेत. नगरसचिव विभागाकडील पत्र क्र. नस/४/कावी/२८९/२०२१ दि. ८/६/२०२१ अन्वये सन्मा. सदस्यांनी मागणी केलेनुसार COVID -19 संदर्भातील शासनाकडील आदेश, परिपत्रके, पत्रे मा. महापालिका सभेपुढे ठेवणेकामी नगरसचिव विभागाकडे सादर करणेकामी कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार COVID -19 चे संदर्भात शासनाकडून किंवा शासकिय अधिका-याकडून प्राप्त झालेले शासन निर्णय, आदेश, निर्देश, अधिसूचना, परिपत्रके, पत्रे मा. महापालिका सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने वैद्यकीय विभागाकडे सोबतचे प्रपत्र "**अ**" नुसार COVID -19 चे संदर्भात शासनाकडून

किंवा शासकिय अधिका-याकडून प्राप्त झालेले शासन निर्णय, आदेश, निर्देश, अधिसूचना, परिपत्रके, पत्रे इत्यादीचे अवलोकन करणेत येत आहे.

मा.हर्षल ढोरे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १३

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अमुका/३/कावि/१७३/२०२१ दि. ५/१०/२०२१

मा.महापालिका सभा ठराव क्र. ६९६ दि.२०/०९/२०२१ अन्वये यांत्रिकीकरणाद्वारे साफसफाईचा विषय प्रशासकीय मान्यतेकामी माहे ऑक्टोबर महिन्याचे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच जुन्या आरएफपी मधील ४ पॅकेज ऐवजी २ पॅकेजमध्ये शहरातील रस्त्यांची विभागणी करुन सुधारित आरएफपी मसुदा तयार करण्यास व खर्चामध्ये कपात करुन यंत्रे आणि मनुष्यबळाची फेररचना करण्यात यावी असेही ठरावामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

त्यानुसार आरएफपी मसुद्यामध्ये बदल करुन सुधारित आरएफपी तयार करण्यात आलेला असून आरएफपी मध्ये असलेली रचना व खर्च यामध्ये बदल झालेला आहे. नविन आरएफपी मसुद्यामध्ये असलेल्या करण्यात आलेला बदलांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

सदर कामकाजाकरिता नियुक्त सल्लागार संस्था मे.टंडन अर्बनन सोल्युशन्स प्रा.लि. यांचेमार्फत सुधारित आरएफपी मसुदा तयार करण्यात आलेला असून त्यानुसार शहरातील १८.०० मी. पेक्षा मोठ्या रस्त्यांची २ भागांमध्ये विभागणी करण्यात आलेली असून त्यामध्ये Southern side of head office व Northern side of head office चे प्रत्येकी १ पॅकेज अशा रितीने २ पॅकेज निश्चित करण्यात आलेले आहे.

पॅकेज क्र. १ करिता ३३१ किमी व पॅकेज क्र. २ करिता ३३९.१५ किमी, इतकी रस्त्याची लांबी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे शहरातील एकत्रित रस्त्यांची अंदाजित लांबी (Sweeping Length)६७०.१५ गृहीत धरण्यात आलेली आहे. यामध्ये शहरातील

महामार्ग, बीआरटी मार्ग व १८.०० मी. पेक्षा रस्त्यांची लांबी गृहीत धरण्यात आलेली आहे. यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या वाहनांची व मनुष्यबळा बाबतची माहिती आरएफपी मध्ये समाविष्ट करण्यात आलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

**Package 1: - Southern side of Head Office**

| Heavy Vehicle (5-6 M3) | Medium Vehicle (2.5-3.5 M3) | Gobbler / Litter Picker | Total Vehicles | Hook loader / Compactor | Water Tanker (10000 L) |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4 | 8 | 16 | 3 | 2 |

**Proposed Manpower Deployment**

| Sweeper | Driver | Operator | Helper | Total |
|---|---|---|---|---|
| 150 | 16 | 20 | 5 | 191 |

**Package 2: - Northern side of Head Office**

| Heavy Vehicle (5-6 M3) | Medium Vehicle (2.5-3.5 M3) | Gobbler / Litter Picker | Total Vehicles | Hook loader / Compactor | Water Tanker (10000 L) |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4 | 8 | 16 | 3 | 2 |

**Proposed Manpower Deployment**

| Sweeper | Driver | Operator | Helper | Total |
|---|---|---|---|---|
| 150 | 16 | 20 | 5 | 191 |

सदर निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असून त्याकरिता अंदाजे र.रु.३६२.०४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तथापि, निविदा प्रक्रिया राबविण्या करिता खालील बाबींची पूर्तता करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

1. निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार असे दायित्व पत्करण्यापूर्वी मा.महापालिका सभेची मंजूरी घेण्याचे प्रावधान आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार मा.महापालिका सभेची अंदाजित र.रु. ३६२.०४ कोटी अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.
2. मा.महापालिका सभेमार्फत प्रशासकीय मान्यता घेण्यात आल्यानंतर आरएफपी मसुद्यामध्ये निविदा प्रक्रियेपूर्वी अथवा निविदा प्रक्रिये दरम्यान काही बदल करणे आवश्यक असल्यास उदा.मनुष्यबळ, वाहनसंख्या, अंदाजित / प्रत्यक्ष खर्च इ. सदर बदल करण्याचे अधिकार आयुक्तांना राहतील.
3. निविदा प्रक्रियेअंती निश्चित होणा-या दरास व संविदेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक राहील.

सबब, शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळया जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजा करिता तयार करण्यात आलेल्या निविदा / आरएफपी नुसार ७ वर्षे कालावधीकरिता निविदा प्रक्रिया राबविणेकामी व त्यापोटी होणा-या अंदाजे र.रु.३६२.०४ कोटींच्या अथवा प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यतेकामी प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (ब) नुसार मा.महापालिका सभेची मान्यता देणेत यावी.

मा.हर्षल ढोरे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सागर आंगोळकर - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक - ७२१ विषय क्रमांक – १३

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अमुका/३/कावि/१७३/२०२१ दि. ५/१०/२०२१

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १४

दिनांक – २०/१०/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.आमुका/२/कावि/२८१/२०२१ दि.२/१०/२०२१

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेमार्फत राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदा / नगरपंचायतींमध्ये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी लागू करण्याबाबत दि.११ जुलै २०१९ रोजी शासन निर्णय निर्गत करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्य शासनामार्फत तयार करण्यात आलेले उपविधी आदेशाचे दिनांकापासून राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायतींसाठी लागू झालेले असून त्याकरिता महापालिका सभा ठरावाची अथवा स्वतंत्र मान्यता घेण्याची आवश्यक नसल्याचे त्यामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयानुसार दि.१ जुलै २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेची अंमलबावणी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

सदर शुल्क व शास्ती लागू झाल्यानंतर जमा होणारी शुल्काची रक्कम भरणा करण्याकरिता विभागाकडे लेखाशिर्ष उपलब्ध नसल्यामुळे आरोग्य मुख्य कार्यालयामध्ये उपयोगकर्ता शुल्क वसुली साठी नविन लेखाशिर्ष तयार करणे आवश्यक आहे.

सबब नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेमार्फत दि.११ जुलै २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायतींमध्ये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), अन्वये लागू करण्यात आलेले स्वच्छता व आरोग्य उपविधी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकरिता लागू करणेकामी तसेच कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन केल्यापोटी निर्धारित शास्तीच्या रकमेचा भरणा करणेकामी “उपयोगकर्ता शुल्क वसुली व शास्ती” या नावाने नविन लेखाशिर्ष निर्माण करणेस मान्यता देणेत यावी.

मा.हर्षल ढोरे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड शहरमध्ये विविध खेळांच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा विकसीत करण्यात आलेल्या आहेत. सदर सुविधांचा वापर शहरातील खेळाडू व नागरिक घेत असतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरामध्ये खेळ संस्कृती रूजविण्यासाठी व शहराचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकण्यासाठी शहरामध्ये ज्या खेळांच्या सुविधा उपलब्ध आहेत अशा खेळांच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धांचे आयोजन करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा आयोजीत

केल्यास शहरातील उदयोन्मुख खेळाडूंना त्याचा लाभ होण्यास मदत होईल व खेळाचा प्रसार होईल.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेकामी येणा-या विविध खर्चांसाठी खालील प्रमाणे "राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा" असे नव्याने लेखाशिर्ष तयार करून त्यावर आवश्यक तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | मुख्य अंदाजपत्रक -२ | | सन २०२१-२२ चा मुळ अंदाज | वर्गीकरण व आवश्यकतेनुसार होणारी | | सुधारीत तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पान क्र. | अ.क्र. | | वाढ | घट | | |
| १ | क्रीडा विभांतर्गत नाविण्यपुर्ण सुविधा उपक्रम राबविणे | क्रीडा विभांतर्गत नाविण्यपुर्ण सुविधा उपक्रम राबविणे | १७८-१७९ | १७ | २०००००००० | ० | ९५०००००० | १०५०००००० | सदर कामासाठी असलेली तरतूद पुरेशी आहे. |
| २ | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने तरतूद वर्ग करणे | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा | नविन | नविन | ० | ९५०००००० | ० | ९५०००००० | राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे. |
| एकुण र.रू. | | | | | २०००००००० | ९५०००००० | ९५०००००० | २०००००००० | |

तरी वरिल प्रमाणे "राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा" हे लेखाशिर्ष नव्याने तयार करून "क्रीडा विभांतर्गत नाविण्यपुर्ण सुविधा उपक्रम राबविणे" या लेखाशिर्षावर केलेल्या तरतूद र.रू.२०००००००० मधून "राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा" या लेखाशिर्षावर तरतूद र.रू.९५०००००० वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

